
# काही रंग काही रेषा



डॉ. निर्मलकुमार फडकुले

# काही रंग : काही रेषा

निर्मलकुमार फडकुले

मेहता पब्लिशिंग हाऊस,
पुणे

प्रकाशक :
अनिलकुमार मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस
धनश्री अपार्टमेंट्स
१२१६ सदाशिव
पुणे ३०.

© निर्मलकुमार फडकुले

प्रथमावृत्ती :
मे १९८६

मूल्य :
रुपये ४०

मुद्रक :
ज. ता. गायकवाड
मायबोली प्रिंटर्स
४०५/१ नारायण पेठ
पुणे ३०.

मांडणी : मुखपृष्ठ
रविमुकुल

'काही रंग काही रेषा' हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक १९८६ साली 'मेहता पब्लिशिंग हाऊस' यांनी प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

ajitphadkule@hotmail.com

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# काही रंग काही रेषा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

**माझ्यावर प्रेम करणाऱ्या**

**माझ्या विद्यार्थी मित्रांना....**

त्यांच्यामुळेच

मी लिहीत आणि बोलत राहिलो

## काही शब्द....

साहित्यविषयक चौदा लेखांचा हा संग्रह यातील लेख अनेक नियतकालिकांतून गेल्या दोनतीन वर्षांत प्रकाशित झाले. काही लेखांचे मी संस्करण केलेआहे.

रसिक मनाला साहित्य अनेक पातळयांवरून आवाहन करू शकते. काही साहित्यकृती काळाच्या ओघातही अभंग राहतात. त्यांचे सामर्थ्य असे असते की जीवनावर नवनवीन संदर्भात त्या प्रकाश टाकतात आणि नवी आव्हाने देऊ शकतात. अशा साहित्यकृतींचा मागोवा घेण्यात एक विलक्षण आनंद वाटत असतो यात शंका नाही. संतवाङ्मयापासून आज निर्माण होत असलेल्या दलित, शोषितांच्या वाङ्मया-पर्यंत कितीतरी भिन्न भिन्न प्रवाह साहित्याच्या प्रांतात वाहात राहिले. त्यांच्या स्वरू-पाची व त्यांनी समाजमनाशी साधलेल्या संवादाची चर्चा करण्यातला एक आगळा आनंद या लेखनातून मला लाभला. सावरकर, गडकरी, फुले यांच्या साहित्यातून काही नित्यनूतन असे भावविचारांचे सौंदर्य आपल्याला जाणवत राहते. त्याचे मूळ शोधण्याचा मी माझ्यापरीने येथे प्रयत्न केला. साहित्यातून आढळणाऱ्या जीवन-चित्रातल्या काही रंगांची व रेषांची मला मनःपूर्वक दखल घ्यावीशी वाटली. विविध प्रकारच्या रंगगंधांचे मिश्रण साहित्यात, होत असल्यामुळे त्याचे दर्शन विचारी मनाला चालना देते. या लेखांच्या माध्यमातून मी माझी मते काहीशी आग्रहपूर्वक मांडली असली तरी प्रामाणिक मतभेदांना अवसर असू शकतो हे मला मान्य आहे. साहित्य आणि समाज यांच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा हा एक माझा नम्र प्रयत्न आहे. चिंतनाच्या सुगंधी वाटेने जाताना जे रंग माझ्या मनाला दिसले त्यांचा सुखानुभव काही रसिकांना मिळावा इतकाच या लेखनाचा हेतू आहे.

माझे साहित्यप्रेमी मित्र व मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक श्री. अनिल-कुमार मेहता यांनी केवळ स्नेहभावाने हा लेखसंग्रह प्रकाशित करण्याची जबाबदारी घतली. त्यांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

— **निर्मलकुमार फडकुले**

## अनुक्रम

कामगंडाने पछाडलेली नाटके । १
साहित्यात ' माणूस ' हवा । १०
ग्रामीण साहित्याचा आत्मा । २०
विद्रोही जाणिवांचा पेटता आविष्कार । २८
साहित्य आणि जीवनवेध । ३८
म. फुले यांच्या साहित्यातील क्रांतिधारा । ४७
शृंगारवेल ' कमला ' । ५८
सावरकर : बलोद्धत शैलीचा निबंधकार । ६८
' वाग्वैजयंती ' जुनी झाली काय ? । ९७
गडकऱ्यांची विलोभनीय नाट्यशैली । ८९
रामदासांची ' समर्थ ' जीवनदृष्टी । १०२
सामाजिक समता आणि संत । १२१
साहित्यिक स्वतंत्र आहेत काय ? । १३२

# कामगंडाने पछाडलेली नाटके

स्वतःला शेक्स्पिअरचा अवतार मानणाऱ्या एका तथाकथित नाटककाराच्या नवीन नाटकात अनेक बीभत्स, ओंगळ दृश्ये होती. संवाद घाणेरडे होते. नाटकाच्या नावापासूनच दुर्गंधाला सुरुवात झाली होती. त्याच्या नाट्यकृतीवर जोराचा हल्ला चढवल्यानंतर तो शेक्स्पिअरचा वंशज आपली कैफियत माझ्यापुढे आवेशाने मांडू लागला.

'तुम्ही टीकाकार सोवळ्या सांप्रदायिक दृष्टीनं नाटकाकडं पाहता. खरं तर जीवनाचं स्पष्ट आणि सत्य दर्शन रंगभूमीवर घडवणं हाच नाटकाचा धर्म असतो. माणसाच्या लैंगिक जीवनाचं आम्ही प्रामाणिक चित्रण केलं तर तुम्हा नीतिमार्तंडांना संताप का यावा हे कळत नाही. तुम्ही लेखकाचं स्वातंत्र्य मानता ना? वाङ्मयाचं आणि जीवनाचं नातं अतूट असताना, जे जे जीवनात सापडतं ते ते आमच्या नाटकात अवतीर्ण झालं तर तुमचा पित्तप्रकोप का व्हावा? साहित्यानं केवळ सोवळी आणि बुळबुळीत भावनांची सांकेतिक चित्रं रंगवीत बसावं ही भूमिकाच आम्हाला मान्य नाही. आमची लेखणी बंडखोर आहे. स्त्री-पुरुषांच्या स्वैर संबंधातलं नाट्य कमालीच्या धैर्यानं आम्ही रंगभूमीवर आणलं आहे. जे तुमच्या गडकरी–खाडिलकरांना जमलं नाही ते आम्ही करीत असताना, टीकाकारांची वक्र दृष्टी आमच्याकडं का वळावी हे कळत नाही. दुसरं असं की, या नाटकांना प्रेक्षक गर्दी करतात. त्यांना ती आवडतात. प्रेक्षकांची मागणी प्रचंड प्रमाणात आहे याचा अर्थ, वास्तवजीवनाचे दर्शन घेण्याची त्यांची इच्छा आम्ही नव्या दमाचे नाटककार आमच्या शक्तीप्रमाणं पुरी करीत आहोत. टीकाकारांना मात्र सांकेतिकतेच्या पलीकडं जाण्याचं धारिष्टय नसतं. पण त्यांच्या टीकेची दखल न घेता आमची नाटकं आम्ही करीतच राहू.'

त्या ग्रामशेक्सपिअरचे आवेशपूर्ण वक्तृत्व ऐकून माझी उत्तम करमणूक झाली. हास्यास्पद, भुसभुशीत युक्तिवादांनी तो स्वतःच्या गलिच्छ नाटकांची तरफदारी कर-

ण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत होता. 'साहित्याचा धर्म', 'संकेतनिष्ठा', 'जीवनाचे वास्तव दर्शन' वगैरे शब्दांचा भोंगळ वापर त्याने केला होता. आणि अखेर प्रेक्षकांच्या प्रचंड मागणीचाही उल्लेख करून आपल्या लेखनाचे तो समर्थन करीत होता. गमतीची गोष्ट अशी की, 'पोटाचा धंदा' म्हणून घाणेरडी नाटके लिहीत बसलेले हे लोक स्वतःला कालिदास, भवभूतीच्या जातकुळीतले मानीत होते. एकाने तर चक्क भवभूतीच्या चालीवर असे सुनावले की, 'आज जरी तुम्ही आमच्या नाट्यकृतींवर तुटून पडत असलात तरी एक दिवस तुमचे हात आमच्या गळ्यांत हार घालण्यासाठी पुढे सरसावतील.' असल्या साहसी विधानांचे मूळ अभिजात मूर्खपणात असते यात संशय नाही. सवंग अभिरुचीच्या लोकांनी गर्दी केली आणि एकदोन ठिकाणी टाळ्या दिल्या, की नाट्यकृतीला असामान्य यश लाभले असे मानणाऱ्यांची दया येते. कालिदासाने म्हटले आहे—

आपरितोषाद् विदुषाम् न साधुमन्ये प्रयोग विज्ञानम् ।
बलवदपिशिक्षितानाम् आत्मन्यप्रत्ययं चेतः ॥

जाणकार रसिकांचे समाधान झाल्याशिवाय माझे नाटक यशस्वी झाले असे मी मानणार नाही. कविकुलगुरू कालिदासाचे हे मत. सर्वसाधारण प्रेक्षक आणि रसज्ञ, मर्मज्ञ प्रेक्षक यांच्यात तो फरक करतो. सामान्य माणसाने केलेली स्तुती आणि रसडोळस व्यक्तीने केलेली टीका यात कालिदासाला टीकाच महत्त्वाची वाटते. केवळ गर्दीच्या मागे धावत सुटलेला, गर्दीला खूष करण्यासाठी धडपडणारा लेखक 'कलावंत' असत नाही. तो एक धंदेवाईक ठेकेदार असतो. नाटकाचा साधारण प्रेक्षक आणि नाटकाचा रसिक प्रेक्षक यांच्यात महत्त्वाचे अंतर आहे. दुसरा मुद्दा असा की, लेखकाला जीवनाच्या कोणत्याही भागाचे, कोणत्याही बऱ्या-वाईट अनुभवाचे चित्रण करण्याचे मुक्त स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्यावर बंधने घालण्याचे काहीच कारण नाही. बंधनांच्या पलीकडे जाण्याची कलावंतांची ऊर्मी पूर्णपणे समर्थनीय आहे. सोवळ्या, आकुंचित वृत्तीने कोणी लेखकाच्या स्वातंत्र्याला अपशकुन करीत असेल, तर त्याचा निषेधच केला पाहिजे. पण शेक्सपिअरचा आव आणून स्वतःच्या गलिच्छ, सडक्या नाटकाचे समर्थन करताना लेखकांच्या स्वातंत्र्याचा उल्लेख करणे हास्यास्पद आहे. या लोकांचे खरोखरच स्वातंत्र्यावर प्रेम असते? कलेच्या प्रेमाने हे स्वातंत्र्याची तरफदारी करतात? 'नाटक हा एक केवळ धंदा' हीच यांची प्रमुख विचारसरणी असते. धंद्याच्या प्रेमानेच हे लोक नाटकाकडे वळलेले असतात यात शंका नाही.

सर्व साहित्यप्रकारांत नाटक हा अधिक रमणीय कलाप्रकार आहे असे मानले जाते. रंगभूमीवर प्रत्यक्ष जीवनच नाटकाच्या माध्यमातून प्रेक्षकांपुढे उभे राहाते. नाट्यानुभव घेणारा रसिक जीवनाचाच अनुभव घेत असतो. नाटकांतून जीवन वेगवेगळ्या रूपांत भेटते. पण याचा अर्थ रंगभूमीवर कोणतीही किळसवाणी दृश्ये बेदर-

कारपणे दाखवून 'हे मानवी जीवन आहे' असे त्यांचे समर्थन करणे शक्य आहे काय? समर्थ प्रतिभेचा नाटककार जीविताचे भेदक दर्शन उत्तम रीतीने घडवू शकतो. हॅम्लेटची व्यभिचारी आई ज्या सामर्थ्याने शेक्सपिअर रेखाटतो त्याच कुशलतेने निरागस डेस्डिमोनालाही तो समूर्त करतो. सिंधूसारख्या निष्ठावान स्त्रीचे उदात्त चित्र काढणारे गडकरी, तळीरामासारख्या निष्ठाहीन दारूबाजाचेही दुश्चित्र रंगवू शकतात. नाटकाने माणसाच्या मनातली सद्भावनेची अमृतवेल जशी दाखवावी, तशीच त्याच्या मनाचे गटारही उघडे करून दाखवावे. हे स्वातंत्र्य अर्थातच कलावंताला असते. माणसाच्या रूपात घाणेरड्या वासनांच्या वारुळातून फुंफाटत जाणारे विकारी सर्पही नाटकातून दिसावेत, केवळ उदात्त आणि मंगल भावनेचीच चित्रे रंगवण्यात अर्थ नाही. कारण माणसाचे आयुष्य केवळ मंगलही नाही, की केवळ अमंगलही नाही. त्यात चमत्कारिक सरमिसळ झाली आहे बऱ्याची आणि बुऱ्याची. सत् आणि असत् यांच्या संकराचेच अपत्य आहे मनुष्य. कोणताही विषय लेखकाच्या प्रतिभेला वर्ज्य नाही.

पण अलीकडे मराठी रंगभूमीवर लिंगपिसाट नाटकांची एक प्रचंड लाट येऊन आदळली आहे. या नाटकांतून आपण बीभत्स वास्तवाचे दर्शन घडवून कुजलेल्या, सडलेल्या समाजावर प्रकाशझोत टाकीत आहोत अशी वल्गना काही नाटकवाले करू लागले आहेत. खरे तर, हे नाट्यलेखक नवीन काहीच सांगत नसतात. नवीन आणि धक्कादायक सांगण्याची एक वेगळी कुवत असावी लागते. तो वकूब या अतिसामान्य लेखकूंच्या जवळ मुळातच नसतो. काहीतरी भडक प्रसंग पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांच्या पुढे एक ठराविक पद्धतीचा 'गरमागरम मसाला' तयार करून देणारे हे नाट्यक्षेत्रातले सुमार दर्जाचे आचारी असतात. एखादा नाट्यानुभव यांना कधीच झपाटून टाकीत नाही. कलावंताच्या दृष्टीने एखाद्या अनुभवाला सामोरे जाण्याची शक्ती यांच्यापाशी असत नाही. स्वतंत्र प्रसंगांची निर्मिती करून जीवनाचे स्वरूप-दर्शन घडविणे त्यांना शक्य नसते. कदाचित् आपल्या विचारदारिद्र्याची त्यांनाही जाणीव असावी. आपल्या सौंदर्यपूर्ण व्यक्तित्वाने आणि अभिनयाने रसिकांना मुग्ध करणारी अभिनेत्री कुठे! आणि देहाचे दुकान थाटून बाजारात बसलेली एखादी धंदेवाली कुठे! यांच्यात जेवढे अंतर, तेवढेच नाटककार आणि नाटकाच्या नावाखाली लेखणी झिजवीत बसलेला लेखणीमजूर या दोघांत असते. वास्तवदर्शन घडवण्याच्या नावाखाली हे लोक रंगभूमीवर काय दाखवतात? दारू पिऊन बेभान झालेले तीन–चार कामलंपट पुरुष एका स्त्रीवर लांडग्यासारखे कसे तुटून पडतात याचा बारीक–सारीक तपशील ते प्रेक्षकांपुढे ठेवतात. त्यांचे असभ्य, कामुक चाळे समोर मांडतात. बलात्काराचा विषय झालेल्या स्त्रीच्या उघड्या देहाचं जेवढं प्रदर्शन करता येईल, तितकं 'वास्तव' रीतीनं करतात. कित्येक वेळा या प्रसंगाचा त्या नाट्यवस्तूशी फारसा संबंधही असत नाही. असे प्रसंग ज्या नाटकात असतात त्यांना धड सुसंगत असं

कथानकही नसतं. दारूची बाटली आणि एखादी 'सेक्स अपील' असलेली बाई यांच्याभोवती ही नाटकं केवळ फेर धरीत असतात. स्त्रीचं शरीर हा केवळ निर्लज्ज उपभोगाचा विषय आहे आणि या विषयाचा आस्वाद घेताना नीती, संस्कृती, समाज, स्त्री-पुरुषांतील कौटुंबिक नाती वगैरे कसलाही सोवळा विचार करण्याचं कारण नाही. वासनेच्या पेटलेल्या भट्टीत सारी मूल्ये बिनदिक्कत फेकून द्यावीत असा 'महान क्रांती-कारक' आणि 'तेजस्वी' विचार या प्रकारच्या नाटकांतून प्रेक्षकांना मिळतो. निर्मात्याचा आणि लेखकाचा गल्ला भरतो. प्रेक्षकांनाही नवा 'धीट संस्कार' मिळतो. काही नाटकांतून तर समलिंगी संभोगाची वकिली केलेली आढळते. एका नाटकाने बाप आणि मुलगी, भाऊ आणि बहीण या नात्यांची घाणेरडी विटंबना केली आहे. प्रश्न असा आहे की, हेच 'वास्तवाचं दर्शन' आहे काय ? वास्तवतेशी इमान राखून लेखकांनी लिहावे याबद्दल वाद नाही. पण केवळ 'कासोटा फेडू' नाटके म्हणजच जीवनदर्शन घडवणारी वास्तव नाटके असे जे चमत्कारिक समर्थन केले जाते त्यात वैचारिक करंटेपणा आहे. मला एका प्रसिद्ध धंदेवाईक लेखकाने सांगितले की, त्याच्या नाटकात दर अंकात दोन बलात्कार आहेत. या बलात्कारांचे दृश्यही नावीन्यपूर्ण रीतीने दाखविण्यात येणार आहे. आपल्या 'कल्पकतेवर' खूष झालेल्या या 'युग-प्रवर्तक' लेखकाने गडकरी, खाडिलकर हे नाटककार आता जुनाट झाले असून त्यांना मानवी जीवनाचे 'यथातथ्य' आकलनच झाले नव्हते, असा शोध लावला आहे. मानवी मनाचे आणि जीवनाचे चित्र म्हणजे केवळ वासनांची उत्तान, अश्लील, बेबंद दृश्ये असे समजणे हा माणसाच्या मनाचा केवढा अपमान आहे ! मराठी रंगभूमीला आपण अधिक प्रभावी, प्रत्ययकारी बनवली असे हे मानतात. चार घाणेरडे देखावे सवंग करमणुकीसाठी दाखवीत राहाणं हा रंगदेवतेचा अपमान आहे. यात कलात्मकता आणि जीवनातली वास्तवता कुठं आहे ? ही शुद्ध दुकानदारी आहे आणि ती सुद्धा प्रामाणिक नव्हे.

रंगभूमीवर आलेली ही अश्लीलतेची लाट रंगभूमीच्या सामर्थ्याला नख लावीत आहे याची खंत वाटते. अशा नाटकांना नीतिवादी किंवा सोवळ्या दृष्टिकोनातून आपला विरोध असण्याचे कारण नाही. ही नाटके कलात्मकतेला, रसिकतेला आणि अभिरुचीलाच निर्लज्जपणे हरताळ लावीत आहेत. म्हणून या नाटकांना विरोध केला पाहिजे. बलात्कारासारखे अनैतिक दृश्यसुद्धा रंगभूमीवर आले तरी ते चालेल, पण ते बटबटीत नसावे. ते सूचक असले पाहिजे. नाट्यात्मकता आणि कलात्मकता यांच्या पातळीवर ते अपरिहार्य असेल तरच त्याला स्थान मिळू शकेल. हे दृश्य औचित्यपूर्ण संयमाचा वापर करून, प्रेक्षकांपर्यंत पोहोचवून, त्यांच्या मनाचा प्रक्षोभ घडवून आणता येईल. नाट्य ही एक कला असून नाट्यातली प्रत्येक कृती आणि उक्ती कलात्मक-तेच्या सीमेपर्यंत गेलीच पाहिजे.

कमीत कमी रेषा आणि रंग यांच्या साहाय्याने सुंदर चित्र रेखाटता येते. त्यासाठी

अतिरेकी भडक रंग ओतण्याचे काहीच कारण नसते. रंगांची उधळण करणारा चित्रकार कलेचे मर्म नीटपणे जाणीत नाही. जीवनाच्या एखाद्या अनैतिक अथवा घृणास्पद भागाचे असे सूचक प्रदर्शन रंगभूमीने घडवावे, की ते प्रेक्षकांच्या मनाला जाऊन भिडावे. आजची ' सेक्सी ' नाटके पाहताना असा प्रत्यय येतो काय ? वासनेची शिकार झालेली स्त्री, व्यभिचाराच्या भोवऱ्यात सापडलेली स्त्री किंवा पशुतुल्य बलात्काराचे भक्ष्य झालेली स्त्री हा सहानुभूतीचा आणि मनःप्रक्षोभाचा खरे तर विषय आहे. पण त्या दृष्टीने हा विषय रंगविला जात नाही. जिच्यावर बलात्कार होतो तिच्या उघडया देहाकडे पाहून प्रेक्षकांनीही आपल्या डोळयांचे पारणे फेडून घ्यावे आणि आपले पैसे वसूल झाल्याचे करंटे समाधान मानून बखवखलेल्या मनाने थिएटरमधून बाहेर पडावे, असाच धूर्त हिशेब करून ही ' हिट् ' आणि ' हॉट ' नाटके बेतलेली असतात. बलात्काराची घटना कितीतरी कलात्मक युक्त्या योजून सूचित करता येते. ही ढोबळ घटना मुद्दाम तपशीलाने दाखवण्याची कसलीही आवश्यकता असत नाही. पण बहुतेक लिंगवादी नाटके याच प्रसंगाभोवती फिरत असतात. त्यात धड साहित्यही नसते आणि जीवनही नसते. काळजाला हात घालील असा अर्थपूर्ण संवादही नसतो, की भावपूर्ण दृश्यही नसते. कंगाल कल्पनाशक्तीच्या कुबडया घेऊन नाटककार रंगभूमीवर लंगडत चालत असतो. ही नाटके कशीही खरडली जातात. जीवनविषयक जाणिवेचा कसलाली स्पर्श अशा नाटकांना झालेला नसतो. प्रेक्षकांनाही या नाटकांकडून अन्य कोणतीच अपेक्षा नसते. त्यांना फक्त विकृत दृश्ये पाहून एक प्रकारची ' किक् ' मिळवायची असते. अशा ' अभिरुचीचे ' प्रेक्षक अलीकडे वाढले आहेत. या वाढीची काही आर्थिक आणि सामाजिक कारणे सांगता येतील. मराठी रंगभूमीच्या वृक्षावर फोफावत चाललेली ही बांडगुळे सुजाण प्रेक्षकांनीच कापून टाकली पाहिजेत. आपल्या मरणाने ती मरतील असला उदार विचार या बांडगुळांच्या बाबतीत करण्याचे कारण नाही. चार दिवसांनी ही लाट विरून जाईल हे म्हणणेही मला भोंगळपणाचे वाटते. म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावतो अशी परिस्थिती आहे. कुठल्यातरी तालुक्याच्या गावात असलेच एक धंदेवाईक नाटक माझ्या एका कन्नडभाषी मित्राने पाहिले. त्याने मला पत्रातून कळवले, ' मराठी रंगभूमी किती समर्थ बनली आहे याचे मला आज दर्शन घडले. तमाशावरसुद्धा तुमच्या मराठी नाटकांनी आता ताण केली. तमाशात नुसतेच अशिष्ट हावभाव असतात. पण तुमचं मराठी नाटक आता ' प्रत्यक्ष कृतीच्या ' पातळीवर आलं आहे. गेल्या काही वर्षांत मराठी रंगभूमी ' वयात ' आली याची मला माहितीच नव्हती. '

तमाशाबरोबर या सेक्सी नाटकांची तुलना करण्यात काही अर्थ नाही. तमाशातला एक सोंगाडया परवा मला म्हणाला,

' तुम्ही सुशिक्षित माणसं तमाशा म्हटल्यावर नाकं मुरडता. आमच्या तमाशातली ' बाई ' कितीही नाचली, तरी तिच्या खांद्यावरचा पदर कधी ढळायचा नाही. पदराचं

भान तिचं कधी सुटायचं नाही. नाटकाबद्दल आम्ही काय बोलावं ? अंगावरचे कपडे काढून टाकण्याचीच चळवळ नाटकातल्या बायकांनी – सुशिक्षित नटींनी सुरू केलेली दिसते. तमाशा पार मागं पडला.'

त्या सोंगाड्याच्या म्हणण्यात निश्चितच तथ्य आहे. ज्यात जीवनचिंतन नाही, जिवंत व्यक्तिदर्शन नाही, संवादात आणि प्रसंगांत कलात्मकता नाही, केवळ इकडून तिकडन गोळा करून आणलेली काही गलिच्छ अर्थाची वाक्ये, दारूच्या बाटल्या, कपडे बदलण्याचे किंवा कपडे उतरण्याचे देखावे, संभोगाची दृश्ये या ठराविक फॉर्म्युल्यापलीकडे जाऊ शकत नसलेल्या हीन दर्जाच्या नाटकांनी रंगभूमीला घेरून टाकावे याची चिंता वाटते. ज्या रंगभूमीवर प्रतिभावंत लेखकांच्या नाट्यकलेने आपला सौंदर्याविष्कार केला, नाना रसभावनांचा प्रभाव पाडला, त्याच रंगभूमीवर आज 'कासोटा फेडू' नाटकांचा नंगा नाच सुरू झालेला पाहून, 'मुंग्यांनी मेरूपर्वत तर गिळला नाही ना ?' या संभाजीच्या प्रसिद्ध स्वगताची आठवण येते.

'ही नाटकं प्रेक्षकांना आवडतात ना ? ती पाहण्यासाठी ते गर्दी करतात ना ? मागणी आहे म्हणूनच त्यांचा पुरवठा केला पाहिजे. हे साधे अर्थशास्त्र तुम्हाला कळत नाही. कलामूल्य, प्रतिभा, गुणात्मकता, सुसंस्कृत अभिरुची वगैरे शब्दांचा अर्थही आम्हाला कळत नाही. प्रेक्षक पैसे मोजतात ते काहीतरी धुंदफुंद मिळावं म्हणून. आम्ही त्यांची मागणी पुरी करतो. हा सरळ व्यवहार आहे.' आपण केवळ व्यावसायिक दृष्टीनं रंगभूमीकडं वळलो हे त्यानं कबूल केलं. प्रामाणिक होता तो. पण कोणत्याही कलेनं आणि त्यातून नाट्यासारख्या संपन्न कलेनं वाचक-प्रेक्षकांची जीवनशक्ती संस्कारित केली पाहिजे या अपेक्षेचं काय होणार ? कोणतीही कला माणसाच्या संस्कृतीला आणि त्याच्या जाणीवबुद्धीला विकसित करणारी असावी. अशा कलेचा निर्माता कलावंत या संज्ञेला प्राप्त होतो. आजच्या रंगभूमीवर गलिच्छ कामुकतेने बरबटलेल्या नाटकांची लाट आली यांची जबाबदारी केवळ परिस्थितीवर टाकण्यात स्वारस्य नाही. परिस्थितीला कलाटणी देऊ शकणारे समर्थ नाटककार आज दृष्टीस पडत नाहीत. एक-दोन नावे वगळली, तर प्रेक्षकांना आपल्या प्रतिभेने खिळवून टाकणारा लेखक आढळत नाही. श्रेष्ठ नाटककार सहजासहजी जन्माला येत नाही हे मान्य केले तरी, आज नाट्यनिर्मिती करणाऱ्या अनेक लेखकांनी घसरत चाललेल्या लोकाभिरुचीचाच केविलवाणा अनुनय चालविला आहे. सुमार दर्जाची नाटके कोणत्या तरी नाट्यबाह्य कारणांनी लोकप्रिय होतात आणि लोकाभिरुचीच्या अधोगतीला चालना मिळत जाते. नाटकाची लोकप्रियता त्याच्या जीवनदर्शनक्षमतेवर आणि त्याच्या कलात्मक विशिष्टतेवर अवलंबून असली पाहिजे. पण सध्या लोकप्रियतेचे गणित उलट्या पद्धतीने मांडले जाते. जे चांगले ते लोकप्रिय या ऐवजी, जे लोकप्रिय तेच चांगले हे समीकरण दृढ झाले. याचा परिणाम लेखकांच्या अभिरुचीवरही झाला हे नाकारण्यात अर्थ नाही.

ही कामपिसाट नाटके रंगभूमीवर राजरोसपणे कशी येऊ शकतात ? महाराष्ट्र

शासनाचे एक रंगभूमी-प्रयोग-परिनिरीक्षण मंडळ अस्तित्वात असताना ही नाटके दंगल उडवीत आहेत याचा अर्थ काय ? असा प्रश्न कुणीही विचारील. परीक्षण मंडळ काटेकोरपणे नाटकाची संहिता तपासून पाहते. त्यातल्या बीभत्स, अश्लील दृश्यांना आणि संवादांना आक्षेप घेऊन तसा भाग नाटकांतून वगळण्यास भाग पाडते. नाटककार आणि निर्माता दोघेही आक्षेपार्ह भाग वगळूनच आम्ही नाटकाचा प्रयोग सादर करू असे लेखी वचनपत्र देतात. पण प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळी मात्र धंद्यात निपुण असलेले हे लोक आक्षेपार्ह दृश्ये आणि प्रसंग सादर करतात. मंडळाचे पंधरा-सोळा सदस्य गावोगावी होणारे नाटकांचे प्रयोग पाहू शकत नाहीत याचा नेमका गैरफायदा लेखक, निर्माते तत्परतेने घेतात. आचार्य अत्र्यांच्या 'लग्नाची बेडी' या विनोदप्रधान नाटकाचा अलीकडेच प्रयोग पाहिला. मूळ नाटकात नसलेले कितीतरी घाणेरडे शब्द व अश्लील वाक्ये विशिष्ट अंगविक्षेपांसह उच्चारून, एका तथाकथित विनोदी नटाने अत्र्यांच्या विनोदात आपल्या करंट्या बुद्धीला झेपेल अशी किळसवाणी भर घातली. तेव्हा मी थक्कच झालो. कलेची जाण नसलेल्या भिकार अभिरुचीच्या नट-दिग्दर्शकांच्या पाठीवर कोरडेच ओढले पाहिजेत. आचार्य अत्रे आज असते तर, त्यांनी या महाभागांची अधिक प्रभावी शब्दांमधून हजेरी घेतली असती. नाटक किंवा चित्रपट यांचे परीक्षण करणाऱ्या मंडळाच्या नियमांतून कुठे आणि कशा पळवाटा शोधायच्या हे या धूर्त व्यवहारपंडितांना अवगत असते. प्रत्येक ठिकाणी कायद्याचा वापर करता येत नाही; कारण कायदा हीसुद्धा एक बेभरवशाची लहरी शक्ती आहे. त्यामुळे कायदेशीर उपायांना देखील काही अंगभूत मर्यादा आहे. यावर उत्तम उपाय असा की, चांगल्या गुणवान नाटकांची प्रेक्षकांनीच मागणी करावी. एखाद्या नाटकात केवळ कामगंडाने पछाडलेल्या विकृत दृश्यांचा समावेश असेल तर, अशा गलिच्छ नाट्यप्रयोगांवर प्रेक्षकांनी बहिष्कार टाकावा. परवाच 'घाशीराम ड्रायव्हर' नामक एका दरिद्री नाटकाचा किळसवाणा प्रयोग औरंगाबादच्या काही सुविद्य भगिनींनी बंद पाडला. त्याचा परिणाम असा झाला, की त्या शहरात या ड्रायव्हरला पुन्हा आश्रय मिळाला नाही. सुजाण प्रेक्षक-अभिरुचीला जपणारा, कलागुणांची जाण असणारा प्रेक्षकवर्ग थोडा असला तरी त्याचा नाट्यक्षेत्रात नैतिक दबाव असतो हे नाकारता येत नाही; म्हणूनच कालिदासासारखा अभिजात नाटककार मर्मज्ञ रसिकांच्या रसिकतेला कौल लावतो. आणि त्यांच्या मान्यतेची इच्छा करतो.

या 'हिट् आणि हॉट्' नाटकांनी रंगभूमीला बाजारी बनवून प्रेक्षकांच्या अभिरुचीवर 'बलात्कार' केला यात शंकाच नाही. रंगभूमीवर येणाऱ्या नाटकाला जो किमान कलात्मक दर्जा होता तो ढासळत चालला. नाट्य कशाशी खातात, अभिनय म्हणजे काय, नाटकाला वाङ्मयीन मूल्य असावे याचा अर्थ काय, याची ज्यांना कल्पनाही नाही ते नाटककार म्हणून मिरवू लागले. त्यांच्या मिरवण्यावर आमचा आक्षेप नाही. वाङ्मयीन मूल्यांना यामुळे निर्वासित व्हावे लागत आहे याचा खेद

वाटतो. पण ही हानी काहीच नव्हे असा एक भयानक प्रकार या नाटकांमुळे होत आहे. सामाजिक दृष्टया तो अधिक चिंताजनक आहे. आपल्या समाजमनावर यामुळे जो विदारक, विकृत प्रकाश पडतो त्याची दखल जाणकारांनी घेतली पाहिजे.

या वखवखलेल्या नाटकांचे प्रमुख भांडवल म्हणजे स्त्रीचे शरीर. एखाद्या पुष्ट तरुणीच्या देहसौष्ठवाचे भडक प्रदर्शन करून, आपल्या थाळीत पैसे जमा करायचे हा या नाटकांचा उद्देश. स्त्री हा एक सवंग करमणुकीचा, उपभोगाचा, वेळ घालवण्याचा, एक फावल्या वेळेचा विषय आहे. स्त्रीचे सारेच आयुष्य केवळ पुरुषाच्या वासनापूर्तीसाठी वाहिलेले असते-असावे यापेक्षा तिच्या आशा-आकांक्षांना काही अर्थ नाही. तिला स्वतःचे व्यक्तित्व, मन असे काही असते असे नाही. पुरुषवासनेच्या कुंडात आहुती टाकण्यासाठी स्त्रीचे जीवन आहे, हीच अत्यंत रोगट भूमिका घेऊन ही नाटके लिहिली जातात. मानवी संस्कृतीत स्त्रीची उपयुक्तता एवढीच असते असा परिणाम अशा प्रकारची नाटके पाहून सामान्य माणसावर होतो. या कंगाल नाटकांमुळे कोवळ्या तरुणांच्या मनाची काय अवस्था होत असेल याची कल्पना येते. साऱ्या स्त्रीजातीचीच निर्लज्ज विटंबना करणाऱ्या या नाटकांचे सामाजिक परिणाम फारच गंभीर होत आहेत. स्त्री ही शृंगारमूर्ती आहे असे मानले तरी, शृंगारभावनेतले उत्कट माधुर्य आणि सौंदर्य प्रकट करणारी कित्येक नाटके रंगभूमीवर आली आहेत. या नाट्यकृतींनी स्त्रीत्वाची प्रतिष्ठा कमी केली नाही. स्त्रीच्या व्यक्तित्वात आढळणाऱ्या अनेक वैशिष्ट्यांचा साहित्यात, काव्यात आविष्कार होत असतो. मनुष्यजीवनात स्त्रीस्पर्शाने सुखाचे, स्वारस्याचे, लालित्याचे अनेक तरंग निर्माण केले यात संदेह नाही. पण याचा अर्थ स्त्री म्हणजे केवळ पाशवी वासनातृप्तीचे एक तात्पुरते साधन असे समजून, स्त्रीत्वाचा बाजार मांडणाऱ्या नाटकांनी रंगभूमीवर जो असंस्कृत धिंगाणा चालवला आहे तो समर्थनीय किंवा क्षम्य नव्हे. स्त्री ही देवताही नव्हे, की राक्षसही नव्हे. ती एक माणूसच आहे. तिचा आत्यंतिक गौरव जसा नको, तशीच तिची पराकोटीची अवहेलनाही चुकीची. विकृतीच्या लोलकातूनच स्त्रीकडे सदैव पाहाण्याची सवय असलेले रोगट जंतू समाजात पुष्कळ आहेत. या जंतूंच्या 'घाणेरड्या आनंदासाठी' तयार होत असलेली लिंगगंडात्मक नाटके चिमटीने धरून फेकून दिली पाहिजेत. बाईच्या शरीराचा बाजार मांडणारी नाटके हा मराठी संस्कृतीच्या मंदिरावर होणारा आघात आहे. तो आपण जागरूकतेने परतवलाच पाहिजे.

बाजारी, बीभत्स नाटकांचा निषेध करताना माझी भूमिका कोणत्याही अर्थाने आकुंचित, सोवळी नाही. ती कलापोषकच आहे. कलाकृती ही कलेच्या मूल्यांवर उभी असावी. तिने जीवनाचा खोलवर जाऊन शोध घ्यावा आणि जीवनावर कोणतेही भाष्य करावे अथवा करू नये. उत्तम कलाकृती मूक राहूनच जीवनभाष्य करीत असते. स्त्रीची अप्रतिष्ठा लंपट वृत्तीने दाखवणारी नाटके जीवनदर्शनाच्या हेतूतून निर्माण होत नाहीत, कलाप्रेमातून ती लिहिली जात नाहीत, फार काय, शृंगारभावनेचा

जयघोष करून ती भावना साऱ्या जीवनाला कशी प्रेरक ठरते हे दाखवण्यासाठीही असली नाटके केली जात नाहीत. कलावंताचा फसवा मुखवटा तोंडावर चढवलेले कलाद्रेष्टे लोक आपला ' धंदा ' राजरोसपणे करीत असल्यामुळेच ज्यांना संस्कृतीचे, जीवनाचे व कलेचे प्रेम आहे त्यांनी— रसिकांनी हा धंदा थांबवावा. तो थांबवण्याची नितांत आवश्यकता आहे.

□

# साहित्यात ‘ माणूस ’ हवा

लेखक का लिहितो ? या प्रश्नाचे उत्तर अनेक रीतींनी देता येईल. वाहणे हा जसा वाऱ्याचा किंवा झऱ्याचा धर्म आहे, फुलणे हा जसा फुलांचा स्वभाव आहे, तसेच लिहिणे ही लेखक-कवींची जन्मजात प्रवृत्ती आहे. जातिवंत लेखकाला लिहिल्याशिवाय राहवतच नाही. जे त्याला जाणवते, आवडते किंवा ज्या घटनांची व अनुभवांची त्याच्या मनावर तीव्र प्रतिक्रिया होते, ती शब्दांतून व्यक्त करण्याची अनावर ऊर्मी त्याला येते. आपल्या लेखणीने जीवनातल्या नानाविध रंगरूपांचा, वृत्तीप्रवृत्तींचा, सुख-दुःखांचा नेमका, समर्थ वेध घ्यावा असे त्याला उत्कटतेने वाटत असते. एका कवीने म्हटले आहे, ‘ जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे, गाणे सवेचि मग होय मनात जागे. ’ जीवनातील सौंदर्य, साधुत्व, सामर्थ्य, उदात्तत्व, यांचे दर्शन घडताच साहित्यिकाच्या हृदयातील सुप्त प्रतिभेचा झरा जागा होऊन खळखळून वाहू लागतो. तान्हुल्याला पाहताच आईच्या वात्सल्याला जाग यावी, किंवा कलावान बोटांचा स्पर्श झाला, की सतारीतील निद्रिस्त स्वर तारांतून झंकारित व्हावेत, त्याप्रमाणे जीवनाचे सारे चमत्कृतिपूर्ण, सुंदर आणि असुंदर विशेष लेखकाच्या प्रतिभेला आवाहन करीत असतात. आणि मग त्याची लेखणी रसभावनांनी पाझरू लागते. ही क्रिया मोठी विलक्षण आहे. जीवनाची अंगोपांगे, त्याचे सारे तपशील, त्याच्या साऱ्या छटा आपण टिपून घ्याव्यात आणि त्यांना शब्दांचे अवीट रंग द्यावेत हा साहित्यिकाला एक गूढ पण उत्कट ध्यास लागलेला असतो. चित्रकार, शिल्पकार, गायक आणि नर्तक आपापल्या कलांच्या माध्यमांतून जीवनालाच बिलगत असतात. जीवनालाच प्रकट करण्याचा प्रयत्न करीत असतात. माणसांचे विविध सुखदुःखांनी ओसंडून वाहाणारे हे जीवन हाच त्यांचा केन्द्रबिंदू असतो. या जीविता-भोवतीच सारे कलावंत, सारे लेखक आणि कवी उत्सुकतेने पिंगा घालीत असतात. पण जे जीवन आपल्या लेखणीने रेखाटावे असे त्यांना वाटते ते तर अनंत आहे, अपार आहे. कोणत्याही महान प्रतिभेला त्याचे सर्वांग दिसू शकले नाही. काय

चमत्कार आहे पहा ! शतकानुशतके नाटककार, कादंबरीकार आणि कवी या जीविता-संबंधी प्रचंड उत्साहाने लिहीत आहेत, पण म्हणून हे जीवन त्यांना सर्वस्वी सापडलें म्हणता काय ? प्रत्येकानेच अखेर आपलें हात त्याच्यासमोर निराशेने टेकले आहेत. आजपर्यंत महासागरातून कोट्यवधी मासे बाहेर काढण्यात आले. आणखी कित्येक सहस्रवर्षे ही क्रिया चालू राहिली तरी, महासागर काही रिता होणार नाही. जीवनाच्या अतिविशाल उदरात भावभावनांची, नानाविध रंगगंधांची अमाप संपत्ती साठवलेली आहे. कालिदास येवो, नाहीतर मिल्टन, शेक्सपीअर येवोत, त्यांच्या लेखण्या कितीही महान असल्या तरी, सारे जीवन पेलण्याची आणि चित्रित करण्याची त्यांच्यात कशी बरे क्षमता असेल ? त्यांची ओंजळ जेवढी असेल, तेवढेच पाणी त्यांना घेता येईल. आणि ते ओठापर्यंत नेताना बरेचसे गळूनही जाईल. कोणी एखादा लेखक सारे जीवन आपल्या कवेत घेऊ शकेल हे कधी तरी—स्वप्नात तरी शक्य आहे काय ? या जीवनाचा आणखी एक चमत्कार आहे. ते कधी थांबत नाही. त्याचे रहाटगाडगे युगे उलटली तरी अविराम गतीने फिरतच आहे. हे जीवन कधी शिळे होत नाही, कधी आटत नाही, कधी तुटत नाही आणि कधी विटत नाही. ते प्रतिक्षणी नवीन असते. नावीन्य आणि जीवन, गती आणि जीवन यांचे एक अभंग समीकरण होऊन बसले आहे. जीवनासारखे जातिवंत, जीवनासारखे सुखमय आणि जीवनासारखे दुःखमय दुसरे काय असेल बरे ! म्हणून तर, कितीही जगलो तरी जगण्याचा मोह सुटत नाही. महाकवी माघाने आपल्या ' शिशुपालवध ' काव्यात सौंदर्याची व्याख्या केली आहे. तो म्हणतो, ' प्रतिक्षणी ज्यात नवीनतेच्या भिन्न भिन्न छटा झळकतात तेच रूप सुंदरतेचे मानावे. ' या व्याख्येच्या चौकटीत जीवनाशिवाय दुसरे काय येऊ शकणार !

पण जीवन जसे रमणीय आहे, सुगंधाने भरलेले आहे तसेच ते भीषण आहे, घाणेरडेही आहे. ते दयाळू तसेच क्रूरही आहे. रस्त्याच्या कडेला लालभडक रंगाची, टपोरी गुलाबाची फुले विक्रीसाठी ठेवलेली होती. फुलांच्या पाकळ्या मुलायम होत्या. आकार आकर्षक होता. ती फुले घेण्यासाठी दोन-चार सुंदर तरुणी तेथे थांबल्या होत्या. कोणीही मोहित व्हावे असेच ते दृश्य होते. डोळ्यांना सुखविणारी आणि मनाला नाचविणारी ती गुलाबपुष्पे पाहिल्यावर एखाद्या कवीला कविता सुचली नाही तरच आश्चर्य ! पण चार पावले पुढे गेल्यानंतर त्याच रस्त्याच्या कडेला काही महा-रोगी भीक मागायला बसलेले आहेत, त्यांच्या जखमा वाहात आहेत, त्यांचे चेहरे विद्रूप, भकास आणि केविलवाणे दिसत आहेत. दारिद्र्याचे व रोगाचे हे गलिच्छ प्रदर्शन पाहिल्यानंतर जीवनाच्या कुरूपतेचा, घृणास्पदतेचा प्रत्यय येतो. आणि मन कमालीचे विषण्ण होते. कवी किंवा लेखक या दृश्यावरही लेखन करील. त्याच्या अंतःकरणातली करुणा, अनुकंपा उचंबळून येईल आणि ती साहित्यातून आकार धारण करील. साहित्याच्या निर्मितीला जीवनाचाच आधार असतो. ' मी केवळ रमणीय वस्तूंचेच वर्णन करीन, मी केवळ सुंदर आणि सुगंधी असेल त्यालाच सामोरा

जाईन ? असे जातिवंत लेखक म्हणूच शकत नाही. सारेच मानवी जीवन प्रतिभावंताला सर्व बाजूंनी साद घालीत असते. ज्याची लेखणी केवळ सुंदराचीच चित्रे रेखाटते, सुसंगतीलाच स्वीकारते, जे दर्शनीय असेल त्यालाच पाहते, जे सुरेल असेल त्याच्यासाठीच जिवाचा कान करते आणि असुंदराला झिडकारते, अमंगलतेला नाकारते असा लेखक अस्सल कलावंत ठरेल असे वाटत नाही. परमेश्वर ज्याप्रमाणे सर्वत्र भरलेला आहे असे भक्ताला जाणवते. त्याप्रमाणे जीवनाच्या साऱ्या रूपांत आणि विरूपांत काहीतरी लक्षणीय, चैतन्यपूर्ण सामावले आहे असेच लेखकाला वाटले पाहिजे. व्यासऋषींनी महाभारतात जसे पुण्यात्म्यांचे शुभंकर जीवन वर्णिले आहे, त्याप्रमाणेच पापात्म्यांच्या दुष्ट कृत्यांचेही चित्र तितक्याच सहजतेने रंगवले आहे. व्यासांची प्रतिभा कृष्ण, भीष्म, धर्म यांना जशी आलिंगन देते, तशीच ती दुःशासन, शकुनी यांनाही मिठया मारते. या साऱ्या व्यक्तींच्या ठायी जीवनाचेच बरे-वाईट गुणधर्म प्रकट झाले आहेत. कोणत्याही श्रेष्ठ कलावंताला सारे जीवन हाच अभ्यासाचा, आश्चर्याचा, आनंदाचा आणि चित्रणाचा विषय वाटत असतो. सर्व दृष्टिकोनांतून आणि सर्व पातळयांवरून हे अद्भुत जीवन आपण न्याहाळले पाहिजे असे त्यांना तीव्रतेने वाटते. महाभारतात तऱ्हेतऱ्हेची माणसे आणि त्यांच्या प्रकृती व विकृती यांच्यावर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केला आहे. जीवनाची एखादीच लहानशी बाजू दाखवायची आणि तेच समग्र जीवन मानायचे अशी आत्मवंचना करून घेणारे अनेक लेखक असतात. विकृतीने पछाडलेला एखादा खुनी गुन्हेगार आपल्या कादंबरीत किंवा नाटकात रंगवायचा आणि जीवनाचे प्रातिनिधिक वास्तवदर्शन आपण घडवले आहे अशा भ्रमात राहायचे, ही खरे तर स्वतःच्या मनाशीच केलेली प्रतारणा आहे. कोणताही सुटा, त्रुटित अनुभव हा अखेर जीवनाचाच घटक असला तरी, संपूर्ण जीवनाचे प्रतिनिधित्व त्याला करता येणे कसे शक्य आहे ? द्रौपदीच्या मनातल्या चोरकप्प्यात कर्णाविषयी एक चोरटी अभिलाषा दबा धरून बसली होती हे चमत्कारिक सत्य व्यासांसारखा कवी झाकून ठेवणार नाही. द्रौपदीच्या प्रतिमेला यामुळे तडा जाईल असे तो मानीत नाही. माणूस एकाच रंगाचा नसतो. त्याच्या व्यक्तित्वात कितीतरी उलट-सुलट, वेडया-वाकडया, सुसंगत-विसंगत रेषा आणि रंग असतात. काळे-पांढरेपणाचे एक विचित्र असे मिश्रण त्याच्या वृत्तीत तयार झालेले असते. आणि त्यातही आणखी कितीतरी रंगच्छटा मिसळून गेलेल्या असतात, की त्या विलग करणे शक्यच नसते. माणसाचे मन हे मानसशास्त्राला सदैव पुरून उरणारे एक प्रचंड आव्हान आहे. त्यामुळेच मनुष्याचा प्रकृतिधर्म उमजून घेण्यासाठी लेखकाची आयुष्यभर धडपड चाललेली असते. कोणत्या प्रसंगी मनुष्य कसा वागू शकेल याचे नियम कधीच ठरू शकत नाहीत. मनुष्याविषयी जितका विचार करावा तितका माणूस आकलनाच्या कक्षेबाहेर आहे हेच जाणवायला लागते. पशु-पक्ष्यांच्या वर्तनक्रमासंबंधी काही निश्चितपणाने बोलता येते. पण सदा चंचल आणि लहरी असलेल्या मानवी

प्रवृत्तींविषयी अबाधित निष्कर्ष काढता येत नाहीत. युधिष्ठिराच्या धर्मशील मनातसुद्धा आपल्या सावत्र आईविषयी निसटती वासना उद्भवली होती हे धक्कादायक सत्य एवढेच स्पष्ट करते की, विसंगत आणि विरोधी रेषांनी माणसाचे आयुष्य भरकटून गेले आहे. ' **Truth is stranger than fiction** '—' सत्य हे कल्पनेपेक्षाही विलक्षण असते ' असे म्हटले जाते. त्यावर कसले भाष्य करायचे ! म्हणूनच कोणाही समर्थ लेखकाला जीवनाच्या दर्शनी वास्तवापेक्षा जीवनाला व्यापून उरलेल्या आंतरिक वास्तवाचा अन्तर्भेदी दृष्टीने छेद घ्यावा लागतो. बाहेरून दिसणारा माणूस आणि आत लपलेला, स्वत:ला दडवून घेतलेला माणूस यांचे सूक्ष्म दर्शन – सम्यक् दर्शन घेण्याची क्षमता असल्याशिवाय साहित्याला खरा जीवनस्पर्श होणार नाही. जातिवंत कवी, नाटककार व कादंबरीकार जीवनातल्या खाचखळग्यांकडे, काटयाकुटयांकडे बारकाईने आणि तटस्थपणे पाहतात. जे दिसले त्याचे खरेपण तपासून घेतात, त्याची स्वत:शी कारणमीमांसा करतात, पण सामान्य दर्जाचे, सुमार बुद्धीचे लेखक मात्र काहीतरी वरवरच्या गोष्टी कृत्रिमपणे, भडकपणे खरडीत राहतात. मनुष्यजीवनाचा व्यापक अर्थ आणि अनुभव बुद्धीत रुजून, त्यातून नवनिर्मिती करण्याची अनिवार ऊर्मी आल्याशिवाय, केवळ दिसले म्हणून लिहिले असे करणाऱ्या लेखकाला जीवन कसे सापडणार ? त्याला आयुष्य कळलेलेच नसते. खळखळाट करणारे उथळ पाणी फार लवकर वाहून जाते. साहित्याच्या प्रांतात उथळ वृत्तीचे लेखनिक पुष्कळ असतात. त्यांनी लिहिलेल्या कथा-कादंबऱ्यांचा रंग फार लवकर उडून जातो.

नाही सरो येत जोडिल्या वचनी । कवित्वाची वाणी कुशलता ॥
सत्याचा अनुभव वेधी सत्यपणे । अनुभवाच्या गुणे रुचो येतो ॥
काय आगीपाशी शृंगारिले चाले । पोटीचे उकले कसापाशी ॥
तुका म्हणे येथे करावा उकल । लागे चि ना बोल वाढवूनि ॥

साहित्याचे शास्त्र न पढता, आपल्या आयुष्याची किंमत देऊन जीवनाचे शास्त्र शिकलेल्या तुकारामाला ते अचूक कळले होते. खरे साहित्य पोटातूनच अवतरावे लागते. ते पोटातून यावे यासाठी, जीवनसत्याच्या पोटात प्रतिभेच्या साहाय्याने शिरावे लागते. तुकारामासारखा कवी जीवनाचा श्रेष्ठ उपासक होता म्हणूनच तो जीवनावर जिवंतपणाने लिहू शकला. ज्यांच्या कवित्वाचे नाणे केवळ टांकसाळी असते असे लेखक, वाङ्मयाच्या बाजारात पाहता पाहता मोडीत निघतात. कारण त्यांना माणूस आणि त्याचे जीवन समजलेलेच नसते. पाचदहा वर्षांच्या आतच वाचक त्यांना विसरून जातात.

अलेक्झांडर क्युप्रिनची ' यामा ' ही कादंबरी मी अनेक वर्षांपूर्वी वाचली, पण आजही तिच्यातील अनेक घटना आणि व्यक्ती स्पष्टपणे माझ्या दृष्टीसमोर उभ्या आहेत. फार वर्षांपूर्वी लिहिली गेलेली ही कादंबरी, अजूनही पूर्वीइतकीच टवटवीत राहिली आहे. माणसांच्या सुखदु:खांचा अस्सल वास या कादंबरीला येत असल्या-

मुळे ती जुनी होणे शक्यच नाही. कादंबरीचा विषय भयानक आहे. पोट भरण्यासाठी आपल्या शरीरांचा बाजार मांडून बसलेल्या दुर्दैवी स्त्रियांच्या कंगाल जिण्याची हृदय-द्रावक कहाणी क्युप्रिनने सहानुभतीने सांगितली आहे. वेश्यांचे आयुष्य म्हणजे मूर्तिमंत नरक. नानाप्रकारच्या दुःखांना आणि अपमानांना तोंड देणाऱ्या आणि अकालीच चिपाड होऊन मरून जाणाऱ्या या बायकांच्या आयुष्यातले जीवघेणे दुःख हा या कादंबरीचा केन्द्रबिंदू आहे. काय असेल ते असो, दुःखाच्या भोवती लेखकांची प्रतिभा नेहमीच प्रदक्षिणा घालीत आहे. सुखाला लवकर शिळेपणा येतो, पण दुःखाचा कोंभ लसलसत राहतो. सुख हुलकावण्या देते, हातातून निसटून जाते, पण दुःख असे चंचल नाही. आपल्या काटेरी हातांनी माणसालाच ते घट्ट विळखा घालते आणि एकदा त्याची संगत धरली की, त्याला मृत्यूपर्यंत सोडीत नाही. त्यामुळेच दुःखाची कथा जेवढी सुखकर वाटते, तेवढी सुखाची कहाणी काळजाला भिडत नाही. 'यामा' सारखी कादंबरी अशाच एका सनातन, अमर दुःखाचे संगीत आळवीत बसली आहे. तिच्या नादलहरी आपल्या मनाला जणू घरे पाडतात. 'यामा' मधील वेश्या नाजुक भावनांची चिता आपल्या डोळ्यांसमोर पेटली असतानाही हसण्याचा विलक्षण अभिनय करीत असतात. पोटातल्या दुःखावर पांघरूण घालायचे आणि शरीराला विवस्त्र करून कुठल्या तरी रोगट, दारूबाज पुरुषाच्या गळयात गळा घालून त्याचा शृंगार साजरा करायचा. ही घोर वंचना करण्यातच आयुष्य बळी पडते. रात्रीचा दिवस करताना आयुष्याची ज्योत केव्हा जळून जाते आणि मरणाची काळोखी रात्र पसरते ते समजत नाही. असा आगळा अनुभव घेणाऱ्या, देहाचे दुकान थाटलेल्या या उपेक्षित स्त्रियांच्या अंतःकरणाच्या कपारीत, माणुसकीचा क्षीण दिवा कसा तेवत असतो हे पाहणारी क्युप्रिनची प्रतिभा खरोखर मंगल आहे. हे महाभयानक जग त्याने जवळून पाहिले होते. या घाणेरडया, अमंगळ विश्वाचा वेध घेऊन ते जसेच्या तसे रंगवलेच पाहिजे असे त्याला वाटले. माणसाच्या पापवासनेतून निर्माण झालेला हा बायकांचा बाजार, माणसांच्या माणुसकीची किंमत कवडीइतकीही कशी नाही आणि कवडीमोलाची माणसे चार पैसे फेकून शृंगारभावनेचा कसा घाऊक सौदा करतात, याची हिडीस बाजू त्याने भेदकपणाने दाखविली आहे. स्त्रीचे शरीर उघडया बाजारात मांडून त्याची खरेदी-विक्री राजरोस व कायदेशीरपणे चालावी यावरून मानवी संस्कृतीच्या क्षुद्र-पणाची व कंगालपणाची कल्पना यावी. जगाच्या समोर या लेखकाने एक आरसाच धरला आहे. या आरशात आपलेही कुरूप प्रतिबिंब पाहून आपण लज्जित व्हावे. म्हणून तर कुप्रिनने कसलेही कल्पनेचे रंग न भरता हे दर्पण मानवी संस्कृतीच्या दिवाणखान्यात मध्यभागीच अशा कौशल्याने ठेवून दिले आहे की, सहजगत्या कोणाही प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या व्यक्तीला आपले नागडे-उघडे चित्र दिसावे आणि क्षणभर तरी खेदाने आपली मान त्याने खाली घालावी. साहित्याच्या निर्मितीसाठी कल्पनाशक्ती तल्लख असावी लागते असे म्हणतात. असेलही. पण विविध प्रकारच्या

अजब प्रवृत्तींनी ठेचून भरलेल्या माणसांच्या या म्युझियममध्ये ( खरे तर प्राणिसंग्रहालयामध्ये ) कल्पनेपेक्षाही वास्तवच अति दर्शनीय आहे. ते पाहायला डोळे मात्र हवेत-टॉल्स्टॉयचे, क्युप्रिनचे, तुकारामाचे, रवींद्र आणि शरदबाबू यांचे. करुणेने, सहानुभूतीने, ममतेने, विचक्षणतेने आणि रसिकतेने माणूस व त्याच्या भोवतालचे पसरलेले जग पाहता आले तर, साहित्याच्या कवेत जीवनाला एखादा महाकवी बंदिस्त करू शकणार नाही काय? वासना-विकारांच्या खातेऱ्यात रात्रंदिवस लोळणाऱ्या वेश्यांच्या मनातही प्रेमाचे, माणुसकीचे, उदात्त भावनांचे झंकार कसे उमटून जातात आणि त्या दुर्दैवी स्त्रियांच्या लक्तरलेल्या आयुष्यालासुद्धा क्षणभर कसा मानव्याचा पवित्र सुगंध येऊ लागतो याचे जे दर्शन हा लेखक घडवतो, त्यामुळे ही कादंबरी हातातून खाली ठेवता येत नाही.

वेश्याजीवनावरील कादंबरी म्हणून काही सभ्य लोक तिला नाके मुरडतात हे मला माहीत आहे. पण ते देखील मानवाचेच जीवन नव्हे काय? साहित्याने काय केवळ प्रतिष्ठितांची झुळझुळीत आयुष्ये रेखाटावीत? केवळ यशस्वी कीर्तिवंतांच्या कर्तृत्वाचे पोवाडे गावेत? सिंहासनावर चढून बसलेल्या मस्तवाल सत्ताधाऱ्यांच्या गौरवासाठी आपल्या लेखण्या झिजवाव्यात? खरे तर साहित्याने सारेच रंग न्याहाळावेत. दुःख, दारिद्र्य, निराशा आणि लाचारी यांचीही प्रामाणिक चित्रणे त्याने करावीत; पण अजूनही साहित्य म्हणजे मनोरंजनाचे एक निरुपद्रवी साधन मानण्यात येते हे साहित्याचेच दुर्दैव आहे. सौंदर्याला पाहून लुब्ध होणारा कवी, अन्याय पाहून क्षुब्ध झाला नाही तर तो कवीच नव्हे. लेखकाची दृष्टी आणि लेखणी राजवाड्यापासून झोपडीपर्यंत जीवनाचा शोध घेत आणि जीवनाचे विखुरलेले अनेक प्रकारचे तुकडे जुळवीत सर्वत्र फिरू लागली तर, त्या साहित्याला अस्सल मानव्याचा स्पर्श झाल्याशिवाय राहाणार नाही. माझ्या दृष्टीने हाच ' परतत्त्वस्पर्श ' आहे. ज्ञानेश्वरांनी परतत्त्वाची व्याख्या आध्यात्मिक दृष्टीने केली आहे. पण साहित्यात जेव्हा जिताजागता ' माणूस ' प्रकट होतो, तेव्हा ते साहित्य ' परतत्त्वस्पर्शा 'ने उजळून निघाले आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. ' परतत्त्व ' याचा अर्थ परमात्मा असाच ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असावा. परमात्मा ज्याप्रमाणे सर्व चराचर सृष्टीत ओतप्रोत भरला आहे, त्याप्रमाणे अनेक अंगांनी विकसित झालेले मानवी जीवन त्याच्या नाना रसरंगांना, त्याच्या नसानसांना आपण प्रकट करू शकतो अशी महत्त्वाकांक्षी प्रतिभा जेव्हा सर्वस्पर्शी होते, तेव्हा ती परतत्त्वस्पर्शी बनली असे म्हणता येते. एकाच रसाचा सहजसुंदर आविष्कार करणारे कलावंत असतात. त्या विशिष्ट रसाशीच ते समरस होतात. त्या रसातच आपले आयुष्य व प्रतिभेचे सामर्थ्य बुडवून टाकतात. एकाच रसाचा भोग घेण्यात त्यांची भोगशक्ती धन्यता मानते. हे कलावंत त्या रसाच्या संदर्भात उच्च कलाकृती निर्माण करू शकतात. पण तरीही त्यांची रसिकता एका ठराविक वर्तुळातच फिरत राहिल्यामुळे, अखेर क्षीणबल ठरल्याशिवाय राहात नाही.

केशवसुतांनी 'मळयास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे' असे म्हटले आहे. आपल्या निर्माणशक्तीला, जीवनचैतन्याचा शोध घेऊ शकणाऱ्या दृष्टीला स्वतःच कुंपण घालून बसलेले कलावंत स्वतःलाच बंदिवान करून घेत आहेत. एकच रागिणी आळवणारा गायक कितीही गोड गळ्याचा असला तरी, त्याच्या गानसामर्थ्याला एक अंगभूत कुंपण उभे राहिले, की त्यापलीकडचा अफाट प्रदेश त्याला वंचित होतो. अनेक वाटांनी एकाच वेळी आपण चालू शकत नाही, पण प्रत्येक वाटेचे- मग ती वाट अंधारी असेल, काट्यांची असेल, न मळलेली बिकट वाट असेल, पण तिचेही आकर्षण वाटले पाहिजे. साऱ्याच वाटांनी मला प्रवास करता येतो. या साऱ्या निरनिराळ्या वाटा एकाच जीवनतत्त्वाच्या पसरलेल्या फांद्या आहेत असे जाणून चालत राहणारा पथिक वाट चुकला तरी, त्याचा स्वैर संचार अनुभवांची श्रीमंती त्याला देऊ शकतो.'

साहित्यशास्त्रकारांनी साहित्य नवरसरुचिर असावे असे म्हटले आहे. कालिदासाने नाटकाचे महत्त्व सांगताना, 'त्रैगुण्योद्भवमय लोकचरितम् नानारसम् दृश्यते।' असे म्हटले आहे. श्रेष्ठ नाटककार आणि कवी जीविताच्या बाह्यांगापेक्षाही अंतरंगालाच महत्त्व देतो. आणि तो समग्रतेने जीवित पाहण्याची धडपड करतो. शेक्सपीअरची महती मॅथ्यू अरनोल्ड पुढील शब्दांतून सांगतो की, 'त्याने सारे जीवित समग्रपणाने आणि तटस्थपणे पाहिले; माणूस सर्व बाजूंनी पाहावा लागतो. तो जसा दिसेल तसाच तो असेल हे गृहीत धरता येत नाही. त्याच्या मनाच्या खोल कुहरात दबा धरून बसलेल्या अनेक भावना आणि वासना यांची समीपदृश्ये ( क्लोजअप्स् ) घेत असतो.'

भिन्न भिन्न स्वभावांच्या विविध व्यक्तिमत्त्वांची चित्रे शेक्सपीअरच्या नाटकांतून दिसतात. एकाची चेहरेपट्टी दुसऱ्याशी जुळत नाही. याचाच अर्थ एकत्वापेक्षा नानात्व हेच मनुष्यजीवनाचे वैशिष्टय आहे. याची प्रचीती त्याला आली होती. 'तिळा उघड' म्हटल्यानंतर अलीबाबाला त्या गुहेत रत्नालंकारांचे प्रचंड भांडार दिसले. आणि त्यातले काय घ्यावे, काय घेऊ नये या गोंधळात तो स्तिमित होऊन उभा राहिला. तशीच अवस्था साहित्यिकाची होत असते. त्याच्या निरीक्षणाच्या मुळाशी जिज्ञासा, विचारशीलता, जीवनविषयक वत्सलता, रसलोलुपता असली तर, त्याच्या साहित्याला आगळ्याच सुंदरतेचे खतपाणी मिळून ते फोफावत जाते. ज्याची मुळे जमिनीत खोलवर पसरली आहेत असा महावृक्ष आकाशाला भिडण्यासाठी झेपावतो, त्याप्रमाणे बहुविध अनुभवांच्या क्षेत्रात रुजलेली कविप्रतिभा जीवनाच्या गाभ्यालाच भिडण्यासाठी उत्सुक होत जाते. ज्याला माणसाविषयी कुतूहल नाही. ज्याची अनुभूती आणि बुद्धी सूर्यप्रकाश न मिळालेल्या खुरट्या झुडपासारखी निस्तेज, कळाहीन बनली आहे, त्याची कला फार तर कुंडीत लावलेल्या प्लॅस्टिकच्या फुलझाडासारखी कृत्रिम ठरली तर त्यात नवल काय? माणुसकीची वेल ज्याच्या अंतर्मनात रुजत नाही,

फुलत नाही, जीवनप्रेमाची भूक ज्याला अस्वस्थ करत नाही, त्याला साहित्याची निर्मिती कशी कळणार ? वंध्येला प्रसुतिवेदना कशी कळणार ? तुकारामाने गर्भार-पणाचे सोंग घेतलेल्या एका स्त्रीचा दृष्टांत देऊन म्हटले आहे की, ' पोटाशी चिरगुटे बांधून तिला गर्भवती होता येईल काय ? ' याच चालीवर म्हणावेसे वाटते की, जीवन-प्रेमाचा सशक्त गर्भ कलावंताच्या हृदयाच्या गर्भाशयात पोसला गेल्याशिवाय जीवन-कळेने न्हालेली सतेज कलानिर्मिती होऊच शकणार नाही. ' One Who Wants nothing, hopes for nothing, fears nothing cannot be an artist. असे एका साहित्यिकाचे वचन या संदर्भात आठवते. पिरांदेल्लो या नाटककारानेही, ' The eternal man is the First primary concern of the man of letters, of the writer, of the artist. ' असे उद्गार काढताना मानव-प्रेमाचाच उद्घोष केला आहे. या जीवनप्रेमातूनच जीवनशोधन आणि जीवन-दर्शनाची प्रक्रिया घडत असते.

सध्या साहित्यिकांच्या जगात, साहित्यिकांनी सामाजिक बांधिलकी मानावी की नाही यावर एक वाद चालू आहे. जीवनाशी बांधिलकी मानली की, या प्रश्नाचे उत्तर आपोआपच दिले जाते. हा वाद वस्तुतः आजचा नाही. अनेक वर्षांपासून चालत आलेला हा वाद नव्या शीर्षकाखाली खेळवला जात आहे. झाडावर बसलेल्या पानांनी झाडाची बांधिलकी मानावी काय ? या प्रश्नातच त्याचे उत्तर सामावले आहे. बांधिलकी सक्तीची असेल तर ती निरर्थक ठरल्याशिवाय राहणार नाही. साहित्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय...सर्व प्रकारच्या चळवळींचे अपरिहार्यपणे प्रतिबिंब पडत असते.

जीवनाशी प्रामाणिक असलेला लेखक, जीवनातून उद्भवलेल्या आंदोलनांची दखल घेत असतो. कारण अखेर या आंदोलनांच्या मुळाशी देखील माणूस आणि त्याची अदम्य जीवनेच्छाच असते. मानवी अस्तित्वाचा अर्थ माणूस जी सुखदुःखे भोगतो व ज्या जीविताला तो मरणापर्यंत बिलगून राहतो, त्या जीवनातच शोधावा लागतो. अर्नेस्ट हेमिंग्वेच्या ' The old man and the sea ' या कादंबरीची येथे अपरिहार्यपणे आठवण होते. एका पराभूत म्हाताऱ्या माणसाची शूर शोकांतिका रंगवून माणसाच्या माणूसपणावर त्याने सहजसुंदर भाष्य केले आहे. दुःख समजून घेण्याची, पराभवाचा अर्थ लावण्याची, माणसाच्या सनातन आशावादाची मीमांसा करण्याची प्रवृत्ती या कादंबरीतून डोकावते. देवमाशाच्या शिकारीसाठी एकाकी निघालेला एक म्हातारा म्हणजे सर्वसमर्थ नियतीच्या पहाडावर बेगुमानपणे धडक द्यायला उत्सुक असलेल्या मानवी संघर्षशीलतेचे एक प्रतीक आहे. नियतीला विरोध करून, देवमाशाची शिकार साधून ते प्रचंड धूड किनाऱ्याकडे ओढीत आणणाऱ्या त्या विजयी वीराला अखेर एका अटळ अकल्पनीय निराशेने ग्रासून टाकले. देवमाशाचा केवळ हाडांचा

सांगाडा मात्र किनाऱ्यापर्यंत आला. त्याचे सारे मांस शार्क माशांनी केव्हाच फस्त केले होते. अमर्याद आकांक्षा करणाऱ्या, पराक्रमाने नियतीला नमवणाऱ्या माणसाचे जन्मजात दुबळेपण अशा वेळी स्पष्टपणे ध्यानात येते. हेमिंग्वेला हा माणूस कितीतरी रूपांत दिसला. पराभवावर हास्याचे पांघरूण घालणारा कादंबरीतला म्हातारा अखेर केवळ एकटा आहे. पण त्याच्या एकटेपणालाही महत्त्वाकांक्षेची एक सुंदर किनार आहे. तो केव्हा तरी प्रचंड नियतीला आपल्या काबूत आणू शकेल असेच तर या लेखकाला सुचवायचे नसेल ? काहीही असेल पण माणसाचे हे झंझावाती चैतन्य हेमिंग्वेसारखा मनस्वी लेखक आपल्या लेखणीतून साकार करू शकतो. साहित्याची बांधिलकी अखेर माणसाशी आणि त्याच्या जगण्यामरण्याशी असली पाहिजे हेच कोणतीही श्रेष्ठ कलाकृती सुचवीत असते.

—माणूस ! एक चमत्कारिक आणि गुंतागुंतीचा विषय. भित्रा आणि नेभळा असा हा माणूस, शूर आणि तेजस्वी असाही असतो. आपल्या मरणापूर्वीच तो अनंत मरणे मरतो. आणि काही वेळा मरूनदेखील मरत नाही. मरणालाच मरणोन्मुख करतो. धर्म आणि परंपरा, रूढी आणि संकेत यांचे दोरखंड गळ्यात बांधून घेतलेला हा माणूस कोठेतरी खेचला जातो, भरकटत राहतो. पण हाच माणूस आपल्या संहारक हातांनी हे चिवट दोर सपासप कापून टाकतो. मुक्त होतो. विजयाची आरोळी ठोकतो आणि नव्या संस्कृतीचा निर्माता होतो. तो क्षुद्र आहे. पशूहून पशू आहे. विकारांच्या आणि वासनांच्या घाणीत वळवळणारा एक कीटक आहे. तेथेच तो फसतो आणि आपली माणुसकी गमावून बसतो. पण हाच माणूस माथ्यावरच्या अथांग आभाळाकडे पाहात, पंखांची उघडझाप करताकरता एक दिवस गरुडझेप घेतो. अप्रबुद्ध असलेला माणूस बुद्ध होतो. भेकड असलेला माणूस महावीर होतो. माणसाच्या पापांना क्षमा कर म्हणून परमेश्वराची करुणा भाकणारा येशू ख्रिस्त होतो. हा माणूस असाही आहे आणि तसाही आहे. तो कसा आहे हे 'माणूस' झाल्याशिवाय माणसाला कळत नाही. तो जितका सुरूप तितकाच कुरूप आहे. चंद्रावर पाऊल टाकू शकणाऱ्या या माणसाला आपल्याच घरात नीट राहता येत नाही. माणूस हे एक कोडे आहे यात कसली शंका ? तो निर्माण करताना सृष्टीने कोणते रसायन वापरले होते कुणास ठाऊक ! सृष्टीने निर्मिलेला हा माणूस सृष्टीचाही निर्माता होऊ शकतो. महाभारत असो, रामायण असो, शाकुंतल असो किंवा हॅम्लेट-ऑथेल्लो असो, साहित्य कोणतेही असो त्याचा आद्यबिंदू, मध्यबिंदू आणि त्याचा अन्त्यबिंदू माणूस हाच असला पाहिजे.

माणसाच्या भोवतीच साऱ्या कलांनी, संस्कृतींनी पिंगा घालीत राहिले पाहिजे. साहित्य, संस्कृती, समाज, राज्यपद्धती हे सारे देव्हारे आहेत. या देव्हाऱ्यांत देवाची मूर्ती म्हणजे माणूसच पाहिजे. तोच हे देव्हारे स्वतःसाठी तयार करतो हा एक गमतीदार चमत्कार आहे. साहित्याची विशाल सृष्टी उत्पन्न केली, माणसाने स्वतःचे

रूप पाहण्यासाठी; स्वतःवर प्रकाशाचा झोत टाकण्यासाठी, स्वतःची विजयपताका फडकवण्यासाठी आणि स्वतःवर टीका करण्यासाठी माणसाने साहित्याची निर्मिती केली आणि साहित्याने मनुष्य निर्माण केला. आपण निर्माण केलेल्या कलाकृतींच्या माध्यमातून अमर, अक्षर राहण्याची माणसाने ही किमया केली आहे.

□

# ग्रामीण साहित्याचा आत्मा

' ग्रामीण साहित्य ' असा साहित्याचा एक वेगळा व स्वतंत्र प्रकार मानणे कित पत सयुक्तिक आहे ? साहित्याचे केले जाणारे हे वर्गीकरण कृत्रिम वाटत नाही काय ? असे प्रश्न नेहमी विचारले जातात. साहित्याचे उद्दिष्ट एकच असते. मनुष्याच्या भाव-जीवनाचा वेध घेऊन त्याच्या सुखदुःखांना परिणामकारक, कलात्मक शब्दाकार देणे हाच कोणत्याही साहित्याचा मूलभूत हेतू असतो. साहित्यात रेखाटलेले चित्र खेड्यांचे असेल अथवा महानगरांचे असेल. ते इतिहासकाळातील असेल किंवा वर्तमान जीवना-चेही असेल. त्यावर एखादी कृत्रिम मुद्रा उमटविणे उचित ठरणार नाही. कारण, अखेर साहित्यकृतीच्या मूल्यांकनाचे निकष एकच असतात. नागर साहित्यासाठी एखादा वेगळा मानदंड आहे व ग्रामीण साहित्यासाठी निराळे निकष आहेत असे घडत नाही. त्यामुळेच ग्रामीण साहित्य ही अन्य साहित्याहून वेगळी ठरणारी घटना नाही. पण इतके मान्य केल्यानंतर, ' ग्रामीण साहित्य ' या विशिष्ट संज्ञेला काहीतरी अर्थ आहे. म्हणूच ही संज्ञा आता मराठीत रुजली आहे असे म्हणता येईल. ' उपेक्षितांचे अंतरंग ' यांसारखे कथासंग्रह किंवा ' वनगरवाडी ', ' गोतावळा ' यांसारख्या विलक्षण जिवंत, प्रत्ययकारी वाङ्मयकृती निर्माण होतात. तेव्हा या कृतींच्या समर्थ वैशिष्ट्यां-मुळे त्यांची स्वतंत्र रीतीने वर्गवारी लावण्याशिवाय गत्यंतर उरत नाही. माणूस ज्याप्रमाणे सर्वत्र सारखाच असतो, पण त्याच्या अंगभूत विशिष्ट गुणावगुणांमुळे त्यांचे काही वर्ग आणि प्रकार कळत न कळत तयार होतात. तशीच अवस्था साहित्य-कृतींचीही व्हावी हे स्वाभाविक वाटते. केवळ सोयीसाठी मात्र ' ग्रामीण साहित्य ' ही मुद्रा तयार झालेली नाही. ग्रामीण साहित्याला आता नाव घेण्यासारखा इतिहास आहे. एक विशिष्ट परंपरा आहे. या साहित्याला वगळून मराठी वाङ्मयाची समीक्षा करता येणार नाही इतके सामर्थ्य त्याला लाभले आहे. एका ठराविक आवर्तातच काही काळ ग्रामीण लेखक फिरत राहिले होते. पण त्यातूनच बाहेर पडून आपल्या आज-

बाजूच्या वास्तवाचे भान ठेवण्याची त्यांची धडपड सुरू आहे. याची जाणीव आज ग्रामीण साहित्य वाचताना आपल्याला होते.

खेड्यापाड्यांत पसरलेला एक बहुसंख्य समाज आपल्या पारंपरिक चौकटीत शतकानुशतके जगत आहे. जगण्यासाठी जिवाचा आटापिटा करीत आहे. त्याच्या दारिद्र्यातून आणि अज्ञानातून अनेक प्रश्नांची गुंतवळ निर्माण झाली आहे. त्याची शेतीभाती, मोलमजुरी, सावकारी, त्याच्या यात्राजत्रा, देवदेवता यातून या समाजाची सुखदु:खे अपरिहार्यपणे त्याला वेढून बसली आहेत. याची जाणीव आमच्या मध्यमवर्गीय लेखक-कवींना कुठे झाली होती? रानात घाम गाळणारा शेतमजूर त्यांना दिसणे शक्य नव्हते. मग त्याच्याशी त्याच्या बोलीतून 'संवाद' करणे दूरच. खेड्यात फुलणारा निसर्ग काही वेगळा आहे, तिथल्या काट्यांची बोच निराळी आहे, याची कल्पना शहरी वातावरणातच राहिलेल्या, जन्मलेल्या लेखकांना येऊ शकली नाही याबद्दल त्यांना दोष देऊ नये. आमच्या साऱ्याच लेखक-कवींचे जग मध्यमवर्गीयांचेच होते. खरे तर अजूनसुद्धा आहे. त्यांच्या अनुभूतीला या अंगभूत मर्यादा पडलेल्या आहेत. हरिभाऊंसारखा विशाल प्रतिभेचा लेखक आपल्या निर्मितिक्षम नेत्रांनी खेड्यांत पसरलेल्या मानवसमूहाकडे पाहू शकला असता, तर मराठी कथा-कादंबरीला 'सदाशिव पेठी' विळखा पडला नसता. 'काळ तर मोठा कठीण आला' यासारखी एक दीर्घकथा त्यांनी कणवेपोटी लिहिली. तिला ग्रामीण कथेत स्थान देणे कठीण वाटावे इतकी ती स्थूल आहे. मराठीतल्या कथाकारांनी, कवींनी खऱ्या अर्थाने कधी खेडे पाहिलेलेच नव्हते. ज्यांनी ते पाहण्याचा प्रयत्न केला त्यांनी कल्पनारम्य, रंगीबेरंगी काचेतून जेवढे दिसले तेवढेच चातुर्याने टिपले. लेखक पांढरपेशा वर्गातला आणि वाचकही त्याच पठडीतला अशी अवस्था असल्यामुळे श्री. म. माटे यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग' या कथासंग्रहापर्यंत ग्रामीण जीवनाच्या संदर्भात कसलेच चित्र साहित्यात साकार झाले नाही. काही अस्पष्ट, अपूर्ण रेषा मात्र अधून मधून उमटलेल्या दिसतात. ग्रामजीवन मराठी कथा–कादंबरीला तोपर्यंत सर्वस्वी अस्पष्ट राहिले.

या अवस्थेची दोन कारणे संभवतात. पहिले कारण स्पष्ट केले आहे. मध्यमवर्गीय अनुभवांच्या वलयात गुरफटून राहिलेला आत्मसंतुष्ट लेखकवर्ग, हे पहिले कारण. तो नागर वातावरणातच रमलेला होता. पण नगरातसुद्धा लोकजीवनाचे अनेक थर असतात. तेही पाहण्याची त्याची शक्ती नव्हती. घाम गाळणारा मजूर, हमाल, रस्त्याच्या कडेला बसून भाजीपाला विकणाऱ्या गरीब बाया, गाडीवान, कंडक्टर, गिरणी कामगार, मोलमजुरी करणारी माणसे असे कितीतरी थर शहरात असतात. आमच्या लेखक–कवींना यांची जाणीव किती प्रमाणात झाली? नागरी साहित्यसुद्धा सर्वार्थांनी नागरी नाही. ते केवळ एकाच वर्गाचे साहित्य आहे असेच म्हटले पाहिजे. काही कादंबरीकारांच्या कादंबऱ्या पुणेरी आहेत. काहींच्या नागपुरी आहेत. काहींनी मुंबई रंगविली. या लेखकांच्या डोळ्यांवरील मध्यमवर्गीय चष्मा खाली उतरलाच नाही. एकाच मर्यादित

अनुभवांच्या वर्तुळात समाधान मानणाऱ्या लेखकांना आपल्या अनुभवाचे विश्व विस्तारत गेले पाहिजे ही कलावंताची व्यापक जाणीव कधी झालीच नाही. ठराविक विषयांवरच लिहीत राहणाऱ्या लेखकांना लेखनाचे समाधान तरी कसे मिळत होते कोणास ठाऊक! यशस्वी झालेले पांढरपेशा लेखक आपल्या यशाच्या कोषात गुरफटून गेले. त्यांच्या लेखनविषयांची कक्षा त्यामुळे वाढलीच नाही. दुसरे अधिक महत्त्वाचे कारण असे की, खेड्यापाड्यांतून पसरलेल्या बहुसंख्य समाजाच्या सुखदुःखांशी संवाद करण्याची या लेखकांना आवश्यकता वाटली नाही. त्यांना तशी सामाजिक जाणीव नव्हती. कलेची उपासना म्हणजे स्वतःच्या थिट्या अनुभवांच्या भोवती केवळ पिंगा घालीत बसणे नव्हे, हे भान त्यांना कधी आले नाही. खेड्यांच्या मातीचा वास कधीतरी भरभरून घ्यावा अशी इच्छा आमच्या 'कलावंतांना' होत नाही. संस्कृती, कला, साहित्य, जीवन या साऱ्या संज्ञा त्यांनी आपल्या मध्यमवर्गीय नागरी हातरुमालात गुंडाळून ठेवल्या आहेत. फारच झाले तर, रुचिपालट म्हणून खेड्याकडे एखादा फेरफटका मारावा या पलीकडे ग्रामीण समाजजीवनाशी त्यांचा जिव्हाळ्याचा, अंतःकरणाचा संबंध कधी येत नाही. क्षीण सामाजिक जाणीवेचे हे परिणाम आहेत. कलावादी, आकृतिवादी लेखकांना तर, सामाजिक जाणीव ह्या शब्दप्रयोगाने सुद्धा अपचन होऊ शकते. लोकांचे साहित्य म्हणजे काय हे आम्हांला समजत नाही. सामाजिक भान या शब्दांचा अर्थही आम्हांला कळत नाही असे काहीजण अभिमानाने सांगतात. व्यापक सहानुभूती, तीव्र समाज जाणीव आणि अस्सल अनुभव यांच्या मिश्रणातून वाङ्मयाला तेज येते. ग्रामीण जीवनाचे दर्शन मराठी साहित्यात माटेयांच्या काळापर्यंत फारसे होऊ शकले नाही याची माझ्या दृष्टीने ही मीमांसा आहे. ग्रामीण समाजाचे सहानुभूतीने निरीक्षण करून त्यातल्या काही माणसांची माणुसकी चितारणारा पहिला ग्रामीण लेखक म्हणून माटे यांचा उल्लेख करायला हरकत नाही. त्यांच्या कथाप्रतिभेच्या या हरळीचे मूळ खेड्यातल्या जमिनीत रुजले होते असे म्हणण्याचा मोह होतो. कारण वर्षे उलटली तरी त्यांचा बन्सीधर, मुक्याने मेलेली सावित्री अजून काळीज कुरतडते. ग्रामीण जीवनाच्या रगाड्यात पिचलेले काही उपेक्षित लोक आपली वेगळीच सुखदुःखे घेऊन त्यांच्या कथांतून जेव्हा समोर येतात, तेव्हा त्या सुखदुःखांचा रंग गावाकडल्या मातीचा आहे हे जाणवत राहते. माटेयांच्या कथासाहित्याची अनेक दृष्टींनी चिकित्सा करता येईल. तिच्या सामर्थ्याबरोबरच तिच्या काही मर्यादा जाणवतात हे खरे. पण सामाजिक दृष्टी असलेल्या या कथाकाराने खेड्यातला माणूस 'माणूस' म्हणून पाहिला आणि तन्मयतेने रेखाटला. ग्रामीण साहित्याचा प्रवाह येथून खळखळू लागला असे कदाचित ऐतिहासिक दृष्टीने म्हणता येणार नाही; पण स्थूल मानाने हे विधान करता यावे असे वाटते.

एकोणीसशे पंचेचाळीसनंतर ग्रामीण साहित्याला त्याचा स्वतःचा असा एक अर्थपूर्ण आकार येऊ लागला. या साहित्यातले 'ग्रामीणपण' हे त्याचे स्वतंत्र वैशिष्ट्य

आहे. शहरी लेखकांनी एक टूम म्हणून ग्रामीण धरतीचे साहित्य लिहिण्याचा प्रयत्न केला होता. पण तो कृत्रिम प्रयत्न होता. त्यांना खेडे समजलेच नव्हते. खेड्यातला माणूस हा तिथल्या मातीचाच एक अविभाज्य घटक असतो हे त्यांना उमगले नाही. खरे तर खेड्यापाड्यांशी ज्यांचा वरवरचा संबंध असतो. त्यांच्या साहित्यात खेड्याला स्वतंत्र, जिवंत अस्तित्व आहे असे जाणवत नाही. केवळ पार्श्वभूमी म्हणून खेडवळ वातावरणाचा वापर करून एखाद्या शहरी घाटणीच्या कथेचे कलम ग्रामीण जीवनावर करण्यात काय अर्थ आहे ? पण गेल्या पंचवीस-तीस वर्षांत ज्या साहित्यकृती प्रकाशात आल्या त्या अस्सल अनुभवांवर आधारलेल्या आहेत. लेखकाचा मनःपिंडच खेड्यातल्या वातावरणाने आणि संस्काराने पोसला आहे याची जाणीव होते. खेड्यातला बरावाईट, सुखी-दुःखी माणूस आणि त्या माणसाला आपल्यातून साकार करणारी खेड्यातली माती हेच ग्रामीण साहित्याचे मूलद्रव्य. त्याची भाषा, त्याचे भाव, त्याचे रीतिरिवाज, त्याचे असे एक निराळे व्यक्तित्व यांच्या एकत्रित रसायनातून त्या साहित्यकृतीची वीण झालेली असते. ग्रामीण साहित्यातला माणूस त्याच्या प्रदेशापासून अलग काढताच येणार नाही. झाडाचे पान ज्याप्रमाणे त्या झाडाशीच एकरस झालेले असते, तसे एक-रसत्व या साहित्यातल्या माणसांचे प्रदेशांशी असते. काहीजण अशी शंका घेतील की, शहर आणि खेडे हा केवळ प्रादेशिक फरक सोडला तर, दोन्ही ठिकाणी जो माणूस आहे, त्याचे रागलोभादि विकार सारखेच असत नाहीत काय ? भिन्न प्रदेशामुळे माणसांच्या प्रवृत्तीतही कधी स्थूल, तर कधी सूक्ष्म बदल घडून येतात. हवापाणी, डोंगर दऱ्या, सुकाळदुष्काळ, भाषा आणि रीतीभाती यामुळे माणसे निश्चितच बदलतात. कोठेही जा, माणसाचे मन आणि प्रवृत्ती एकच असतात, हे एक गोलमाल विधान आहे. शास्त्रीय अर्थाने पाहू लागलो तर, ते बरोबर ठरणार नाही. एकाच वातावरणात असलेली दोन माणसे एकमेकांहून कितीतरी वेगळी काढता येतात. नागर भावना आणि ग्रामीण भावना व त्यांची होणारी अभिव्यक्ती यांतले अंतर सामान्यालाही कळते. आपली काही सुखदुःखे आजूबाजूच्या समाजावर, परिसरावर, भूप्रदेशावर अवलंबून असतात. ' माणदेशी माणसं ' ही सर्वसामान्य माणसांसारखीच आहेत. पण ती माणदेशाच्या मातीचा ठसा घेऊन आली आहेत. माणसांत माणदेश मिसळून एकजीव झाला आहे. त्यामुळेच त्यांच्या बोलण्याचालण्याला एक अगदी निराळे परिमाण लाभते. यंत्राधिष्ठित जीवनाशी निगडित असलेल्या नागर समाजाच्या भावना अनेक प्रसंगी कमी उत्कट, मचूळ अशा वाटतात. त्यांच्या जीवनांना त्या रुक्ष यांत्रिकतेने वेढा घातलेला असतो. खेड्यातल्या वातावरणात वाढलेली माणसं आपल्या भावनिक प्रतिक्रिया कशा व्यक्त करतात हे पाहिले, म्हणजे शहरी मनुष्य काही वेळा भांबावून जातो. ग्रामीण जीवनातच रस घेतलेल्या लेखकाच्या साक्षात अनुभवांचा अविष्कार, अलीकडील काही वर्षांत साहित्यात होत असल्याचे दिसते. ज्यांना खेड्याचे भावविश्व दिसले, ज्यांनी ते आपल्यात मुरवले, त्यांच्या लेखनात आत्मप्रत्ययाचा तजेला यावा यात आश्चर्य

नाही. ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, आनंद यादव इत्यादींच्या लेखनाने ग्रामीण साहित्याला एक स्थिर प्रतिष्ठा दिली. नव-नवीन प्रयोग करून या साहित्याचा आवाका त्यांनी वाढवला. याच संदर्भात अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबूराव बागूल या लेखकांचाही आवर्जून उल्लेख केला पाहिजे. एका वेगळ्या सामाजिक संदर्भाचा विचार केला तर, वाङ्मयातून ग्रामीण जीवनातल्या अनेक भेदक घटनांचे अणि विशिष्ट परिस्थितीमुळे उरी फुटून गेलेल्या दुबळ्या, खडबळ माणसाचे दर्शन घडते. प्रादेशिक आणि ग्रामीण या दोन संज्ञा एकमेकींपासून दूरच्या नाहीत. काही ठिकाणी तर, त्या हातात हात घालून उभ्या आहेत. दलित साहित्याच्या बाबतीतही असे विधान करणे शक्य होईल. दलितपणाचे दैन्य आणि दुःख खेड्यातल्या दलित समाजाला अधिक तीव्रतेने भोगावे लागले आहे. खरात, दया पवार यांचे लक्ष तिकडे अधिकांशाने गेले. ज्या साहित्यात साक्षात खेडे उभे राहते. आपल्या सर्वांगानी आपल्या सर्व विशेषांनी उभे रहाते ते साहित्य हेच खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य म्हटले पाहिजे. अशा खेड्यांची केवळ समाजशास्त्रीय माहिती लेखकांजवळ असेल, पण अनुभव नसेल तर त्या साहित्याला ही संज्ञा देता येणार नाही. कल्पकता आणि ज्ञान यांच्या बळावर साहित्य भावानुभव कसा देऊ शकेल ? अस्वस्थ करणारे, रोमांचित करणारे ग्रामीण भावदर्शन घडविण्याची क्षमता, अनुभवाच्या आधाराशिवाय येणार नाही. लेखकाला 'साक्षात' अनुभव असावा काय ? परोक्षानुभव साक्षात अनुभतीपेक्षा अधिक जिवंत असतो काय ? या वादात पडण्याचे कारण नाही. पण साहित्याच्या मुळाशी लेखकाचा प्रत्यक्ष सळसळता जिवंत अनुभव असेल तर, ते साहित्य रसिकांशी कसा साक्षात संबंध जोडते याची कित्येक उदाहरणे देता येतील.

कलानिर्मितीला प्रत्यक्ष अनुभवांची बैठक असेल, तर ती कला वास्तवाचा विलक्षण समर्थ आविष्कार करू शकते. ग्रामीण साहित्याच्या बाबतीत तर हे विधान मला अधिक ठासून करायचे आहे. केवळ कल्पना, अवलोकन, माहिती यातून खेड्यातल्या व्यक्तींचे, घटनांचे यथार्थ दर्शन घडविणे शक्यतेच्या कोटीतले नाही. केवळ तपशील भरून, भाषेची नक्कल करून लिहिणाऱ्या ग्रामीण लेखकांना ग्रामजीवनाच्या प्रकृती-विकृतीचे, आत्मतत्त्वाचे आकलन कसे होणार ? कलाकृती आणि कारागिरी यातले अंतर अशावेळी जाणवते. आजपर्यंत निर्माण झालेल्या ग्रामीण साहित्याकडे शोधक दृष्टी टाकली तर, ग्रामीण परिसर आणि भाषा यांचा अगदीच अपुरा, तात्पुरता पार्श्वभूमी म्हणून उपयोग करून घेतलेल्या काही 'कृती' दिसतात. लेखकाला ज्या ग्रामीण वास्तवाने झपाटून टाकायला हवे ते वास्तव अशा लेखकांना जाणवतच नाही. अर्थातच ही जाणीव केवळ खेड्यातच वास्तव्य करून राहिलेल्या लेखकालाच होऊ शकते असे मात्र मला म्हणायचे नाही. जाणीव होणे हे संवेदनशील मनोवृत्तीचे लक्षण नाहे. साहित्यकृती म्हणजे जिवंत अनुभवांची एक कहाणी असते. अनुभवाला सच्चेपणाचा पदर हवाच.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेल्या तीसबत्तीस वर्षांत नागर आणि ग्रामीण समाज अंत-

बाहय ढवळून निघाला. त्याच्या जीवनपद्धतीत, दृष्टिकोनात, भाषेत आणि आचार-विचारात कितीतरी फरक पडला. खेडी बदलली, शहरी-सोयी खेड्यातही आल्या. ज्या स्थैर्याचे पांघरूण घेऊन खेडी वर्षानुवर्षे पडून राहिली होती. ते पांघरूण परिस्थितीने ओढून, फेकून दिले आहे. खेड्यांचा चेहरा-मोहरा बदलला. शेतीभातीच्या जुन्या रीती उरल्या नाहीत. शाळा आल्या. नवा मध्यमवर्ग दिसायला लागला. नवे प्रश्न निर्माण झाले. गुंतागुंती वाढल्या. पक्षीय आणि राजकीय चळवळींनी ग्रामीण परिसरात नवे संघर्ष निर्माण केले. या साऱ्यांचा परिणाम होऊन खेड्यातला माणूसही निश्चतपणे बदलला. पण आज लिहिल्या जात असलेल्या ग्रामीण साहित्यात, हे संक्रमणाचे वारे काही आढळत नाही. फार थोड्या कथा-कादंबऱ्यांनी हे फेरबदल जाणले आणि टिपले. साहित्यिकाला खरे म्हटले तर, परिवर्तनाची चाहूल इतरांपेक्षा लवकर लागायला हवी. लेखक हा सामाजिक बदलाचा केवळ तटस्थ साक्षीदार असून चालणार नाही. त्याचा परिवर्तनाशी भावात्मक संबंध असावा. तसा असेल तरच, त्याच्या साहित्याला ' समाज-पण ' लाभेल. जागतिक साहित्यातल्या अनेक श्रेष्ठ कृतींची साक्ष काढली तर असे दिसून येते की, विशिष्ट प्रदेशातील जीवनानुभव त्या कृतींनी टिपले. तेथील भावना, भाषा उचलली. तेथील जीवनाचा अन्वयार्थ लावला. आणि त्या परिसरात घडलेला माणूसच रंगवला. म्हणूनच त्या कृती विशेष ठरल्या. ग्रामीण साहित्यातही आजवर प्रकट न झालेले असंख्य अनुभव आहेत. खेड्यांच्या अंतरंगांशी आपल्या अंतःकरणाचा सूर जुळवणारा साहित्यिक हवा आहे. आजची ग्रामीण कथा आणि कादंबरी बहुधा एकसुरीच वाटते. अनुभवांची विविधता त्यातून जाणवत नाही, अशी टीका काही समीक्षकांनी केली आहे. कोंडी फोडण्याचे प्रयत्न अगदीच झाले नाहीत असे मात्र नव्हे. पण टीकेतल्या सत्यांशाकडे लक्ष दिलेच पाहिजे. विदर्भ, मराठवाडा, कोकण, खानदेश आणि उरलेला महाराष्ट्र, गोवे या साऱ्या प्रदेशांना व त्यातील ग्रामजीवनाला वेगळे रूपरंग आहेत. अठरा पगड जमातींनी भरलेल्या या ग्रामस्थांच्या आयुष्यातील बदलते नाट्य पकडण्याचा प्रयत्न लेखकांनी केला पाहिजे. त्या त्या विभागातील लेखक, कवी आपला अनुभव अधिक ताकदीने मांडू शकतील. ना. धों. महानोर यांच्यासारखा कवी हे एक उदाहरण. सारेच ग्रामीण जीवन एकरंगी, एकपदरी असते असा भ्रम कित्येक शहरी लेखकांनाही झाला आहे. खरे तर अलीकडे शहरेच आपला चेहरा-मोहरा हरवून बसली आहेत. पण अजूनही प्रत्येक खेड्याला त्याचा एक तोंडवळा आहे. प्रत्येक ग्रामीण विभागाला त्याची एक विलक्षण जिवंत भाषा आहे.

ग्रामीण साहित्याची भाषा कोणती असावी हा एक वादाचा मुद्दा. प्रत्येक साहित्य स्वतःची भाषा घेऊनच अवतरते. भाषा हा त्याचा अंगभूत अवयव असतो. ललित साहित्याची भाषा साधनीभूत नसते. ज्या लोकजीवनाचे चित्रण त्यात येते, त्याचीच म्हणजे लोकभाषाच साहित्यात उतरली पाहिजे. तिचे अपरिहार्यत्व जाणवले पाहिजे. कदाचित लेखकाची भाषा वेगळी असू शकेल. पण त्याच्या साहित्याने मात्र विशिष्ट

ग्रामीण भाषेतून आविष्कार करावा. शंकर पाटील आपल्या कित्येक कथांतून जे निवेदन करतात त्यांचा ग्रामीणपणा हा त्या कथांशी पूर्णांशाने निगडित झालेला असतो. खेड्यातल्या अशिक्षित माणसाची कथा सांगताना, त्याच्या आजूबाजूच्या स्थितीचे चित्र रेखाटताना लेखकाचे तृतीयपुरुषी निवेदन शुद्ध प्रमाणभाषेत आणि त्यातील संवाद मात्र गावरान भाषेत असतील तर काही रसिकांना ते खटकेल असे मला वाटते. कथेशी आणि तिच्यातील खेडवळ वातावरणाशी सूर जुळवताना शहरी भाषेमुळे रसविघ्न निर्माण होईल. भाषा कोणती असावी हे अखेर त्या साहित्याच्या प्रकृतीवर, परिणामांवरच अवलंबून राहील. जिला आपण ग्रामीण भाषा समजतो ती, वस्तुतः किती संपन्न असते याची शहरवासियांना कल्पना नसते. तुकारामाच्या भाषेला किती गुणवत्ता आणि अर्थवत्ता आहे याची साऱ्यांनाच जाणीव आहे. कित्येक खेड-वळ शब्द शिष्ट भाषेचे रूप धारण करतात, तेव्हा आपली परिणामकारकता हरवून बसतात. अनागर भाषेची अकृत्रिमता ही अनुभवानेच समजते. लोकगीते, स्त्रीगीते ग्रामीण भाषेत आहेत म्हणूनच ती भावनेला भिडतात. बहिणाबाई चौधरींची कविता प्रमाणभाषेत लिहिली गेली असती, तर ती आजच्या इतकी काव्यात्म आणि सकस वाटली असती काय हा प्रश्नच आहे. ग्रामीण साहित्याचे जे अनिवार्य, महत्त्वपूर्ण घटक आहेत त्यात भाषा हा एक लक्षणीय भाग आहे. साहित्यातील अनुभवविश्वाला जिवंत रूप देण्याचे कार्य भाषाच करते. भाषा आणि अनुभव यांचे प्रवाह एकमेकांत मिसळून गेले म्हणजेच साहित्याला प्रत्ययक्षमता लाभते. खेड्यातल्या माणसाचे चित्र रेखाटताना त्याची खेडवळ बोली अपरिहार्यपणे चित्रात यावी लागते. कदाचित हा मतभेदाचा मुद्दा असलेही. पण माडगूळकर, पाटील, यादव यांच्या साहित्यातले ग्रामीण अनुभव त्यांनी योजलेल्या ग्रामीण बोलीनेच सहज तोलून धरले आहेत. 'गोतावळा' सारखी कादंबरी तर, संपूर्णपणे याच बोलीतून आकार घेते. ही कादं-बरी शहरी भाषेतून लिहिली गेली असती, तर आपला इच्छित परिणाम तिला साधता आला नसता. जो भावनिक आणि वैचारिक प्रत्यय ती कादंबरी आपल्याला देऊ शकते त्याचे मूळ जसे ग्रामीण अनुभवात आहे, तसेच ग्रामीण भाषेतही आहे. दलितांचे साहित्य त्यांच्या विशिष्ट भाषेतूनच सहजपणे उचंबळून येते, त्याप्रमाणेच ग्रामीण साहित्य आणि नागरभाषा हा समास विजोड ठरेल असे वाटते. मराठी भाषेच्या शक्तीचे अनेक पाझर महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून बोलल्या जाणाऱ्या लोकबोलीतून अखंड पाझरत आहेत याची जाण निदान आमच्या ग्रामीण लेखकांनी तरी ठेवली पाहिजे. आता हळूहळू या बोली नवे रूप घेत आहेत. दळणवळणाची साधने वाढली. खेडी आणि शहरे यांतले अंतर–सांस्कृतिक, सामाजिक–कमी होत चालले. शिक्षणाची साधने, वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन यांच्या माध्यमांतून भाषिक अंतरही फार राहील असे नव्हे. पण तरीही ग्रामीण जीवनाची काही स्वतंत्र लक्षणे असणारच ! माणसांप्रमाणेच प्रत्येक प्रदेशाला, तेथील निसर्गाला स्वतःचा एक चेहरा

असतो. संस्कृती, व्यवसाय, परंपरा, यांमुळे ग्रामीण बोली आणि नागरभाषा यात काही प्रमाणात अंतर राहणे हे अपरिहार्य आहे. ग्रामीण कथा-कादंबरीचा, कवितेचा आस्वाद घेताना त्यातील भाषेचा खेडवळ वासही रसिकाला सारखा जाणवत राहिला पाहिजे असे मी आग्रहाने म्हणतो. शहरातल्या वाचकाला आपली भाषा कळणार नाही म्हणून तो वाचक डोळ्यांपुढे ठेवून आपले ग्रामीण कथन मुद्दामच शहरी भाषेत कथित करणे ही एक कृत्रिम तडजोड नव्हे काय ? खेड्यातली भाषा ही प्रमाणभाषेतूनच निघालेली असते किंवा प्रमाणभाषेचा उगम हा ग्रामीण बोलीतून झालेला असू शकतो. त्यामुळे ग्रामीण बोलीतली कथा नागरवाचकांना समजू शकते. प्रमाणभाषेतले अनेक शब्द, वाक्प्रचार बोलीतही असतात. पण तिला येणारा स्वाद मात्र गावरान असतो.

आजपर्यंत निर्माण झालेल्या ग्रामीण साहित्याकडे काहीशा समाधानाने पाहता येते. पण हे समाधान निर्भेळ मात्र नाही. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या अव्वल दर्जाच्या काही साहित्यकृती वगळल्या, तर लिहिल्या जाणाऱ्या इतर ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा केवळ रंजनवादी आणि रोमँटिक आहेत. शहरी वाचकाला खेड्यांतल्या गोष्टी, कल्पनेचा मालमसाला भरून 'चविष्ट' करून सांगाव्यात हीच भूमिका दिसते. ग्रामीण जीवनाच्या तळाशी जाऊन तेथील मनुष्य आणि निसर्ग यांच्याशी सहरूप पावण्याची व त्यांचे वास्तव दर्शन घडवण्याची प्रामाणिक उर्मी तथाकथित ग्रामीण लेखकांत दिसत नाही. वाचकांना खरे ग्रामीण वाङ्मय कितपत वाचायला मिळते ? आजच्या ग्रामीण मराठी चित्रपटांची जी अवस्था झाली आहे, तीच स्थिती ग्रामीण साहित्याचीही होत आहे असे विधान खेदाने करावे लागते. खेडी आणि खेडुतांचे आयुष्य हे खरे तर कलावंताला मिळालेले फार मोठे आव्हान आहे. खेड्यांचा आत्मा ज्यांनी कधीच शोधला नाही, केवळ खेड्यातल्या काही ठराविक ठशाच्या मानगडींचेच जे चित्रण करीत राहिले, त्यांच्या साहित्याला ग्रामीण साहित्य ही संज्ञा देण्यात अर्थ नाही. खेड्यांतल्या मातीचा विशिष्ट वास शहरी वृत्तीच्या लेखकांना नीटसा हुंगता येत नाही. केवळ रुचिपालट म्हणून ग्रामीण वाङ्मयाकडे वळलेले आणि त्यात थोडे फार दिखाऊ यश मिळवलेले लेखक, स्वतःला ग्रामीण साहित्याचे ठेकेदार समजत असतील तर खुशाल समजोत. कोणत्याही साहित्यनिर्मितीच्या मुळाशी केवळ कलात्मक जाणिवा असून भागत नाही. जीवनाविषयी, समाजाविषयी खोल सहानुभूती असावी लागते. अभ्यास आणि अनुभव यांची जरूर असते. ग्रामीण जीवनाचा आत्मा शोधणारा, ग्रामीण मातीशी समरस होणारा लेखक हवा आहे. आज-उद्या तो भेटू शकेल अशी आशा करण्यास प्रत्यवाय नाही.

□

# विद्रोही जाणिवांचा पेटता आविष्कार

साहित्यात एखादा नवा प्रवाह निर्माण होतो तेव्हा तो एक अपघात नसतो. विशिष्ट जाणिवांतून, आकांक्षांतून काहीतरी नवरचना करण्याच्या ऊर्मीतून त्याचा उगम झालेला असतो. साहित्यनिर्मितीच्या मागे केवळ एखाद्या व्यक्तीच्याच भावभावना असतात असे नव्हे, तर एखाद्या प्रचंड समुदायाच्या तीव्र, स्फोटक इच्छाही उचंबळत असतात. साहित्य व्यक्तिनिष्ठ असते हे मान्य करूनही त्या व्यक्तिनिष्ठेला व्यापक सामाजिक मनःशक्तीतून बलवत्तर प्रेरणा लाभलेली असते. काही साहित्याभ्यासकांना हे मत मान्य होणार नाही. त्यांच्या दृष्टीने साहित्य म्हणजे एका व्यक्तीची अभिव्यक्ती असते. तुकारामाची कविता ही केवळ त्याचीच असते असे त्यांचे म्हणणे. खरे तर तुकारामाच्या नानाविध अभंगांतून तत्कालीन समाजातील सुखदुःखांनाही आकार मिळाला आहे. एका कालखंडातील सामान्य माणसांचा प्रतिनिधी म्हणून तुकाराम आपल्यापुढे उभा राहतो. आजचे दलित साहित्य एका शोषित, पीडित समुदायाचे फाटलेले जीवन आणि चिरडलेले मन प्रकट करते. त्या मनात वेळोवेळी उठणाऱ्या बंडखोरीच्या लाटा व्यक्त करते. या साहित्यात उमटलेल्या प्रतिक्रिया केवळ व्यक्तीच्या असत्या तर ते केव्हाच क्षीणबल ठरले असते. या साहित्यामागील प्रेरणांना सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक अर्थ आहे. पारंपरिक उथळ दृष्टीने जे साहित्याकडे पाहतात, किंवा ज्यांचा दृष्टिकोन साहित्यशास्त्रावर-पुस्तकांवर आधारलेला आहे, त्यांना दलित वाङ्मय ही घटना कशाचे फलित आहे हे समजणार नाही. साहित्य समजून घेण्यासाठी केवळ लेखक ही एक व्यक्ती मात्र अभ्यासून चालत नाही. या व्यक्तीची पाळेमुळे सामाजिक भूमीत खोलवर रुजलेली आहेत. कोणतीही व्यक्ती उपरी – आधाररहित नसते. शेकडो अदृश्य धाग्यादोऱ्यांनी तिला आधार दिलेला असतो किंवा बांधून टाकलेले असते. दलित साहित्याचे आकलन हे काही व्यक्तींचे नव्हेच. ते कोट्यवधी माणसांच्या समूहाचे, त्यांच्या संस्कृतीचे,

त्यांच्या धर्माचे व त्यातून निर्माण झालेल्या त्यांच्या सुखदुःखांचे आणि समस्यांचे आकलन असते. पण ज्यांच्या डोळ्यांवर कलावादी चष्मे आहेत, त्यांना दलित साहित्याचे साहित्य म्हणून काही वेगळे अस्तित्व आहे हे मान्य नाही. ते एकाच पठडीतून विचार करतात, हे त्यांच्या विचारांचे एकदेशीयपण हा देखील सनातन परंपरेचाच एक आविष्कार आहे.

स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव, अभिमान आणि प्रतिष्ठा यांचे भान साहित्य-निर्मितीला चालना देतात. ' स्व 'ची जाणीव व्यापक, विशाल बनत जाते. पण जेव्हा आपल्या अस्तित्वाची पुरेशी जाण नसते, तेव्हा साहित्यनिर्मितीची प्रक्रिया संभवत नाही. साहित्य लिहिण्याची प्रेरणा ही एका अर्थाने आपल्या अस्तित्वाची, अस्मितेची ग्वाही देणे आहे. आपल्यावरील अन्याय ओरडून सांगण्यातही अन्यायाबद्दलची विद्रोही जाणीव व्यक्त होते. दलित साहित्याचे मूळ हिंदुसमाजरचनेतल्या विषमता-वादी शक्तीत आहे हे ज्यांना नीटसे समजत नाही ते त्याची परीक्षा अगदीच ढोबळ निकषांच्या आधाराने करतात. हे साहित्य आज नियतीवाद, कर्मविपाक आणि अनेक शतकांची सांस्कृतिक परंपरा यांच्याविरुद्ध आपला आवाज बुलंदपणे उठवण्यासाठी सामर्थ्याची उपासना करीत आहे. त्याच्या मागे एक विप्लवी विचारसरणी ठाम उभी आहे. या विचारधारेचे आकलन म्हणजेच दलित साहित्याचे आकलन. खरे सांगायचे तर, दलित समाजानेही आपल्या आत्मस्थितीचे अधिक स्वच्छ मनाने निरीक्षण करण्याची जरूर आहे. केवळ प्रचलित समाजरचनेला आव्हान एवढेच मर्यादित उद्दिष्ट या साहित्याचे आहे काय ? मला तसे वाटत नाही. एक रचना उद्ध्वस्त करायची, पण दुसरी रचना उभी करायची ही बळकट भूमिका नसेल तर नुसत्या बंडाच्या घोषणेला अर्थ उरत नाही. दलित साहित्य एका वैचारिक पीठिके-वर उभे असले पाहिजे. केवळ भावनात्मक आवाहने करण्यासाठी किंवा कलात्मक मूल्यांची तरफदारी करण्यासाठी हे साहित्य आकार घेत नाही. भावना आणि कला-त्मकता हे साहित्याचे गुणधर्म अत्यंत महत्त्वाचे असतात हे मी अमान्य करीत नाही. पण एका विशिष्ट सामाजिक अवस्थेचा आविष्कार म्हणून जेव्हा साहित्य अवतीर्ण होते, तेव्हा त्याला केवळ दुःखवेदनेचा नव्हे तर, रचनात्मक, विध्वंसनात्मक तात्त्विक विचारसरणीचा आधार असावा लागतो. हा आधार घेणारा लेखक-कवी ' मी फक्त माझं गाऱ्हाणं मांडतो ' असे मानीत नाही. या साहित्याची वाट स्वतंत्र व निराळी आहे. रंजनवादी प्रेरणांच्या विळख्यात हे साहित्य कधी सापडेल असे वाटत नाही.

काही सुजाण समजले जाणारे समीक्षक या साहित्याचे वेगळेपण समजू शकत नाहीत याची दोन कारणे संभवतात. दलितांच्या अनुभवविश्वाशी सहकंप पावण्या-इतकी समरसता त्यांच्यात असत नाही किंवा सांकेतिक विचारांच्या वर्तुळातच फिरत राहिलेल्या यांच्या पुराण मनोवृत्तीला दलित साहित्यातून प्रकट होत असलेल्या नव्या जाणिवा रुचत नाहीत. साहित्य ही समाजाच्या जिवंतपणाची प्रभावी खूण असते.

जुन्याच साहित्याचे ढोल बडवीत बसलेला समाज फार तर इतिहासपूजक आहे असे म्हणता येईल, पण भविष्याच्या बाबतीत तो उदासीन आहे असे विधान करावे लागेल. काळ आणि परिस्थिती यांची पुटे साहित्यावर चढत असतात. कालबाह्य झालेल्या कृतींचा नव्या काळात फारसा उपयोग नाही हे कित्येक भाषिक समीक्षकांच्या लक्षात येत नाही. कोणतेही नवे साहित्य जेव्हा आपल्या अनुभवांशी इमान राखून आपली स्वतंत्र वाट चालण्याचा प्रयत्न करते, तेव्हा अनेक प्रकारच्या विरोधांना त्याला तोंड द्यावेच लागते. विरोधातून वाट काढणारे साहित्य जिवंत प्रकृतीचे असते. काही नव्या विरोधी आणि विद्रोही जाणिवा पोटात घेऊनच या साहित्याने आपल्या प्रवासाला सुरुवात केल्यामुळे काही तथाकथित समीक्षकांना जोरदार धक्के बसले. माझ्या मते या साहित्याचे निराळेपण असे की, त्याने काही मूलभूत प्रश्न वाचकांच्या व समीक्षकांच्या मनात उत्पन्न केले. आज दलित साहित्य व त्याचे तात्त्विक वेगळेपण मान्य केल्याशिवाय पुढे विचार करता येऊ नये अशी परिस्थिती दिसते. साहित्याच्या क्षेत्रातली ही एखादी तात्पुरती लाट असती तर ती केव्हाच विरून जायला हवी होती. पण हा एक नवजीवनवादी, जबरदस्त विचारांचा सामाजिक आणि वाङ्मयीन स्वरूपाचा उद्धत प्रवाह आहे हे गेल्या वीस वर्षांत सिद्ध झाले आहे.

चाकोरीतल्या संकेतनिष्ठ साहित्याबद्दल कोणी फारशी चर्चा करीत नाही. ते चर्चेचा, वादाचा विषयही होत नाही. पण जीवनातल्या विदारक सत्याचा मागोवा धीटपणे घेत चाललेल्या साहित्यातून काही वाद अपरिहार्यपणे निर्माण होतात. दलित साहित्याने या दृष्टीने खरोखरच काही नवे दिले आहे काय याचा तटस्थपणाने शोध घेतला पाहिजे. त्याची सामर्थ्यस्थाने व त्याच्या मर्यादा यांचाही विचार अलिप्त वृत्तीने होण्याची आवश्यकता आहे. या साहित्याची डोळे मिटून भलावण करणारे समीक्षक आणि हे साहित्य नव्हेच असे अभिनिवेशाने प्रतिपादन करणारे समीक्षक भेटत असल्यामुळेच, त्याची साधकबाधक चिकित्सा होणे अगत्याचे आहे.

ज्या अनुभवांना दलित लेखकांनी आकार दिला ते अनुभव मराठीत प्रथमच अवतीर्ण झाले. अत्यंत विदारक रीतीने, आपल्या नागड्या-उघड्या स्वरूपात सामोरे आले त्यामुळे ते लक्षवेधक तर ठरलेच, पण दृष्टीला चमत्कारिक, ओंगळ व प्रक्षोभक वाटू लागले. मध्यमवर्गीय डोळ्यांना अस्वस्थ करील, अंतर्मुख करील असेच या अनुभवांचे रूप – विद्रूप आहे. साहित्यातून प्रकट होणाऱ्या अनुभूती कशा असाव्यात याचा एक ‘ कलात्मक ’ साचा तयार झाला होता. त्याची भाषा, भूमिका यांनाही स्थैर्य आले होते. रसभावनांची एक व्यवस्था लावण्यात आली होती. साहित्यापासून कोणत्या अपेक्षा करायच्या याचीही एक शिस्त वाचकांत निर्माण झाली होती. लेखक आणि वाचक यांच्या वाटा ठरलेल्या असल्यामुळे सारे सुरळीत चालले होते. मधून मधून रुचिपालट म्हणून ‘ कला की जीवन ? ’ अशासारखे वाद खेळले जात असत. साहित्य, साहित्यिक आणि त्यांचे वादविवाद या साऱ्यांना मध्यमवर्गीय

जाणिवांची अपरिहार्य कक्षा होती. उपेक्षेच्या आणि अस्पृश्यतेच्या जीवघेण्या अंधारात खुरडत राहिलेला व शतकानुशतके प्रारब्धाला बोल लावीत बसलेला एक फार मोठा जनसमूह मराठी साहित्यात कुठेच प्रतिबिंबित झाला नाही. याचा अर्थच असा की, हे साहित्य सामान्य माणसाचे नव्हतेच मुळी. 'हे साडेतीन टक्क्यांचे साहित्य आहे' असा उपहास केला जातो त्याला काही अर्थ आहे. दलित लेखक आपले विशिष्ट विदारक अनुभव घेऊन साहित्यनिर्मिती करू लागले. आणि या साहित्याच्या विश्वात प्रचंड उत्पात घडावा अशी परिस्थिती निर्माण झाली. दलित साहित्यात भेटणारा माणूस आणि समाज पावलोपावली ठेचकाळणारा, आयुष्यात फरफटत निघालेला आहे. एकेकाळी उजेडाचे स्वप्नही त्याला आपल्या डोळ्यांनी पाहता येत नव्हते. या अगतिक माणसाच्या माथ्यावरचे आभाळ फाटलेले आहे. पायाखालची काट्याकुट्यांनी भरलेली जमीन दुभंगलेली आहे. त्याला धर्म आहे. पण धर्माने आणि परंपरेने त्याला आक्रंदत ठेवले आहे. अस्पृश्यतेचा जळता वणवा पोटात घेऊन लाचारीचे आयुष्य जगू पाहणारा हा माणूस, साहित्यात पूर्वी कधीच दिसला नाही. तो गावोगावी गावकुसाबाहेर आपले दुःख घोटभर पाण्याबरोबर- ( ते पाणीही त्याला सहजपणे मिळत नाही ) गिळून मूकपणे बसला आहे. त्याच्या भेगाळलेल्या मनाचे तुकडे पांढरपेशा लेखकाला दिसणे शक्यच नव्हते. मराठी साहित्याचे जग मुळी मूठभर पांढरपेशांचे होते. आता या साहित्यात नवनवीन चीत्कार उमटू लागले. पेटून उठलेले बंडखोर शब्द ऐकू येऊ लागले. सामाजिक न्यायाची मागणी करण्यासाठी मूठ वळवून आक्रमणाच्या पवित्र्यात उभी असलेली एक पीळदार मनोवृत्ती दिसू लागली. पण ही क्रांती अलीकडच्या पंधरा-वीस वर्षांतच झाली. दलित साहित्याची उपेक्षा करणे आता अशक्य आहे असे वाटून काही उच्चभ्रू टीकाकारांच्या 'संस्कृतप्रचुर' भाषेत थोडासा बदल झाला असावा अशी शंका येऊ लागली आहे. पण या संक्रमणाचे श्रेय दलित लेखक–कवींनाच दिले पाहिजे. ज्याचे जळत असते त्यानेच आरोळी ठोकायची असते. आपले पेटलेले गावकूस गावातील लोक येऊन विझवतील या लाचार आशेत अर्थ नाही. याची जाणीव दलितांना तीव्रपणे झाल्यानंतर हे स्थित्यंतर घडून आले. मध्यमवर्गीय साहित्याने दलितांविषयी मधून मधून शाब्दिक कळवळा मात्र दाखवल्याची नोंद सापडते. पण कोणाही अस्पृश्य व्यक्तीला दैनंदिन जीवनात आपण उद्‌ध्वस्त आणि निर्वासित आहोत असे वाटत होते, त्याची जाण 'सदाशिवपेठी' साहित्याने दाखविली नाही हे एक भेदक सत्य. आजचा दलित लेखक पूर्वीचे सारेच साहित्य नाकारलेच पाहिजे असे जेव्हा म्हणतो, तेव्हा हे उद्‌गार अतिरेकी आहेत अशी टीका करता येईल काय ?

नामदेव ढसाळांचे हे उद्‌गार टीकास्पद का वाटावेत ?
मी तुला शिव्या देतो, तुझ्या ग्रंथाला शिव्या देतो,
तुझ्या संस्कृतीला शिव्या देतो,

तुझ्या पाखंडीपणाला शिव्या देतो,
ईव्हन मी आईबापांना देखील शिव्या देतो,
मी हे सारं काही बोलणार नव्हतो,
पण माझे हात जागे झालेत.

जुन्या साहित्याच्या नकारामागे कोणती भूमिका आहे हे ज्यांना कळणेच शक्य नाही, ते साहित्याकडे केवळ वाङ्मयीन दृष्टीनेच पाहिले पाहिजे असा 'मौलिक' विचार पुनः पुन्हा मांडीत आहेत. साहित्यकृती ही कलाकृती असली तरी, माणसाच्या जाणिवांची, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाची अभिव्यक्ती असते. ती केवळ कला नसते. तिच्यातून मनुष्य आपल्या साऱ्या सुखदुःखांसह प्रकट होतो.

दलित साहित्यिकांनी बंडाची जी ठिणगी टाकली तिची आता ज्वाला झालेली दिसते. अर्थात या जागृतीचे श्रेय डॉ. आंबेडकरांसारख्या क्रांतिकारक विचारवंत साहित्यिकाकडे जाते. आंबेडकरांची आव्हानप्रद विचारधारा या साहित्यिकांनी सर्वस्वी प्रमाण मानावी हे अगदी स्वाभाविक आहे. कारण आंबेडकरांनी दुःखवेदनेला शब्द दिले. त्या शब्दांत स्फोटक विचार भरले. विचारात अन्यायाशी दोन हात करण्याची स्फूर्ती आणि शक्ती ओतली. भरडला गेलेला शापित माणूस बंडखोरीचा आवाज उठवू लागतो. तेव्हा माणसांची संस्कृती अधिक समृद्ध होते. साहित्याला जीवनकळा लागते. परतंत्र आणि पराभूत झालेला, धुळीत पडलेला, धूळधाण झालेला पारंपरिक धूळफेकीला बळी पडलेला हा दलित गुलाम एका नव्या स्पर्शाने उठून बसला. स्वतःच्या आवाजात, स्वतःसाठी स्वतंत्रपणे बोलू लागला, लिहू लागला, आपली हरवलेली अस्मिता शोधू लागला. केवळ साहित्याच्या दृष्टीनेच नव्हे तर, सामाजिक संदर्भातही दलितांच्या या उत्थानाला एक विलक्षण अर्थ आहे. मराठी सारस्वताभोवती उभ्या असलेल्या अनेक तटबंदी आता कोसळू लागल्या आहेत. ज्ञानेश्वरांनी सरस्वतीचे वर्णन करताना तिला 'अभिनववाग्विलासिनी' असे सार्थपणे संबोधले आहे. साहित्यातले हे अभिनव दर्शन एका संक्रमणाचे चिन्ह आहे. प्रथम त्याचे स्वागत केले पाहिजे. पण हे भाबडेपणाने केले पाहिजे असे मला मुळीच म्हणायचे नाही. नवसामर्थ्याचे कोंभ वर येत असताना, करंटेपणाने त्यांना अपशकून करणारी मनोवृत्ती सयुक्तिक नाही इतकेच या संदर्भात म्हटले पाहिजे. प्रा. श्री. म. माटे यांनी 'भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी' या नावाचा एक वैचारिक लेख लिहून आपली भूमिका मांडली होती. भिन्न भिन्न व्यवसायातले लोक जेव्हा आपल्या व्यवसायातली परिभाषा घेऊन लिहू लागतील, तेव्हाच भाषा आणि साहित्य यांची वाढ होत जाते. उदाहरणे घेताना त्यांनी गोरा कुंभार, नरहरी सोनार, सावता माळी वगैरे वेगवेगळ्या व्यवसायातील कवींच्या कविता दिल्या होत्या. सामाजिक जीवनाची विविध रूपे साहित्य दाखवीत नसेल तर ते खुरटत जाऊन निष्प्राण बनते, याची साक्ष इतिहासातून मिळते. मराठी-तली पंडिती कविता संस्कृत काव्याच्या निर्जीव अनुकरणातून चालत राहिली, त्यामुळे

तिचा समाजाशी संवाद होऊ शकला नाही. चार बुद्धिजीवी पांढरपेशांच्या पलीकड या कवितेला कोणीही ओळखीत नव्हते. आज निर्माण होत असलेले दलित साहित्य कोणताही पांगुळगाडा घेतल्याशिवाय आपल्या पायांवर चालू लागले याचा अर्थ काही नवी स्फुरणे आणि आकांक्षा त्याच्या मनात रुजल्या आहेत. महार, मांग, चांभार, ढोर वगैरे जातिव्यवस्थेचे बळी ठरलेले लोक आपली स्वतःची एक जोमदार बोली घेऊन आणि त्यापेक्षाही विचित्र, विपरीत अनुभव घेऊन साहित्यात उतरले. हे वाङ्मयीन प्रगतीचेच लक्षण नव्हे काय ? माणुसकीची नवी जाण देण्याचे कार्य या प्रवाहामुळे होत आहे. जीवनाचे निरनिराळे संदर्भ त्यामुळे प्रकाशात येत आहेत. वाङ्मयाचे व जीवनाचे प्रदेश विस्तारत आहेत. साहित्य आपल्या मूळ प्रकृतीच्या जवळ जात असून, कल्पनारम्य ( Romantic ) वातावरणाच्या कोषातून ते बाहेर पडण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. समाजमनात खदखदत असलेल्या संघर्षांचे आकलन व्हायला या साहित्याने साहाय्य केले आहे. निरागस आनंद देण्याघेण्याच्या हेतूतून निर्माण होणारे साहित्य निरुपद्रवी असते. त्याच्यात झेपही नसते आणि माणसाला पिचून टाकणारे दुःखही नसते. पण दलित साहित्याची प्रकृती नुसती निराळी नाही, ती वादळी आहे.

स्वातंत्र्य मिळून छत्तीस वर्षे उलटली. अजूनही अस्पृश्यांना सामुदायिकरीत्या जाळण्याचे प्रकार या देशात घडतात. दलित स्त्रियांवर बलात्कार होतात, अनेक गावांतून सार्वजनिक पाणवठ्यावर आजही त्यांना पाणी भरता येत नाही. मानवी हक्कांची कित्येक दारे अजून त्यांच्यासाठी बंदच आहेत. धर्म आणि शास्त्र यांनी या वर्गाची अद्यापी शिकार चालवलेली दिसते. या शास्त्रपूत समजल्या जाणाऱ्या अन्यायाविरुद्ध विद्रोहाचे तप्त स्वर उमटावेत ही घटना आश्चर्याची नव्हे. खरे आश्चर्य असे, की विद्रोहाची आग ओकणारे हे साहित्य फार उशीराने निर्माण होऊ लागले. माणसाचे शोषण करणारा, त्याची माणुसकी हिरावून घेऊन त्याला पशुतुल्य पातळीवर नेऊन ठेवणारा धर्म आपल्याशी पिढयान् पिढया शत्रुत्व करीत आला आहे. हे सत्य कळायला दलित समाजाला कित्येक शतकांची वाट तुडवावी लागली. कोणीतरी आपल्यावर एक दुष्ट व्यवस्था लादली आहे, आपण प्रत्येक क्षणी त्या व्यवस्थेच्या चरकात पिळले जात आहोत हे लवकर लक्षात येत नाही. म्हणूनच शोषकांचा अल्पसंख्य वर्ग धूर्तपणाने शोषितांच्या सभोवताली अज्ञानाच्या भिंती उभ्या करून ठेवतो. या भिंती ईश्वरप्रणीत असल्याचे नाटक करण्यासाठी ग्रंथांची रचना करतो. अमर्याद सत्ता हातात असलेल्या या वर्गाला भाडोत्री ग्रंथकार मिळणे कठीण नसते. ईश्वरेच्छेने निर्माण झालेली ही अस्पृश्यता मोडून काढण्यासाठी प्रथमतः प्राचीन धर्मकल्पनांवर आणि शास्त्रपुराणांवर प्रहार करावे लागतात. ' आपली पायरी खालचीच असते. व ती तशीच राहणार ' असल्या मानसिक गुलामगिरीचे साखळदंड तोडण्यासाठी जुने ग्रंथ आणि तो जुना-

पुराणा झालेला ईश्वर हे निकालात काढावे लागतात. हे काम केवळ कथा-कादंबऱ्यांचे असत नाही. जीवन उभे करण्याची एक बुलंद वैचारिक निष्ठा घेऊन लढण्याची तयारी ठवलेल्या बुद्धिवादी नेत्यालाच हे शक्य होते. दलित साहित्यात ही वैचारिक रग आली आहे काय ? ती दलित समाजात भिनल्याशिवाय साहित्यात उतरणार नाही, आणि साहित्यातून तिचा प्रचार झाल्याशिवाय ती दलिताच्या शेवटच्या झोपडीपर्यंत पोहोचणार नाही. या साहित्याला विद्रोही साहित्य अशी एक सार्थ संज्ञा दिली जाते. अस्पृश्यतेची दुःखेच केवळ चितारणाऱ्या साहित्याला विद्रोही म्हणता येणार नाही. या दृष्टीने पाहिल्यास यच्चयावत दलित लेखकांनी लिहिलेले साहित्य विद्रोही ठरत नाही. विद्रोहाच्या रसरशीत जाणीवा घेऊन शोषण करणाऱ्या शक्तींवर तुटून पडणे हेच विद्रोही साहित्याचे प्रमुख प्रयोजन. दीर्घकाळच्या अगतिकतेनंतर या पराभूत लोकांच्या हातात आता शस्त्र आले आहे. त्याचा उपयोग विद्ध्वंस करण्यासाठीच झाला पाहिजे. सडलेल्या परंपरेची नाळ कापण्यासाठी हे शस्त्र धारदार व्हायला हवे. रंजनवादी आणि कलावादी प्रेरणा या साहित्याने अडगळीतच टाकायला हव्यात. जुन्या साहित्य-शास्त्राच्या अपुऱ्या, सांकेतिक फुटपट्ट्या हातात घेतलेल्या विद्वानांच्या भृकुटिभंगाकडे लक्ष देण्याचे कारण नाही. ' त्यांना आपला पिढीजात उद्योग इमाने-इतबारे करू द्या. '

अशासारखे या साहित्यावर घेण्यात येणारे काही आक्षेप अगदीच प्राथमिक स्वरूपाचे आहेत. एक ' मान्यवर ' टीकाकार म्हणाले,

' दलित साहित्याची भाषा अगदीच वेंगरूळ. आणि अशिष्ट आहे. या भाषेला वाङ्मयीन मूल्य काय आहे ? कलात्मकतेचा स्पर्शही नाही. अशा परिस्थितीत याला साहित्य म्हणणेही कठीणच वाटते. '

साहित्याच्या भाषेचा हा प्रश्न साहित्यविषयक सांकेतिक विचारांतून उद्भवलेला आहे. तो अगदीच गौण आहे. प्रत्येक अनुभवाला त्याची स्वतःची भाषा मिळाली पाहिजे. एखादी पेटती जाणीव व्यक्त होताना तिचे भाषारूप धगधगीतच असणार, नव्हे ते तसेच असणे आवश्यक. ज्याच्या मनात आपल्या विटंबनेची, अपमानाची चीड संचारली आहे, त्याच्या शब्दांना प्रचलित शिष्टमान्य संकेतांचे व्याकरण कसे सांभाळता येईल ? प्रक्षोभाची भूमिका अद्यापि पुरेशा तीव्रतेने साहित्यातून प्रकट झाली आहे असे मला वाटत नाही. मूलतः मराठी लेखक– आजचा मराठी लेखक सामाजिक दृष्ट्या अगदीच क्षीण भाव असलेला आहे. वाङ्मयातून आपले सामाजिक न्याय-अन्याय, आपले शोषण प्रकट व्हावे ही प्रक्रियाच अद्यापि मंद आहे, वाङ्मयनिर्मिती ही केवळ सुखी, सुशिक्षित, सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या लोकांची मिरासदारी आहे अशीच भ्रांत धारणा अजूनही आपल्या मनात आहे. मनातला प्रक्षोभ प्रक्षुब्ध भाषेतूनच आकार घेणार हे उघड आहे. भाषेची सुंदरता विशिष्ट शब्दरचनेमधूनच जाणवते असा एक गैरसमज रूढ झाला आहे. जी विशिष्ट अनुभूती वाचकांना मिळावी असे लेखकाला वाटते, ती त्याच्यापर्यंत परिणामकारकतेने पोहोचली म्हणजे

ती भाषा यशस्वी झाली असेच म्हणावे लागेल. गेल्या सातशे वर्षांत मराठीत जे साहित्य निर्माण झाले त्याच्या भाषेत अनेक बदल होत आलेले आहेत. ज्ञानेश्वरांची शब्दकळा त्यांच्या प्रकृतीला, प्रवृत्तीला अनुरूप वाटते. तुकारामाची राकट, स्पष्ट आणि क्वचित प्रसंगी ग्राम्य असलेली भाषा त्यांच्या प्रवृत्तीची आणि अनुभूतीची द्योतक आहे. त्यामुळेच हे दोन्ही कवी प्रत्ययकारी भाषेतच लिहितात. कोणाची भाषा अधिक सरस हा तुलनात्मक विचार अप्रस्तुत ठरतो. भाषेचा संबंध व्यक्तित्वाशी, जीवनदृष्टीशी, वर्ण्यविषयाशी, आशयाशी आणि अनुभवाशी असतो. यांचा संदर्भ सोडून भाषेचा स्वतंत्रपणाने विचार करता येत नाही. दलित साहित्यात आज तरी क्षोभाची लाट आलेली दिसते. त्यामुळेच विद्रोह आणि आक्रमकता यांचा प्रभाव या लेखकांवर पडणे अपरिहार्य आहे. हा प्रक्षोभ हेच आजच्या दलित साहित्याचे वैशिष्ट्य असले तरी, उद्याचे दलित साहित्य याच स्वरूपाचे राहील असे मात्र नाही. काळ आणि परिस्थिती हळूहळू बदलत आहे. या बदलाचे साहित्यावरही परिणाम होत राहणार यात शंका नाही. केवळ प्रक्षोभाचे अतिरेकी शब्द कोणताही लेखक, कवी किती काळ उच्चारणार आहे ? साहित्याला स्थायी स्वरूपाची शक्ती देण्याची कला मिळविण्यासाठी लेखकांना विविध रसानुभवांचा आविष्कार करावा लागेल.

आजच्या दलित साहित्याच्या संदर्भात इतकी चर्चा केल्यानंतर व त्याच्या सामर्थ्यस्थानांचा मागोवा घेतल्यानंतर, आता त्याच्या मर्यादांचाही सम्यक् विचार झाला पाहिजे. आपले साहित्य हे समाज बदलण्याच्या, अन्यायनिर्मूलनाच्या उर्मीतून अपरिहार्यपणे निर्माण होत आहे व ते क्रांतीचे साधन व्हावे असे वाटत असेल, तर या साहित्याच्या कलात्मक अंगांचाही डोळसपणे विचार झाला पाहिजे. अमेरिकेतल्या निग्रोंच्या साहित्यात प्रकट झालेली बंडखोरी व मूर्तिभंजकता आशय आणि आविष्कार यांच्या दृष्टीने कलात्मकतेच्या पातळीवर गेलेली आहेत. सामाजिक जाणिवेच्या साहित्याला कलात्मकतेमुळे अधिक बळ येते हे निर्विवाद. कलातत्त्वांच्याकडे पाठ फिरवलेली साहित्यकृती फार काळ लोकमानसात राहत नाही. ती प्रचारी असण्यास हरकत नाही, पण प्रचारालाही कलात्मकतेची डूब द्यावी लागते. 'आम्ही क्रांतीचे पाईक आहोत, कलेचे दास किंवा पूजक नाही' असे म्हणणाऱ्या लेखकालाही कलेची उपासना करावीच लागेल. कारण त्यांच्या साहित्याची मूलभूत प्रेरणा समता आणि बंधुभाव बळकट करण्याची आहे. हे कार्य केवळ आकस्ताळी लेखनातून होऊ शकणार नाही. आजची दलित कविता जेवढी प्रत्ययकारी आहे तेवढी दलित कादंबरी नाही. कथेच्या आणि नाटकाच्या क्षेत्रात विकासाच्या खुणा दिसतात. पण विद्रोहाची, क्रांतीची तात्त्विक भूमिका विवरून सांगणारे वैचारिक साहित्य फारसे निर्माण झाले नाही. आपल्या वेदनेच्या वर्तुळात दलितांचे साहित्य सापडले आहे अशी काही टीकाकारांनी टीका केली आहे. खरे तर पिढ्यान्‌पिढ्या या वेदनेने दलितांच्या आयुष्याची जी भयानक चिरफाड केली आहे, त्या व्यथेचा ठणका त्यांच्या साहित्यात प्रामुख्याने

येणारच. आपल्या वेदनेची ते जाहिरात करतात अशा अर्थाची जेव्हा कोणी टीका करतो तेव्हा त्याच्या अज्ञानाची चीड येते. पण या वेदनेवर मात करणारी, आव्हान देणारी, नव्या समाजरचनेचे स्वप्न रंगवणारी आणि अन्यायाला गाडण्यासाठी रगेल विचारांचा बुभुत्कार करणारी साहित्यकृती आता हवी आहे. अशी समर्थ रचना आपोआप निर्माण होणार नाही. आपल्या मर्यादांवर मात करून शोषितांच्या आणि शापितांच्या विलक्षण दुःखाची मीमांसा करणारी साहित्यरचना करण्याची प्रेरणा या लेखकांना स्वस्थ बसू देणार नाही. कणव, लाचारी आणि अगतिकता ही दलित साहित्याची वैशिष्टये ठरू नयेत. आपल्याला सोसाव्या लागलेल्या दुःखांचे दर्शन जरूर घडवावे, पण त्यांचे प्रदर्शन करण्याची प्रवृत्ती असू नये. या साहित्याची क्षितिजे व्यापक होत जातीलही, पण क्रांतिकारक, ज्वलंत प्रेरणांचा अग्नी जोपर्यंत या लेखकांच्या पदरात धगधगत असेल तोपर्यंतच.

आणखी एका मूलभूत प्रश्नाचा विचार व्हायला हवा. दलित म्हणजे कोण? वर्णव्यवस्थेत सर्वांत खालचे स्थान मिळाल्यामुळे गावकुसाबाहेर फेकल्या गेलेल्या शूद्रातिशूद्रांना 'दलित' ही संज्ञा आहे. दळला गेलेला, भरडला गेलेला तो दलित. सामाजिक चौकटीत शेकडो वर्षे बंदिस्त होऊन पडलेला हा समूह दलितांचा आहे. त्यांचे बंड समाजरचनेविरुद्ध आहे. प्रश्न असा निर्माण होतो, की दलित या शब्दाची व्याप्ती इतकी मर्यादित असावी काय? घाम गाळणारा, कष्ट उपसणारा आणि तरीही अर्थव्यवस्थेत खालची पायरी मिळालेला कंगाल मनुष्य दलित ठरत नाही काय? दलित ही जमात नसून ती एक अवस्था आहे. म्हणूनच दलित साहित्य म्हणजे विशिष्ट जातीचे, जमातवादी साहित्य नव्हे. सामाजिक परिवर्तन याचा अर्थ जात आणि धर्म यांच्या संदर्भातच घेणे चुकीचे ठरेल. नानाप्रकारचे अन्याय फणा काढून माणसाला दंश करीत आहेत. शूद्रांवर विलक्षण अन्याय झाला हे मान्य करूनही केवळ शूद्रांवरील अन्यायाचे चित्र हेच दलित साहित्याचे एकमेव वैशिष्टय ठरू नये. समाजजीवनातल्या कुरूपतेवर, वैगुण्यांवर, दंभावर, शोषणावर, माणसाला गुलाम बनविणाऱ्या विषारी तत्त्वज्ञानावर सारख्याच त्वेषाने तुटून पडण्याची व्यापक दृष्टी साहित्यात येणे आवश्यक आहे. 'मळयास माझ्या कुंपण पडणे, अगदी न मला साहे' ही भूमिका घेऊन साकल्याचा प्रदेश साहित्याने आक्रमिला पाहिजे. आम्ही केवळ दलित जमातीपुरताच विचार करतो असे कोणताही साहित्यिक म्हणणार नाही. त्यामुळेच दलित या शब्दाभोवतालचा अर्थ व्यापक होत गेला तर, संपूर्ण, आमूलाग्र क्रांतीचा पुरस्कार करणारे, प्रागतिक विचार-भावनांचे व्यासपीठ म्हणून दलित साहित्याचा उल्लेख होऊ शकेल. एका विराट परिवर्तनवादी चळवळीची बीजे या साहित्यात सामावली आहेत. त्यांच्या विकासासाठी अधिक प्रयत्न व्हावेत. माणसाचे माणूसपण मुक्तपणे घोषित आणि प्रस्थापित करून त्याच्या भोवतालचे अनेक साखळदंड तोडण्याच्या प्रक्रियेतला एक भाग म्हणजे दलित साहित्य.

डॉ. आंबेडकरांची भूमिका व्यापक होती. महाड सत्याग्रहाच्या वेळी ते म्हणाले होते,

'आमचा कटाक्ष ब्राह्मण्यावर आहे. ब्राह्मण लोक आमचे वैरी नसून ब्राह्मण्य-ग्रस्त लोक आमचे वैरी आहेत. आमच्या मनाची ठेवण अशा तऱ्हेची असल्यामुळे आम्ही योजलेल्या सत्याग्रहात हरएक व्यक्तीस मुभा आहे. मग ती व्यक्ती कोण-त्याही जातीतील असो.'

जातीय आणि सांप्रदायिक भिंतींच्या पलीकडे जाऊन माणसाच्या मूलभूत व्यथेची कहाणी रेखाटण्याची प्रगत शक्ती दलित साहित्याच्या मुळाशी निश्चित रूपाने आहे. म्हणूनच हे एका जातीच्या लोकांचे साहित्य नव्हेच. दलित साहित्याची निर्मिती ब्राह्मणही करू शकतो. त्यासाठी लेखकाचा जन्म गावकुसाबाहेरच झाला पाहिजे किंवा तो शूद्र असला पाहिजे हा संकेत निरुपयोगी आहे. मानवी समतेचा जाहीरनामा प्रकट करणाऱ्या या वाङ्मयाने फुले, आंबेडकरांचे नेतृत्व प्रमाण मानल्या-मुळे हे वाङ्मय विकासोन्मुखच राहणार.

आजच्या मराठी साहित्याचे एकंदर स्वरूप पाहिल्यानंतर दलित साहित्यातून प्रकट होणाऱ्या क्रांतिवादी जाणिवांचे विशेष उत्साहाने स्वागत केले पाहिजे असे मला वाटते. ऐतिहासिक कथा आणि कादंबऱ्यांच्या माध्यमातून भूतकालाचे पोवाडे भाविक-पणाने गायिले जात आहेत. पुराणकथा पुन्हा परंपरेचे तुणतुणे वाजवीत आहेत. पुनरु-ज्जीवनवादी प्रवृत्ती या प्रकारच्या वाङ्मयातून डोके वर काढताना दिसत आहेत. सामाजिक समजल्या जाणाऱ्या, कलावादी म्हणवून घेणाऱ्या साहित्यात स्त्री-पुरुष संबंधाचे चर्वितचर्वण चालू आहे. पण यावेळी विद्रोहाचे निशाण घेतलेल्या साहित्यि-कांचा लढा साहित्याच्या माध्यमातून नवा आकार घेत आहे. या लढ्याचे स्वरूप आणि प्रयोजन ज्यांना समजत नाही त्यांना इतकेच सांगितले पाहिजे की, 'भल्या गृहस्थांनो, हे साहित्य तुमच्यासाठी नाहीच मुळी! यातल्या मानवी मूल्यांचा, यातल्या गर्जनांचा, यातल्या ध्येयवादाचा आणि सुखदुःखांचा तुमच्याशी काहीच संबंध नाही. तुम्ही तुमच्या ढोलीत खुशाल बसा. ही साहित्याची यात्रा दमदार पाऊले टाकीत पुढेपुढेच जाणार आहे.'

□

# साहित्य आणि जीवनवेध

जीवनाचे चित्रीकरण करण्याच्या उर्मीतून साहित्याचा जन्म झाला. शेकडो वर्षांपासून काव्य-नाटकांतून, कथा-कादंबऱ्यांतून जीवन रंगवले जात आहे. पण हे जीवन अजूनही आकलनाच्या क्षेत्रात आले आहे असे वाटत नाही. या जीवनासारखे आश्चर्यकारक, नाविन्यपूर्ण दुसरे काही असेल का ? इतके रसमय आणि रहस्यमय ! रम्य आणि भीषण, सुखदुःखांनी काठोकाठ भरलेले जीवन म्हणजे एक अतिविलक्षण प्रकरण आहे यात शंका नाही. काय असेल बरे या जीविताचा अर्थ ? कुणास ठाऊक ! कसे आहे त्याचे वास्तव रूप ? कसा आहे त्याचा रंग आणि गंध ? जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न आजपर्यंत असंख्य लोकांनी केला असेल. तत्त्ववेत्त्यांनी, प्रतिभावंतांनी, दार्शनिकांनी अक्षरशः अनेकांनी हा प्रयत्न केला. पण हे जीवन मोठे चमत्कारिक आहे. कांचनमृगासारखे सान्यांनाच हुलकावण्या देते. काही केल्या ते हाती लागत नाही. वाऱ्याला एक वेळ बांधून ठेवता येईल पण जीवनाला कसे पकडून ठेवणार ? ते समोर उभे असते, आपल्याला खुणावते, हसवते, रडवते, भुलवते. पण तरीही आपण त्याला थांबवू शकत नाही. ते पळतच असते. त्याचा एक अनिवार लोभ आपल्याला जडलेला असतो. तो सुटता सुटत नाही. चंचल असणाऱ्या, फसवणाऱ्या या जीवनावर आपले अतूट प्रेम असते. आपल्याला माहीत असते की, ते आपल्या ताब्यात कधीच येणार नाही. एक दिवस ते सरळ आपल्याकडे पाठ फिरवून बेमुर्वतखोर होऊन निघून जाणार आहे, पण त्याची ओढ तर आपल्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूत भिनलेली असते. जीवनाची ओढ मनस्वी असते. कृष्णाच्या मुरलीचे सूर कानावर आले की, राधेच्या देहकणांत कृष्णाचे प्रेम उचंबळून येत असे. ती सैरभैर व्हायची. हातातले काम टाकून तिचे पाय त्या सुरांच्या ओढीने चालत राहायचे. मन केव्हाच कृष्णरूप झालेले असायचे. माणसाचे जीवनप्रेम असेच आतुर, असेच अदम्य असते. जीवनाची सोबत-संगत हे तर आपले सर्वस्व असते. कुणाला नको

आहे बरे हे जीवन? ज्याच्या भोवती मृत्यू घुटमळत आहे अशा एखाद्या पार वृद्धाला विचारा, तो म्हणेल, 'छे छे! मला जीवन हवे आहे. मला अजून जगायचे आहे. इतक्यातच मरायची माझी तयारी नाही. मला जगू द्या. मला जगायचे आहे.' काय म्हणावे या जीवनासक्तीला?

जीवनाचा नेमका अर्थ तरी काय? त्याचे नेमके स्वरूप तरी कसे आहे? काहीच सांगता येत नाही. धर्मसंस्थापक गौतम बुद्धाने निर्वाणाच्या वेळी मावळत्या सूर्याकडे पाहिले. त्याचे कोवळे किरण सर्वत्र पसरले होते. त्या पिवळसर, सुंदर किरणात सारे आसमंत कसे सुंदर दिसत होते. भगवान बुद्ध म्हणाले, 'मानवी जीवन किती रमणीय आहे!' काही वेळाने त्यांचे निर्वाण झाले. पण जीवनाच्या नितांत सुंदरतेची ग्वाही अखेरच्या क्षणीही बुद्धांनी दिली. ते जीवनाचा निरोप घेत होते. पण या जीवनाच्या रमणीयतेने त्यावेळी ते प्रसन्न, प्रमुदित झाले होते. खरेच जीवित इतके रमणीय आहे काय? राजा भर्तृहरीने जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला. एका श्लोकात त्याने या शोधाचा निष्कर्ष सांगितला आहे. तो म्हणतो —

'कोठे वीणावादन चालू आहे, तर कोठे रडारड सुरू आहे. कोठे विद्वानांचा आनंददायक परिसंवाद ऐकायला मिळत आहे, तर कोठे दारू पिऊन झिंगलेल्या दारू-बाजांच्या गलिच्छ भांडण्याचा आवाज येत आहे. एखाद्या ठिकाणी सुंदर युवतींचे मनोहर दर्शन होत आहे, तर दुसऱ्या ठिकाणी म्हातारपणामुळं जर्जर झालेल्या वृद्धेचं कष्टदायक दर्शन घडत आहे. अरे, हा संसार, हे जीवन, अमृतमय की विषमय हेच समजत नाही.' भर्तृहरीने जीवनाच्या बाजू आपल्यासमोर स्पष्ट ठेवल्या, पण निष्कर्ष मात्र त्याला काही काढता आला नाही. कसा काढणार? अगदीच परस्परविरोधी, विसंगत चित्रांनी आणि घटनांनी हे मानवी जीवन जर ओथंबून गेले असेल, तर एखादा निश्चित स्वरूपाचा अर्थ त्यातून कसा निघणार? आपली असमर्थता प्रकट करून भर्तृहरी मोकळा झाला. तो म्हणतो त्याप्रमाणे जीवन सुखाचे की दुःखाचे तेच कळत नाही. सुखदुःखाच्या आडव्या-उभ्या धाग्यांनी आपल्या जीवनाचे वस्त्र नियतीने विणून ठेवले आहे. येथे प्रकाशही आहे आणि अंधारही आहे. सुस्वरही आहेत आणि थरकाप उडवणारे भेसूर सूरही आहेत. भर्तृहरीला काहीच निर्णय करता येऊ नये हे स्वाभाविक आहे.

महाकवी कालिदासाची साक्ष काढली तर काही वेगळेच ऐकायला येते. आपल्या 'रघुवंशात' तो म्हणतो,

'मरण ही प्रकृती आहे. जीवन मात्र विकृती आहे. विवेकवंतांनीच असे म्हटले आहे.' असे सांगून त्याने आपला जीवनविषयक अभिप्राय व्यक्त केला आहे. जीवन ही विकृती आहे असे कालिदासासारख्या शृंगाररसाच्या सम्राटाने म्हणावे? विश्वास बसत नाही, पण त्याने म्हटले आहे खरे! अज राजा आपल्या प्रिय पत्नीच्या मृत्यूने विव्हल झाला तेव्हा, या आशयाचा श्लोक कालिदासाने लिहिला. एका दृष्टीने

त्याचे बरोबर आहे. जीविताऐक्षा मृत्यूच अधिक स्वाभाविक आहे. मरण ही अत्यंत अटळ अशी घटना आहे. मरणाला चुकवून जीवन कधी अमर होऊ शकेल का ? साऱ्या आयुष्यालाच मरणाच्या भुजंगाने असे घट्ट वेटोळे घातले आहे, की ते सोडवणे कुणालाच शक्य नाही. साऱ्यांनाच एक दिवस मरणाचा आश्रय घ्यावा लागतो. मरण-लाट थोपवण्याची प्राज्ञा तर युगंधर पुरुषांतही नाही. राम, कृष्ण, बुद्ध, ख्रिस्त यांसारखे महापुरुष या वाटेनेच निघून गेले. या लाटेने त्यांना आपलेसे केले. जगणे हा एक अपघात आहे, तर मरणे हा नियम आहे. जीवनासंबंधीचा हा विचार आपल्याला निराशेचा वाटला तरी शंभर टक्के खरा आहे. मरणाला जिंकायचे आणि चिरंजीव व्हायचे हे तुमचे-आमचे एक अद्‌भुत स्वप्न आहे. हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण किती तरी उरस्फोड करतो. शक्तिवर्धक औषधे घेतो. रोग प्रतिबंध व्हावा म्हणून सतत काळजी घेतो. जगण्याचा आणि जगतच राहण्याचा अट्टाहास धरतो. पण व्हायचे तेच होते. जन्मापासूनच मस्तकावर मरणाची अदृश्य तलवार लटकत असते. ती ध्यानीमनी नसताना अचानक कोसळते. आणि मग कित्येक वर्षांचे जीवन पाहता पाहता मृत्यूच्या वावटळीत उडून जाते. याचा अर्थ मृत्यू ही सर्वस्पर्शी, सर्वविनाशक शक्ती आहे. या महाशक्तीपुढे जीवन म्हणजे कोणत्या झाडाचा पाला !

मला येथे कुसुमाग्रजांची आठवण होते. ‘ मातीची दर्पोक्ती ’ या नावाची एक अस्वस्थ करणारी कविता त्यांनी लिहिली आहे. माती म्हणते, ‘ कोणाला कितीही गर्व होऊ द्या. रूपवतींना आरशात पाहताना आपल्या सौंदर्याचा गर्व वाटत असेल. बाहुबलींना आपल्या पराक्रमाची घमेंड असेल. पंडितांना आपल्या विद्वत्तेचा अहंकार वाटत असेल पण या साऱ्यांचा मस्तवालपणा अखेर मातीला मिळणार आहे. कारण माती हे तर अंतिम सत्य आहे. जीवनाचा अर्थ मूठभर माती हाच आहे. असले विचार आपल्याला विषण्ण करतात. आपण जीवनावर विश्वास ठेवून वावरत असतो. आणखी पाच वर्षांनी, दहा वर्षांनी काय काय करायचे याच्या योजना आपण मोठ्या उत्साहाने आखून ठेवतो. पण मृत्यूची योजना काही निराळीच असते. ‘ मनसा चिन्तितम् एकम् । दैवमन्यत्र चिन्तयेत । ’ हेच खरे ! विल्यम शेक्सपिअर हा जगप्रसिद्ध नाटककार. जीवनाची नानाविध रूपे त्याच्या नाटकांतून साकार झाली. माणूस आणि त्याच्या सुष्टदुष्ट प्रवृत्ती व त्यांतून दिसणारे रंगीबेरंगी जीवन या प्रतिभावंताने अनेक रीतींनी रंगविले. एका पात्राच्या तोंडून त्यान जे जीवनभाष्य व्यक्त केले आहे, ते आपल्याला विचार करायला लावणारे आहे.

‘ Life is a tale, told by an idiot, full of sound and fury and signifying nothing. ’

आयुष्य ही एका वेडयाने सांगितलेली अर्थशून्य कहाणी आहे. आयुष्य ही एक निःसार घटना आहे. या जगण्याला मग कसलाच अर्थ नाही. जगण्याची आपल्याला जी असोशी असते ती वेडेपणाची ठरते. सत्तर-पंच्याहत्तर वर्षे जगलेल्या एखाद्या

वृद्धाला जर विचारले, 'आपण इतकी वर्षें जगलात त्याच्यामागे कोणती प्रेरणा होती. आपण जगलंच पाहिजे असा आग्रह तुमच्या मनात होता काय ? कोणता हेतू बाळगून तुम्ही जीवनाचे कष्ट उपसलेत ?' या प्रश्नांची उत्तरे त्यालाच काय पण एखाद्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकालासुद्धा देता येणार नाहीत. इतकी वर्षं जगून आपल्या पदरात काय पडत असते ? माझ्या जगण्याला एक सुसंगत अर्थ आहे असे निश्चितपणे म्हणणारी माणसे कदाचित फार थोडी असतील. शेक्सपियरने हॅम्लेट रंगवला. ऑथेल्लो, लियर, मॅकबेथ यांसारख्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तीरेखा साकार केल्या. या माणसांत काही चांगल्या प्रवृत्ती होत्या, पण त्यांची आयुष्ये नुसतीच अयशस्वी झाली असे नव्हे तर, वाया गेली. नासून गेली. ही सारीच माणसे सत्ताधीश होती. संपत्तीमान होती. राजा लियर सोडला तर बाकीच्या व्यक्ती तरुण होत्या. असे असूनही या सर्वांचे जीवन भयानक अपयशाने का खचून जावे समजत नाही. सत्ता, संपत्ती आणि तारुण्य ही एकत्र असल्यावर, खरं तर आयुष्य कसे चांदण्यारात्री प्रेससीबरोबर केलेल्या नौकाविहारासारखे रम्य व्हायला पाहिजे. सर्व साधने अनुकूल असून सुद्धा आयुष्य जर अशी घोर फसवणूक करीत असेल तर या दगलबाज आयुष्यावर विश्वास तरी कसा ठेवावा ? आपली वंचना आपले शत्रू तर करीतच असतात. ते सुखाने जगू देत नाहीत. पण येथे पाहवे तर आयुष्याने त्यांना क्रूर रीतीने फसवावे आणि मरणाच्या ताब्यात देऊन मोकळे व्हावे या विश्वासघातालाँ कोणते बरे विशेषण द्यायचे ? शेक्सपियर म्हणतो ते खरे वाटू लागते. 'एका वेड्याने सांगितलेली निरर्थक कहाणी म्हणजे हे आयुष्य' असा प्रत्यय त्याच्या शोकात्मिकांतून येत राहतो. त्याचे विधान बरोबर आहे असे वाटते.

स्वतः शेक्सपियरचे आयुष्यसुद्धा कोणत्या तरी नियमाला धरून चालले होते असे म्हणता येणार नाही. लौकिक अर्थाने पाहायचे झाल्यास तो यशस्वी झाला. त्याने कीर्ती मिळवली, पैसाही मिळवला. सुखासमाधानाने तो जगला असावा. आपण एक श्रेष्ठ नाटककार होऊ असे त्याला सुरुवातीला वाटले होते काय ? थिएटरात नाटक पाहायला येणाऱ्या अमीर उमरावांची घोडी सांभाळणारा हा सामान्य नोकर. पुढे तो डोअरकीपर झाला. नाटकांतून लहान लहान कामे करू लागला. समकालीन लेखकांच्या नाटक-कादंबऱ्यांतील प्रसंग अक्षरशः चोरून नाटके लिहू लागला. आणि पाहता पाहता अत्यंत लोकप्रियच नव्हे तर श्रेष्ठ नाटककार झाला. याचा अर्थ, आयुष्याला काही नियम असतो, तर्कसंगती असते असे दिसत नाही. केव्हाही काय वाटेल ते घडू शकते. आणि जे घडते ते बऱ्याच वेळा इतके अर्थहीन असते, की अखेर निरर्थक कहाणी याच शब्दात त्याची संभावना करावी लागते. बालकवी ठोंबरे यांच्यासारखा साहित्य उपवनातील बलबुल 'आनंदी आनंद गडे । जिकडे तिकडे चोहीकडे' असे आनंदाने आयुष्याच्या हिरव्यागार गालिच्यावर बसून गात होता. ऐन तारुण्यात आगगाडीच्या अजस्र चाकांखाली त्याच्या देहाचा चेंदामेंदा होऊन गेला. जीवनाचे सुंदर स्वप्न मरणाच्या काळोखात इतक्या भयानक पद्धतीने विलीन व्हावे हे पाहिल्यावर जो प्रचंड वैचारिक

धक्का बसतो, त्यातून स्वतःला सावरणे कठीण असते. राम गणेश गडकऱ्यांनी 'जीवितास' या नावाची एक कविता लिहिली आहे- ती मला सारखी आठवते. गडकऱ्यांचे जीवन तर पूर्णपणे काजळून गेले होते. मनासारखा एकही डाव त्यांना खेळता आला नाही. खरे सांगायचे तर, नियतीने त्यांच्या हातात हुकमाचे एक जबरदस्त पान दिले होते. विलक्षण प्रतिभाशक्ती हेच त्यांचे सामर्थ्य. पण ज्या मानाने त्यांना भव्य प्रतिभेचे देणे मिळाले, त्या मानाने आयुष्य मात्र लाभले नाही. त्यामुळे गडकऱ्यांनी केलेली वाङ्मयनिर्मिती झगझगीत असून सुद्धा ती फार थोडी आहे याची खंत वाचकांच्या मनात सारखी भरून राहिली आहे. हाती 'रामबाण' असावा, पण त्याने रावणाचा वेध घेण्याऐवजी एखाद्या सामान्य सावजालाच त्याने आपले लक्ष्य ठरवावे असेच कदाचित गडकऱ्यांचे झाले असावे. जिच्यावरून आपला जीव ओवाळून टाकावा अशी जिवाभावाची प्रेमदेवता त्यांना आयुष्यात भेटली, पण या मनस्वी प्रतिभावंताची योग्यता ओळखण्याची तिच्यात कुवतच नव्हती. ती नटव्या थाटाच्या पाठीमागे खुशाल निघून गेली. विलक्षण भावसौंदर्याने ओथंबलेल्या एका महान प्रेमिकाच्या हृदयाला आपण लाथाडीत आहोत, याचीही कदर तिने केली नाही. गडकऱ्यांचे उरलेले आयुष्य म्हणजे एक मूर्तिमंत स्मशान बनले. ते म्हणतात —

'आणि जीविता लाभ हाच का तुझ्या संगती राहुनिया।
असेच जाणे असे सदा का कालौघावर वाहुनिया ?
फसव्या पाण्यावरी पोहुनी दम कोंडुनी मरता
'गोविंदाग्रज' म्हणे जीविता लाभ तुझा नच यापरता ! '

जीवनाच्या जुगारात सर्वस्व हरवून बसलेल्या या रामाला जो पराभव पत्करावा लागला तो कल्पनातीत दारुण होता. आयुष्याची काटेरी वाट फुलांच्या अपेक्षेने तुडवायची. काट्यांची बोच सहन करायची. आता आपल्या पदरात फुले पडतील अशी वेडी आशा बाळगायची आणि एखाद्या विषारी जीवाणूने पायाला कडकडून चावा करायचा तशीच स्थिती कालौघावर वाहून गेलेल्या या प्रेमकवीची का बरे व्हावी ? मला वाटते याचे एकच उत्तर देता येईल. आयुष्य हा एक अत्यंत बेभरवशाचा जुगार आहे. ज्याच्या पदरात दान पडते त्याला त्याचा अर्थ कळत नाही. ज्याला दान नाकारले जाते त्यालाही या घटनेचे आकलन होत नाही. आचार्य अत्र्यांनी एका ठिकाणी म्हटले आहे, 'आयुष्य हे एखाद्या हेकट म्हशीसारखे ओढाळ आहे. ते माणसाला कोठे ओढून नेईल हे सांगता येणार नाही.' आपण देवाच्या आळंदीला निघालो होतो पण चोराच्या आळंदीला येऊन पोहोचलो अशा अर्थाचे उद्‌गार त्यांनी काढले आहेत. त्यात काहीसा विनोद असेलही पण सत्य मात्र अधिकांश आहे.

शॉपेनहॉवर नावाच्या एका जर्मन तत्त्वज्ञाने तर फारच अतिरेकाचे विधान करून जीवनावर टीका केली आहे. आपण मुळी जन्मालाच न येणे हे सर्वांत मोठे भाग्य. जन्माला आलोच तर तावडतोब मरणे हेही नशीबाचे लक्षण. पण दीर्घकाळ जगणे हे

मात्र सरळ सरळ दुर्भाग्य आहे. आता या विक्षिप्त मताबद्दल मी कोणते मत व्यक्त करणार ? शॉपेनहॉवर हा काही सामान्य, अडाणी माणूस नव्हता. या विद्यासंपन्न तत्त्वविवेचकाचे मत कालिदासाच्या मतासारखेच दिसते. जगताना पावलोपावली माणसाला या जगात अकारण ठेचकळावे लागते. चांगल्या मूल्यांशी लाजिरवाणी तडजोड करावी लागते. गरजेपोटी मूर्ख आणि क्षुद्र माणसांचे पाय धरावे लागतात. नाही नाही ती सोंगे करून जीवनाला रंगवावे लागते. कवी कुसुमाग्रज म्हणतात, 'तुम्हीच सांगा, सोंगावाचून शक्य असे का हे जीवन ?' असले फसवे देखावे करीत बसण्यापेक्षा आपल्या मस्तकावरचे आयुष्याचे भिकार ओझे का फेकून देऊ नये, असा वैतागाचा विचार या तत्वज्ञाच्या, शॉपेनहॉवरच्या मनात आला असावा. पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी सुद्धा माणसाला जन्मभर लाचारी पत्करावी लागते. याला काय जीवन म्हणायचे ? शॉपेनहॉवरचा जीवनद्वेष आंधळा नाही, तो डोळसच आहे. जगण्यात आनंद असावा, उत्साह असावा, जीवनाच्या जयघोषाचे स्वर उत्कट असावेत असे त्याला वाटत होते. पण जे जीवन लक्षावधी, कोटयवधी माणसांच्या वाटयाला येते ते पाहिल्यावर आणि स्वतःच्याही आयुष्याचा अर्थ लावल्यावर या जर्मन विचारवंताला जीविताकडेच पाठ फिरवावी असे वाटले तर त्याचे हे मत कसे खोडून काढायचे ? मांजर ज्याप्रमाणे उंदराला एकदम ठार मारीत नाही. त्याला खेळवून, भय-भीत करून त्याचे हालहाल करून मग त्याचा घास घेते, त्याप्रमाणे बहुसंख्य माणसांची अवस्था होते. भयानक रोगाने पीडलेला एक रोगी जवळजवळ पंचवीस वर्षे अंथरुणावर पडून होता. तो जगणे शक्य नाही याची त्याच्यासह सान्यांनाच खात्री होती. पण तरीही तो मरत नव्हता. आपल्या दुबळ्या स्वराने मरणाची तो दररोज अनन्यभावाने आळवणी करीत होता. पण ते लहरी मरण त्याच्याकडे ढुंकूनही पाहायला तयार नव्हते. त्याची सेवाशुश्रुषा करणारा त्याचा धडधाकट भाऊ रस्त्यावरून चालताना विजेच्या खांबाला हात लावल्याचे निमित्त होऊन तडकाफडकी मरण पावला. पण या रोग्याकडे मृत्यूची कृपादृष्टी वळेल असे चिन्ह दिसेना. त्याला उठता येत नव्हते, बसता येत नव्हते. सतत पडून राहिल्यामुळे त्याच्या पाठीला जखमा झाल्या होत्या, वेदना असह्य होत होत्या. पण जीवनाने त्याला मारलेली मगरमिठी सैल होत नव्हती. खरे तर मृत्यू हेच त्याचे जीवन होते आणि जीवन हेच मूर्तिमंत मरण होते. जेव्हा जगण्यासारखे आयुष्यात पुष्कळ असते, तेव्हा आयुष्यच हातातून निसटून जाते. आणि जेव्हा मरणे अत्यावश्यक असते, तेव्हा मात्र नको असलेले जिणे संपता संपत नाही. जीवनमृत्यूचा हा खेळ असाच चालू राहिल्यामुळे, जीवनावरचा विश्वास उडून जावा यात आश्चर्य तरी कसले ?

का कुणास ठाऊक, पण आयुष्याचे पाणी बहुधा फसवेच असते. मला आठवतात त्या अनेक लेखक-कवींनी आयुष्याच्या चंचलतेवर टीकाच केली आहे. तत्त्वज्ञान्यांनीही जीवनाची अनिश्चितता अनेक प्रकारांनी स्पष्ट केली आहे. शाहनामा या

प्रसिद्ध काव्याचा कवी फिर्दोसी याची जीवनकथा मी प्रथम ऐकली तेव्हा बरेच दिवस अस्वस्थ होतो. उपासमारीत, दारिद्र्यात पिचत असताना, महंमद गजनीच्या समाधानासाठी आपली प्रतिभा पणाला लावून त्याने हे काव्य लिहिले. जगण्यासाठी त्याला पैसे हवे होते. आपले हे काव्य वाचताच महंमद तृप्त होऊन आपल्याला हजारो मोहरा पाठवून देईल याची त्याला खात्री होती, पण पैसे मिळत नव्हते. पोटातली आग भडकत होती. औषधालाही पैसा नव्हता. अंथरुणावर खिळलेल्या फिर्दोसीच्या डोळ्यांत आशा अजूनही चमकत होती. तो दररोज बादशहाच्या मेहेरबानीची वाट नव्या उमेदीने पाहत होता. अखेर बादशहाने ते काव्य वाचले तेव्हा संतुष्ट होऊन मोहोरांच्या थैल्या कवीच्या घरी पाठविल्या. संपत्तीच्या अवजड थैल्या घेऊन बादशहाचे शिपाई फिर्दोसीच्या घरात प्रवेश करीत होते, त्याचवेळी फिर्दोसीचे प्रेत घराबाहेर आणले जात होते. कोणत्याही शोकनाट्यात परिणामकारक ठरावा असा हा प्रसंग फिर्दोसीच्या जीवन नाटकात नियतीने का बरे घातला असावा ? बादशहाने पाठवलेल्या मोहोरा कवीच्या प्रेतसंस्कारासाठी उपयोगी पडल्या.

कोणताही कवी, नाटककार, कथालेखक आपण मनुष्याच्या जीवनाचे चित्रण करून त्यावर भाष्य करीत असतो असे सांगतो. त्याचे हे म्हणणे कितपत खरे आहे ? जीवनाचा एक अगदी लहानसा सामान्य तुकडा प्रत्येकाच्या वाट्याला येतो. लेखक, कवी काहीशा व्यापक दृष्टीने जीविताचे आणखी दोनचार तुकडे उत्सुकतेने पाहतात. पण तेवढ्यावरून विशाल, विराट, असीम जीवनाचा त्यांना शोध करणे कसे शक्य आहे ? मनुष्याला मिळणारे ज्ञान वाळवंटातल्या एका वाळूच्या कणाइतके क्षुद्र, नगण्य असते यात काहीच शंका नाही. जे मानवी जीवित हजारो वर्षांपासून चालत आले आहे आणि आणखी कित्येक हजार वर्षं त्याची वाटचाल थांबणे शक्य नाही, जे जीवित वाऱ्याहूनही चंचल आहे, ज्याच्या अंतरंगात प्रतिक्षणी चित्रविचित्र लहरी उचंबळत असतात, जे सापडलेसे वाटते आणि त्याचक्षणी जे निसटून गेलेले असते ते आम्ही आमच्या साहित्यातून रेखाटतो. आणि त्यावर आमची स्वतंत्र टीका करतो असे म्हणणे मला तरी हास्यास्पद वाटते. तर्कबुद्धीच्या कवेत जीवन कधी सापडत नाही. प्रतिभेने ते आटोक्यात आले, त्याचा अर्थ समजला असेही म्हणता येणार नाही. त्याच्यावर भाष्य करण्याची, त्याच्यासंबंधी ठामपणे काहीतरी विधाने करण्याची सामान्य माणसांप्रमाणेच कवींचीही प्रवृत्ती आहे. जीवनाचा एखादाच ओझरता किरण माणसाला ज्ञात होतो. त्याच्या आधाराने समग्र जीवनावर आपण भाष्य करीत आहोत असा सुखद गैरसमज लेखकही करून घेतात.

जीवनाचा पार लागत नसला तरी, त्याच्याविषयी विचार करण्याची, त्याच्यावर टीका-टिप्पणी करण्याची वृत्ती चुकीची मात्र नाही. मनुष्य आपल्या प्रज्ञाप्रतिभेने जीवनाचा शक्य तितक्या उत्कटतेने वेध घेण्याची धडपड करीत आहे हे एका अर्थाने जीवनप्रेमाचेच द्योतक आहे. जगण्याचा मोह जसा सुटत नाही त्याप्रमाणेच जीवनाचे

आकलन करून घेण्याचा मोहही कधी संपत नाही. काही विरक्त विचारवंतांनी जीवनाला धिक्कारून मरणाची तरफदारी केली असली तरी, मरण हेही जीवनाइतकेच विविधरंगी आहे असे म्हणायला आधार तरी कोणता आहे ? मरण सुंदर म्हणणाऱ्याला जीवनाची सारी सुंदरता कुठे समजलेली असते ? नानाप्रकारच्या वैगुण्यांनी हे जीवन डागाळलेले असले तरी ते सारेच्या सारे अर्थशून्य, रसशून्य, रूपगंधहीन आहे असे म्हणता येईल काय ?

'The stars are setting and the Caravan, starts for the dawn of nothing. oh ! make haste.'

चांदण्या विझत आहेत. हा काफिला आता निघाला आहे. पण तो कुठे जात आहे! अभावाच्या, अस्तित्वशून्यतेच्या पहाटेकडे तो जात आहे. ही दाट निराशा उमरखैयामने व्यक्त केली आहे. इतक्या विफलतापूर्ण दृष्टीने जीविताचा विचार करावा का असे माझ्या मनात येते. जीवन ही अंधारातली यात्रा नाही. प्रकाशाचा शोध करीत करीत चाललेल्या माणसाची ती एक विलक्षण यात्रा आहे. उमरखैयामच्या म्हणण्याप्रमाणे चांदण्या विझत चालल्या असल्या तरी, पथिकाच्या मनातल्या चांदण्या मात्र अखेरपर्यंत लुकलुकत राहतात. जीवनावर अतिरेकी टीका करणाऱ्या साहित्यिकांनी, विचारवंतांनी उगीचच त्याला बदनाम करून ठेवले आहे. निरर्थकता आणि विनाश हीच जीवनसत्ये आहेत हे म्हणणे पटत नाही. ते इतके अर्थहीन असते तर, आम्हा सामान्य माणसांना त्याच्यावर जिवापाड प्रेम करावे असे वाटले असते काय ? नैराश्याचा अंधार तुडवीत चाललेल्या कवींना व तत्ववेत्त्यांना मला तर असे गर्जून सांगावेसे वाटते की —

अहो बुद्धिवंतांनो ! तुम्ही म्हणता ते अंशतः खरं असेलही, पण मी एक सामान्य मनुष्य आहे. माझ्या सामान्य दृष्टीनं जीवन ही नियतीनं माणसाला दिलेली एक अपूर्व अन् नितान्तसुंदर अशी देणगी आहे. ही वेडेपणानं आम्ही टाकून देणार नाही. या जीवनाला आम्ही चिकटून राहणार आहोत. तुमची तत्त्वदृष्टी सखोल आणि महान असेल. तुम्ही म्हणता त्याप्रमाणं मानवी आयुष्य हा एक क्षणजीवी बुडबुडा असेल, नव्हे आहेच. पण खरं सांगू ? आम्हाला या विनाशी जीवनाची सुंदरता फार फार मोह घालते. आमचं सुरांवर प्रेम आहे. सूर वाऱ्यावर फार लवकर विरून जातात. पण कानांतून ते मनात जाऊन रुजतात. आणि तिथे आपले एक सुंदर घरटे करतात. नर्तकीच्या पायातल्या घुंगरांत आमचा जीव गुंतून पडतो. एखाद्या सुंदर युवतीच्या गालावर पडणाऱ्या खळीत आम्हाला आमचे स्वप्न दिसते. ते साकार झाले नाही तर होणारे दुःखसुद्धा किती गोड असते. जे जीवन तुम्ही क्षुद्र आहे असे म्हणता ते आमच्या सामान्य डोळ्यांनी आम्ही जेव्हा पाहतो तेव्हा ते नाना रसांनी, गंधांनी रंगलेले दिसते. आम्हा सामान्य माणसांना दगडातही देव दिसतो. हा वेडेपणा असेलही. पण वेडात देखील आनंद असतो असे आम्हाला वाटते. कुणावर तरी,

कशावर तरी जीव तोडून प्रेम करायचे, कुणाच्या तरी प्रेमाचा विषय व्हायचे, एकमेकांना मन द्यायचे, जितके दिवस जगता येईल तितके दिवस धडपड करायची आणि एक दिवस डोळे मिटायचे हे आम्हां सामान्यांचे सामान्य तत्त्वज्ञान आहे. जीवन क्षुद्र, नगण्य आणि अनंत संकटांनी भरलेले आहे. ती एक अर्थशून्य कहाणी आहे वगैरे वगैरे शंभर टक्के खरे असेल. आम्हाला प्रतिवाद करायचा नाही. जीवन ही एक विकृतीही असेल. असू द्या, पण जोपर्यंत अंधाराला दूर सारून सूर्याचे बिंब क्षितिजावर येताना आम्हाला दिसते. पाखरांचा उल्हसित चिवचिवाट ऐकायला मिळतो. देवळात कुणा भाविकाने वाजवलेल्या घंटेचा नाद कानांवर येतो आणि आमच्या पुढ्यात चहाचा कप ठेवताना कुणाच्या तरी श्यामगौर हातातल्या कंकणांचा किणकिणाट अंगावर रोमांच आणतो, तोपर्यंत विकृत, विपरीत, तुच्छ, क्षुद्र, निरर्थक जीवनाच्या गुलाबी कोड्यात आम्ही असेच गुरफटून राहणार. आमचे या विसंगतींनी भरलेल्या जीवनावर प्रेम आहे. तुम्ही काही म्हणा ? आम्हाला जगायचे आहे, मनापासून जगायचे आहे ! !

चांदण्या रात्री थोड्याच असतात. पण आकाशातून झरणारे चांदणे आणि वाऱ्याची झुळुक यांचा स्पर्श झाला, की आपण सामान्य माणसे थोडावेळ जीवनातले कडवट संघर्ष विसरतो. ' सुंदरतेच्या सुमनावरचे दंव चुंबुनि घ्यावे, ' ही बालकवींची ओळ आठवते. वाऱ्याच्या लहरीने समोरच्या झाडांची पाने सळसळतात. आम्हा सामान्य माणसांच्या मनात लपून राहिलेली काही आकांक्षांची पाने त्यावेळी अशीच सळसळू लागतात. साऱ्याच कवींनी जीवनातली दुःखे आणि आपदा रंगवल्या नाहीत. काही कवी जीवनाच्या सुंदरतेवर, त्याच्या मोहकतेवर मनापासून लुब्ध झाले आहेत. त्यांच्या कवितांची अशा वेळी आठवण होते. या जीविताच्या दुःखमूलकतेवर कितीही बोला, कितीही टीका करा; जीवनाची ओढ विलक्षण नाही काय ? सर्वनाशाची चित्रे सभोवताली दिसली तरी मर्ढेकरांनी एका कवितेत म्हटले आहे,"

अजून येतो वास फुलांना  
अजून माती लाल चमकते  
खुरट्या बुंध्यावरती चढुनी  
अजून बकरी पाला खाते.

जीवनाच्या मोहाला जिंकण्यापेक्षा, त्याच्या सुखदुःखात्मक पाशात मनापासून गुरफटून जाणे श्रेयस्कर वाटते. न सापडणाऱ्या जीवनस्वरूपाचा शोध करण्यातला आनंद कवी, कलावंत, तत्त्वचिंतक घेतात. आम्ही साधारण माणसेही या आनंदासाठीच धडपडतो. नादावतो. लोभावतो.

□

# म. फुल्यांच्या साहित्यातील क्रांतिधारा

महात्मा फुले ही महाराष्ट्राच्या समाजमनाला आकार देणारी एक वादळी शक्ती आहे यात शंका नाही. फुले जसे बंडखोर होते तसेच ते चिंतनशील वृत्तीचे एक लेखकही होते. एकोणिसाव्या शतकात ज्या लेखकांनी क्रांतिकारक विचार मांडून नवजीवनाचा पाया घातला त्यात ज्योतिबा फुले यांचे स्थान अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. नवनिर्मितीचे स्वप्न त्यांच्या साहित्याने उत्कटपणे रंगवले आहे. तीव्र सामाजिक जाणीव आणि सामाजिक न्यायाचा सदैव पुरस्कार हाच त्यांच्या व्यक्तित्वाचा व साहित्याचा धर्म आहे. म्हणूनच फुल्यांच्या साहित्याकडे वाङ्मयीन दृष्टीने पाहून त्याच एका निकषावर त्यांची परीक्षा करणे चुकीचे ठरेल. समाजावर मनःपूर्वक प्रेम करणाऱ्या या लेखकाला समाज मुळातूनच बदलावा आणि सामान्य माणसालाही ' माणूस ' म्हणून न्याय व प्रतिष्ठा मिळावी असे वाटत होते. त्यासाठीच त्यांनी अनेक आंदोलने केली. विरोधी शक्तीबरोबर अखंड संघर्ष केला. आपले विचार साहित्यातून अत्यंत स्पष्टपणे, फटकळपणाने पण प्रभावाने व्यक्त केले. साहित्य हे ज्योतिबा फुल्यांनी आपली मानवमुक्तीची चळवळ समर्थ करणारे एक साधन आहे असेच मानले. बहुजनसमाजाच्या, पददलितांच्या प्रबोधनासाठी आणि स्वातंत्र्यासाठी आंतरिक तळमळीने लिहिणारा हा लेखक आहे. त्यांनी आठ-नऊ पुस्तके लिहिली. त्यात नाटक आहे, पोवाडे आहेत, अभंगासारखी रचना आहे. आणि ' गुलामगिरी ', ' सार्वजनिक सत्यधर्म ' व ' शेतकऱ्यांचा आसूड ' यांसारखे महत्त्वपूर्ण ग्रंथही आहेत. या ग्रंथांचे मनन केल्याशिवाय आजच्या समाजचिंतकाला पुढे पाऊलच टाकता येणार नाही असे विधान केल्यास ते अतिशयोक्त ठरणार नाही. कारण समाजाच्या मननातून आणि स्वतःच्या अस्सल अनुभवातून त्यांचे लेखन आकाराला आले आहे. ज्या साहित्याला अनुभवांची बैठक असते, ज्यात जीवनाविषयी, समाजाविषयी आत्मीयता असते ते साहित्य नीरस, शिळे होत नाही.

काळ झपाट्याने बदलत असतो. आठ-दहा वर्षांच्या अवधीत एखादे पुस्तक आणि त्याचा लेखक जुनापुराणा ठरतो. पण फुल्यांच्या साहित्यातील काही विचार एक शतक उलटल्यानंतर सुद्धा ताजे टवटवीत राहिले आहेत. त्याबाबतीत त्यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म' आणि 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. १८ जुलै १८८३ ला 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ त्यांनी पूर्ण केला. या घटनेला आता शंभर वर्षे उलटून गेली. फुल्यांच्या सामाजिक जाणिवेची कक्षा केवढी व्यापक, केवढी सखोल आणि किती उत्कट होती याचे दर्शन या ग्रंथातून आपल्याला घडते. सर्वसामान्य माणूस हाच फुल्यांच्या क्रांतिकार्याचा केन्द्रबिंदू होता. स्वतः फुले सामान्य माणसांतून, एका शेतकरी कुटुंबातून उसळी घेऊन वर आलेले सामान्य माणसांचे एक निष्ठावान पुढारी होते. खालच्या थरातल्या माणसांची विषम समाजव्यवस्थेत कशी चमत्कारिक कोंडी होते याचे अनुभव त्यांनी स्वतः सोसले होते. त्यामुळेच खेड्यापाड्यात पसरलेला बहुजनसमाज, शेतकरी वर्ग, दलित समाज यांच्या सर्व समस्यांची त्यांना पूर्ण जाणीव झालेली होती. शेतकऱ्यांची आणि शेतमजुरांची अत्यंत कष्टप्रद अवस्था हा त्यांच्या चिंतनाचा एक महत्त्वाचा विषय होऊन गेला. ऊनपावसात, वाऱ्या-वादळात अर्धपोटी राहून कष्ट करणारा, निढळाचा घाम गाळणारा शेतकरी कंगाल आणि कर्जबाजारी असावा याची एक विलक्षण वेदना त्यांच्या काळजाला पोखरून काढीत होती. या वेदनेतूनच 'शेतकऱ्यांचा आसूड'चे लेखन त्यांनी केले. यातले शब्द पुस्तकी नाहीत. ते जुळवलेले नाहीत. त्यातल्या शब्दांना शेतकऱ्यांच्या दुःखांचा वास येतो. त्यात चीड आणि त्वेष आहे. या पुस्तकात उद्याच्या सुखी आणि संपन्न शेतकरी जीवनाचे एक स्वप्न आहे. म्हणून आजही हा ग्रंथ केवळ वाचनीय आहे असे नव्हे, तर शेतकऱ्यांच्या शेती व्यवसायाची आणि जीवनाची घडी बसवण्यासाठी तो चिंतनीय आहे. महाराष्ट्राच्या शेतीविषयक विचारात महत्त्वाची भर घालणारे हे पुस्तक विसरता किंवा वगळता येणार नाही.

'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाची एकूण पाच प्रकरणे आहेत. प्रस्तावनेत फुले म्हणतात, 'जगातील एकंदर सर्व देशांचे इतिहास एकमेकांशी ताडून पाहता, हिंदुस्थानातील अज्ञानी व देवभोळ्या शूद्र शेतकऱ्यांची स्थिती मात्र इतर देशांतील शेतकऱ्यांपेक्षा निकृष्ट अवस्थेस पात्र होऊन, केवळ पशूपलीकडचे मजलशीस जाऊन पोहोचली असे दिसून येईल. ते म्हणतात,

'विद्येविना मती गेली. मतीविना नीती गेली. नीतीविना गती गेली. गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले. इतके अनर्थ एका अविद्येने केले.' शूद्र शेतकरी हल्ली इतक्या दैन्यवाण्या स्थितीत येऊन पोहोचण्याची धर्म व राज्यासंबंधी अनेक कारणे आहेत. त्यापैकी थोड्या बहुतांचे विवेचन करण्याच्या हेतूने हा पुढील ग्रंथ रचिला आहे.

शेतकऱ्यांवर होणाऱ्या निरनिराळ्या अन्यायांविरुद्ध आवाज उठवून या वर्गाचे

शोषण थांबलेच पाहिजे असा आग्रह धरून उपाययोजना सुचविणारे महात्मा फुले हे भारतातले पहिले समाजचिंतक आहेत यात शंका नाही. ज्या काळात मराठी साहित्याची कक्षा अत्यंत मर्यादित होती त्या काळात शेतकऱ्यांची गाऱ्हाणी वेशीवर टांगणारे हे पहिलेच मराठी पुस्तक आहे. कष्ट करणाऱ्याचे शोषण समाजात व्हावे ही एक भयानक सामाजिक निवृत्ती आहे, ही भूमिका घेऊन शासनाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी हे पुस्तक लिहिले. सावकारशाही, अधिकाऱ्यांची सुलतानशाही आणि पुरोहितशाही व अज्ञान यांच्या विळख्यात सापडलेल्या शेतकऱ्याचे उदध्वस्त जीवन असामान्य तळमळीने यात चित्रित केले आहे. इंग्रजी शासन यंत्रणेत सर्वत्र उच्चवर्णीयांचे वर्चस्व होते. सरकारी अंमलदार, वकील आणि न्यायाधीश, शिरस्तेदार, सावकार, कारकून, तलाठी, कुलकर्णी हे सारेच वरिष्ठ वर्गाचे लोक होते. शेतकऱ्यांबद्दल या लोकांच्या मनात सहानुभूतीचा ओलावा नव्हता. एका बाजूला हे उच्चवर्णीय अधिकारी आणि दुसऱ्या बाजूला शूद्र शेतकरी अशी ही दोन भिन्न जगात वावरणारी माणसे होती. गरीब शेतकऱ्यांची दाद त्यामुळे कोठेही लागत नसे. त्याला लुबाडणाऱ्या अनेक शक्ती समाजात प्रतिष्ठित बनलेल्या होत्या. फाटक्या कपड्यात वावरणाऱ्या शेतकऱ्याला समाजव्यवस्थेत जातिदृष्टया अत्यंत खालचे स्थान होते. तो शिक्षण घेऊ शकत नव्हता. अनेक अशास्त्रीय रूढींचे आणि संकेतांचे संस्कार त्यांच्या मेंदूवर देवाधर्माच्या नावाखाली वर्षानुवर्षे करण्यात आले होते. त्यामुळे खेड्यातील भटभिक्षुक या शेतकऱ्यांना जन्मापासून मृत्यूपर्यंत आणि चैत्रशुद्ध प्रतिपदेपासून फाल्गुन महिन्याच्या शेवटापर्यंत कसे नाना उपायांनी नागवीत असत याचे वर्णन त्यांनी फटकळ भाषेत केले आहे. सावकाराच्या मगरमिठीत शेतकरी पिढ्यानुपिढ्या सापडलेला असतो. त्या संबंधात म्हटले आहे.

' हल्ली कित्येक ब्राह्मण व मारवाडी सावकार नापतीच्या अक्षरशून्य शेतकऱ्यास सांगतात की, सरकारी कायद्यामुळे तुम्हाला गहाणावर कर्जाऊ रुपये आम्हास देता येत नाहीत. यास्तव तुम्ही जर आपली शेते आम्हास खरेदी करून द्याल, तर आम्ही तुम्हास कर्ज देऊ. व तुम्ही आमचे रुपयांची फेड केल्याबरोबर आम्ही तुमची शेते परत खरेदी करून तुमच्या ताब्यात देऊ. म्हणून शपथा घेऊन बोम्बा मात्र करितात. परंतु या सोवळ्या व अहिंसक सावकारापासून कुटुंबवत्सल अज्ञानी, भोळ्या शेतकऱ्यांची शेते क्वचितच परत मिळतात.

सरकारी अधिकाऱ्यांचा लाचखाऊपणा, गोऱ्या अंमलदाराची बेफिकीर वृत्ती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे उदासीनतेने पाहण्याची दृष्टी यावरही फुल्यांनी अत्यंत निःसंदिग्ध शब्दांतून कोरडे ओढले आहेत. वेगवेगळे कर लादून शासन शेतकऱ्यांना पिळून काढीत आहे. पण त्या मोबदल्यात खेड्यातील लोकांना व त्यांना कोणत्याही सोयी सवलती देत नाहीत. असे विधान करून ' महासमुद्राचे पलीकडील आमच्या

महाज्ञानी चार-चार घोड्यांच्या चारटात बसून फिरणाऱ्या मेंढपाळ स्टेट सेक्रेटरीवर ' फुल्यांनी ' आसूडाचे ' फटकारे ओढले आहेत. इंग्रजांच्या शेतीविषयक धोरणावर त्या काळात निष्ठुर पण तर्कशुद्ध टीका करणारे शेतकऱ्यांचे एकमेव पुढारी फुले हेच होते यात संशय नाही.

शेतीसुधारणेच्या अनेक उपायांचे या पुस्तकातून फुल्यांनी दिग्दर्शन केले आहे. त्यांनी सुचवलेले काही उपाय आज शंभर वर्षानंतरही अंमलात आलेले दिसत नाहीत. शेतकरी विद्यावंत व्हावा, नाना प्रकारच्या अशास्त्रीय रूढींच्या विळख्यातून त्याची सुटका व्हावी आणि त्याने शास्त्रीय दृष्टिकोनातून शेती करावी, त्याला साधनसंपत्तीचा तुटवडा पडू नये आणि सामाजिक वातावरणात शेतकऱ्यांना त्याची योग्य ती प्रतिष्ठा लाभावी ही भूमिका घेऊन फुल्यांनी सुचवलेले विविध उपाय पाहिले म्हणजे आश्चर्य वाटते. ' पाणी पुरवठ्याला अग्रक्रम मिळावा. लष्कर व पोलीस यांच्याकडून सरकारने जागोजाग बंधारे बांधावेत, विहिरी खोदाव्यात, नदी-नाले आणि तलाव यांच्यातील गाळ शेतकऱ्यांना फुकट द्यावा. त्यांना उत्तम खताचा पुरवठा करावा. पिकांच्या रक्षणासाठी रानडुकरे वगैरे मारण्याची जबाबदारी पोलिसांनी घ्यावी. जनावरांमुळे शेतीचे नुकसान झाले असेल तर सरकारी तिजोरीतून शेतकऱ्यांची भरपाई करावी. शासनाने प्रत्येक वर्षी शेती प्रदर्शने भरवावीत. शतकामाच्या परीक्षा घेऊन बक्षीसे व पदव्या द्याव्यात. शेतकऱ्यांच्या मुलांना शेती आणि शेतीशी संबंधित असे व्यवसाय यात लक्ष घातल्यावर त्यांना सरकारी खर्चाने विलायतेतील शेतीशाळा पाहण्याकरिता पाठवावे. शेतकऱ्यांवरील करांचा बोजा कमी करावा. ' असे अनेक उपयुक्त आणि रचनात्मक उपाय फुल्यांनी आपल्या स्पष्ट भाषेत ठोसपणाने मांडले आहेत. त्यांनी असा आरोप केला आहे, की कालव्याच्या पाण्यापायी सरकार शेतकऱ्यांपासून वाटेल तितका पैसा घेते, पण त्यांच्या शेतांना वेळच्यावेळी पाणी मिळण्याची सोय मात्र ते करीत नाहीत. म्युनिसिपालिट्या जकात म्हणून हजारो रुपये शेतकऱ्यांकडून वसूल करतात. पण त्या पैशांतून शहरात राहणाऱ्या लोकांकरिता मोठमोठे रस्ते, दिव्यांची आरास वगैरेसारख्या सोयी केल्या जातात. यात शेतकऱ्यांचा फायदा काय ? उत्पादनाचा खर्च शेतसारा आणि लोकल फंड दिल्यानंतर मरेपयत काम करूनही शेतकऱ्यांना दर माणशी दर महिन्याला तीन रुपयेसुद्धा मिळत नाहीत. पण कसलेही परिश्रम न करणारा आणि कधीही घाम न गाळणारा साधारण युरोपियन किंवा हिन्दी अधिकारी मात्र शेतकऱ्यांपेक्षा कितीतरी पटीने अधिक पैसा मिळवतो. आर्थिक विषमतेत शेतकऱ्यांच्या शोषणाचे मूळ आहे अशी जोतिबा फुले यांची खात्री पटलेली होती.

फुले हे अर्थशास्त्राचे खास अभ्यासक नव्हते. पण शेतकरी वर्गाच्या दैन्य दारिद्र्याची मुख्य कारणे त्यावेळच्या विषम अर्थव्यवस्थेत कशी सामावली आहेत याची यथार्थ जाणीव त्यांना झाली होती. प्रस्थापित समाजव्यवस्था अन्यायाच्या पायावर उभी आहे व ती उलथून पाडली पाहिजे. त्याशिवाय शूद्र आणि अतिशूद्र व

शेतकरी यांना खरा न्याय मिळणे शक्य नाही याची खोल जाणीव झालेले ते महाराष्ट्रातलेच नव्हे तर साऱ्या भारतातले पहिले समाजचिंतक आहेत असेच म्हटले पाहिजे. त्यांची भाषा शास्त्रीय नाही पण दृष्टी मात्र शास्त्रशुद्ध आहे. म्हणून तर शेतकऱ्यांच्या शोषणाचे अचूक आकलन त्यांनाच प्रथम झाले. भारतातील वर्गीय आणि जातीय संबंधामुळे शेतकरी मात्र वर्षानुवर्षे भरडला जात आहे याची विलक्षण वेदना फुल्यांच्या विचारातून साकार झाली आहे. आपल्या या पुस्तकाचा समारोप करताना त्यांनी असे म्हटले आहे,

'येथे मध्यम व कनिष्ठ प्रतीच्या शूद्र शेतकऱ्यांच्या दैनवाण्या स्थितीविषयी ठोकळ ठोकळ मुद्यांचे ओबडधोबड वर्णन करून येथील गव्हर्नरसाहेबांचे रहाते शहरात व गव्हर्नर जनरल साहेबांचे अंमलात, आमचे समुद्राचे पलीकडील खासे विलायती सरकारास कळविले आहे. याउपर आमचे सरकारास ब्राह्मणांच्या मुलांनी शेवटचे पाणी पाजून मुक्त करावे अशी जर त्यांची इच्छाच असेल, तर त्यांनी शूद्र शेतकऱ्यांची हाडे पिळून गोळा करीत आलेल्या रायलफंडातून साल दरसाल मोठमोठ्या रकमा खर्ची घालून ब्राह्मणांच्या मुलांस विद्वान करण्याची वहिवाट कायम ठेवावी. त्याविरुद्ध तूर्त माझे काही म्हणणे नाही. परंतु त्यांनी फक्त शेतकऱ्यांच्या मुलास विद्या देण्याची थाप देऊन वसूल करीत आलेला, एकंदर सर्व लोकलफंड तेवढा तरी निदान शेतकऱ्यांच्या मुलास मात्र इमानेइतबारे विद्या देण्याचे कामी खर्ची घालू लागल्यास मी इतके दिवस श्रम केल्याचे फळ मिळाले; असे समजून आनंद मानीन. परंतु त्यांनी तसे जर नाही केले, तर ते देवाजीजवळ जबाबदार होतील.'

शंभर वर्षांपूर्वीच्या या ग्रंथाने शेतकऱ्यांचे प्रश्न ज्वलंतपणे समाजासमोर मांडले आहेत. फुले यांच्यासारख्या क्रांतिकारकाने अथांग सहानुभूतीने हे प्रश्न समजून घेतले. आणि त्याचे विदारक दर्शन घडवून शासनाला जाग आणण्याचा प्रयत्न केला. हा ग्रंथ वाचल्यानंतर एक अस्वस्थ करणारा प्रश्न मनात उभा राहतो. शेतकऱ्यांचे जीवन आज बदलले आहे का? त्यांच्यावरील अन्याय नाहीसे झाले आहेत काय? जे स्वप्न एक शतकापूर्वी फुल्यांनी पाहिले, ते आजही प्रत्यक्षात आले नसेल तर ही परिस्थिती कशी बदलायची? उत्तर असे की काही प्रमाणात परिस्थिती सुधारली. आजचा शेतकरी कालच्या इतका भोळाभाबडा, अडाणी, रूढीवादी राहिला नाही. पण आर्थिक दृष्ट्या तो दरिद्रीच आहे. कनिष्ठ शेतकरी आणि शेतमजूर आजही पूर्वीच्याच दैन्यात खितपत पडले आहेत. सरकारी अंमलदाराचा भ्रष्टाचार कायम आहे असे नव्हे तर तो वाढला आहे असे म्हणावे लागेल. शेतकऱ्यांची लूटमार त्यामुळे चालूच आहे. ज्या शेतीधारणा फुल्यांनी सुचवल्या त्यांच्या संदर्भात कायदे करण्यात आले तरी अखेर कायद्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी कितपत प्रामाणिक आणि पुरोगामी आहेत हा प्रश्नच आहे! 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ आजही मार्गदर्शक आहे. आणि त्यातून फुल्यांच्या समाजनिष्ठ, प्रगतीवादी विचारांचे व त्यांच्या व्यक्तित्वाचे

स्पष्ट दर्शन होते यात शंका नाही. 'शेतकऱ्याचा आसूड' यापेक्षाही म. फुल्यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथाला सामाजिक प्रबोधनाच्या इतिहासात एक आगळे महत्त्व आहे. फुल्यांच्या बंडखोर, विध्वंसक पण तरीही विधायक, मानवतावादी विचारांचा अत्यंत स्पष्ट, निःशंक आविष्कार या ग्रंथातून झाला. केशवसुत ज्याप्रमाणे 'तुतारी'तून दिसतात, टिळकांचे दर्शन जसे 'गीतारहस्यातून' होते तसे फुले 'सार्वजनिक सत्यधर्मातून' प्राधान्याने प्रकट होतात. त्यांच्या ध्येयवादित्वाची, चिंतनशीलतेचीही साक्ष याच ग्रंथातून अधिकांशाने पटते. फुले हे पढीक पंडित नव्हते. पण जीवनाचे आणि समाजाचे ते एक अभ्यासक होते. पारंपरिक विचार अंधपणाने स्वीकारून श्रद्धाळू लोकांनी धार्मिक आणि सामाजिक जीवनात जो कमालीचा रोगटपणा आणला आहे त्याबद्दल ते सदैव व्यथित असत. त्यांचे दुःख हे एखाद्या अभ्यासिकेत बसलेल्या निष्क्रिय विद्वानाचे दुःख नव्हते. सामाजिक जागृती घडवू इच्छिणाऱ्या कृतिवंत कार्यकर्त्यांचे ते दुःख होते. त्यामुळेच 'सार्वजनिक सत्यधर्म' यासारखा जीवनभाष्य करणारा ग्रंथ ते लिहू शकले. फुल्यांची काही मते एकांगी व अभिनिवेशी होती अशी त्यांच्यावर टीका करण्यात येते. काही अंशी हा आक्षेप संयुक्तिक आहे. पण जगातली कोणतीही क्रांती आकार घेत असताना तिच्या प्रणेत्यांना काही प्रमाणात एकांगीपणा आणि अभिनिवेश स्वीकारावा लागला होता. दुसरे असे की फुल्यांनी नानाप्रकारचे ग्रंथ अभ्यासून, साधक बाधक चर्चा करून, विद्वानांशी विचारविनिमय करून आपली तत्त्वधारा निश्चित केलेली नव्हती. ते ग्रंथोपजीवी पंडितांप्रमाणे ग्रंथांतच गुरफटून जाणारे विचारवंत नाहीत. आपल्या अंतःकरणाच्या प्रवृत्तीला कौल लावून दमदारपणे खंबीर पाऊले टाकीत पुढे जात राहिलेले ते समाजचिंतक आहेत. फुल्यांच्या लेखनात एकप्रकारचा स्वैरपणा आढळला तरी त्यांच्या विचारांच्या मुळाशी मानवप्रेमाची अदम्य चेतना आहे हे जाणवत राहते. त्यांची जीवनदृष्टी माणुसकीने भारलेली, सामाजिक न्याय आणि समता या मूल्यांतून उचंबळून आलेली वाटते. न्यायमूर्ती रानडे यांच्या विचारात शास्त्रशुद्धता असूनही फुल्यांच्या विचारातला ताजेपणा, लढाऊपणा यांचा आढळ होत नाही. रानडे मवाळ आहेत. थंड वृत्तीने ते विचार करतात असे वाटते. पण फुल्यांच्या वृत्तीतले बंड त्यांच्या विचारात आणि भाषेत सहज उतरते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी फुल्यांचे सामर्थ्यस्थान कोणते हे हेरले होते. आपली शक्ती एकवटून 'मराठी भाषेच्या शिवाजीने' फुल्यांना विरोध केला याचे कारण फुले हे नवविचारांचा पुरस्कार आत्यंतिक प्रामाणिकपणे पण अभिनिवेशाने करीत होते. त्यांची लेखणी ताकदवान आहे हे चिपळूणकरांना उमगले होते.

'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथातून ज्या धर्माचे त्यांनी प्रतिपादन केले आहे तो सार्वजनीन स्वरुपाचा आहे असे त्यांना ठासून सांगायचे आहे. जगातले इतर सारेच धर्म आकुंचित संप्रदायांच्या चौकटीत बंदिस्त होऊन पडले आहेत आणि आपली अंगभूत शक्ती केव्हाच गमावून बसले याची तीव्र जाणीव त्यांना झाली. धर्मसंस्थेच्या

भोवती नानाप्रकारच्या क्षुद्र, आंधळ्या संकेतांचे जबरदस्त कुंपण धूर्त लोकांनी उभे करून ठेवल्यामुळे ही संस्था आपले कलेवर मात्र टिकवू शकली याचे चित्र फुल्यांना हरघडी दिसत होते. म्हणूनच ते प्रश्न विचारतात,

मानवांचे साठी बहुधर्म कसे । झाला काहो पिसे । जोती म्हणे ।।
मानवांचे धर्म नसावे अनेक । निर्मीक तो एक । जोती म्हणे ।।

—ईश्वर एकच व धर्मही एकच ही फुल्यांची भूमिका खंडोगणती देव मानून आणि नाना धर्मांच्या जंजाळात सापडलेल्या अंधश्रद्ध समाजाला निश्चितच दिलासा देणारी होती. मध्ययुगीन साधुसंतही हेच सांगत होते. पण फुल्यांची भूमिका सनातन धर्माच्या पुनरुज्जीवनाची नव्हती. जुन्यांचे उच्चाटन करून नवधर्माची प्रतिष्ठापना करणाऱ्या बंडखोराची होती. जुने साधुसंत पोथ्या पुराणात गुरफटलेले. न्यायमूर्ती रानडे यांच्यासारखा सुधारकसुद्धा जुन्या शास्त्रवचनांची साक्ष काढण्यासाठी जेथे धडपडत होता तेथे फुल्यांच्या विचारातील स्वतंत्र तेज सहज लक्षात यावे. हिंदुधर्मातील पुरोहितशाहीवर त्यांनी बेगुमानपणे हल्ला चढविला आहे. कारण विषमतामूलक वर्णव्यवस्थेची पकड पोलादी करण्यात आणि बहुसंख्य माणसांना अस्पृश्यतेच्या अंधारात भिरकावून देण्यात पुरोहितशाही हीच प्रमुख आहे हे स्पष्ट झाले होते. त्यामुळे या संस्थेवर आपल्या आसूडाचे फटके मारण्याशिवाय त्यांना गत्यंतर उरले नाही. ते म्हणतात,

हिंदु धर्माचे ब्राह्मण वकील । लुटीले सकळ । जन त्याने ।
धर्मामिशे लोक नाडीले वकीले । स्वार्थ साधले । आपुले ते ।
न लगे वकील देव दरबारी । भक्ती एक खरी । जोती म्हणे ।।

—फुले ईश्वरनिष्ठ आणि धर्मनिष्ठ असूनही किंवा असल्यामुळेच जाती आणि संप्रदाय यांच्यापलीकडे ते सहजपणाने पाहू शकत होते. धार्मिक समजले जाणारे लोक अंतर्यामी पराकाष्ठेचे कर्मठ असतात. माणसामाणसांत भेद मानतात. उच्चनीचत्वाच्या भ्रांत जाणिवेने पछाडलेले असतात. दगडात देव पाहू शकणारे हे महाभाग माणसात मात्र ' माणूस ' पाहू शकत नाहीत याची विलक्षण चीड फुल्यांच्या मनात होती. त्यांचा कल्पना विहंग अभेद भावाच्या आकाशात अत्युच्च भराऱ्या मारीत होता असे दिसते. जमिनीवरून सरपटणारे क्षुद्र विचार त्यांना मोह घालू शकत नाहीत. ' सार्वजनिक सत्यधर्मात ' संप्रदायशून्यतेकडे आणि निर्भेळ माणुसकीकडे ते कशी झेप घेतात हे सुंदर दृश्य पाहण्यासारखे आहे. त्यांच्या विचार सौंदर्याचे व सामर्थ्याचे दर्शन घडते.

येथे एक प्रश्न उपस्थित करावासा वाटतो. साहित्याचे श्रेष्ठत्व नेमके कशात आहे ? त्याच्या शब्दकलेत ? कलागुणांत ? की त्यात असलेल्या विचारधारेत ? आकृतिवादी समीक्षक विचारांना महत्त्व देणार नाहीत. पण ज्या विचारांतून मानव्याचा विकास होतो त्या विचारांच्या अभिव्यक्तीला श्रेष्ठ साहित्य ही संज्ञा दिली जाते. नामदेव तुकारामांच्या अभंगांच्या श्रेष्ठपणाची चिकित्सा करताना त्यांच्या जीवन-

दृष्टीला आणि विचारधारेलाच अधिक महत्त्व द्यावे लागेल असे वाटते. शब्दकलेचा मुद्दा गौण आहे. कला ही आनंद देण्यासाठीच केवळ अवतीर्ण होते, तिचा जीवन-मूल्यांशी काही संबंध असत नाही हा युक्तिवाद आता टिकण्यासारखा नाही. भोंगळ बोधवादाचा पुरस्कार आणि डोळस जीवनवाद यांच्यात पुष्कळच अंतर आहे. साहित्यातून मिळणारा आनंद हा शब्दजन्य नसतो. विचारांच्या स्पर्शातून मनाला व बुद्धीला उत्तेजित करण्याची प्रसन्न क्षमता ज्यात असते ते साहित्य श्रेष्ठ. आपल्या हृदयस्थ प्रेरणेशी जेव्हा लेखक पूर्ण इमान राखतो व आपली विशिष्ट भूमिका कोणाच्याही रागालोभाची क्षिती न बाळगता निःसंदिग्धपणे मांडतो तेव्हा त्याच्या साहित्यात प्रत्यय-कारिता आल्याशिवाय राहत नाही. फुल्यांचे विचारग्रंथ केवळ मनावर परिणाम करतात असे नाही तर आपण प्रमाण मानलेल्या मूल्यांची फेरतपासणी करायला प्रवृत्त करतात. फुल्यांच्या साहित्यिक थोरपणाबद्दल आजही संशय व्यक्त करणाऱ्या समी-क्षकांना ते साहित्य ज्या उदार आणि उदात्त मूल्यांवर आधारलेले आहे त्यांची यथार्थ कल्पना नसते. फुल्यांची ही वैचारिक झेप लक्षणीय आहे. ते म्हणतात,

'या भूमंडळावर महासत्पुरुषांनी जेवढी म्हणून धर्मपुस्तके केली आहेत, त्या सर्वांत त्यावेळेस अनुसरून त्यांच्या समजुतीप्रमाणे काहीना काही सत्य आहे. यास्तव कोणत्याही कुटुंबातील एका मानव स्त्रीने बौद्धधर्मी पुस्तक वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तिने तो धर्म स्वीकारावा. व त्याच कुटुंबातील तिच्या पतीने जुना व नवा करार वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास त्याने खिस्ती व्हावे. व त्याच कुटुंबातील त्यांच्या कन्येने कुराण वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तिने महमदी धर्मी व्हावे. आणि त्याच कुटुंबातील त्यांच्या पुत्राने सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास त्याने सार्वजनिक सत्यधर्मी व्हावे. आणि या सर्व माता-पित्यांसह कन्यापुत्रांनी आपला प्रपंच करीत असता प्रत्येकाने कोणी कोणाच्या धर्माचा हेवा करून द्वेष करू नये. आणि त्या सर्वांनी आपण सर्वांच्या निर्माणकर्त्याने निर्माण केलेली लेकरे असून त्याच्याच ( निर्मिकाच्या ) कुटुंबातील आहोत, असे समजून प्रेमाने व गोडीगुलाबीने एकमेकांनी वर्तन करावे. म्हणजे ते सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या राज्यात धन्य होतील.'

खरे तर हे एक भव्य स्वप्न आहे. मी ज्ञानेश्वरांच्या 'पसायदानाशी' त्याची तुलना केली तर कदाचित काहींना ती आवडणार नाही. पण ज्ञानेश्वरांसारख्या प्रतिभावंताने जसे आपल्या स्वप्नात विलक्षण सात्विक, सुंदर रंग भरून ते 'पसायदान' मागितले, तसेच फुल्यांनीही आपले विशाल स्वप्न 'सत्यधर्मा'च्या रूपाने सादर केले आहे. यावर टीका करताना एक टीकाखोर म्हणाला, 'ही एक वेडगळपणाची बडबड आहे. तुम्ही त्याला धर्म स्वातंत्र्याचा जाहीरनामा म्हणा की, आणखी एखादे अलंकार-प्रचुर नाव द्या ! असले सैराट विचार कधीच वास्तवाच्या जमिनीवर उतरणार नाहीत. काहीतरी अचाट कल्पना करीत बसणे हा शुद्ध वेडेपणा आहे.' मनुष्यजातीच्या

कल्याणाची स्वप्ने पाहणे हा जर वेडेपणा असेल तर असल्याच महनीय सुंदर वेडेपणाची जगाला फार आवश्यकता आहे. अशा प्रकारचे वेड फारच थोडयांना लागते म्हणूनच जगात ठायी ठायी सांप्रदायिक विचारांची आणि मानवी ऐक्याला तडे पाडणारी क्षुद्र बेटे तयार झाली आहेत. धर्माभिमानाची मदिरा पिऊन झिंगलेल्या धर्मवेडयांनी धर्माच्याच पोटात खंजीर खुपसला. पंथ आणि संप्रदाय यांची पिलावळ वाढली. माणूस माणसापासून दुरावला. आकुंचित स्वार्थी हितसंबंधांच्या वर्तुळात अडकून पडला. ही सारी दृश्ये फुले दररोज पाहत होते. एकाच कुटुंबात भिन्न धर्मीय माणसे नांदवून घेणारी आदर्श कुटुंबव्यवस्था उद्याच्या मनुष्याला स्वीकारावी लागेल हा निर्णय जेव्हा फुले देतात तेव्हा ते उद्याचे सत्य सांगत आहेत. कल्पनारम्य, स्वप्नाळू दृष्टीने केलेला हा निर्णय आहे असे मानणे उचित होणार नाही. या विचारात मानवी, ऐक्याची, समतेची तीव्र आच आहे. प्रतिभावंतांची स्वप्ने सामान्य माणसांना पेलत नाहीत हे खरे आहे. पण अशा स्वप्नांचा ध्यास लागल्याशिवाय सामान्यांना आपले जीवन चैतन्यमय करता येणार नाही. जात, धर्म, पंथ, उपासनापद्धती, या साऱ्यांच्या पलीकडे पसरलेले ऐक्यभावनेचे अथांग आकाश एका दृष्टिक्षेपात पाहण्याची क्षमता माणसांत आली तर आजच्या अनेक जटिल प्रश्नांच्या वेढयातून त्यांची सुटका सहज होऊ शकेल. फुल्यांना कोणत्याही मर्यादित संकेताने बांधून ठेवले नाही की त्यांनीही स्वतःला कोणत्याच बंधनात गुरफटून घेतले नाही. ते राष्ट्रवादीही नाहीत अमेरिकेतील ज्या मानवतावादी लोकांनी गुलामांची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी धडपड केली त्यांच्या सन्मानासाठी 'गुलामगिरी' हे आपले पुस्तक फुल्यांनी अर्पण केले आहे. पारतंत्र्याची मनस्वी चीड आणि मानवी समतेवर मनस्वी प्रेम हे या मनस्वी क्रांतिकारकाच्या व्यक्तित्वाचे गुणधर्म आहेत. सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथातील विचारांचे आवाहन साऱ्या मनुष्यजातीलाच आहे. फुल्यांची लेखणी आणि वाणी मानवी स्वातंत्र्याच्या चळवळीला समर्पित झालेली आहे. त्यामुळेच केशवसुतांच्या कवितेतून जो 'नवा शिपाई' प्रकट झाला आहे, तो फुल्यांचेच प्रतिरूप घेऊन अवतरला आहे असे म्हणण्याचा मोह होतो. 'ब्राह्मण नाही, हिंदुही नाही, न मी एक पंथाचा' याच वृत्तीचे प्रतिनिधीपण फुल्यांच्या साहित्यातून केले आहे.

या ग्रंथातील वैचारिक बंडखोरी आजच्या विज्ञाननिष्ठ वातावरणातही कित्येकांना पचत नाही. केवळ वैज्ञानिक उपकरणे वाढून जीवन बदलत नाही. यंत्रतंत्राच्या प्रगतीतून मनुष्याच्या बाह्य जीवनाला वेग आलेला असला, तरी त्याचे श्रद्धाळू मन शेकडो-हजारो वर्षे मागेच रेंगाळत आहे. त्यामुळेच फुल्यांनी अनेक अंध संकेतांवर केलेले कठोर आघात आजच्या 'आधुनिक' धार्मिक माणसाला रुचण्याची शक्यता कमी आहे. म. फुल्यांच्या नावाचा पावलोपावली जयजयकार करणाऱ्या लोकांनी फुल्यांना सरळ देव्हाऱ्यातच नेऊन बसवले आहे. या अनुयायांनाही आपल्या नेत्याच्या बुद्धिवादी बंडखोरीची यथार्थ ओळख कुठे पटली आहे? मनुष्य विज्ञाननिष्ठ झाला म्हणून तो

बुद्धिनिष्ठ होईलच अशी ग्वाही देता येत नाही. फुल्यांनी धर्मग्रंथांच्या बाबतीत जी स्पष्ट व सडेतोड भूमिका घेतली आहे ती खरोखरच सर्वार्थांनी समर्थनीय आहे. ते म्हणतात,

' या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवांनी धर्मपुस्तके केली आहेत, त्यांपैकी एकाही ग्रंथात आरंभापासून शेवटापर्यंत सारखे सार्वजनिक सत्य नाही. कारण प्रत्येक धर्मपुस्तकामध्ये काहीएक व्यक्तींनी त्यावेळच्या प्रसंगांस अनुसरून हेकडपणा केल्यामुळे, ते धर्म एकंदर सर्व मानवी प्राण्यांस सारखे हितकारक न होता सहजच त्यामध्ये अनेक फळ्या होऊन त्या एकमेकांचा मनापासून हेवा व द्वेष करू लागतात.'

प्रत्येक धर्माचा अनुयायी आपला धर्मग्रंथ ईश्वरप्रणीत आहे, त्यातील अक्षर न् अक्षर केवळ सत्य व पवित्र असून या ग्रंथांची भाषा साक्षात् ईश्वराची वाणी आहे अशा श्रद्धेने भारलेला असतो. वस्तुतः धर्मग्रंथ मनुष्यांनीच लिहिले हे इतके उघड सत्य आहे की त्यावर कसलेही भाष्य करण्याचे काही कारण असू नये. ईश्वरप्रणीतत्वाच्या कल्पनेवर फुल्यांनी केलेला प्रहार अचूक व मर्मभेदक आहे. बहुसंख्य लोक ग्रंथशरण वृत्तीचे असतात. पराकोटीचे ग्रंथप्रामाण्य समाजात शिरल्यामुळे आपापल्या धर्मग्रंथाच्या प्राचीनत्वाबद्दल आणि त्याच्या ईश्वरकर्तृकतेबद्दल ते दुराग्रही बनलेले असतात. वस्तुतः गीता, बायबल, कुराण वगैरे धर्मग्रंथांतून काही शाश्वत मूल्यांचा आढळ होत असला तरी हे ग्रंथ कालसापेक्ष आहेत यात कसलीच शंका नाही. कित्येक शतकांपूर्वी निर्माण झालेले साहित्य काळाच्या ओघात आपल्या स्वतःचे काही सामर्थ्य हरवून बसते. साऱ्याच ग्रंथांच्या संदर्भात हे नियमाने घडत गेले आहे. फुल्यांनी धर्मसंस्था, धर्मग्रंथ, भिन्न भिन्न पंथ यांच्याकडे ज्या सत्यशोधक दृष्टीने पाहिले ती दृष्टी फुल्यांचे पुतळे गावोगावी उभारणाऱ्या लोकात केव्हा येणार हाच खरा प्रश्न आहे.

' सार्वजनिक सत्यधर्म ' हा ग्रंथ म्हणजे फुल्यांच्या व्यापक, समावेशक, मानवतावादी विचारांचा उत्कृष्ट अविष्कार आहे. त्याची रचना संवाद पद्धतीने झाली आहे. याचा परिणाम ग्रंथाची भाषाशैली सुगम, प्रसादपूर्ण बनण्यात झाला. फुल्यांची भाषा कोठेही क्लिष्ट होत नाही. पंडिती कृत्रिमपणाचा तर तिला स्पर्शही झालेला नाही. साधी, सहज, परिपूर्ण, अर्थ व्यक्त करणारी, बहुजनाला, सामान्यातल्या सामान्य माणसालाही कळू शकेल आणि त्याच्यावर आपल्या ठाम विचारांचा परिणाम घडवू शकेल अशी अकृत्रिम भाषा फुल्यांनी लिहून मराठी गद्यशैलीला एका अर्थाने सामर्थ्याचीच देणगी दिली आहे. आपल्या विद्वत्तेच्या प्रदर्शनासाठी अलंकारिक, अवजड भाषा योजणारे अनेक पंडित असतात. फुले शब्दपंडित नसले तरी शब्दांचा यथोचित वापर करून भाव आणि अर्थ सुलभ रीतीने प्रकट करणारे शब्दप्रभू लेखक आहेत असे विधान करण्यास प्रत्यवाय नाही. तीव्र सामाजिक भान असलेल्या या विचारवंताला आपण नेमके कोणासाठी लिहित आहोत, आपला वाचकवर्ग कोण आहे आणि त्याची बौद्धिक कुवत काय आहे याची जाणीव त्यांना होती. शेतकरी,

कष्टकरी, लहान उद्योगधंदे करणारा साधारण व्यापारी, खेड्यापाड्यातला सामान्य शिक्षित माणूस यांच्या सदैव संपर्कात फुले राहिले होते. ते स्वतः साधारण समाजाचेच एक घटक असल्यामुळे सामान्य माणसांची भाषा हीच त्यांची भाषा बनली होती. विद्वानांची संस्कृतप्रचुर भाषा हृदयाला जाऊन भिडत नाही. ती बुद्धीचे रंजन करते. स्तिमित करते. पण अंतःकरणात घर करीत नाही. कारण तिला सामाजिक जीवनाचा गंध नसतो. फुल्यांच्या भाषेत चित्रात्मक परिणाम साधण्याची विशिष्ट शक्ती आहे. सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथाच्या भाषेत फुल्यांचे व्यक्तिमत्त्वही मिसळून गेले आहे. ज्या कालखंडात चिपळूणकरांसारखे शैलीकार समजले जाणारे लेखक आपल्या नटव्या, भरजरी आणि म्हणूनच जडावलेल्या भाषेने सुशिक्षित वाचकांची नजरबंदी करीत होते. त्याच काळात फुल्यांची स्वच्छ, घरगुती प्रसादपूर्ण भाषा लिहिली गेली आणि हळूहळू ती समाजमनात मुरत गेली. फुल्यांच्या शैलीनेही मराठी गद्याच्या दालनात क्रांतिकारक कार्य केले असे म्हणता येईल. ज्यांनी गद्यशैली संपन्न केली अशा लेखकांच्या नामावलीत फुल्यांचे नाव घेतले जात नाही हे समीक्षकांचे दुर्दैव आहे. कारण या सरळ व धीट मराठमोळ्या भाषेचे नीटसे आकलनच त्यांना होऊ शकले नाही. मराठी गद्यशैली सामान्य माणसाच्या मनात फुल्यांच्या लेखणीमुळेच स्थान मिळवू शकली. ब्राह्मणी भाषेच्या जोखडातून मराठीला मोकळी करून ती बहुजनांच्या घरादारापर्यंत नेण्याची कामगिरी फुल्यांनी प्राधान्याने केली हे सत्य अजून नीट लक्षात घेतले जात नाही याची खंत वाटते.

फुल्यांचा उल्लेख महात्मा या उपाधीने सर्वत्र केला जातो. पण 'महात्मा' या शब्दाला एक आध्यात्मिक अर्थ चिकटला आहे. तो बाजूला सारून व्यक्तीची मुलभूत प्रतिष्ठा आणि स्वायत्तता यांचा निर्भेळ पुरस्कार करणारा समतेचा व सामाजिक न्यायाचा ध्वज उंच धरणारा क्रांतिकारक असाच अर्थ या उपाधीचा करावा लागेल. कारण हेच फुल्यांचे रूप आहे. त्यांच्या साहित्यातून ते स्पष्ट झाले आहे. क्रांतिवादी साहित्य शोषितांच्या, श्रमिकांच्या पाठीशी उभे राहते. ते परंपरेला आव्हान देते, नवरचनेचा पाठपुरावा करते. मराठी साहित्यात फुल्यांनी प्रथमच आमूलाग्र क्रांतीची ललकारी मारली. पुढील साहित्यात हे पेटते सूर उमटले खरे, पण त्यांचे मूळ फुल्यांच्या आक्रमक, पुरोगामी लेखणीत आहे असेच म्हणावे लागेल. जीवनाला वेढून राहिलेल्या साऱ्याच समस्यांचा मूलभूत विचार त्यांनी केला आहे. व्यापक सहानुभूतीने ओथंबलेल्या या साहित्याने फुल्यांचे जिवंत मन आणि व्यक्तिमत्व टिपून घेतलेले दिसते. हे साहित्य वाचताना त्याची प्रतीती येते व मन सुखावते.

□

# शृंगारवेल 'कमला'

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या वाङ्मयातून त्यांच्या प्रमत्त, प्रखर आणि प्रभावी व्यक्तिमत्वाचे अत्यंत स्पष्ट, उद्दीपक दर्शन घडते. त्यांची कविता ही तर जणू काही त्यांची आत्मकहाणीच आहे. वीर आणि शृंगार या रसांचा उत्कट आविष्कार करणारी ही कविता एका वादळी क्रांतिकारक आणि रोमहर्षक जीवनाचा उग्रगंध घेऊन आपल्या समोर उभी राहते. तिचे दर्शन दिपविणारे आहे, तसेच ते सुखविणारेही आहे. ही कविता आपल्याला केवळ काव्यानंद देत नाही, केवळ कल्पनाविलासाचे रंगीबेरंगी चमत्कार दाखवीत नाही. ही कविता एखाद्या मस्तवाल वावटळीसारखी आपल्या हृदयाला झोंबत राहते. विचारभावनांची अनेक वर्तुळे मनात निर्माण करते. जीवनातला आशय ती आपल्या कवेत घेण्याचा वेगाने प्रयत्न करते. क्षणभर उल्हासित करणारी आणि नंतर सुकून जाणारी ही सामान्य कविता नव्हे. कारण हिचा आस्वाद आणि अनुभव घेताना ती आपल्या मनाला काही ठिकाणी सुखदु:खांच्या जखमा करून जाते.

अंदमानच्या अंधारकोठडीत विनायक दामोदर सावरकर नावाचा एक क्रांतिकारक तरुण पाशवी हातांनी ढकलला जातो. त्याची सारी दिव्यस्वप्ने त्याच्यापासून ओरबाडली जातात. त्याच्या आक्रमक व्यक्तिमत्वाला चोळामोळा करून टाकण्याचा प्रयत्न केला जातो. पन्नास वर्षे काळ्या पाण्याची जबरदस्त शिक्षा त्याला साम्राज्यशाहीने ठोठावलेली असते. त्या अंधारकोठडीत दबा धरून बसलेला मृत्यू आता त्याच्याकडे पाहून विकट हसत असतो. मरणाच्याच सहवासात या तरुणाला आपल्या साऱ्या महत्त्वाकांक्षांची राखरांगोळी करायची असते. कविप्रकृतीचा हा तरुण मातृभूमीवरील प्रेमाने कमालीचा व्याकुळ होतो. पण आता तर त्याची जन्मभूमी त्याला कायमची दुरावलेली आहे. पूर्वी केव्हा तरी उचंबळत्या सागराच्या किनाऱ्याशी बसून मातृभूमीला परत घेऊन जा अशी त्याची विनवणी या कवीने केलेली दिसते. आता तर सारेच दरवाजे बंद झाले होते. पत्नीच्या आठवणींनी अस्वस्थ झालेला हा तरुण त्या काळकोठडीत

जखमी वाघासारखा येरझारा घालीत आहे. त्याचे सारे मित्र, सारे आप्तेष्ट – नव्हे त्याचे सारे पराक्रमी, ध्येयवादी आयुष्यच त्याच्यापासून नियतीने हिसडून घेतलेले आहे. उरला आहे तो केवळ अंधार ! पन्नास वर्षांच्या या दीर्घ दारुण काळोखात कोणाला काही दिसणे शक्य आहे काय ? अंधाराच्या अजगराने सर्वांगाला विळखा घातल्यानंतर त्याच्या जबड्यात मुकाट्याने विलीन होण्याशिवाय दुसरा कोणता मार्ग असणार ? हा अंधार आता अखेरपर्यंत क्रूर सोबत करणार आहे. आपण स्वतःच आपल्या या पराभूत आयुष्याचा गळफास लावून एका हिस्क्यासरशी शेवट करावा असेच कोणालाही वाटेल. सावरकरांच्या मनातही ही पलायनवादी कल्पना क्षणभर वळवळली. पण क्षणभरच ! दुसऱ्याच क्षणी गीतेच्या लढाऊ तत्वज्ञानाची दुग्धधारा प्यालेल्या या विनायकाच्या मनात पौरुषाची, जीवनप्रेमाची मरणावर मात करण्याची विलक्षण उर्मी उचंबळून आली आणि त्यांच्या तोंडून कवितेच्या ओळी उमटू लागल्या.

> अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला
> मारिल रिपु जगति असा कवण जन्मला ।।
> अट्टहास करित जअी धर्मधारणी
> मृत्युसीच गाठ घालु मी घुसे रणी
> अग्नि जाळि मजसि ना खड्ग छेदितो
> भिऊनि मला भ्याड मृत्यु पळत सूटतो
> खुळा ऽ रिपू ऽ तया स्वये
> मृत्युच्याचि भीतीने भिवबु मजसि ये ।।

'मला मारू शकेल, माझा शेवट करू शकेल असा कोण आहे ? ही अंदमानाची अंधारकोठडी मला गिळू शकणार नाही. भोवताली पसरलेला वैफल्याचा नि निष्प्रेमाचा काळोख माझ्या हृदयातल्या प्रकाशकिरणांनी मी पार नाहीसा करीन. होय ! माझ्या मनात, बुद्धीत, आत्म्यात एक विलक्षण प्रकाशशलाका आहे. तिच्या साहाय्याने मला एक नवी निर्मिती करायची आहे. माझी प्रतिभा या क्षणी अंधार कोठडीला ओलांडून नवनवीन सौंदर्याचा वेध घेत आहे. कितीतरी चित्रविचित्र, दिव्य सौंदर्य दिसत आहेत... '

सावरकरांच्या हृदयातली प्रतिभा जागी झाली, तिची तार छेडली गेली. एक प्रेमधुंद लयकारी उमटली, फुलबागेतल्या फुलांचा सुगंध वाऱ्याबरोबर वाहत यावा, त्याप्रमाणे या कवीच्या जीवनासक्त मनात उत्कटपणे भोगलेल्या प्रीतीचा सुवास दरवळू लागला. त्या सुवासात एक आगळी जादू होती कारण आता यमयातना देणारी ती अंदमानाची राक्षसी कोठडी उरली नव्हती. पायातल्या साखळदंडांचीही फुलं झाली होती. आजूबाजूच्या रुक्ष वातावरणाला शृंगाराचे संगीत आठवू लागले. सावरकरांच्या ताज्या तरुण संगमोत्सुक हृदयाच्या सतारीवर उन्मत्त शृंगाराची सुरावट उचंबळून येऊ लागली. सापडलेले हे सूर आणि शब्द कोठेतरी गुंफले पाहिजेत. शब्द कोठेतरी लिहिले

पाहिजेत. कवी इकडे तिकडे पाहू लागला. त्या भयाण तुरुंगातली ती उदास कोठडी विषण्ण आणि जड झालेली वर्षानुवर्षे नैराश्याची ओझे घेऊन उभी होती, कोठडीच्या जाडजूड काळसर भिंती कशाने कुणास ठाऊक काळवंडून गेल्या होत्या. उंचावरील एका लहानशा झरोक्यातून एकच चुकार किरण त्या धुरकट भिंतीवर रेंगाळत होता. सावरकरांच्या दृष्टीसमोर किशोरावस्था आणि यौवन यांच्या संधिप्रदेशात उभी असलेली कमला दिसू लागली. त्या कोवळ्या नवतरुणीच्या अंगोपांगावर निसर्ग आपली मोहक जादू एका अदृश्य कुंचल्याने चितारीत होता. कोठडीत डांबला गेलेला हा कवी तिच्या फुलऱ्या देहसौंदर्याकडे प्रेमिकाच्या आणि कवीच्या धुंद दृष्टीने पाहत होता. कमलेच्या नवतारुण्याचे चांदणे तिच्या गात्रागात्रांतून कसे खेळत आहे याचे चित्र आपण रेखाटले पाहिजे. सौंदर्याची आणि यौवनाची ही मूर्ती आपण आपल्या शब्दांतून मूर्त केली पाहिजे. या तीव्र जाणिवेने नवे शब्द प्रकट होऊ लागले. शृंगार, प्रेम, रसिकता यांनी रसरसलेली कविता आकार घेऊ लागली, प्रणयोन्मादाची मदिरा प्यालेले रसिक शब्द त्या भयाण अंधारकोठडीत गात गात अवतीर्ण झाले. कोठडीत ठाण मांडून बसलेली खिन्नतेची काळी सावली आता उरलेली नव्हती. जणू ती कोठडीही शृंगाराच्या स्पर्शाने मोहरून निघाली होती. त्या जुनाट, अंधाऱ्या, उदास खोलीला आता तारुण्याची कविता आणि कवितेचे तारुण्य दोन्ही कडकडून भेटली होती.

मनात दाटून आलेली कविता लिहायची कशी ? आणि कोठे ? ना लेखणी, ना कागद. शब्द कोठेतरी ग्रथित केलेच पाहिजेत. दोन जन्मठेपींची शिक्षा आलेला एक तरुण कैदी, प्रणयशृंगाराची कविता लिहायला साधन नाही म्हणून विषण्ण होतो ही घटनाच केवढी नाट्यपूर्ण आहे. हताश झालेल्या त्या तरुणाने पराभवाचे गीत मनात जपले असते तर ते स्वाभाविकच होते. पण तो हताशही नव्हता आणि पराभूत तर त्याहून नव्हता. जीवनाची सारी स्वप्ने उद्ध्वस्त झाली म्हणून काय झाले ? नवी भव्य स्वप्ने पाहण्याची एक सुंदर निर्माणशील दृष्टी त्याच्यापाशी होती. त्याने वेदना भोगल्या होत्या म्हणूनच त्याला नवनवीन स्वप्ने पडत होती. सावरकरांच्या मनात एक चिरतरुण, प्रतिभावंत कवी जागाच होता. दुःखाच्या रखरखीत उन्हातसुद्धा या कवीच्या अंतःकरणातली प्रतिभेची वेल सुकली नव्हती. ती अधिकच बहरली. चैतन्याने ती अधिकच सळसळू लागली. तिचा उन्मत्त गंध त्या अंधारकोठडीच्या अंगावरही पसरू लागला. कोठडीत अस्वस्थपणाने येरझारा घालणाऱ्या सावरकरांना घातपाताचा एक काटा सापडला. त्या काट्याची त्यांनी लेखणी केली. कोठडीच्या खडबडीत भिंतींचा कागद झाला. काटेरी लेखणीतून काळसर भिंतीवर तारुण्याने न्हालेल्या एका कवितेला तिचा स्वतःचा वैशिष्ट्यपूर्ण आकार येत राहिला. ओळीमागून ओळी लिहिल्या जाव्यात, त्या पाठ कराव्यात, पुन्हा पुसून टाकाव्यात व आणखी नव्या ओळी लिहिल्या जाव्यात या क्रमाने ' कमला ' या खंडकाव्याचा जन्म झाला. मराठी साहित्याच्याच काय, पण कोणत्याही भाषेच्या साहित्यात इतक्या विलक्षण रीतीने

आणि इतक्या प्रतिकूल वातावरणात एखादे दीर्घ काव्य जन्माला आले असेल काय ? शक्यच नाही. भिंतीवर लिहिली गेलेली आणि काट्याने कोरली गेलेली ही एकमेव शृंगारकविता आहे आश्चर्य असे की तुरुंगातल्या यातना निमूटपणाने सहन करीत राहिलेल्या काळ्या पाण्यावरील एका कैद्याने आपल्या नैराश्यवावर मात करून हे रसपूर्ण खंडकाव्य निर्माण करण्यात देहभान विसरुन जावे हा केवढा बरे चमत्कार आहे ! तसे पाहिले तर सावरकर हाच मुळी एक अपूर्व चमत्कार आहे. त्यांचे सारे जीवन हाच काव्याचा—महाकाव्याचा विषय ठरावा. अग्नीसारखी दाहकता आणि फुलासारखी कोमलता यांच्या मिश्रणातून त्यांच्या आयुष्याला सृष्टीने एक चमत्कारिक रंग आणि वास दिला. सारा जन्म या देशभक्ताने राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीचे जे अग्निकुंड पेटले होते त्यात स्वतःला बिनदिक्कत झोकून देण्यातच काढला. झुंजता झुंजता याच्या आयुष्याची कविता समाप्त झाली. वयाच्या पंधराव्या वर्षीच त्याने प्रतिज्ञा केली, ' माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी सशस्त्र युद्धात शत्रूस मारीत चाफेकरांसारखा मरेन किंवा शिवाजीसारखा विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या मस्तकी स्वराज्याचा राज्याभिषेक करवीन. ' कोवळ्या वयात उच्चारलेली ही प्रतिज्ञा अमलात आणताना सावरकर आपल्या प्राणांचा नैवेद्य घेऊन उभे होते. सर्वस्वावर लाथ मारण्याची तयारी करून मातृभूमीचे स्वातंत्र्य हेच सर्वस्व मानणाऱ्या या आत्यंतिक प्रकृतीच्या प्रतिभावंतात वीररसाप्रमाणेच शृंगारभावही आवेगाने उचंबळत होता. वीरालाच शृंगार साजून दिसतो. कृष्णजीवनात केवळ शृंगार आणि प्रणय असता तर ते जीवन आज वंदनीय ठरले असते काय हा प्रश्नच आहे. शृंगाराची निर्झरिणी जेव्हा पराक्रमाच्या आणि ध्येयवादित्वाच्या पहाडातून वाहू लागते तेव्हाच ती कौतुकाचा व आनंदाचा विषय होते. रसमय, राकट शृंगार ही वीराची मानसिक गरज असते. शृंगाराची खुलावट वीररसाच्या अधिष्ठानावर जेव्हा होते तेव्हा त्याची रमणीयता विशेष दिसते. सावरकरांच्या मनातला, खोल दडलेला प्रणय भाव, आसक्ती अंदमानच्या बंदिवासात उफाळून यावी आणि त्या भावनेला त्यांनी काव्यरूप देण्याची धडपड करावी हे स्वाभाविक वाटते. मरणाचे सावट पडूनसुद्धा प्रेमभोगाची ओढ हिरवीगार राहवी यातच त्यांच्या धैर्याची, आशावादाची आणि रसिकतेची साक्ष पटते.

' कमला ' हे वस्तुतः एक खंडकाव्य. पण त्याला महाकाव्याची ऐट आहे. त्यातली काही वर्णने सांकेतिक व भाषाही कृत्रिम वळणाची आहे. पण या काव्याला महाकाव्याचा डौल मात्र आला आहे. कल्पनेची विविधता आणि विशालता व सुंदर आणि भव्य यांचे उत्कट आकर्षण ही महाकाव्याची वैशिष्टये ' कमला 'त जाणवत राहतात. कमलेच्या मनःस्थितीशी कवी समरस तर झालाच आहे, पण पुन्हा अलिप्त राहून तो तिला काही संदेशही देत आहे. कमला आणि मुकुंद यांच्या पहिल्या प्रेममीलनाची रोमांचक कथा कवीच्याच भावजीवनाचा जणू आविष्कार आहे. राधा-

कृष्णाच्या माध्यमातून जुन्या संत व पंतकवींनी ज्याप्रमाणे आपल्याच मनात पिंगा घालणारी प्रेमभावना प्रकट केली, त्याप्रमाणे 'कमला' म्हणजे सावरकरांच्या अतृप्त, उद्दीप्त व प्रमत्त शृंगारभावनेचे सुंदर, धुंद पण उदात्त चित्रण आहे. रम्याद्भुत कल्पनांचा त्यांनी या काव्यात तर पाऊसच पाडला आहे. अपूर्व वस्तूची निर्मिती करणारी प्रज्ञा म्हणजे प्रतिभा या व्याख्येचे येथे पूर्ण प्रत्यंतर येते. सावरकर हे प्रकृतीनेच कवी आहेत. कवीच्या विलक्षण रोमँटिक दृष्टीने त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्याचे स्वप्न रंगवले आणि त्या उदात्त स्वप्नाचा पाठलाग करीत जन्मभर वणवणत राहिले. अंदमानच्या अजस्र तुरुंगात म्हणूनच त्यांची बंडखोर प्रतिभा जखडून राहिली नाही. काव्याला आवश्यक असलेली तीव्र भावात्मकता त्यांच्या साहित्यालाच काय, पण त्यांच्या साऱ्या आयुष्यालाही व्यापून उरली. या काव्यावर अस्वाभाविकतेचा आक्षेप काही टीकाकारांनी घेतला आहे. पण कवीच्या जीवनातच एकप्रकारची अद्भुतता आहे. 'कमला' काव्यात सृष्टीच्या बाह्य वर्णनात अतिशयोक्ती नि अद्भुतता असली, तरी कमला आणि मुकुंद यांच्या मनःसृष्टीतील परिवर्तने कवीने अगदी सहज टिपली आहेत. खरे तर कमला आणि मुकुंद या दोन्ही भूमिका एकाच भोगलालस मनाने घेतल्या आहेत असे म्हणण्यात अतिशयोक्ती नाही.

पानिपतच्या युद्धापूर्वी मुकुंद आणि कमला यांचा बालपणीच विवाह झाला आहे. मुकुंद व त्याचा मित्र मुकुल दोघे सैनिक आहेत. पाडव्याच्या सणासाठी घरी आलेल्या मुकुंदाला आपली 'कैशोरयौवना' पत्नी कमला दिसते आणि तो तिला भेटण्यासाठी अत्यंत आतुर होतो. बागेत फुले तोडण्यात गर्क झालेल्या कमलेचे तो पहिले चुंबन – चोरटे चुंबन घेतो. त्या विलक्षण उन्मादक अनुभवाने कमला अंतर्बाह्य रोमांचित होते. इतकी की ते चुंबन तिला जीवनाच्या आणि तारुण्याच्या यक्षसृष्टीत घेऊन जाते. भ्रमराच्या गोड दंशाने फुलत चाललेल्या कळीचे दर्शन रात्री तिला स्वप्नात सुद्धा घडत राहते. या अनुभवाने कमला ऋतुमती होते आणि यौवनाच्या कांतीने ती अधिकच मोहक दिसू लागते. तारुण्याच्या सीमेवर उभ्या असलेल्या कमलेच्या मनातली ही अनोखी कंपने इतक्या हळुवारपणे, इतक्या रसिकतेने आणि इतक्या सचित्रपणे साकार केली आहेत, की क्रांतीचा अंगार ज्या वाणीने उधळला तीच वाणी हा सूक्ष्मतरल प्रणयानुभव कसा रेखाटीत आहे याचे नवल वाटते. सावरकर म्हणतात,

> प्रियेच्या पहिल्याची हे लज्जाचंचल चुंबना
> कोण प्राणी जगी की जो विसरेल तुझ्या क्षणा !
> असुनी पल जो पाजी चुंबना तुझिया रसा
> शताब्दाहुनीही होई तरी अपल तो कसा
> तुझ्यात दिव्य जी चोरी, गार जो चटकाहि की

या आणि नंतरच्या ओळीतून त्यांनी पहिल्या चुंबनाची मादकता कोणत्याही

मद्याहून कशी अधिक बेहोशी देऊ शकते याचे वर्णन केले आहे. त्यानंतर कवी म्हणतो,

स्नेहशून्य साहरा वाळवंटात काळखोलीत
प्रियेच्या पहिल्याची हे मुग्ध प्रेमल चुंबना !
तुझीच स्मृति जावो नि भेटवी विरही मना !

पूर्वी अनुभवलेली पण आता पारखी झालेली ही चंचल अनुभूती कवी आपल्या मनात जागी करीत आहे. आपल्या कल्पनेच्या राज्यात मुकुंदाच्या रूपाने तो कमलेच्या सहवासाचा आस्वाद घेत आहे. भीषण वास्तवता त्याच्याभोवती दगडी तुरुंगाच्या आणि अंधारकोठडीच्या माध्यमातून त्याला वेढा देऊन बसली आहे. पण कवीची प्रतिभा कारागृहाच्या उंच भिंतीवरून उड्डाण करू शकते. कारण ती स्वच्छंद आहे. मुक्त आहे. सावरकरांचे शरीर त्या अंधारलेल्या स्नेहशून्य भिंतीच्या आत जखडले असले, तरी त्यांच्या मनाचा पक्षी केव्हाच जुन्या आठवणींच्या आभाळात भरारी घेत होता. व्यावहारिक सत्य आणि वाङ्मयीन सत्य यातील अंतर ज्यांच्या लक्षात येत नाही त्यांना 'कमला' काव्य हा केवळ कल्पनेचा कृत्रिम खेळ वाटतो. पण ही 'कमला' मुकुंद होऊन या कवीने पुन्हा पुन्हा चुंबिली आहे. सावरकरांच्या मानसिक स्थितिगतीचे हे एक अस्सल चित्र आहे. तपशील कल्पनेतला असेल पण काव्यातले तत्व पूर्णांशाने वास्तव आहे यात वाद नाही.

कमला आणि मुकुंद यांच्या पहिल्या मीलनाचा शब्दाविष्कार सावरकर सहजतेने करतात,

ऋतुमती झालेली कमला
सुरम्य मखरामाजी रमणी मग जै बसे
श्लोकात कालिदासाच्या उपमाच जशी दिसे.

कालिदासाच्या श्लोकातल्या उपमेची अनुरूप उपमा कमलेला देण्यातले औचित्य रसिकांना सांगण्याचे कारण नाही. कालिदासाच्या शृंगारातली अभिजातता आपल्या काव्यात सावरकरांनी आणण्याचा प्रयत्न केला आहे.

पुढील वर्णन काव्याच्या सौंदर्यात किती समृद्ध भर घालते हे पाहिल्याशिवाय या काव्याची काव्यमयता लक्षात येणार नाही.

वेणी होताच दे सासू जी पाठीस तया दिशी
थाप जी आईच्या लागे चुंबनाहुनी गोडशी
.... ... ... ... .... ... ...
न्हाता एकासनी ऐसे किती चोरियली तरी
अंगे स्वयेचि अंगाशी लागताति परस्परी
मऊ मऊ असे काही मऊ ते सुख लागले.
धरीच वक्षी तो तीते, झोक जाऊनिया बरे

पडद्यात गुलालाच्या जळांच्या गळत्यामधी
घेववे न तिला दे ती संधी साधुन तो तधी
अशी परिचिता होता प्रियमूर्ती अनुक्रमे
दुरोनि नच, ओठांही प्यावी चंद्रकला गमे

कल्पकतेचे नवनवीन उन्मेष हे या काव्याचे एक आगळे वैशिष्टय. फुलबागेच्या वर्णनात कवी रंगून गेला आहे. बागेतील भृंग हा मदनाचा दलाल आहे आणि निशिगंधाची फुले ही मदनाच्या सेनेची पुढे आलेली रौप्यशृंगे आहेत. कारंजातून उफाळणाऱ्या जलधारा म्हणजे इंद्रधनुष्याची पिले आहेत. अशा कल्पनांची धुंदी अनुभवताना कवी त्या बागेत किती मनःपूर्वक रमला आहे याची जाणीव होते. नवनवीन शब्दांचे आणि कल्पनांचे घुंगुर पायात बांधण्याचा प्रयत्न या काव्याने केला आहे. सावरकरांची काव्याभिरुची संस्कृतातील अभिजात काव्यावर आणि मराठीतील पंडिती प्रकृतीच्या कवितेवर पोसली गेल्यामुळे ' कमला ' मधील प्रत्येक वर्णने संस्कृत वळणाची ठराविक पद्धतीची वाटतात. शब्दांची रचना काही ठिकाणी अतिसंस्कृतनिष्ठ असल्यामुळे क्लिष्टता व दुर्बोधता जाणवत राहते. पण अशा काही वैगुण्यांना बाजूला सारून सावरकरांची कविता कित्येक स्थळी काळजाला हात घालते. शृंगार आणि प्रेम यांच्या बेहोश अनुभवाची रसरशीत चित्रे अत्यंत तन्मयतेने रेखाटते. या खंडकाव्याचा आणखी एक अद्वितीय विशेष सांगितलाच पाहिजे.

स्त्री पुरुषांचा शृंगार अनेक कवींनी आजपर्यंत वर्णिला आहे. त्याचे वर्णन पुढेही साहित्यात सदैव होत राहील. शृंगार हा जीवनाला रुची देणारा एक अत्यंत आकर्षक आणि गूढ विषय आहे यात शंका नाही. कालिदासाने ' मेघदूतात ' विप्रलंभ शृंगार रेखाटला तर ' कुमारसंभवात ' संभोग शृंगार रंगवला. शृंगाराची प्रमत्त चित्रे जुन्या मराठी काव्यातही पुष्कळ सापडतात. मुक्तेश्वर आणि वामन यांनी उघडा शृंगार कित्येक स्थळी वर्णिला आहे. राम जोशी, होनाजी बाळा, सगनभाऊ, पठ्ठे बापूराव वगैरे शाहिरांच्या लावण्यांतून हा रस भरभरून वाहत आहे. भारतात पसरलेल्या अनेक प्राचीन मंदिरांच्या दगडी भिंतीवर कित्येक शृंगारचित्रे खोदलेली दिसतात. हा एक सनातन आणि अवीट मधुर असा विषय आहे. पण या विषयाच्या रेखाटनाला कलावंताची कलाशक्ती जिवंत आणि निकोप असेल आणि समरसता आणि तटस्थता यांचा कलात्मक तोल सांभाळता येत असेल तरच हा विषय सुंदर रीतीने मांडता येतो. कालिदासासारख्या महाकवीचे पाऊलसुद्धा अशा विषय चित्रणात कळत नकळत घसरते व काममीलनात त्याची प्रतिभा अतिरेकी विकृत रस घेऊ लागते. मुक्तेश्वराची अशीच अवस्था झाली आहे. शाहिरांच्याबद्दल तर बोलण्याचे कारणच नाही. सर्व भावनांत रतिभावनेसारखी उन्मत्त आणि उत्कट भावना नाही दुसरी. दुःख आणि आनंद यांची पेरणी करून मनुष्याला घडविणारी किंवा उद्‌ध्वस्त करणारी ही विषय-भावना साऱ्याच प्रतिभावंतांच्या लेखनाचा महत्त्वपूर्ण विषय बनला तर त्यात आश्चर्य नाही.

पण तिची अभिव्यक्ती कलात्मकतेने करणे हे एक मोठे आव्हान असते. कमला आणि मुकुंद यांचा प्रथम समागम घडल्यानंतर कमल झोपेत असतानाच तिला सोडून मुकुंदाला लढाईवर जावे लागते. कमलेच्या स्वप्नात काही भीतिदायक दृश्ये तिला दिसतात. येथे या काव्याचा शेवट झाला आहे. पण सावरकरांनी कमला आणि मुकुंद यांच्या संगमाच्या चित्रणाला उदात्त जाणिवेचा जो स्पर्श दिला आहे त्यामुळे या काव्याला एक आगळीच नवलाई लाभली. मराठी साहित्यात तरी या प्रकारचे संगमचित्रण सर्वस्वी नवीन आणि स्तिमित करणारे आहे. फुलांच्या शेजेवर भीत भीत बसणाऱ्या कमलेला उद्देशून सावरकरांमधल्या श्रेष्ठ कवीने आणि तत्वचिंतकाने जे भाष्य केले आहे ते केवळ अपूर्व नाही तर नितांत माननीयही आहे. या तत्वचिंतनात तत्वजडता नाही, तत्वसुंदरता आहे. काव्याच्या चैतन्ययुक्त गाभ्याला या चिंतनाने अधिकच जिवंत आकर्षक बनविले आहे. जीवनाकडे रसिकतेने व शोधकतेने, नीटपणे व धीटपणे पाहू शकणाऱ्या चिंतनप्रिय कवीलाच या प्रकारचे भाष्य करता येणे शक्य आहे. शृंगारात अडकलेला, लडबडलेला कवी असे ' चिंतन ' कधीच करू शकणार नाही. शरीर पातळीवरचा प्रमत्त भोग साकार करताना तात्विक पातळीवरील विवेक जेव्हा हा कवी प्रकट करतो तेव्हाच त्याच्या प्रतिभेचे रसायन साधे, सोपे नसून त्यात अनेक रंग मिसळले आहेत व साऱ्या रंगांपेक्षा कवींच्या विशिष्ट व्यक्तित्वाचा रंगच अधिक प्रभावी झाला आहे याची जाणीव होऊ लागते. कवीने म्हटले आहे,

पुण्यमंचकशय्या ही बैस बैस शुभे, नभी;
चुंबिता का मघेची तू राहशी सुटूनी उभी !
बैस शेजेसि ये तू ये; स्वये जनककन्यका !
स्पर्शली जीस ती झाली रतिसेज न धन्य का !
देहधर्म कसासाची ! पावने प्रकटे अजी

' ज्या रतिशेजेला तू स्पर्श करीत आहेस ती शेज सीतेनेही धन्य केली आहे. तिला तू टाळू शकत नाहीस. ही जीवनाची स्वर्गीय गंगा आहे. तो केवळ देहधर्म नव्हे. स्वतः परमेश्वरानेच ही जीवनगंगा तुझ्या ठायी निर्माण केली आहे म्हणून

आलिंगनामृती गोडी; पिऊनी तर तू पहा !
अंगी अंगी समलिंगी, विलंब पल ना करी :
की असामान्य गे देवी पल हा !

या शुद्ध नैसर्गिक, क्रमप्राप्त ईश्वरी प्रेरणेतून मदन नवी पेरणी करीत असतो. हे केवळ दोन शरीरांचे मीलन नव्हे. या मीलनाच्या मागे एक शक्ती उभी आहे. याच दिव्य मीलनातून उद्याचा रामचंद्र, गीतेचा कर्ता श्रीकृष्ण, एखादा बृहस्पती, एखादा महारथी भीष्म किंवा कोणी मुक्त मीरा, पार्वती जन्म घेण्याच्या क्षणाची वाट पाहत असेल. कोणी नवप्रतिभेचा नाटककार, शिल्पकार किंवा आसन्नमरण राष्ट्राला

तारणारा कोणी चंद्रगुप्त, विक्रमादित्य या ' दिव्य पेरणीतून ' प्रकट होण्याची वाट पाहत उभा असेल. सावरकरांचे या संदर्भातले चिंतन त्यांच्याच शब्दांतून वाचावे आणि रोमांचित व्हावे. ते म्हणतात,

' हिंदु छत्रपती श्रीमान शिव वीरवराग्रणी
गुरु गोविंद वा बंदा, धर्मवीर नवा कुणी
मंगलाची परा सीमा ! पेरणीतचि संभवा
घेणे असेल या दिव्या देवभूमि तुझ्यात या
जन्मजन्मांतरीची यज्ञतपःसिद्धी फलोन्मुखा '

सावरकरांच्या दृष्टीने स्त्री-पुरुष संगमाचा केवढा व्यापक तात्त्विक अर्थ आहे हे लक्षात येऊन आश्चर्य वाटते. हा अर्थ मनात आला की, आता ' कमला ' हे केवळ संभोगशृंगाराचे काव्य राहत नाही. ते केवळ कल्पनेच्या भराऱ्या मारणारे, अद्‌भुत वर्णनात रमलेले मनोरंजक, कृत्रिम काव्य वाटत नाही. अंदमानच्या अंधारलेल्या जगात स्वतःचे रंजन करून घेण्यासाठी कवीने केलेला हा काव्यमय खेळ राहत नाही. त्यात त्याने आपले स्वतःचे रसडोळसपण समर्पित, क्रांतिकारक आणि तत्त्वचिंतक व्यक्तिमत्व ओतले आहे. हे काव्य भोगाचे आहे. स्त्री-पुरुषाच्या मीलनाचे आहे. तारुण्याच्या आणि देहासक्तीच्या जयघोषाचे आहे यात शंकाच नाही. पण प्रेममीलनात, शरीरभोगात जो एक चिरंतन महत्त्वाचा रस सामावला आहे, त्याचा विचार कवी अत्यंत सखोलपणे करतो. भोगविचारांकडे एका सुसंस्कृत उन्नत व सौंदर्यवादी दृष्टीने कसे पाहता येते आणि त्यातून नवा अधिक सुंदर अर्थ कसा निर्माण करता येतो याचे हे एक अपवादात्मक उदाहरण आहे. सावरकरांच्या या काव्याला कोठेही अश्लीलाला थाराच नाही. जे आहे ते सुभग आणि शुचिमान आहे. एका निकोप तरुण मनात उचंबळून आलेली तरुण प्रतिभा येथे आविष्कृत झाली आहे. मराठी काव्य साहित्यात ' कमला ' आपल्या अंगभूत वैशिष्ट्यांनी रसिकांना सदैव प्रसन्न करीत राहील यात काय संशय ?

वाङ्‌मयाचे मूल्यमापन केवळ वाङ्‌मयीन निकषावर करण्यात अर्थ नाही. कारण वाङ्‌मय हे निव्वळ वाङ्‌मय नसून, त्यात समाजजीवनाचे अनेक प्रवाह मिसळलेले असतात. त्यामुळेच साहित्यबाह्य कसोट्यांचाही विचार करावा लागतो. ' कमला ' काव्यातल्या शरीरभोगाकडे अभिनव आणि रुचिर वृत्तीने कवी पाहू शकला म्हणून तर या काव्याला नवे परिमाण लाभले. साचेबंद प्रणयाची कथा उगाळणारी ही कविता नाही. तिच्या भोवती भोगातून निर्माण होणाऱ्या नव्या सृष्टीची जाण आहे. ही नवी निर्मितीसुद्धा कवीला आपल्या जीवन विचाराच्या संदर्भात व्हावी असे वाटते. अशी कविता स्फुरायला जीवनचिंतनाच्या खोल पाण्यात जाणीवपूर्वक बुडी मारण्याची क्षमता असावी लागते. वाङ्‌मयाला जीवनभाष्याची पदवी व प्रतिष्ठा त्यातूनच मिळते. सभोवताली अंधाराने आणि मरणाने वेढा घातला असतानाही प्रेम, तारुण्य, सौंदर्य, उपभोग,

नवनिर्मिती आणि जीवन यांच्या जयजयकाराची प्रकाशमान, जिवंत कविता लिहिणारी जयिष्णु प्रतिभा मराठी सारस्वतात प्रकट झाली याचा आनंद आणि अभिमान रसिकांना सदैव वाटेल. सावरकरांतला कलावंत या काव्यातून सर्वांगांनी उचंबळत असलेला जाणवतो. स्वतःभोवती घोर निराशेने आणि मरणाने पाश पसरले असतानाही त्याच्याकडे उपहासाने पाहून दुर्लक्ष करायचे आणि एका नव्या निर्मितीत गढून जायचे ही मस्तवाल वृत्ती, ही कलंदर बेफिकिरी हेच कलावंताचे वैशिष्टय म्हटले पाहिजे. स्वतः सावरकर हा देखील काव्याचा एक विलक्षण विषय ठरला तो या वृत्तीमुळेच !

'कमला' खंडकाव्य वाचताना आपल्या भोवती एक धुंद वातावरण तयार होते. पण तुरुंगाच्या निर्दय, रूक्ष कोठडीत लिहिली गेलेली शृंगाररसाची ही सळसळती अक्षरे आहेत याचीही जाणीव माझ्या मनाला होत राहते. ही पार्श्वभूमीही रोमांचकच आहे, मराठीतली ही प्रेममदिर कविता एका जहाल क्रांतिकारकाने घायपाताच्या काट्याने बंदिखान्यातल्या अंधारकोठडीच्या भिंतीवर खरडून लिहिली केवढी विलक्षण घटना आहे, 'कमला' विसरणे आम्हाला शक्यच नाही.

□

# सावरकर: बलोद्धत शैलीचा निबंधकार

काही लेखकांचे साहित्य रंगहीन असते. प्रभावशून्य असते. ते खूप लिहितात. पण त्यांचे लेखन अंतःकरणाला भिडतच नाही. विपुल निर्मिती करणारा लेखक वाचकांना कोणताच उत्कट प्रत्यय देऊ शकत नसेल तर ती एक शोकांतिकाच म्हणावी लागेल. असे का व्हावे? एखादा लेखक एखादीच कृती निर्माण करतो पण ती कृती वाचकांच्या हृदयात रुजून बसते. याचे कारण काय असावे? लेखकाच्या जीवनानुभूतीशी आणि त्याच्या विशिष्ट व्यक्तिमत्वाशी याचा दृढ संबंध असावा. कित्येक लेखक केवळ शब्द लिहितात. त्या शब्दांना त्यांच्या मनोभावनांचा, व्यक्तित्वाचा वास येत नाही. शब्दांमागून शब्द लिहिणे ही निर्मिती नसून केवळ मांडणी आहे. ज्याच्या जगण्याला आणि सुखदुःखांना स्वतःचा आग्रह आहे, ज्याच्या विचारांना पीळ आहे, ज्याच्या भावनांत आवेग आहे, ज्याच्या व्यक्तित्वात बळ आहे असा मनुष्य जेव्हा कणखरपणाने बोलू व लिहू लागतो तेव्हा जिवंत साहित्य निर्माण होते. ज्याच्या भावनांना कढ नसेल त्याच्या शब्दांत कसला जीव असणार आहे? विशिष्ट रंगगंधांनी फुलून आलेले चैतन्यपूर्ण व्यक्तिमत्व हेच प्रभावी साहित्याचे मर्म असते. शेकडो पुस्तके लिहून काही लेखक विस्मरणाच्या धुक्यात केव्हाच नाहीसे झाले आहेत. प्रश्न संख्येचा नसून गुणवाचकतेचा आहे. ही गुणवाचकता लेखकाच्या जातिवंत प्रकृतीतूनच त्याच्या साहित्यकृतीत उतरत असते. या दृष्टीने सावरकरांच्या वाङ्मयाकडे दृष्टिक्षेप केला म्हणजे त्यांचे विलक्षण, वादळी, जयिष्णु व्यक्तिमत्व प्रमत्तपणाने त्याच्या साहित्यातही स्पष्टपणे उतरले आहे याची जाणीव होते. कदाचित् त्यांचे जीवन ही एखाद्या अपयशाची कहाणी असेल. कदाचित् या व्यक्तीच्या पदरात नियतीने दीर्घकाळ वनवास टाकला असेल. पण ही व्यक्ती एक शक्ती होती. ती झगडत होती. झुंजत राहण्याची एक पराकाष्ठेची जिद्द या मनस्वी माणसाच्या रक्तातून अखेरपर्यंत उचंबळत राहिली. ध्येयाच्या भोवती घिरट्या घालताना या गरुडाचे पंख कितीतरी

वेळा वणव्यात होरपळून गेले. पण त्या वणव्यापेक्षाही अधिक दाहक आणि अधिक आक्रमक वृत्तीने हा माणूस लढत राहिला. त्याला त्याचे स्वतःचे एक बलिष्ठ, गरिष्ठ व्यक्तिमत्व होते. त्याला त्याचे स्वतःचे जळते मन होते. त्याला त्याची स्वतःची स्वप्ने होती. स्वतःचे पंख होते. त्याला स्वतःचे आकाश होते. त्यामुळेच त्याच्या लेखनातून तो स्वतः स्वच्छपणे प्रकट होत राहिला. सावरकरांनी जे जे लिहिले ते ते तंत्रदृष्ट्या कसे आहे हा मुद्दाच गौण ठरतो. त्यांचे शब्द आपल्याला कसे झपाटून टाकतात हेच महत्त्वाचे ठरते. कविता, कथा-कादंबरी, चरित्र-आत्मचरित्र, नाटक आणि निबंध या साऱ्या वाङ्मयप्रकारांत त्यांची लेखणी रमली. तांत्रिक दृष्टीने पाहिल्यास हे लेखन कमी अधिक प्रमाणात यशस्वी झाले. पण त्यांची प्रत्येक साहित्यकृती त्यांच्या पुरुषार्थी, प्रबल, व्यक्तिमत्वाचा रंग घेऊनच उदयाला आली. सावरकरांचे वाङ्मय हे 'स्वातंत्र्यवीराचे' वाङ्मय आहे याचे प्रत्यंतर येत राहते. त्यामुळेच या वाङ्मयाचा वाचकांच्या मनावर एक आगळाच ठसा ठसठशीतपणे उमटून जातो. समर्थ व्यक्तित्व असेल तर वाङ्मयाला कसदारपणा आल्याशिवाय राहत नाही याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे सावरकरांचे साहित्य हेच आहे. वस्तुतः निबंध हा वस्तुनिष्ठ वाङ्मयप्रकार पण त्यातही या लेखकाच्या वृत्ती-प्रवृत्तींचा, आग्रह आकांक्षांचा जोमदार प्रभाव पडल्यामुळे सावरकरांच्या विचारनिष्ठ निबंधाला अनेकस्थळी भावनिष्ठ गद्यकाव्याचे रूप आलेले दिसते. मला तर असे विधान करावेसे वाटते की इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारांपेक्षा सावरकरांची आक्रमक, उद्दीप्त आणि तर्कनिष्ठ विचारधारा निबंधांतूनच अधिकांशाने प्रकट झाली आहे.

मराठी निबंध ज्या लेखकांनी जोपासला, समर्थ व संपन्न केला, वाङ्मयगुणांनी नटविला त्यांत सावरकरांचा वाटा विशेष महत्त्वाचा आहे यात शंका नाही. लोकहितवादी आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यापासून विकास पावत आलेल्या निबंधाचे तेजस्वी दर्शन सावरकरांच्या लेखनात अधिकच सकसपणे घडते. वस्तुतः निबंध हा प्रकार काव्यासारखा आत्मनिष्ठ नाही. पण मराठीतल्या प्रत्येक प्रतिभावंत निबंधकाराने आपल्या व्यक्तित्वाची एक मुद्रा निबंधावर उमटविलेली दिसते. याचा अर्थ केवळ विचारप्रकटीकरणाचे साधन इतक्या मर्यादित दृष्टीने निबंधांकडे या लेखकांनी पाहिले नाही. ज्या भावना आणि विचार त्यांच्या प्रकृतीशी एकरूप झाले होते, जो ध्येयवाद त्यांनी स्वीकारला होता त्याचाच आविष्कार करण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणूनच त्यांनी निबंधाचा सहज स्वीकार केला.

टिळक, परांजपे, केळकर, सावरकर इत्यादिकांच्या निबंधांतून त्यांच्या समग्र व्यक्तित्वाचे दर्शन घडू शकते असे विधान केल्यास त्यात अतिशयोक्ती होणार नाही. आपल्याला काहीतरी तीव्रतेने सांगायचे आहे, समाजाच्या नवरचनेला आकार द्यायचा आहे ही बलिष्ठ जाणीव मनात ठेवून कित्येक लेखकांनी निबंधलेखन केले आहे. निबंधातूनच मुख्यतः त्यांच्या प्रज्ञेचा व प्रतिभेचा आविष्कार झाला आहे.

सावरकरांचा समावेश अशाच लेखकांमध्ये करावा लागतो. सामाजिक आणि राजकीय क्रांती घडवू इच्छिणाऱ्या एका क्रांतिकारक विचारवंताची तेजस्वी प्रतिमा त्यांनी लिहिलेल्या निबंधांतून अधिकांशाने साकार होते.

निबंध हा वाङ्मयप्रकार विचारवंतांच्या वैचारिक अभिव्यक्तीला विशेष सुलभ आणि सहज वाटावा यात आश्चर्य नाही. काव्यनाटकादी ललित वाङ्मयाची तांत्रिक चौकट सांभाळून त्यातून विशिष्ट विचारांचे प्रतिपादन करताना विचारवंतांच्या लेखणीला अनेक मर्यादा पडतात. सावरकरांची ही अवस्था त्यांच्या काव्य, नाटकात आपल्याला जाणवते. पण निबंधांतून मात्र चिंतनशील प्रवृत्ती आणि क्रांतिप्रद विचार-धारा स्वाभाविक आवेगाने उचंबळून आली आहे हे दिसते. त्यांच्या निबंधांनी त्यांच्या विशिष्ट विचारसरणीचे अत्यंत प्रामाणिक, अत्यंत उत्कट, आवेशपूर्ण प्रतिनिधित्व केले यात संशय नाही. रुक्ष विचारांचे प्रतिपादन आणि विश्लेषण करण्यात हा निबंध कधीच रमला नाही. विचारांचे चैतन्यरूप त्यातल्या शब्दाशब्दांतून सळसळताना दिसते. विचार भावनांच्या ठिणग्या उडत आहेत. त्यांची धग कधी कधी असह्य वाटत आहे, पण तरीही ती बुद्धीला मोहिनी घालीत आहे. अशी प्रतीती त्यांचे निबंध वाचताना आल्याशिवाय राहत नाही, सावरकरांचे निबंध आपल्या अभ्यासिकेत बसून शांत आणि स्थिर मनाने त्यांनी लिहिले असे मुळी वाटतच नाही. अभ्यासिकेत बसून सामाजिक आणि राजकीय समस्यांविषयी समतोल मनाने, साधक-बाधक लिहिणारा लेखक वाचकांच्या बुद्धीला केवळ दुरून स्पर्श करतो. त्याचे प्रतिपादन तर्कशुद्ध असेल, त्याची संशोधनबुद्धी परिपक्व असेल, पण तरीही त्याचे लेखन वाचकांच्या काळजाचा ठाव घेण्यास असमर्थच ठरते. केवळ बौद्धिक चर्चा करणारे पांडित्यप्रचुर निबंध लिहून सावरकरांनी पंडिती समाधान कधीच मानले नाही. ती त्यांची प्रकृतीच नव्हती. या प्रकारच्या लेखनाला आवश्यक असणारे स्वास्थ्य त्यांच्या संघर्षपूर्ण आयुष्यात त्यांना कधीच मिळाले नाही. सावरकरांच्या पांडित्याला आणि प्रतिभेला सामाजिक जाणिवेचे बळकट अधिष्ठान आहे. त्यांनी ग्रंथांपेक्षा माणसांवर कितीतरी अधिक प्रेम केले. काही जीवननिष्ठा त्यांनी जन्मभर प्राणपणाने जोपासल्या. आपल्या जीवनापेक्षा त्या निष्ठा अधिक मोलाच्या आहेत म्हणून त्यांचे संगोपन व संवर्धन केले पाहिजे ही जाणीव त्यांच्या रक्तातून जन्मभर वाहत राहिली. आणि तीच त्यांच्या निबंधांतून जाणवत राहिली. जेव्हा निबंधकार आपल्या जीवनात मुरलेल्या एखाद्या ध्येयाबद्दल जिवाभावाने लिहित राहतो, तेव्हा त्याचे लेखन काही आगळ्या जीवशक्तीने सळ-सळत राहते. चिपळूणकर आणि परांजपे यांच्यानंतर सावरकरांनी जे निबंध लेखन केले त्यात हा प्रत्यय अधिकांशाने येतो, मराठी साहित्यात विचारवंत निबंधकार म्हणून सावरकरांचे स्थान आहेच. पण 'क्रांतिकारक' निबंधकार म्हणून त्यांचा उल्लेख करणे अधिक अन्वर्थक ठरेल. क्रांतिरसाच्या जणू चिळकांड्या त्यांच्या निबंधांतून उडताना दिसतात. म्हणूनच हा उल्लेख सर्वस्वी सयुक्तिक ठरतो.

सावरकरांनी एका कवितेत आपला जीवनहेतू स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, ' मी माझे मन, साहित्य, वक्तृत्व किंबहुना सारे जीवन मातृभूमीलाच वाहिले आहे. मातृभूमीचे विमोचन हीच माझ्या जीवनाची प्रधान प्रेरणा आहे, या कार्यात मृत्यू आला तरी तो मी आनंदाने स्वीकारीन. ' दिव्य दाहकाची अविश्रांत पूजा करणाऱ्या या ध्येयवाद्याने राष्ट्रीय स्वातंत्र्याचा परमोत्कट ध्यास घेऊन इंग्रजी सत्तेशी जवळ जवळ एकाकी असा जो लढा दिला तो रोमांचक आहे. राष्ट्रीय अभ्युदयासाठी ज्या विषयांची चर्चा करणे त्यांना आवश्यक वाटले त्याच विषयावर त्यांनी आपले बहुतांश निबंध लिहिले आहेत. आपल्या मतांचा प्रचार करण्यासाठी निबंधाच्या माध्यमाचा त्यांनी कुशलतेने वापर केला. हा वाङ्मयप्रकार आपण आपल्या प्रतिभेने फुलवावा, तो तंत्रदृष्ट्या विकसित करावा आणि निबंधवाङ्मयात उत्तम भर टाकावी. ही वाङ्मयीन जाणीव त्यांच्या ठिकाणी जवळ जवळ आढळत नाही असेच म्हटले पाहिजे. आपण निबंधकार आहोत यापेक्षा स्वातंत्र्याचे उद्गायक आहोत, भाष्यकार आहोत हीच जाणीव त्यांच्या मनात सदैव नांदत होती. पण तरीही प्रथम श्रेणीचे वाङ्मयगुण त्यांच्या निबंधात आढळतात. ध्येयवादाबरोबरच मराठी आणि इंग्रजी भाषांतून उत्तमोत्तम साहित्यकृतींचा त्यांनी व्यासंग केला होता हे त्याचे कारण. सावरकरांचा अभ्यास चौफेर होता. इतिहास, समाज, राज्य आणि काव्य, निबंधादी साहित्य यांचे अध्ययन त्यांनी मनःपूर्वक केले होते.

लो. टिळक आणि विशेषतः काळकर्ते शि. म. परांजपे यांच्या व्यक्तित्वाचा, विचारांचा आणि वाणीचा प्रभाव सावरकरांवर बऱ्याच अंशी पडला होता. ते स्वतःच म्हणतात, ' माझ्या ज्ञानावर, भाषेवर, संस्कृतीवर आणि उत्साहावर ' काळा 'च्या अखंड परिशीलनाचा फारच मोठा परिणाम झाला. परांजप्यांचा मनःपिंड जसा रोमँटिक राष्ट्रवाद्याचा होता तसाच काही अंशी सावरकरांचाही बनत गेला. परांजप्यांच्या निबंधांतील काव्यात्मकता, कल्पनाशीलता सावरकरांच्याही निबंधांत अनेक स्थळी आढळते. पण ते वास्तवाच्या भूमीवर आपले पाऊल ठामपणे रोवून उभे आहेत. याची जाणीव होते.

त्यांच्या कल्पनाशीलतेला तर्कनिष्ठेची, बुद्धिवादाची अंगभूत मर्यादा आहे. स्वच्छंद कल्पनाविलासात रममाण होणे त्यांना शक्यच नव्हते. आपले अंगीकृत कार्य आणि ध्येय स्पष्ट करणारे एक प्रभावी वाहन त्यांना निबंधरूपाने मिळाले. सावरकरांच्या आंतरिक शक्तींचा, त्यांच्या आशा-आकांक्षांचा दीप्तीमान विलास त्यांच्या निबंधांतून झाल्यामुळे त्यांची मतसरणी मान्य नसलेल्या वाचकालाही हे निबंध आणि त्यातून प्रकट होणारे व्यक्तित्व झपाटून टाकते. जोसेफ मॅझिनीच्या आत्मचरित्राला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना अशीच भारून टाकणारी आहे. अस्वस्थ करणारी, वादळाच्या घोंघावण्याचा प्रत्यय देणारी, आव्हान देणारी वक्तृत्वपूर्ण वाणी त्यांच्या निबंधांतून जेव्हा अनेक प्रकारांनी पुढे येते तेव्हा तो निबंध एका समर्थ प्रकृतीच्या रसायनातून

आकार घेऊन आला आहे हेच ठळकपणे जाणवत राहते. सावरकरी निबंधाचे पहिले महत्त्वपूर्ण वैशिष्टय सांगायचे तर तो सावरकरांची जणू प्रतिमाच आहे. या निबंधांच्या अंगप्रत्यंगांत लेखक आपले विशिष्ट रूप घेऊन सामावला आहे याची साक्ष पटते. आपले व्यक्तिमत्त्व अलग ठेवून विचारांचे केवळ वस्तुनिष्ठ विवरण करणारे काही लेखक असतात. सावरकर या कोटीत येऊ शकत नाहीत. हे जसे त्यांचे सामर्थ्य आहे तसेच त्यांच्या लेखनाची ही एक मर्यादाही आहे—असे म्हणता येईल.

सावरकरांच्या निबंधांत त्यांनी प्रमाण मानलेल्या जीवनध्येयांचा निःसंदिग्ध पुरस्कार-प्रचार झाला आहे, प्रचाराने हा निबंध भारावलेला वाटतो. काही स्थळी तो एकांगीही वाटतो. पण हा प्रचार एका अभिजात साहित्यिकाने आणि वादकुशल समाजपंडिताने केला आहे हे ध्यानात येते. तार्किकता आणि अभिनिवेश यांनी गुंफलेल्या या लेखनात नीरसता वा जडता आढळत नाही. भाषेचे वळण पंडिती, प्रौढ असून वाक्यरचना पल्लेदार असते. पण तरीही निबंधातल्या विचारातला रगेलपणा, आक्रमकता आणि उत्कटता यामुळे त्यांचे निबंध वाचकाला जणू खेचूनच नेतात. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्रगाढ प्रेमाने ओथंबलेले त्यांचे मन, निबंध सामाजिक असो, धार्मिक असो किंवा कोणत्याही विषयावरील असो त्यातून हे स्वातंत्र्यप्रेमी मन व्यक्त झाल्याशिवाय राहत नाही. जाती आणि संप्रदायांच्या क्षुद्र चौकटीतच राहिलेल्या हिंदु समाजाच्या आकुंचित मनोवृत्तीवर प्रहार करताना हिंदु पराक्रमाचा आणि स्वातंत्र्याचा विलय झाला याची एक सतत खंत सावरकरांच्या मनात असते. 'जातिभेदाचे इष्टानिष्टत्व ' या निबंधात ते म्हणतात,

" आकाशात उडण्याची साहसी सवय पिढयानुपिढया नष्ट झाल्याने ज्यांचे पंख पंगु झाले आहेत असे हे हिंदु पराक्रमाचे कोंबडे आपल्याच ' जातीच्या' अंगणास जग मानून त्यातच डौलाडौलाने आखत बसले आणि ते केव्हा ! तर आततायी पराक्रमासही पुण्य मानणाऱ्या मुसलमानी गिधाडांनी आणि युरोपियन गुंडांनी सर्व जगाचे आकाश नुसते झाकून टाकले तेव्हा ! अशा स्थितीत त्यांच्या झेपेसरशी ते अंगणातले कोंबडे ठिकठिकाणी फडफडून गतप्राण झाले यात काय आश्चर्य ? "

या लहानशा उताऱ्यातही लेखकाच्या मनातली व्याकुलता स्पष्ट जाणवत राहते. पण केवळ आपले दुःख व्यक्त करणे इतकेच अशा निबंधाचे उद्दिष्ट नसते. खंत उद्वेग, निराशा आणि असमर्थता व्यक्त करण्यासाठी बहुधा सावरकर लिहीत नाहीत. त्यांच्या लेखणीला वैफल्याची काजळी कुठेच चढत नाही. प्राप्त परिस्थितीवर आपण आपल्या सामर्थ्याने निश्चित मात करू शकतो असा आत्मप्रत्यय ठासून निर्माण करण्यासाठी त्यांची लेखणी फुरफुरत असते. पौरुषाचा आणि पराक्रमाचा बुभुःकार हा त्यांच्या निबंधांचा अनेकवेळा मुख्य विषय असतो. स्वतः लेखकाच्या मनातच अस्मिता आणि अहंकार, इतिहासाचा अभिमान, धर्म आणि संस्कृती याविषयीची आत्मीयता उचंबळत असल्यामुळे त्यांच्या निबंधांतून अदम्य आत्मविश्वास आणि

अभिनिवेश व्यक्त व्हावा यात नवल नाही. या अभिनिवेशामुळे सावरकरांचे निबंध धारदार, आक्रमक बनले आहेत. केवळ तार्किक युक्तिवाद करून संथपणे आपले मुद्दे मांडण्यात त्यांना स्वारस्य वाटत नाही. निबंधातला मध्यवर्ती भावविचार हा त्यांच्या सुखःदुखाचा उत्कट विषय झालेला असतो, त्यामुळेच सावरकरांच्या व्यक्तिगत भाव-जीवनावर हा निबंध काही प्रकाश टाकून जातो. निबंधातून सुद्धा सावरकरांनी आत्मलेखन केले असे विधान करता यावे.

लोकहितवादी आणि आगरकर यांच्याप्रमाणेच सावरकरांनी हिंदुसमाजाच्या अधोगतीची तर्ककठोर चिरफाड केली आहे. अशास्त्रीय, भ्रांतिष्ट धर्मकल्पनांची, संकेतांची ते आपल्या तीक्ष्ण शब्दांनी रेवडी उडवतात. देवकल्पनेचीही टर उडवताना त्यांच्या लेखणीला उपहास उपरोधाचे रसायन चोपडलेले असते. लोकहितवादी, आगरकर यांनीही या विषयावर आवेशपूर्ण लेखन केले असले तरी सावरकरांचा झपाटा अधिकच वादळी वाटतो. त्यांचे हल्ले बेगुमान असतात. अशावेळी तथाकथित धर्मनिष्ठ लोकांच्या भावना दुखावल्या जातील याची ते कदर करीत नाहीत. त्यांची लेखणी बिनदिक्कतपणे भ्रमिष्ट संकेतांचे व रूढींचे सपासप शिरकाण करीत वीरश्रीने नाचत असते. ते म्हणतात, ' बुद्धिभेद करू नये, पण दुर्बुद्धिभेद अवश्य करावा. सद्भवना दुखवू नये, पण असद्भावना अवश्य दुखवाव्यात. दुर्बुद्धिभेद बुद्धिवंताने केलाच पाहिजे. रूढीने जेव्हा राष्ट्रचे राष्ट्र रसातळाला जाण्याचा धोका असतो तेव्हा हे केलेच पाहिजे.' ' गाय एक उपयुक्त पशू ' या आपल्या गाजलेल्या, वादग्रस्त झालेल्या पण अत्यंत तर्कशुद्ध असलेल्या मूर्तिभंजक वृत्तीने लिहिलेल्या निबंधात सावरकरांच्या विदारक लेखणीचे अनेक विलास दृष्टीला पडतात. केवळ विचारदृष्ट्याच नव्हे तर साहित्य-दृष्ट्याही हा निबंध विशेष लक्षणीय वाटतो.

सावरकरी वक्तृत्वाचे गुणधर्म यांसारख्या कित्येक निबंधांत ठासून भरले आहेत. त्यांच्या लेखनात नाट्य आणि वक्तृत्व आहे. ओजस्विता व कणखरपणा आहे. आपल्या अर्थपूर्ण, नाट्यमय, रससंपन्न वाणीने एक जन्मजात वक्ता आपल्या समोर उभा राहून आपल्याला संमोहित करीत आहे असेच वाटत राहते. वक्तृत्वाचे गुणविशेष ज्या मराठी निबंधकारांच्या लेखणीतून विशेष जाणवतात त्यांत शिवरामपंत परांजपे, पु. ग. सहस्त्रबुद्धे यांचा उल्लेख अवश्य करावा लागतो. पण सावरकरांचे निबंध म्हणजे अनेक वेळा त्यांच्या घणाघाती ओजपूर्ण, नाट्यमय, पल्लेदार, झपाटून टाकणाऱ्या वक्तृत्वाचा आविष्कार असतो. ' गाय ' या आपल्या निबंधात ते म्हणतात,

" गायीत देव आहे म्हणून पोथ्या सांगतात तर वराहावतारी देव डुक्कर झाले होते असेही पोथ्या सांगतात ! मग गोरक्षणच का करावे ? डुक्कर-रक्षणसंघ स्थापून डुक्करपूजा का प्रचलवू नये ?.........मनुष्याहून सर्व गुणात अत्युच्च असलेल्या प्रतीकासच मनुष्याच्या देवाचे प्रतीक मानणे उचित. गाढवाने पाहिजे तर त्याहून श्रेष्ठ पशू असलेल्या गायीस देव मानावे, पण मनुष्याने तसे मानण्याचा गाढवपणा करू नये.

... .....धेनु जर कोणाची खरोखरच महामाता असेल तर ती बैलांची होय ! हिंदूंची नव्हे !! ज्या हिंदुत्वास गायीच्या पायावर उभे राहवे लागते ते गायीच्या पायासारखेच संकटाच्या पहिल्या झटक्यात मटकन् खाली बसलेच पाहिजे. देवाचे गुण भक्तात उतरतात. गायीला देव मानता, गायीची पूजा करता, हिंदूंचे राष्ट्रचे राष्ट्र गाय होऊन गेले. त्यांनी दाती तृण धरले. आता जर कोणाच्या पायावर आपले हे हिंदुत्व उभारावयाचे असेल तर ते सिंहाच्या पायावर उभारले पाहिजे. मदोन्मत्त दिग्गजांची गंडस्थाने एका झेपेसरशी फोडून टाकणारी तीक्ष्ण नखे ज्याची आहेत तो नृसिंह आता पूजिला पाहिजे. हिंदुत्वाचे ध्येय ते, खूण ती, गायीचा खूर नव्हे. ''

सावरकरांची विज्ञाननिष्ठा, बुद्धिनिष्ठा भेदक आहे. धार्मिक अज्ञानाच्या तमोयुगातून आजच्या पुढारलेल्या विज्ञानयुगात आपल्या राष्ट्राला आणून सोडायचे ही त्यांची ठाम भूमिका आहे. विज्ञानाचे प्रेम हा अखेर त्यांच्या राष्ट्रवादी, हिंदुत्ववादी सामर्थ्यवादी वृत्तीचाच एक अपरिहार्य आविष्कार आहे. हिंदु धर्माची व जीवनपद्धतीची त्यांनी केलेली मीमांसा अनेक ठिकाणी कडवट असली तरी ती वस्तुस्थितीला अनुसरून आहे. धर्मवेड आणि सांप्रदायिक मनोवृत्ती यामुळे हिंदु राष्ट्राची जी शतकानुशतके अधोगती होत गेली त्याची चीड सावरकरांसारख्या कडव्या ' हिंदू ' राष्ट्रभक्ताला येणे अपरिहार्य आहे. ' जात्युच्छेदक निबंध ', ' क्ष-किरणे ', ' विज्ञाननिष्ठ निबंध ' इत्यादी विभागातील लेखन त्यांच्या जीवनदृष्टीवर स्वच्छ प्रकाश पाडू शकते. हिंदुत्ववादी सावरकर सनातनी नसून ते शब्दप्रामाण्यावर प्रहार करणारे विज्ञानवादी विचारवंत आहेत. हे सत्य त्यांच्या निबंधवाङ्मयाने फार स्वच्छपणे प्रकट केले आहे. ' मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव ' या निबंधात ते काहीशा उपरोधाने म्हणतात.

' ही सुगंधी फुले, हे सुस्वर पक्षी, तो मनोहर पिसारा पसरून नाचणारे हे सुंदर मोरांचे थवे, रानचे रान अकस्मात पेटून भडकलेल्या वणव्यात, चुलीत वांगे भाजावे तसे फडफड करतात न करतात तोच भाजून राख करून टाकतो तो कोण ? गाय दिली तो दयाळू, तर त्याच गायीचे दूध पिऊन तिच्याच गोठ्यात बीळ करून राहणारा तो विषारी साप, त्या गायीचे दूध देवाच्या नैवेद्यासाठी काढावयास येणाऱ्या व्रतस्थ साध्वीला कडकडून डसून तिचा जीव घेणारा तो साप, तो ज्याने दिला तो कोण ? प्रत्येक भोगामागे रोग, केसागणिक ठणठणणारे केसतोड, नखानखांचे रोग, दातादातांचे रोग, ते कण्ड, त्या कळा, ती आग, त्या साथी. ती महामारी, ते प्लेग, ती अतिवृष्टी, तो अनावृष्टी, ते उल्कापात, जिच्या मांडीवर विश्वासाने मान ठेवली ती भुईच अकस्मात उलटून मनुष्यांनी गजबजलेले प्रांतचे प्रांत पाताळात जिवंत पुरून गडप करून टाकणारे ते भूमिकंप !! आणि कापसाच्या राशीवर जळती मशाल कोसळावी तसे ह्या पृथ्वीच्या अंगावर कोसळून एखाद्या गवताच्या गंजीसारखी भडभड पेटवून देणारे ते दुष्ट धूमकेतू ते कोणी केले ? '

सावरकरांचा कोटिक्रम निरुत्तर करणारा असतो. केवळ युक्तिवादासाठी मात्र

ते लिहीत नाहीत. वाक्कौशल्याने निबंध सजविण्याची त्यांची पद्धती नाही. तर्कशुद्ध प्रतिपादन करताना वाक्‌चातुर्य आणि चमकदार कोटिक्रम आपोआप प्रकट होतो. कोणत्याही निबंधाचे प्रधान सामर्थ्य त्याच्या मध्यवर्ती विचारातच सामावलेले असते. विचाराच्या भूमीवर खंबीरपणे उभा राहणारा लेखक चिरेबंदी निबंध लिहू शकतो. केवळ भाषाप्रभुत्व, डौलदार शैली आणि गमतीदार कोटिक्रम यांच्या बळावर निबंध ताठ कण्याने उभा राहू शकत नाही. विष्णुशास्त्री चिपळूणकरांची भाषा आणि युक्तिवाद प्रभावी असूनही त्यांच्या विचारांचे सूत्र कित्येक वेळा कच्चे असल्यामुळे तो निबंध 'वाचनीय' होऊनही चिन्तनीय होत नाही. परांजप्यांच्या निबंधात काव्यात्मकता व कल्पनाविलास आहे. भावनेला आवाहनही आहे. पण वाचकांच्या विचारशक्तीला हादरे देण्याचे सामर्थ्य मात्र जाणवत नाही. सावरकर हे कवी आहेत, वक्ते आहेत पण सर्वप्रथम देश, धर्म आणि संस्कृती यांचा विचार करणारे एक व्यासंगी विचारवंत आहेत. त्यांनी मांडलेल्या सिद्धांतांत काही विसंगती अथवा प्रमाद असू शकतील त्या विचारात कोठे कोठे एकदेशीयपणा येऊन तो विचार तर्कदुष्टही झालेला असण्याचा संभव नाकारता येत नाही. पण ही मर्यादा गृहीत धरूनही ते आपल्या निबंधाची मूळ भूमिका विचारदृष्टया पक्की करून घेतात. त्यानंतर त्या विचारांचा आविष्कार करताना उपहास, उपरोध, शब्दसौष्ठव, काव्यात्मकता, कोटिक्रम इत्यादी ठेवणीतली अस्त्रे ते बाहेर काढतात. मंत्राचे सामर्थ्य नाकारताना ते म्हणतात,

'ज्ञानेश्वर निर्जीव भिंत चालवू शकले पण सजीव माणसे आपल्या मंत्रबळे चालवून विंध्याद्रीच्या खिंडीत अल्लाउद्दीनाचा मार्ग रोखण्यासाठी उभी करू शकले नाहीत.'

विज्ञानवादी जीवनदृष्टीची तरफदारी करताना सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा मात्र कोठेही शबलित झालेली नाही. हिंदुत्व हेच त्यांच्या दृष्टीने राष्ट्रीयत्व आहे. वस्तुतः मानवनिष्ठेहून हिंदुत्वनिष्ठा ही खालच्या पातळीवरील मर्यादित निष्ठा आहे याचे भान या बुद्धिवाद्याला निश्चितच आहे. पण हिंदू राष्ट्राच्या उन्नतीवर आणि स्वातंत्र्यावर त्यांचे इतके मनःपूर्वक प्रेम आहे की हिंदु राष्ट्र हा त्यांच्या आत्यंतिक स्फुरणाचा आणि सर्वस्व समर्पणाचा एक विषय आहे. हिंदु संस्कृतीतल्या व परंपरेतल्या विसंगतीवर त्यांनी कठोर आघात केले असले तरी हिंदु पराक्रम, हिंदु तत्त्वज्ञान आणि संस्कृतीतील अभिमानस्थळे यांच्याविषयीच्या आदराने ते अंतर्बाह्य झपाटून गेले आहेत. भारतीय संस्कृती आणि साहित्य या विषयींच्या आत्मीयतेने त्यांच्या वाणीला कसा मोहोर येतो हे पाहण्यासारखे आहे. व्यास वाल्मीकींच्या प्रतिभेचा गौरव करताना त्यांची काव्यवाणी झुळझुळू लागते. ही वाणी वाचकाच्या अंतःकरणाला व त्याच्या सुप्त अहंकाराला काव्यमय जाग आणते. आपल्या प्राचीन संस्कृतीचे व साहित्याचे आणि त्यातील उच्च सौंदर्याचे विलोभनीय दर्शन सावरकर त्याला घडवतात आणि प्रोत्साहित करतात.

"'वाल्मिकीच्या 'सरसा सालंकारा सुपदन्यासा, सुवर्णमय' मूर्तीला ह्या स्वर्ग-मृत्यु-पातालात कोण भुलत नाही ! रामायणाइतके सरस असे ह्या जगात कोणते काव्य आहे ? तरी अप्सरांच्या अधरोष्ठांनी व द्राक्षांच्या लतांनी त्या रामायणातील रस कितीदा तरी चोखून नेलेला आहे ! 'भारत' रचणारा व्यास भरतभूमीशिवाय इतर कोठे जन्माला येणार आहे ? जगावरील सर्व शास्त्रे बुडाली व 'भारत'च काय ते राहिले तरी सर्व शास्त्रांची आठवण होऊ देणार नाही ते 'भारत' या भूमीचे आहे ? तुम्हाला काव्य पाहिजे आहे ? भारताकडे वळा. कवित्व पाहिजे आहे ? भारतसुधामाधुरीकडे वळा. इतिहास, सृष्टिवर्णन, काय पाहिजे आहे ? 'व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्' अशी ज्याच्या कीर्तीची, संघशक्तीची नौबत झडत आहे, त्या व्यासाला जन्म ह्या आर्यभूमीने दिला. रामायण आमचे आहे, महाभारत आमचे आहे, शाकुंतल आमचे आहे. यांपैकी एक आमचे असते, तरी सर्व जगाहून आम्ही श्रेष्ठ ठरलो असतो. आता तर सर्व आमचे आहे, आता भारतभूमी सोडून क्षीरसागराला कोण जातो ? एका क्षीरसागरात राहणाऱ्या त्या लक्ष्मीकांताहून आम्ही भारतभूमीचे रहिवासी भाग्यशाली आहोत, आमच्या कवितेत लक्ष्मी आहे, पण त्याच्या लक्ष्मीत कविता कुठे आहे ?"

भावनेने भिजलेले हे एक गद्यकाव्यच नव्हे काय ? आर्यभूमीतील प्रतिभावंत, तत्त्ववेत्ते, दार्शनिक, पराक्रमी योद्धे या साऱ्यांना वंदन करणारी लेखकाची लेखणी एखाद्या कलावती नर्तकीप्रमाणे आपल्या शब्दरुपी घुंगुरांचा नाद करीत डौलाने चाललेली दिसते. एका बाजूला तर्ककठोर सिद्धांत आक्रमक अभिनिवेशाने मांडणारी लेखणी, दुसऱ्या बाजूला कोमलकांत स्वरुप धारण करते हा चमत्कार मराठी निबंधात सावरकरांशिवाय दुसऱ्या कोणा निबंधकाराने इतक्या कुशलतेने केला आहे काय ?

विचारांच्या सामर्थ्यात आणि सामर्थ्याच्या विचारात सदैव रमलेले सावरकर कधीकधी काव्यरसात रममाण होतात. त्यांच्या वृत्तीतील कठोरता आणि कोमलता, आक्रमकता आणि ओजस्विता अखेर त्यांच्या मनातील राष्ट्रप्रेमाचीच भिन्न भिन्न रूपे घेऊन निबंधात अवतीर्ण होतात. हिंदुत्वनिष्ठा हा भावनेचा विषय आहे तर विज्ञान-निष्ठा बुद्धीशी निगडित आहे. पण या दोन्ही निष्ठा आपले पराकोटीचे रूप प्रकट करतात. त्यामुळेच हे निबंध एकसुरी वाटत नाहीत. आशयात काही वेळा—नव्हे अनेकवेळा पुनरुक्ती झाली तरी अभिव्यक्ती मात्र नवीन असते. निबंधांच्या माध्य-मातून आपल्याला आपली भूमिका स्पष्टपणे मांडून तिचा शक्य तितक्या आग्रहाने प्रचार करायचा आहे याची जाणीव सावरकरांना सतत असल्यामुळे त्यांच्या निबंधात संयम आणि सूचकता यांचा फारसा आढळ होत नाही. जे सांगायचे ते रोखठोकपणे झडझडून सांगायचे, ठाशीव पुनरुक्ती करून सांगायचे. इतिहासातले नेमके दाखले देऊन आपले प्रतिपाद्य, एक घाव दोन तुकडे या पद्धतीने, निश्चितार्थाने मांडायचे हीच प्रवृत्ती त्यांच्या निबंधांत पावलोपावली डोकावते, अर्थात तिचे मूळ लेखकाच्या भूमिकेतच

आहे. वाचकाचे मन वळवण्यासाठी मृदु, मुलायम, आर्जवी पद्धती स्वीकारावी असे या निबंधकाराला फारसे वाटत नाही. अखेर हा प्रश्न प्रकृतीचाच असतो. स्वतःच्या मतावर ठाम विश्वास असल्यावर प्रतिपादनात ठोसपणा येतोच. यातूनच फटकळपणाही आल्याशिवाय राहत नाही. सावरकरांची लेखनशैली ही Positive आहे. एका लढाऊ समाजचिंतकाची शैली अशीच असणार.

ज्ञानेश्वर आणि तुकाराम या दोन संत कवींच्या अभिव्यक्तीत एक लक्षणीय फरक असा आहे की एकाची शैली नागर, सुकुमार मधुर आहे. तर दुसऱ्याच्या शब्दकळेत अनागर कठोरता आणि उग्रता जाणवते. वस्तुतः हे अंतर व्यक्तित्वातले आहे. हे अंतर पडण्याची काही बाह्य कारणेही असू शकतात. पण आंतरिक प्रकृतीचा विशिष्ट गंध शब्दांना येत असतो. सावरकरांच्या निबंधलेखनातली विदारक स्पष्टता, धारदारपणा, जळतेपणा हा त्यांच्या प्रकृतीचाच अपरिहार्य आविष्कार आहे. ज्या विशिष्ट परिस्थितीत आपली सारी सामर्थ्ये पणाला लावून रात्रंदिवस तुकारामांप्रमाणे 'युद्धाचा प्रसंग' अनुभवीत होते. त्या परिस्थितीत सूचकता आणि संयम यापेक्षा स्पष्टोक्ती हीच अधिक उपयुक्त व परिणामकारक आहे असे त्यांना वाटले असावे. घटनांच्या प्रतिक्रिया त्यांच्यावर अधिक तीव्रतेने होत असत. स्वत्व आणि स्वाभिमान यांची जपणूक कसोशीने करणाऱ्या या लेखकाच्या मानबिंदूंना कोणी धक्का लावला तर सावरकरांची लेखणी एखाद्या खवळलेल्या नागिणीप्रमाणे फुंफाटत असते. प्रतिकार आणि आक्रमण या दोन प्रवृत्तींनी त्यांच्या निबंधांत कल्लोळ उडवून दिला आहे. क्षोभ आणि द्वेष या भावना खदखदू लागल्या म्हणजे सावरकरांची शब्दकळा अंगारासारखी फुलू लागते. तिचे उद्दीप्त सौंदर्य वाचकांना एकाच वेळी अस्वस्थही करते. आनंदितही करते.

'मूर्ती दुजी ती' या आपल्या प्रसिद्ध कवितेत त्यांनी साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. कवितेच्या ललित सुंदर मूर्तीपेक्षा तिची चंड, ध्वंसकारी मूर्तीच त्यांना अधिक प्रिय वाटते. हळव्या भावना निर्माण करणारे, बिल्हणीय स्वर देणाऱ्या कवितेपेक्षा रणभेरीचा गंभीर नाद निर्माण करणारी कविता त्यांच्या दृष्टीने अधिक स्वागतार्ह आहे. प्रकृती आणि परिस्थिती यातून सावरकरांच्या निबंधाची जडण-घडण झाली आहे. ज्या काळात 'लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या' असा संदेश त्यांना द्यावासा वाटतो त्या काळातले त्यांचे निबंधलेखन वाचकांच्या रंजनापेक्षा वाचकांच्या वृत्तीवर आणि दृष्टीवर पराक्रमाचे व प्रतिकाराचे ठसे उमटविण्यासाठीच मुख्यतः व्हावे असे त्यांच्यासारख्या क्रांतिकारकाला वाटावे यात आश्चर्य नाही. ते म्हणतात, 'साहित्यासाठीसुद्धा आज साहित्याच्या पोथ्या गुंडाळून सैन्याच्या शिबिराकडे वळले पाहिजे. जे राष्ट्र खुरटे, दुबळे त्यांचे साहित्यिक खुरटे आणि दुबळे असणार.'

सावरकर हे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या निर्मितीसाठी सर्वस्वाचा त्याग करणारे आत्यंतिक ध्येयवादी, दृढनिश्चयी असे पौरुषपूर्ण प्रकृतीचे लेखक आहेत. त्यांच्या निबंधाचे

विषयदेखील या गुणधर्मांशी सुसंगत आहेत. विषयात विविधता असूनही त्यांच्या मुळाशी असलेली सुरावट मात्र वीरत्वाची, ओजस्वितेची आहे. त्यांचे निबंध वाचताना कोंदट मनोवृत्ती खुल्या होतात. त्यांच्यावरील धूळ उडून जाते. एका पेटत्या धगधगीत व्यक्तित्वाच्या सान्निध्यात आपण आलो आहोत आणि एका नव्याच वैचारिक व भावनिक उष्णतेची आच अनुभवीत आहोत याचे समाधान वाटते. लेखकाच्या व्यक्तित्वाचा दृढस्पर्श जेव्हा वाचकाला होतो, तेव्हाच ते लेखन यशस्वी झाले असे म्हणता येते. कारण अखेर वाङ्मयात शब्द हेच व्यक्तित्वाचे प्रतिनिधी असतात. सावरकरांचे साहित्य वाचणे म्हणजे एका स्वातंत्र्यभक्त, हिंदुत्वनिष्ठ जहाल, राष्ट्रवाद्याच्या आशाआकांक्षांशी 'संवाद' करणे आहे. उंच ध्येयवादाच्या पातळीवरील विचारभावनांचा संघर्ष अनुभवणे आहे. सावरकरांची शब्दशैली ही त्यांच्या खास टाकसाळीत तयार झालेली आहे. प्रतिपक्षावर हल्ला करताना त्यांच्या शब्दांचा जोम विलक्षण असतो 'कठीण शब्द या धोंडयांनी करितो हाणाहाण' असे केशवसुतांनी आपल्या कवितेत म्हटले आहे. पण सावरकरी शब्द अधिक घासून आणि तासून टोकदार बनविलेले असतात. स्पष्टोक्तीचे दोष त्यांच्या निबंधांत आहेत. म्हणजे टाकून बोलणे, अतिशयोक्ती करणे वगैरे. पण हे दोषही काही ठिकाणी गुणस्वरूप होतात हे मात्र विसरता येत नाही. कोणताही निबंध सावरकरांनी बुद्धिविलासासाठी; आनंदासाठी लिहिला असे दिसत नाही. अभिनिवेशी प्रचाराच्या उर्मीतून लिहिले गेलेले निबंध स्पष्ट सडेतोड व अस्वस्थ करणारेच असतात. त्यांच्या निबंधांची ठेवण अशी आहे की एकतर वाचकाने त्यांचे प्रतिपादन संपूर्णपणे मान्य करावे अथवा ते संपूर्णपणाने अमान्य करावे. त्यामुळेच त्यांच्या वाङ्मयावर नोंदल्या गेलेल्या प्रतिक्रिया बहुतांशी अशाच स्वरूपाच्या आहेत. कोणी काही म्हटले तरी मराठी निबंधात जयिष्णुतेची, आक्रमकतेची, पौरुषयुक्त बुभुःकाराची लाट सावरकरांच्या लेखणीनेच अतर्क्या जोमदारपणे निर्माण केली. त्यापूर्वी ती चिपळूणकर, टिळक, शि. म. परांजपे या लेखकांच्या लेखनात प्रकट झाली होती. पण तिला जोमदारपणा आला तो सावरकरांमुळे यात संशय नाही. या निबंधशैलीत एक आगळा पीळ आहे. कस आहे.

☐

# ' वाग्वैजयंती ' जुनी झाली काय ?

राम गणेश गडकऱ्यांना केवळ चौतीस वर्षांचे आयुष्य लाभले. प्रतिभावंतांच्या पदरात आयुष्य टाकताना नियती इतका कद्रूपणा का करीत असते ते समजत नाही. जगण्यासारखे ज्यांच्याजवळ कितीतरी असते त्यांनी जीवनाच्या अर्ध्यामुर्ध्या डावातून उठून जावे याला काय म्हणावे ? यामागे कोणते गणित असते ? पण या प्रकारच्या हिशेबाला तसा अर्थ असत नाही. प्रतिभेच्या साक्षात्काराचे, जीवनातल्या दिव्य अनुभवाचे प्रज्ञेच्या स्फुरणाचे, नव्या उमलत्या जाणिवांचे किती विलक्षण क्षण तो कलावंत जगू शकला व त्या क्षणातून कशी नवनिर्मिती करू शकला. रसिकांची मने कशी भावकंपित करण्यास समर्थ ठरला यालाच खरे महत्त्व आहे. गद्यप्राय दीर्घ आयुष्याला कसले महत्त्व असणार ? स्वतः गडकऱ्यांनीच म्हटले आहे,

निष्प्रेम चिरंजीवन ते ।
जगि दगडालाही मिळते । धिक् तया
क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव पडो मरणांचा । मग पुढे

या कवीने प्रेम, सौंदर्य, नैराश्य, वेदना, अगतिकता, तृप्ती, आकांक्षा निर्मितीची अदम्य इच्छा, स्वप्नांचा ध्यास वगैरे भावात्मक अनुभवांचे कित्येक जिवंत आणि उत्कट क्षण अनुभवले व आपल्या काव्यातून ते रसिकांच्या मनोभूमीत पेरले. गडकऱ्यांची कविता एक प्रकारचा उदास, विषण्ण, वेदनामय आनंद गेली कित्येक वर्षे देत आली आहे. या कवीचे पार्थिव जीवन किती वर्षांचे होते हा तपशील आता मागे पडला आहे. गडकऱ्यांच्या प्रतिभेची सतार अल्पकाळ झंकारली खरी, पण तिच्यातून निर्माण झालेल्या सुरावटीने रसिकांच्या मनात नवे सूर निनादत राहिले. आणि मराठी साहित्याला एक आगळी सुंदर देणगी मिळाली यात शंका नाही. पुन्हा त्यांच्याच शब्दात या संगीताचा परिणाम सांगायचा झाला तर असे म्हणता येईल की,

चांदणे चहुंकडे खुलले । फत्तरही सारे फुलले ।
आनंदे विश्वहि झुलले ।
स्फूर्तीच त्यांत तव शिरलि । कन्हैया ! बजाव बजाव मरली
अनुरेणुहि देही स्वैर । भिन्नता विसरलो वैर ।
अब नंदलाल ! कर खैर ।
प्रेमाची दुनिया उरलि । कन्हैया ! बजाव बजाव मुरली

श्रीकृष्णाच्या 'मुरली'चा राधेवर झालेला परिणाम चित्रित करताना त्यांनी हे वर्णन केले आहे. गडकऱ्यांची कविता असाच चमत्कृतीपूर्ण परिणाम करून वाचकांच्या बुद्धीला झुलवते आणि हृदयालाही हलवते. काव्य, नाटक आणि विनोद या तिन्ही दालनात त्यांच्या लेखणीने जो पराक्रम केला त्याला 'विलक्षण' हेच विशेषण द्यावे लागेल. नियतीची गती जशी सांगता येत नाही तशीच नियतीहून लहरी असलेल्या प्रतिभेची गती कसकशी वळणे घेईल ते सांगता येत नाही. पण गडकरी, बाळकराम आणि गोविंदाग्रज ही नावे धारण करणारा एक 'राजहंस' मराठी सारस्वताच्या सरोवरात काही काळ आनंदाने व उन्मादाने विहार करून गेला. त्याच्या क्रीडेचे विलसित आज साठ वर्षांनंतरही रसिकांच्या मनात ताजे टवटवीत राहिले आहे. यातचं या कवीच्या प्रभावी कवित्वाची खूण पटते.

आपल्या कवितेचे वर्णन करताना स्वतः गोविंदाग्रजांनीच जे उद्‌गार काढले आहेत त्यातून त्यांच्या काही प्रकृती वैशिष्ट्यांची साक्ष पटते. आपल्या कवित्वाबद्दल यांच्या मनात केवढा विश्वास आहे असे नव्हे तर कवीसुलभ अहंकारही आहे. हा अहंकार सहज पेलण्याइतकी ही प्रतिभा दमदार आहे. ते म्हणतात,

नवशब्दांचे घुंगूर बांधूनि रसवंती माझी,
नाचत डोलत करि शिणलेली मने पुन्हा ताजी
तिच्या गुणांवर जीव गुंग काही
तरी जादूने जादूगारच काय फसुनी जाई ?

गडकऱ्यांच्या नवशब्दांच्या घुंगुरांचा नाद, कल्पनेचा लखलखाट आणि भावनेचा उत्कट उग्र गंध त्यांच्या काव्य, नाटकांतून सारखा जाणवत राहतो. आजच्या बदललेल्या वाङ्मयाभिरुचीच्या काळात गडकऱ्यांच्या काव्यप्रचुर, नादमय, अलंकारिक शब्दबहुल शैलीवर कृत्रिम असा शिक्का सहज मारण्यात येतो. नवशब्दांच्या नादसंगतीत दंग झालेली गडकऱ्यांची शैली अंशतः 'कृत्रिम' असेलही. पण त्या कृत्रिमतेत अप्रामाणिकतेचा अंशही नाही हे ज्यांच्या लक्षात येत नाही अशा 'चिंतातूर जंतूंना' काय सांगावे ? गडकऱ्यांची प्रतिभा संयमाच्या वाटेने फारशी कधी गेली नाही तिला आकर्षण आहे गहिरेपणाचे. भडक रंगाकडे तिचा अधिक कल आहे. पण हा भडकपणासुद्धा उसना आणलेला नसून तो अंगभूतच आहे. आत्माविष्कारात काहीसा अतिरेक झाला की त्याला आत्मप्रदर्शनाचा रंग येतो, तशी अवस्था गडकऱ्यांच्या भाषाशैलीची काही

प्रमाणात झाली असली तरी, ही शैली एका अभिजात प्रतिभावंताची, कल्पनाप्रभूची व खोल भावनेत रुतलेल्या एका मनस्वी कवीची आहे याची जाणीव सदैव होत राहते. तिच्यातले नाट्य अधिक वेधक आहे पण ही वेधकता नाटकी अवसानापासून पुष्कळ दूरची आहे, म्हणून तर शब्दांच्या आहारी गेलेला 'राजहंस माझा निजला' यासारखी दीर्घ कविता पाषाणालाही पाझर फोडू शकते. गोविंदाग्रजांची सारी बलस्थाने त्यांच्या काव्यनाटकांतून समर्थपणे व्यक्त झाली आहेत. खरे तर त्यांच्या काव्यात जसे नाट्य आहे, तसे त्यांच्या नाट्यकृतीत काव्य आहे. काव्य आणि नाट्य यांचा इतका हृदयस्पर्शी संगम दुसऱ्या एखाद्या कवीत झाला असेल काय याची शंका येते. गडकऱ्यांच्या कवितेचे मूल्यमापन करताना ज्या अडचणी येतात त्यातली प्रमुख अडचण अशी की, काव्यदोष म्हणून ज्यांचा उल्लेख करावा ते दोषही गुणस्वरूप झालेले असतात. दोषांना गुणाचे रूप मिळावे हा गोविंदाग्रजांच्या काव्यातला एक गमतीदार चमत्कार आहे. चमत्कृती, अतिशयोक्ती आणि अद्‌भुताची आवड हे त्यांच्या काव्यातून प्रकट होणारे गुणधर्म अखेर त्यांच्या व्यक्तित्वाचेच विशिष्ट धर्म आहेत. गडकऱ्यांच्या काव्यनाटकातील कोणत्याही ओळी त्या व्यक्तित्वाचीच एक स्पष्ट मुद्रा घेऊन अवतरलेल्या असतात. आपल्या व्यक्तिवैशिष्ट्यांची इतकी ठळक खूण आपल्या वाङ्मयकृतीवर गडकरी ठेवतात याचे कारण त्यांचे साहित्य हे त्यांचे निःश्वासच बनलेले आहे. जीवन आणि वाङ्मय यांची एक मूस बनल्यामुळे गडकऱ्यांच्या नाटकांतून आणि विशेषतः त्यांच्या काव्यातून त्यांच्या जीविततले सारे सुखदुःख, त्यांची सारी विलक्षण उत्कट स्वप्ने, त्यांच्या जिवाला जाळणाऱ्या, एकच पोखरणाऱ्या संवेदना यांचा आलेख उलगडत जातो. स्वतःला अलिप्त ठेवून एखादे नाटक त्यांना लिहिता येणे शक्यच नव्हते. 'एकच प्याला'तला सुधाकर, तळीराम आणि भगीरथ व सिंधूसुद्धा त्यांच्याच प्रकृतीची रूपे आहेत. म्हणून ती माणसे मनस्वी आहेत. आपल्या दुःखाला आमंत्रण देणारी आहेत. आपल्या विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या चौकटीत राहणारी आहेत. कविता हा तर गोविंदाग्रजांच्या हृदयाचा जिताजागता हुंकार आहे. या कवितेतून कवीचे सारे भावरूप सहजपणे पाहता येते. 'वाग्वैजयंती'तल्या अनेक कवितांतून हा कवी आपल्या पराभूत आयुष्याची कहाणी सांगत राहतो. हे सांगताना त्याची भाषा अतिरंजनाची वाटली तरी ती बाहेरून आणलेली उपरी मात्र असत नाही. आपली स्वतःची एक संपन्न पण प्रामाणिक भाषा घेऊन या कविता वाचकांपुढे येतात.

या कवीच्या वाट्याला काटेच अधिक आले असे दिसते. वेदनेच्या गंधाने घमघमलेली त्यांची कविता सुखाची कल्पना करतानासुद्धा कातर होते. काही फुलेही वेचली, पण ती द्यायची कुणाला ? 'फुले वेचिली पण आता देतो टाकुनि खाली' असेच त्याला म्हणावेसे वाटते. 'एखाद्याचे नशीब' या कवितेत त्याने आपल्या पदरी पडलेले विपरीतपण स्पष्ट केले आहे. या कवितेतला नियतीवाद खरा वाटू

लागतो. मानवी जीविताला कसला नियम नाही की कसली संगती नाही. त्याला कोणता हेतू आहे हेसुद्धा कळत नाही. जीवनापासून अमर्याद इच्छा मात्र करीत बसायचे ! निराशेचे जीवघेणे चटके सहन करायचे. गोविंदाग्रजांच्या निर्भरशील, स्वप्नाळू ( Romantic ) दृष्टीने असंख्य स्वप्ने चितारली होती. रोमँटिक मन नेहमीच अमर्याद आशा-आकांक्षांच्या गडद विश्वात झोके घेत राहते. त्याचे पाय वास्तवाच्या जमिनीवर सहसा असत नाहीत. कल्पनेच्या धुंदीत झुलणाऱ्या कविमनाला सत्याची झळ असह्य वाटते. कल्पनेतले ते सुंदर जग कोठे तरी हरवून जाते. पाहता पाहता नाहीसे होते. हरवलेल्या स्वप्नांच्या आठवणींचा सुगंध हळवेपणाने जपून ठेवण्याशिवाय दुसरे काहीच करता येत नाही. हा हळवा गंध गडकऱ्यांच्या कवितांत जाणवतो. भाबडेपणा, हळवी वृत्ती हे कदाचित कोणाला दोष वाटतील. व्यवहारी जगाने या वृत्तीला दोषांच्या सदरातच जागा दिली आहे. पण गडकऱ्यांच्या काव्याचे एक बलस्थान म्हणून या भावातिरेकी वृत्तीचा उल्लेख करावा लागेल. अलीकडच्या मराठी कवितेत हा हळवेपणा फारसा दिसत नाही. पण हा स्वभाव काव्याला चालना देणारा आहे यात शंका नाही. 'फुले वेचिली पण—' या कवितेत गोविंदाग्रज म्हणतात,

> " जीव जाहला जड; ती हाती पुष्पेही जड झाली
> फुले वेचिली पण – पण आता देतो टाकुनि खाली
> चिरंमृताला हवा कशाला हा असला हव्यास ?
> जिवंत फुलवंतीचा असला दुःखप्रद सहवास. "

सौंदर्य, प्रेम आणि स्वप्न, निराशा आणि विकलता यांच्या इतक्या गहिऱ्या छटा आजच्या मराठी काव्यात बहुधा आढळत नाहीत. आजची कविता भावनेच्या दृष्टीने काहीशी कोरडी वाटू लागली आहे. कदाचित आजच्या काळाचा व परिस्थितीचाही हा परिणाम असू शकेल. पन्नास-साठ वर्षांपूर्वीचा कवी एखाद्या भावनेने झपाटलेला असायचा. आज हे झपाटलेपण कमी होत आहे काय ? ते काहीही असो, गडकऱ्यांचा मनःपिंड मात्र सौंदर्यवादी साहित्यावर पोसला गेला होता. आदर्शाची ओढ त्यांच्या रक्तात लहरत होती. टिळक, आगरकरांच्या जीवनातील असीम त्यागांची झळाळी त्यांना दिपवीत होती. स्त्री-पुरुषातल्या प्रेमाच्या दिव्यतेने त्यांना भारून टाकले होते. काही उत्कृष्ट, उदात्त, सुंदर दिसले, काही भव्य आढळले की, वेडावून जाण्याची मनोवृत्ती त्यांच्यात होती. जीवनाकडेच ते या प्रकारच्या दृष्टीने पाहत होते. जीवितातल्या अद्‌भुततेने त्यांना जणू वेढले होते. त्यामुळेच आपल्या नाटकांतूनही दिव्याद्‌भुत व्यक्तित्वाची पात्रे रेखाटण्यात त्यांनी विशेष आनंद मानला. पण या कमालीच्या आत्मनिष्ठ कवीने स्वतःच्या आयुष्याभोवती जे कल्पनासुंदर वलय उत्पन्न केले होते ते वास्तवाच्या स्पर्शाने वितळत चालले होते. त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणजे त्याच्या काव्यात वैफल्याची घनदाट छाया पडू लागली. मनस्वी मनाला जेव्हा

निराशा वेढून बसते तेव्हा ती अधिक तीव्रपणाने आपला विळखा घालते. आयुष्याकडे सावध दृष्टीने पाहणाऱ्या व्यवहारी मनुष्याला निराशेचा दंश सहन करता येतो. कारण तो त्याने गृहीत धरलेला असतो. ती निराशा त्याला उद्ध्वस्त करू शकत नाही. असे व्यवहारचतुर लोक कवीही होऊ शकत नाहीत. गडकऱ्यांसारख्या स्वप्ने पाहणाऱ्या आणि आपल्या स्वप्नांवर आयुष्य ओवाळून टाकणाऱ्या स्वप्नपूजक कलावंताला मनोभंगाची यातना सर्व बाजूंनी कुरतडू लागते. या असह्य वेदनेतूनच त्यांची कविता आकार घेऊ लागते. 'वाग्वैजयंती' तील कित्येक कवितांत शब्द आणि कल्पना यांचे भुरळ पाडणारे सौंदर्य असले तरी, त्यावर कवीच्या हृदयातून उफाळून आलेला वेदनेचा गंध निश्चितपणे मात करतो. गडकऱ्यांची कविता म्हणूनच केवळ शब्दसामर्थ्यावर किंवा कल्पकतेवर जगलेली कविता नव्हे. तिच्या दीर्घ जीवनाचे रहस्य तिच्या ठायी असलेल्या आंतरिक व प्रामाणिक दुःखवेदनांच्या गंधातच शोधता येते.

गडकऱ्यांच्या कवितेची सर्वांगीण चिकित्सा या लेखात करणे शक्य नाही. तसा माझा हेतूही नाही. पण या काव्याच्या काही वैशिष्टयांचा परामर्श मात्र मला घ्यायचा आहे. गडकऱ्यांची 'वाग्वैजयंती' माझ्याच नव्हे तर अनेक रसिकांच्या प्रेमाचा विषय आहे. नाटककार म्हणून गडकरी मोठे आहेतच. पण कवी या नात्याने त्यांचे थोरपण मला अधिक मोहिनी घालते. ते एक श्रेष्ठ भावकवी होते म्हणूनच ते थोर नाटककार झाले, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. काव्यात्मक प्रतिभा असलेला नाटकार आपल्या नाटकांतून काव्यशक्तीचा विलक्षण प्रत्यय देऊ शकतो. खरे तर 'राजसंन्यास' हे एक उत्कृष्ट नाटयकाव्यच नव्हे काय ? गडकऱ्यांच्या ठायी असलेला एक कल्पनाप्रभ आणि शब्दप्रभू कवी 'राजसंन्यासा'तून प्रकट झाला आहे. गडकरी अनेक प्रकारच्या दुःखद अनुभवांतून गेले असले पाहिजेत. असेच त्यांच्या कवितेवरून वाटते. ते निराशावादी आहेत अशी टीका त्यांच्यावर करण्यात काय अर्थ आहे ? जीविताला उद्देशून त्यांनी एक जीवघेणा प्रश्न विचारला आहे.

...आणि, जीविता, लाभ हाच का तुझ्या संगती राहुनिया ?
असेच जाणे असे सदा का कालौघावर वाहुनिया ?

हा प्रश्न पूर्णपणे वैफल्याने झाकळलेला आहे. जीवनाचे पाणी कमालीचे फसवे असते, या पाण्यावर पोहण्याचा प्रयत्न म्हणजे दम कोंडून मरून जाणे. यापेक्षा दुसरा अर्थ नाही. जगण्याचा हेतूच येथे मरणाच्या खोल पाण्यात बुडून जातो. आपल्या हातात मात्र काहीच उरत नाही. जीवनाबद्दलची गडकऱ्यांची ही प्रतिक्रिया अत्यंत कडवट, अत्यंत विदारक अशी असली तरी त्यांच्या बाबतीत ती बहुतांशी खरीच होती. चौतीस वर्षांच्या लहानशा आयुष्यात दुःखवेदनांच्या बऱ्याच ठेचा या कवीने सहन केलेल्या दिसतात. अंथरूण पाहून पाय पसरण्याची व्यावहारिक बुद्धी नसलेल्या आणि स्वप्नातच गुरफटून गेलेल्या कवीच्या जीवनात असे अनुभव आले तर

त्यात आश्चर्य ते कसले ? गडकऱ्यांची कविता दुःखाची आणि प्रमनिराशेची आहे म्हणूनच ती आपल्या हृदयाला दंश करते. ती सुखसाफल्याची असती तर, तिने आपल्या मनाची एवढी जबरदस्त पकड घेतली असती काय याबद्दल शंका वाटते. अंधारातून चालणाऱ्याने प्रकाशाची कविता लिहावी ही अपेक्षा कशी करता येईल.

'अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस' ही कविता त्यांच्या हृदयातल्या गहन निराशेवर आणि विषण्णतेवर असाच प्रकाशझोत टाकून जाते. कवितेला दिलेल्या टीपेत ते म्हणतात, 'मध्यरात्रीच्या सुमाराला कोकिळेचा शब्द विषण्ण व निराश हृदयाला किती सांत्वनपर वाटतो याची सुखनिद्रित मनाला साक्ष पटणार नाही.' दुःखसांत्वनाला वेळ कसली आणि अवेळ कसली ! निष्प्रेमाची शेज सोबतीला आहे, भवतीची सारी दुनिया भयाण वाटत आहे, अशा अवस्थेत गोविंदाग्रजांच्या कवितेने भैरवीचा करुण सूर सारखा आळविला यात आश्चर्य नाही. त्यांच्या पदरात पडलेले दुःखाचे निखारे अपवादात्मक होते काय ? जीविताच्या पाण्यात पाहता पाहता मनुष्य बुडून जातो ही अनुभूती एकट्या गोविंदाग्रजांची नव्हे. असाच अनुभव कमी अधिक प्रमाणात साऱ्यांच्या वाट्याला येत असतो. त्यामुळेच गोविंदाग्रजांची कविता ही एका अपवादात्मक दुःखी मनाची कविता न राहता ती प्रत्येक रसिकाच्या काळजाला आपल्या वेदनेचे वरदान देऊ शकते. कोणाही आत्मनिष्ठ कवीचे साहित्य जसे केवळ त्याचेच असते तसेच त्यातील सुखदुःखांना एक व्यापक, सार्वजनीक अधिष्ठानही असते, आपल्याही मनात अशाच वेदना काहूर मांडीत असतात. आपल्याही आयुष्याला असाच प्रश्न विचारावासा वाटतो की, 'का माझा असा छळ मांडला आहेस ? पाणी समजून मी उरी फुटेपर्यंत धावतो. पण ते मृगजळ आपल्या मायावी वेढ्यात मला सारखे वेढून घेत आहे. हे केव्हा संपणार ?' काही माणसे नकली आशावादाचे चंदनी लेप लावून आपली वेदना झाकण्याचा प्रयत्न करतात. गडकऱ्यांनी मात्र आपल्या आत्म्याचे आक्रंदन मुक्तपणे आडपडदा न ठेवता सांगून टाकले आहे. याच कवितेत कवी म्हणतो–

> हाती संसाराची माती
> मनिच्या आशा मनास खाती
> भूतकाळची भूते रडती
> मिटल्या जाग्या डोळ्यांपुढती, शून्याचे मैदान !

इतकी दाट निराशा आणि आर्तता गडकऱ्यांच्या काळातल्या अन्य काव्यात कोठेच सापडत नाही. त्यांच्या व्यक्तिगत जीवनात त्यांना प्रेमभंगाचे दारुण दुःख भोगावे लागले होते असे म्हणतात. त्यातूनच कधीही न आटणारी एक दुःखधारा या कवितेतून वाहू लागली असा निष्कर्ष काढला गेला. प्रेम निराशेने भरलेली ही कविता वाचताना हे निष्कर्ष चुकीचे नाहीत अशी धारणा होते. कविमनाचे कोडे कित्येक वेळा तार्किक बुद्धीने उलगडता येत नाही. आपल्या वैयक्तिक आयुष्यात गडकऱ्यांना प्रेम-

निराशेचा आघात सहन करावा लागला होता की नाही याला फारसे आधार नाहीत. प्रेमभंगाच्या दुःखानें न्हालेली कविता कल्पनेच्या साहाय्याने लिहिणे अशक्य नाही. साहित्यात कित्येक वेळा भडक सुखोपभोगाची चित्रे एखादा लेखक आपल्या कल्पना-रम्य दृष्टीने रेखाटीत असतो. प्रत्यक्ष जीवनात मात्र असले उपभोग त्याच्याकडे ढुंकूनही पाहत नाहीत. म्हणूनच काव्यातून व्यक्त होणाऱ्या साऱ्याच भावानुभवांचा साक्षात संबंध कवीच्या वैयक्तिक आयुष्याशी जोडणे तर्कशुद्ध नसते. पण गडकऱ्यांच्या कवितेने प्रेमनिराशेचे इतके कढत अश्रू ढाळले आहेत, की त्यांचा संबंध त्यांच्या खाजगी जीवनाशी जोडण्याचा कोणालाही मोह होईल. प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, एकच प्याला इत्यादी नाटकांतून प्रेमवंचनेच्या दुःखाचे सूर त्यांनी पुनः पुन्हा काहीशा प्रक्षुब्ध मनाने व अतीव निराशेने आळवले आहेत. याचे कारण काय असावे ? तांबे यांच्या कवितेत प्रीतिसाफल्याची धुंदी आहे, 'मद्याचा मी प्यालो प्याला, प्रिये तयाचा मद तुज आला,' 'गुलाब माझ्या हृदयी फुलला रंग तुझ्या गालावर खुलला.' असली तृप्तीची गहिरी छटा झळकताना दिसते. वैफल्याचा आणि वंचनेचा स्पर्शही त्यांच्या काव्याला कोठे झालेला नाही. पण गडकऱ्यांची कविता मात्र आपल्या निराश प्रेमाच्या घरट्यात आपले होरपळलेले पंख कुरवाळीत बसली आहे. दुःखातून निर्माण झालेली व दुःखाच्या पूजनातच रमलेली एका दुःखी मनाची ही कविता प्रेमवैफल्याचाच स्वर घोळवीत राहिली आहे. म्हणूनच या कवीच्या व्यक्तिगत जीवनाला प्रेमनैराश्याचे चटके बसले असावेत असाच तर्क करावा लागतो. आत्मनिष्ठ कवितेचा हा एक लक्ष-णीय विशेष असतो की, ती आत्मप्रेमाच्या भूमीतूनच उदयाला येते. आत्मानुभूतीच्या वलयात फिरत राहते.

प्रेमाची दुर्दम्य ओढ लागलेल्या या कवीला प्रेमाचा मात्र लाभ फारसा होत नाही. प्रीतीच्या एका क्षणासाठी मरणाचा वर्षाव झाला तरी तो स्वीकारायला आपण सिद्ध आहोत. असे मानणाऱ्या एका प्रेमपिसासू वृक्षाचे प्रतीक 'प्रेम आणि मरण' या कवितेतून गडकरी रेखाटतात. प्रेमाचा संबंध जीवनापेक्षाही मरणाशीच त्यांनी जोडला याचे कारण काय असावे ? आत्यंतिक संवेदनशीलता आणि निराशा यांचा प्रभाव अशा कवितांवर पडलेला जाणवतो. प्रीतीची पूजा मनोमन करीत राहिलेल्या या कवीला असह्य अनुभव आले असले पाहिजेत. तो म्हणतो—

केल्या ज्याच्या पायघड्या मी तुझ्या पावलांसाठी
त्या हृदयाला तुडवुनि गेलिस नटव्या थाटासाठी

स्त्रीप्रेमासंबंधी एखादी आदर्श कल्पना त्याने आपल्या मनात फुलवून ठेवली असावी. कारण स्त्रीप्रेमाची महती या कवीने आपल्या नाटकांतून अनेक ठिकाणी मनःपूर्वक गायिली आहे. स्त्रीसौंदर्यात आणि स्त्रीप्रेमात कसली तरी दिव्यता सामावली आहे असेच गडकऱ्यांना वाटत होते. 'पुण्यप्रभावा'तील वसुंधरा आणि 'एकच

प्याल्या 'तील सिंधू ही स्त्रीचित्रे त्यांनी काहीशा अलौकिकत्वाच्या रसायनात बुचकळून काढली आहेत. एखादा सर्वसाधारण प्रेमिक आपल्या प्रेयसीची जी प्रतिमा मनात रंगवतो, तशी गडकऱ्यांच्या मनीमानसी रुजलेली प्रतिमा मुळीच नव्हती. अनेक दुर्मिळ गुणांचा तिच्यावर त्यांनी वर्षाव केला होता. ती हाडामांसाची असून सुद्धा तिच्यात काहीतरी अपार्थिव सौंदर्य सामावलेले आहे अशीच जाणीव त्यांना झाली असावी. कदाचित विभूतिपूजक दृष्टीतून आपल्या प्रेयसीची दिव्य प्रतिभा त्यांनी चितारून ठेवली होती. पण वस्तुस्थितीचा स्पर्श झाल्याबरोबर या मूर्तीला तडे पडले असावेत. असले दुःख स्वच्छंदवादी मनोवृत्तीचा एक अविभाज्य घटक असतो, म्हणूनच त्यांच्या कवितेतील नैराश्याला पराकोटीच्या विषण्णतेचा स्पर्श झालेला आहे. स्त्रीच्या प्रेमाचा आणि पवित्रतेचा गौरव करताना ते ' पुण्यप्रभाव ' नाटकात म्हणतात–

' विश्वातल्या प्रेमाच्या, मांगल्याच्या, कोमलतेच्या, सौंदर्याच्या आणि पावित्र्याच्या सारभूत सर्वस्वाची स्त्रीही एकरूप विजयपताका आहे... स्त्रीच्या एका दृष्टिपाताबरोबर वैराण वाळवंटावर रमणीय उद्यानाची वसती झाली आहे. स्त्रीनं तेजाला कोमलतेची जोड दिली आहे आणि स्त्रीनंच सत्यावर सौंदर्याचा साज चढवला आहे. स्त्रीहृदयात उचंबळणाऱ्या प्रीतीच्या पुराबरोबरच महाकवींच्या प्रतिभेचे प्रवाह वाहिले आहेत. '

स्त्रीचे व्यक्तित्व आणि तिचे प्रेम याबद्दल गडकऱ्यांनी आपल्या मनात कोणत्या आदर्श कल्पना जोपासल्या होत्या आणि स्त्रीचे उद्गान करताना त्यांच्या वाणीला भरतीची लाट कशी भेटत होती याची आणखीही काही उदाहरणे गडकरी साहित्यातून देता येतील. प्रेमविषयासंबंधीची ही अमर्याद आदर्श कल्पना प्रत्यक्ष वास्तवात कशी साकार होणार ? कदाचित त्यांना भेटलेली प्रेयसी या कल्पनांशी विसंगत वृत्तीची असेल आणि त्यांनीच म्हटल्याप्रमाणे नटव्या थाटासाठी त्यांच्या हृदयाला तुडवून गेली असेल यात दोष कुणाचा हे सांगता येत नाही. सुसंस्कृत मनाचा उत्कट प्रेमरसिक प्रेमाच्या संदर्भात व्यावहारिक पातळीवर तडजोड करू शकत नाही हा त्याचाही दोष नव्हे आणि व्यावहारिक जाणिवेला महत्त्व देणारी एखादी सामान्य स्त्री प्रेम बाजूला सारून व्यवहारी जीवनाला मिठी मारते हा तिचाही दोष नव्हे. हा दोष असलाच तर परस्पर विसंगत वृत्तीच्या स्त्री-पुरुषांना एकत्र आणणाऱ्या नियतीचा म्हणावा लागेल. इतके मात्र खरे की, प्रेमवैफल्यातून आलेली विलक्षण गडद निराशा या काव्याला वेढून बसली आहे. दुःखार्त मनाच्या स्पंदनाला जेव्हा शब्द भेटतात तेव्हा ते शब्द संवेदनाक्षम वाचकाला जखम करून जातात. गडकऱ्यांची कविता वाचताना प्रसन्नतेपेक्षा व्याकुळताच अधिक जाणवते. याचे कारण या कवितेतल्या वेदनेला प्रांजल, प्रामाणिक अनुभवाची बैठक आहे हेच खरे ! या नैराश्यामुळे त्यांची जीवनदृष्टीही काळवंडली आहे. प्रेमनिराशेचे दुःख पिंजण्यातच दुबळे समाधान

मानणारी ही कविता मराठीत तरी अनन्यसाधारण मानावी लागेल. कारण या भावनेच्या वर्तुळातून हा कवी कधीच बाहेर पडला नाही. एकाच वेदनेच्या भोवती प्रदक्षिणा घालण्यामुळे गोविंदाग्रजांच्या काव्याला व्यापक भावानुभवांची जोड मिळाली नाही. कारण ते एकसुरी झाले आहे.

ही मर्यादा मान्य करूनही प्रेमासारख्या चिरचर्चित विषयावर नवी हृदयस्पर्शी कविता सातत्याने लिहिण्याचा विक्रम केवळ गडकऱ्यांची प्रतिभाच करू शकली असे म्हणण्यात अतिशयोक्ती नाही. ' प्रेम आणि मरण ' या त्यांच्या कवितेवर अतिकल्पकतेचा, शब्दबाजीचा व कृत्रिमतेचा आरोप करण्यात येतो, पण प्रेमाची मरणाशी सांगड घालण्याची वृत्ती ही या कवीच्या अनुभवांशी सुसंगत होती हे लक्षात घेतले पाहिज. विद्युल्लतेच्या ज्वलंत स्पर्शाचा ध्यास घेतलेला वृक्ष काव्याला खुलविण्यासाठी कवीने निर्माण केला नसून तो वृक्ष स्वतः गडकरीच आहेत असे म्हणता येईल काय? काहीही असो, आपल्या उद्ध्वस्त प्रेमभावाची अश्रूंनी भिजलेली कहाणी गोविंदाग्रजांनी वाग्वैजयंतीत गुंफली आहे. या काव्यात भिन्न विषयांच्या आणखी कित्येक कविता आहेत. विनोद, उपरोध असलेली, सामाजिक विचार व्यक्त करणारी, गूढगुंजनाच्या धूसर प्रांतात पाऊल टाकणारी अशी बरीच कविता या कवीने लिहिली. पण गोविंदाग्रजांच्या निराश, करुण प्रेमकवितेला जो आर्त गंध येतो, त्यामुळे रसिकांना एक वेगळाच व्याकुळ आनंद मिळत राहतो. हे आनंदी दुःख आमच्या रसिकतेला समृद्ध करीत असते. प्रीती नावाच्या जीवनमूल्यावर आमरण निष्ठा ठेवणाऱ्या एका मनस्वी प्रतिभावंताच्या व्यक्तिमत्त्वाशी ' संवाद ' करण्याची संधी ही कविता आपल्याला मिळवून देते.

गोविंदाग्रजांची ' वाग्वैजयंती ' आता जुनी झाली काय? एखादा कवी व त्याची कविता आपल्याला केव्हा जुनाट वाटेल? काळाच्या ओघात कित्येक काव्ये वाहून जातात. काही विषय जुने होऊन जातात. मनाला जाऊन भिडण्याची त्यांची ताकद संपुष्टात येते. प्रेमविषयाकडे पाहण्याची गडकऱ्यांची आदर्शपूजक, रोमँटिक वृत्ती कदाचित काही अरसिकांना जुनी झाली असे वाटण्याचा संभव आहे. पण एका कवीच्या पराकाष्ठेच्या अस्सल प्रेमानुभवातून उचंबळलेल्या या भावधारा आपले आवाहनाचे सामर्थ्य हरवून बसतील असे मला वाटत नाही...मुळीच वाटत नाही. मराठी कवितेच्या तोंडवळ्यात गेल्या साठ वर्षांत फार बदल झाला हे मान्य करूनही प्रेमाश्रूंनी भिजलेली ही ' वाग्वैजयंती ' आजच काय, पुढेही सदैव रसिकांना आगळा आनंद देत राहील. वाङ्मयात आणि अभिरुचीत काही बदल घडत असतात. पण ज्या वाङ्मयात अस्सल अनुभवांना स्थान मिळाले आहे ते काळावरही मात करू शकते. गोविंदाग्रजांचे जीवन कालौघावर वाहून गेले त्या घटनेला आता पासष्ट वर्षे उलटून गेली. आज जेव्हा जेव्हा वाग्वैजयंतीची पाने मी चाळतो तेव्हा एका भग्न, विकल अंतःकरणाशी माझा ' संवाद ' होतो. असले उत्कट, रोमँटिक प्रेम ज्यांच्या वाट्याला

कधी आले नाही त्यांनाही त्या 'दिव्य प्रेमाची जाती' मनोमन उपभोगता येते. सौंदर्यवादी अतिरंजित मनोवृत्तीचे अनेक विशेष या काव्यात सामावलेले आहेत. गडकऱ्यांनी स्वतःबद्दल म्हटले आहे,

'अज्ञाता! मरणोत्तर प्रकट ते होईल तूं ते कसे ? कोठे आणि कधीतरी जगति मी होऊनि गेलो असे.' असे निराश उद्गार ते काढतात. पण 'वाग्वैजयंती' चे स्थान रसिकमनात निश्चित झाले आहे ते कसे ढळेल ?

□

# गडकऱ्यांची विलोभनीय नाटय-शैली

गडकऱ्यांच्या नाटयकृतींसंबंधी आजपर्यंत इतकी साधक बाधक चर्चा होऊन गेली आहे की, आता त्यांच्या नाटयसाहित्याबद्दल कोणी काही वेगळे सांगू शकेल असे वाटत नाही. काव्यात्मक प्रतिभेचे देणे लाभलेल्या या नाटककाराला प्रचंड लोकप्रियता मिळाली. मराठी रसिकतेने जेवढे उदंड प्रेम गडकऱ्यांवर केले, तेवढे त्यांच्यापेक्षाही अधिक समर्थ असलेल्या नाटककारांच्या वाटयाला येऊ शकले नाही. पण हा काही केवळ योगायोग नव्हे. रसिकांच्या मनावर आपल्या वाङ्मयीन कर्तृत्वाची दृढ मुद्रा उमटविणाऱ्या लेखकाजवळ अनेक मोहनास्त्रे असतात. लोकप्रियता कितीही लहरी आणि चंचल असली तरी, तिने गडकऱ्यांशी मात्र आश्चर्यकारक इमान राखले आहे. लोकमनाला मोहिनी घालण्याची कोणती विलक्षण शक्ती त्यांच्याजवळ होती याचा शोध करताना असे जाणवते की, कित्येक पंडित टीकाकारांनी गडकरी वाङ्मया-तून नानाप्रकारचे दोष काढून दाखवले आहेत. कोणाला त्यांची कथानके अस्वाभाविक, अतिशयोक्तीपूर्ण वाटतात. कोणी त्यांचे व्यक्तिरेखाटन अपक्व, उथळ व अतिरेकी आहे असे म्हणतो. कित्येकांनी गडकऱ्यांच्या भाषेवर कृत्रिमतेचा व शब्दबाजीचा स्पष्ट शिक्का मारून ही भाषा अवास्तव काव्याने आणि अलंकारांनी जडावलेली आहे असे विधान केले आहे. ही सारी मते एकत्रित केली तर जो निष्कर्ष निघतो तो असा की, गडकऱ्यांची नाटयकथानके अतिरंजित आहेत. त्यांची भाषाशैली भडक आणि कृत्रिम असून व्यक्तींच्या मनाचा त्यांना ठाव घेताच आला नाही. त्यामुळे त्यांची नाटके खऱ्या अर्थाने नाटयात्मक परिणाम करू शकत नाहीत. जीवनाचे वस्तुनिष्ठ दर्शन घडवणे त्यांना शक्य झाले नाही. टीकाकारांची ही टीका त्यांच्या पुस्तकांतच राहून गेली. रसिकाने मात्र या पांडित्यप्रचुर टीकेला धूप न घालता गडकऱ्यांच्या नाटकांवर उदंड प्रेमाचा वर्षाव केला. रसिकांच्या गळ्यातला कंठमणी होऊन बसलेला हा नाटक-कार मूठभर टीकाकारांना समजला नाही म्हणून काही बिघडत नाही. समीक्षकांची

मते पाहता पाहता विरून गेली. मराठी रंगभूमी गडकऱ्यांनी आपल्या प्रतिभेच्या झगझगाटाने उजळून टाकली हे निर्विवाद. त्यांच्या नाटकांची जी सामर्थ्यस्थाने आहेत त्यात अभिजात कल्पकतेने आणि सुंदरतेने रोमरोमांतून फुललेली त्यांची ताजी टवटवीत भाषाशैली हे एक महत्त्वाचे मर्मस्थान आहे यात शंका नाही. कोणी काही म्हटले तरी, गडकऱ्यांनी आपल्या अपूर्व शब्द-सामर्थ्याने मराठी रंगभूमीला आणि साहित्याला एक आगळेच चैतन्य दिले.

खरे तर गडकरी-खाडिलकरांच्या काळापेक्षा आजची मराठी रंगभूमी अनेक अंगांनी प्रगत झाली आहे हे नाकारण्यात अर्थ नाही. साठ-सत्तर वर्षांपूर्वीचे नाटक आता 'जुने' वाटते हे खरे. आजच्या नाटकाचे बहिरंग व अंतरंगही काही अंशी बदलले आहे.

प्रेक्षकांची अभिरुचीही आता नवे रंग धारण करीत आहे. पण तरीही आजच्या वाचकांना व प्रेक्षकांना गडकऱ्यांचे नाटक सहज आकृष्ट करून घेते. त्यांच्या नाट्यसंवादांशी रसिकांचा सहजसंवाद होऊ लागतो. ताज्या फुलाचा गंध यावा, कुठून तरी मोहक व मादक सुरावट कानावर यावी, नर्तकीच्या पायातली पैंजणे सहज झंकारावीत असाच जणू भास त्यांचे शब्द कानी आले की होऊ लागतो. साठ वर्षांनंतरही गडकऱ्यांची भाषा आपली अंगभूत जादूगिरी टिकवून आहे आणि आपल्या विलासविभ्रमांनी ती रसिकांना घायाळ करू शकते, हा एक चमत्कार आहे. खरे सांगायचे तर, चमत्कृतिपूर्ण वैशिष्ट्यांनी नटलेली त्यांची भाषा हाच एक चमत्कार आहे. कानामनाला चकित करणारी त्यांची शब्दशैली विसरणे अशक्य आहे. केवळ भाषेच्या बळावर एखादा कवी किंवा नाटककार वर्षानुवर्षे रसिकांना झुलवू शकत नाही. भाषेचे लावण्य म्हणजे केवळ शब्दांचे रंगढंग नव्हे. जी भाषा जीवनाच्या स्वरूपावर आपल्या अंगभूत सामर्थ्याने नवा प्रकाश टाकू शकते तीच खऱ्या अर्थाने सुंदर असते. एखाद्या स्त्रीची सुंदरता ज्याप्रमाणे तिच्या निरामय शरीरसौष्ठवावर अवलंबून असते, त्याप्रमाणेच कोणत्याही लेखकाच्या भाषेला अर्थाचे, नावीन्यपूर्ण कल्पनेचे आणि जीवनदर्शनाचे निकोप अधिष्ठान असावे लागते. उत्तम भाषाशैली म्हणजे शब्दांचा केवळ खेळ असत नाही. गडकऱ्यांसारख्या भाषाप्रभूंची शब्दशैली ही अखेर त्यांच्या जीवनचिंतनाशी निगडित असते. म्हणूनच ती कोणाही रसिकाला भारून टाकते. त्यांच्या भाषेचा गंध टीकाकारांना वाटतो तसा कृत्रिम नसून तो अंगभूत आहे. या गंधाचे मूळ अर्थातच लेखकाच्या प्रतिभेत आहे. ही भाषा आपल्याभोवती सदैव लाडिक पिंगा घालते. तिचा स्पर्श धुंद करून जातो. गडकऱ्यांच्या कीर्तीला त्यांच्या अद्भुत भाषा-संपत्तीने अधिकच सामर्थ्य दिले. त्यांनी स्वतःच म्हटले आहे.

'नव-शब्दांचे घुंगूर बांधून रसवंती माझी, हासत खेळत करि शिणलेली मने पुन्हा ताजी;' आपल्या ठायी असलेल्या गंधाची स्पष्ट जाणीव या 'कस्तुरी-मृगाला' होती असे दिसते. गडकऱ्यांच्या कवितेत तर काव्य आहेच, पण त्यांच्या नाटकातून

' वाग्वैजयंती 'पेक्षाही अधिक चमकदार, रसमय काव्य प्रकट झाले आहे. काव्य आणि नाट्य यांचा नाट्यपूर्ण संगम त्यांच्या नाट्यकृतीतून झाल्यामुळे ही नाटके हृदयाला अधिक भिडतात. कविप्रवृत्तीचा लेखक गद्यालाही काव्याचे रंग सहज देऊ शकतो. व्यक्तिरेखा, कथावस्तू, रसादिष्कार हे महत्त्वाचे घटक गडकऱ्यांच्या नादमय, काव्यमय शब्दकलेमुळे अधिकच उठावदार बनतात. या भाषेच्या वैशिष्टयांचे अनुकरण करण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. पण त्यांचे शब्द नवे रूप धारण करू शकले नाहीत. काही झाले तरी अनुकरणात स्वाभाविकता येणे अशक्यच. जे रसायन गडकऱ्यांसारख्या रससिद्ध प्रतिभावंताला जमले ते केवळ शब्दांची मिरवणूक काढणाऱ्या शब्दपंडितांना कसे साधता येणार ?

...प्रतिभेची व्याख्या करताना, ' नवनवीन उन्मेष धारण करणारी प्रज्ञा ' आणि 'अपूर्व वस्तुनिर्मितीची क्षमता असलेली बुद्धी' ही तिची प्रमुख लक्षणे सांगण्यात येतात. गडकऱ्यांच्या शब्दशक्तीला अपूर्वाची निर्मिती करण्याची हौस आहे. त्यांच्या भाषेत कवीच्या कल्पकतेचे आणि प्रतिभेचे नवोन्मेश आढळतात. भाषासौंदर्याचे मूळ यातच शोधावे लागते. चमत्कृतिपूर्ण कल्पनांची अनिवार ओढ गडकऱ्यांना मुळातच आहे. कल्पना जितकी वेगळी, चमत्कृतीने भरलेली, विरोधात्मक, तितकी ती त्यांना ओढून घेत असे. आपल्या शब्दरचनेने आणि त्यापेक्षाही कल्पकतेने आपले वाचक स्तिमित झाले पाहिजेत अशीच जणू त्यांची आकांक्षा असावी. माझ्या शब्दसामर्थ्याने मला वाचकांची नजरबंदी करायची आहे, त्यांची विचारशक्ती भारून टाकायची आहे असा जणू त्यांना ध्यास लागला होता.

खरे तर भाषा हे विचार आणि भावनांच्या अभिव्यक्तीचे एक साधन; पण गडकऱ्यांनी ते साध्य मानले असावे. चार-पाच तास आपल्या नाटकांत प्रेक्षकांना गुंतवून टाकायचे असेल तर, आपल्या भात्यातला अपूर्व भाषेचा रामबाण आपण सदैव सज्ज ठेवला पाहिजे हीच त्यांची भूमिका दिसते. दुसरे असे की, शब्द आणि कल्पना यांच्या विविध सौंदर्याभोवती रुंजी घालणारे एक ओढाळ पण रोमँटिक मन त्यांना लाभले होते. मराठीतल्या कोणत्याही नाटककारापेक्षा शब्दसामर्थ्याची जाणीव गडकऱ्यांनीच अधिक ठेवली. काही ठिकाणी ती अतिरेकीही झाली. त्यामुळेच नाटकाच्या इतर अंगांकडे त्यांचे काहीसे दुर्लक्ष झाले; पण आपली शब्दप्रभा कोठेही उणी पडू नये, तिचा प्रभाव ओसरू नये यासाठी त्यांनी कमालीची दक्षता घेतली. नाटकाची भाषा नाटकी असू नये हे मत मान्य करताना ती भाषा गद्यप्रायतेची पुढे चढलेली रंगहीन असू नये हे रंगभूमीच्या इतिहासात गडकऱ्यांनीच प्रथम सिद्ध केले असावे. ' नाटक म्हणजे जीवनाचे चित्र ' याचा अर्थ रुक्ष व्यवहाराची बोलभाषा नाटकात असावी असा अर्थ करता येईल काय ? रोजच्या धकाधकीच्या व्यवहारात वावरणाऱ्या सामान्य माणसाच्या अंतर्मनात रसरंगांवर प्रेम करणारा एक रसिक लपलेला असतो. त्याला गडकऱ्यांच्या लालित्यपूर्ण शब्दांनी प्रभावित केले तर त्यात आश्चर्य कसले ? नाटक ही एक प्रदर्वि-

लेली, जाणीवपूर्वक आकार दिलेली कलाकृती असते. तिची भाषा कल्पना आणि भावना यांच्या मिश्रणातून जेव्हा तजेलदार बनते तेव्हाच ती प्रत्यय देऊ शकते. गडकऱ्यांच्या नाट्यगत भाषेचा विचार नाट्यात्मक परिणामांच्या संदर्भातच केला पाहिजे. तिचा स्वतंत्र किंवा सुटा विचार करून तिच्यावर टीका करणे म्हणजे 'अरसिकाला कवित्व निवेदन' करण्यासारखे आहे. गद्यवृत्तीच्या टीकाकारांनी तर गडकऱ्यांच्या अलंकार-प्रचुर काव्यमय भाषेवर जे आक्षेप घेतले आहेत त्यातून त्यांची सुटका करणे कठीण आहे! गडकऱ्यांच्या भाषेची झळाळी डोळे दिपवणारी असली तरी ती अकारण भडक, अतिरंजित आहे हा आक्षेप मात्र चुकीचा वाटतो. आपल्यापाशी असलेल्या श्रीमंतीचे काही अंशी ते प्रदर्शन करतात असे विधान करता आले तरी, हे प्रदर्शन नाट्यदृष्ट्या अपेक्षित परिणाम करते. इतर कवी–नाटककारांची शब्दकळा गडकऱ्यांच्या तुलनेत साधी, अनलंकृत आहे. तथापि ती रंगहीन आहे असे मात्र नाही. गडकऱ्यांची भाषा तशीच साधी, सरळ असावी हा आग्रह सयुक्तिक वाटत नाही. अनेक सुंदर स्त्रियांच्या मेळाव्यात एखाद्या ललनेचे लावण्य वैशिष्ट्यपूर्ण असते. तिचा वर्ण, प्रमाणबद्ध घाट-दार अवयव, नजरेतली जादू, गालावरची मोहक खळी, हसताना शुभ्र दंतकळ्यांचे अस्फुट दर्शन आणि स्वरातले लाघट माधुर्य ही सारी सामुग्री तिला निसर्गाने बहाल केलेली असते. तिनेही त्यात भर टाकलेली असते. असे सौंदर्य बहुसंख्य स्त्रियांत आढळत नाही म्हणून त्या प्रमदेच्या प्रमत्त सौंदर्याला अतिरेकी, भडक ही विशेषणे देता येतील काय? कर्ण जसा कवचकुंडले घेऊनच जन्माला आला त्याचप्रमाणे नाद-मय, रसवंती घेऊनच गडकऱ्यांनी जगाच्या रंगभूमीवर पाऊल टाकले असे म्हणावे लागते. त्यांच्या लेखणीतून अवतरणारी अक्षरे नाचत नाचतच समोर येतात. या अक्षरांच्या अंगप्रत्यंगात जणू संगीत आणि नृत्य भरलेले असते. ही भाषा मुद्दाम बैठक मारून प्रयासपूर्वक जुळवलेली नसते. ज्यांना शब्द जुळवतानाही श्वास लागतो, त्यांना असली भाषा मुद्दाम सजवल्यासारखी वाटते. संपन्न भाषेचासुद्धा मनाला सोस असावा लागतो. चार-चौघांप्रमाणे आपला आशय सांकेतिक पद्धतीने व्यक्त करण्याची कल्पना मनस्वी प्रकृतीच्या कवीला कधीच रुचणार नाही. शिळ्या झालेल्या शब्दांना तो नव्या कल्पनेचा स्पर्श करून ते शब्द सचेतन करतो. एखाद्या कलावंताची बोटे सतारीच्या तारांवरून सहज फिरली तरी त्या सजीव होऊन झंकार करू लागतात. काव्यात्म मनोवृत्ती साहित्याच्या क्षेत्रात हा चमत्कार कसा घडवू शकते याचे गडकरी हे प्रतीकच म्हटले पाहिजे. समृद्ध भाषेवर रुष्ट होणाऱ्या टीकाकारांना काय म्हणावे? यांना शिवरामपंत परांजप्यांची कल्पनारम्य व्यंगपूर्ण भाषा आवडत नाही. सावर-करांची उदग्र, ओजस्वी, पल्लेदार भाषाही कृत्रिम वाटते. बोरकरांच्या नादमय कवितेकडेही हे पाठ फिरवतात. सुंदर भाषा म्हणजे केवळ साधी भाषा हे समीकरण पटण्यासारखे नाही. ज्याच्या पंखात गगनझेप घेण्याचे सामर्थ्य असते त्याने भुईवर सरपटण्याचा साधेपणा स्वीकारावा हे म्हणण्यात काय अर्थ आहे? गडकऱ्यांच्या

नाटकांतून त्यांची दिमाखदार भाषा वगळली तर कोणत्या रसिकाला त्यांची नाटके मोहिनी घालतील? 'आम्हाला वगळा गतप्रभ झणी होतील तारांगणे' असेच जणू त्यांचे शब्द आव्हान देऊ शकतील.

गडकऱ्यांच्या विविधरंगी भाषेची मीमांसा करताना हे लक्षात येते की, मराठी-तले संतकाव्य, शाहिरी काव्य आणि बखर वाङ्मय यांच्यातील रसरंगाचा अर्क काढून त्यांनी आपल्या लेखणीत तो बेमालूम मिसळून टाकला होता. ओवी-अभंगांतली भाविकता आणि शब्दांची कोवळीक त्यांनी आपल्या मनी-मानसी मुरवली होती.

लावणी, पोवाड्यातल्या रंगतदार शब्दांचा चारा या राजहंसाने मनसोक्त सेवन केला होता. विष्णुशास्त्र्यांची 'निबंधमाला', केशवसुतांची ओजस्वी कविता, आगर-करांचे निबंध यांच्यातून कित्येक धारा गडकऱ्यांच्या वाणीने पिऊन घेतल्या होत्या. केशवसुतांना काव्याच्या क्षेत्रात ते गुरू मानीत असले तरी, 'सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबून घेणाऱ्या' व 'चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात' हिंडणाऱ्या बालकवींच्या सुकुमार हळव्या कवितेवर त्यांनी जिवापाड प्रेम केले. श्रीपाद कृष्णांच्या कलावती वाणीचे पाणी आपल्या लेखणीला मिळावे म्हणून त्यांनी धडपड केली होती. मराठी साहित्यात जेथे जेथे त्यांना सुंदरतेचे, सुभगतेचे, सामर्थ्याचे कण दिसले, तेथे तेथे ते रंगून गेले. असे अनंत कण त्यांनी कसोशीने गोळा केले. एखादी चमत्कृतिपूर्ण आकर्षक कल्पना डोळ्यासमोर चमकली की ती तशाच अर्थपूर्ण, घाटदार शब्दात तावडतोब गुंफून ठेवण्याचा छंद त्यांना जडला.

मागच्या पुढच्या संदर्भाचा काहीच पत्ता नसलेली अनेक गमतीदार सुभाषितवजा सुंदर वाक्ये ते डायरीत लिहून ठेवीत. 'अप्रकाशित गडकरी' या पुस्तकात अशी शेकडो उदाहरणे दिली आहेत. कोटी, कल्पना, शब्द आणि अर्थ यांच्यातली चम-त्कृती, प्रास, वक्रोक्ती, उपहास वगैरे अनेक वैशिष्ट्यांनी नटलेली वाक्ये त्यांच्या मस्तकात घोंघावत असत. गडकऱ्यांचे डोळे शब्दांचे रूप पाहू शकत. शब्दांचा स्पर्श त्यांच्या अंतर्मनाला जागवीत असे. शब्दांच्या ठायी असणारे वेगवेगळे गुणधर्म पाह-ण्याची आणि पारखण्याची एक तरल शक्ती जणू त्यांना प्रसन्न होती. काही सुटी संदर्भहीन वाक्ये वाचताना देखील त्यांच्या भाषेचे झगमगणारे विशेष नजरेत भरतात.

उदाहरणार्थ :

'मार व शिव्या खाण्यास दुसऱ्याची तोंडे व हात लागतात.' 'वर्तमानपत्रे नसल्यामुळे खऱ्या बातम्या तावडतोब लोकांस कळत.' 'काही लोक इतक्या हलक्या प्रकृतीचे असतात की दुसऱ्याच्या पोटात समाधानाने चार घास गेले तरी त्यांच्या पोटात दुखू लागते.' 'आईच्या अश्रूत भिजत असता हसणाऱ्या मुलाइतकी आनंद-दायक वस्तू एखादीच असेल.' 'देवाभोवती फेऱ्या घालण्याने दैवाच्या फेऱ्यातून चुकता येत नाही.'

विनोदबुद्धी, कोटिबाजपणा, मिस्किलपणा, शब्दप्रभुत्व, कल्पकता आणि

काव्यात्मकता इत्यादींची सरमिसळ या लहानशा वाक्यातूनही झालेली दिसते. पण हे सर्व केवळ प्रदर्शनाच्या हव्यासाने गडकरी करीत होते असे म्हणता येणार नाही. प्रत्येक लेखक कवीत स्वभावतःच प्रदर्शनाची एक उर्मी असते, तेवढीच त्यांच्यापाशी होती. छंदोमयी वाणीचे त्यांना जे सहज स्फुरण होत होते त्यामागे त्यांचा व्यासंग होता. इंग्रजीतल्या नामवंत लेखक-कवींचे साहित्य त्यांनी मनापासून अभ्यासले होते. शेक्सपी-अर, इब्सेन, मोलिअर यांची नाटके त्यांना केवळ आवडत असे नव्हे तर, त्या कृतींचा त्यांच्यावर आणि त्यांच्या शैलीवरही काही अंशी संस्कार घडला होता. विनोदाच्या बाबतीत तर मार्कट्वेनचा अधिक परिणाम झाला होता. पण तरीही गडकऱ्यांची शैली कोणाही एका किंवा अनेकांच्या अभ्यासातून व अनुकरणातून निर्माण झाली होती असे निश्चित अर्थाने म्हणणे शक्य नाही. त्याची शब्दकळा बऱ्याच अंशी स्व-तंत्र आहे हेच खरे. आपल्या शब्दांच्या माध्यमातून नानाविध भावनांचे, कल्पनांचे चित्र-विचित्र रसायन भरून ते शब्द जिवंत आणि जोमदार करण्याचे एक आगळे सामर्थ्य या लेखकाने मिळवले होते. कोणत्याही पूर्वसूरींच्या वाङ्‌मयीन शैलीचे जसेच्या तसे अनुकरण या मानी कलावंताने केले नाही. कोल्हटकरांची कल्पना घेऊन तिच्यावर आपल्या विशिष्ट शक्तीचा संस्कार काही वेळा ' प्रेमसंन्यास 'सारख्या नाटकात त्यांनी केलेला आढळतो. पण त्यांची शैली स्वतःच्या वाटेने मनःपूत वेगाने पुढे प्रवास करू लागली. ती अधिकाधिक लयबद्ध आणि नादमय बनत गेली. गडकऱ्यांच्या प्रत्येक वाक्याला एक अंगभूत ताल आणि तोल आहे हे जाणवत राहते. तोल हरवून बसलेले एखादे वाक्य दाखवणे कठीण आहे. शब्दांच्या ठायी असलेल्या अंगभूत लयीची इतकी डोळस जाणीव गडकऱ्यांशिवाय दुसऱ्या एखाद्या नाटककाराने दाखविली आहे काय ? ' भावबंधना 'तला प्रभाकर, लतिकेच्या गालावरील तिळाबद्दल म्हणतो,

' सौंदर्याचे हे चालते बोलते काव्य सर्वांग परिपूर्ण केल्यावर, काव्यरसाची सीमा झाली हे दाखविण्यासाठी विधात्याने या तिळाचा गालावर हा सुंदर पूर्णविराम देऊन ठेवला आहे. '

या विधानात केवळ शब्दसौंदर्य नाही. एखाद्या आकर्षक कल्पनेशी जेव्हा शब्द जोडले जातात तेव्हाच त्यांना जीवकळा प्राप्त होते. नुसते शब्द सुंदरही नसतात, की असुंदरही नसतात. त्यांना जेव्हा अर्थाची, भावनेची आणि कल्पनेची वलये येतात तेव्हाच ते उजळून निघतात. अशा वेळी अगदी रूक्ष, गद्य शब्दसुद्धा खुलून येतो.

कुरूप मनुष्य सुद्धा मनापासून हसला म्हणजे जसा चांगला दिसतो तसेच शब्दांचेही असते. शुद्धलेखनातला पूर्णविराम रुक्ष आहे, पण लतिकेसारख्या सौंदर्य-वतीच्या गालावरील तिळाशी त्याची तुलना झाल्याबरोबर तो सार्थ वाटतो.

कल्पना-चमत्कृतीमुळे हे वाक्य आपल्याला मोहवते. सौंदर्यरसाचे काव्य आणि त्याची सीमा झाली हे सांगणारा पूर्णविराम हा एका अकल्पित पण अन्वर्थक अशा सुंदर चमत्कृतीकडे ओढून नेतो हे वाक्य एका विशिष्ट लयीत उच्चारलेले ऐकताच

कुणाही रसिकाच्या चित्ताला चोरटा, मखमली स्पर्श झाल्याशिवाय राहत नाही. एकाच वेळी गडकऱ्यांची भाषाशैली बुद्धीला आणि हृदयाला फुलवू शकते. कोणी वास्तवताप्रेमी टीकाकार यावर असा आक्षेप घेईल की, आपल्या प्रेयसीशी बोलताना कोणता प्रियकर असले लांबलचक वाक्य प्रत्यक्षात बोलतो ? हे सारे कृत्रिम वाटते. या हास्यास्पद आक्षेपाला कसले उत्तर द्यायचे ? प्रेयसीच्या सौंदर्याने घायाळ झालेला प्रेमिक बोलू लागला तर केवळ अशाच शब्दांतून आपले मनोगत व्यक्त करू शकेल. कल्पनेचा हा मोहक विलास प्रभाकरासारख्या रोमँटिक प्रेमिकालाच सहज शक्य आहे. प्रीतीची लाट तुफान वेगाने उचंबळून आल्यावर ती कल्पनेच्या आणि सुंदर शब्दांच्या फेसाने फेसाळल्याशिवाय कशी राहील ? गडकऱ्यांच्या लावण्यवती शैलीची चर्चा निर्मम तटस्थतेने एखाद्या अभ्यासजड टीकाकारालाच करता येईल. त्यांची शैली रसिकांना सहजपणे लाडिकपणे, बिलगते. चर्चेला ती फारसा अवसर ठेवत नाही.

करुणरसाचा आविष्कार करताना गडकऱ्यांच्या लेखणीने जे काव्यमय अश्रू ढाळले आहेत त्यांचे लावण्य अस्वस्थ करते. कारुण्याचा गहिरेपणा प्रकट करण्यासाठी काव्याच्या उत्कट पातळीवर गेलेली भाषा आवश्यक असते. गडकऱ्यांची लेखणी शृंगारात फारशी रमलेली दिसत नाही; पण शोकरसाचा शिडकावा मात्र ती विलक्षण सामर्थ्याने करते. गडकऱ्यांच्या मनातच एक प्रकारचे स्थिर कारुण्य, नैराश्य आणि व्याकुळ करणारे औदासीन्य रुजलेले होते. आयुष्याच्या जुगारात आपण पराभूत झाल्याची एक तीव्र खंत त्यांच्या मनात कोठेतरी सलत राहिली असावी. व्यक्तींच्या हृदयातले दुःख आणि वेदना साकार करताना गडकऱ्यांची भाषा अनावर आवेगाने उचंबळत राहते. अशा वेळी ती अतिरंजनाकडे झुकते हे खरे; पण अमर्याद दुःख निराशेला शब्दरूप देताना संयम आणि प्रमाणबद्धता यांचे तारतम्य काहीवेळा सुटावे हेही साहजिकच वाटते. करुणरसाच्या अभिव्यक्तीत गडकरी अधिकांशाने रमले. त्यांचा ' संवाद ' जेवढा करुणाशी आहे तेवढा अन्य भावांशी झाला नाही, असे विधान करता यावे इतकी त्यांची नाटके करुणरसप्रधान आहेत. ' राजसंन्यास 'मधील संभाजी अखेरच्या प्रवेशात करुण आणि उदात्त या भावनांच्या उच्च पातळीवर गेलेला आहे. त्याचे सारे प्रमादपूर्ण जीवन त्याच्या दृष्टीसमोरून चित्रपटासारखे सरकत आहे. दुःख आणि अनुताप यांच्या बेबंद लाटांनी त्याला घेरले आहे. अशा तीव्र दुर्दम्य मनःस्थितीतल्या संभाजीच्या अंतरंगांचे दर्शन गडकरी ज्या भाषेत करून देतात ती ऐकताना कोणाच्याही अंगावर तरारून रोमांच उभे राहतात. ती चित्रदर्शी भावाकुल भाषा आपल्याला संभाजीच्या व्यक्तित्वापर्यंत ओढून नेते. त्याच्या होरपळलेल्या मनाशी आपलेही नाते जोडले जाते. हा प्रत्यय केवळ शब्दांच्या माध्यमातून द्यायचा आहे याची जाणीव नाटककाराला आहे. त्याची लेखणी ही किमया करू शकली, कारण गडकऱ्यांचे प्रतिभावंत मन संभाजीच्या सुखदुःखांशी पूर्णपणे समरस होऊ शकले. अंतर्बाह्य पश्चात्तापाने पेटून निघालेला मराठ्यांचा हा मनस्वी राजा मरणाच्या

दाढेत सापडला असताना काय बोलला असेल याची कल्पना गडकरी करतात. किंबहुना संभाजीच्या मनातच ते प्रवेश करतात. संभाजी म्हणतो, 'गो ब्राह्मण प्रतिपालक हिंदुपदपादशहा श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज! नाही! साबाजी, ही माझी किताबत नाही! संभाजी म्हणजे केवळ रंडीबाज छाकटा! काशीची गंगा आणि रामेश्वरचा सागर एकवटून छत्रपतींनी बांधलेल्या राष्ट्रतीर्थाची श्री गंगासागराची ज्याने व्यभिचाराच्या दिवाणखान्यातली मोरी बनवली तो हा संभाजी! वैराग्याच्या वेगाने फडफडणाऱ्या भगव्या झेंड्याला दारूबाजाचे तोंड पुसण्याचा दस्तरुमाल केला! महाराष्ट्रलक्ष्मीच्या वैभवाचा जरीपटका फाडून त्याची रांडेसाठी काचोळी केली! साबाजी, माझ्या नऊ वर्षांच्या नावलौकिकाची इमारत नीटपणे पाहा! चिटणिसाला हत्तीच्या पायाखाली तुडवून तिचा पाया घातला. मातोश्री सोयराबाईसाहेबांना भिंतीत चिणून तिच्या भिंती उभारल्या, ती पातकी इमारत उंचावता उंचावता कळसाला पोचण्यापूर्वीच कोसळून तिच्याखाली संभाजीचा चुराडा होऊन गेला. साबाजी, मी बाहेर पडून लोकांना काय तोंड दाखवू? आपला राजा सुटला असे पाहताच, माझी प्रजा आपखुशीने देश सोडून हद्दपार होईल. साबाजी, या काळोखातसुद्धा मला तोंड लपवावेसे वाटते. खाली पाहीन तर हत्तीच्या पायांनी पाताळापर्यंत गाडलेला बाळाजी, पुन्हा जमिनीतून वर येईल अशी भीती वाटते. भोवताली पाहिले तर कोपऱ्याकोपऱ्यांतून आईसाहेबांचे डोळे माझ्याकडे टवकारून पाहतील. वर पाहिले तर शिरकर्यांची उडवलेली शिरे आकाशातून जयद्रथाच्या मस्तकाप्रमाणे येऊन माझ्या मस्तकावर आदळतील. साबाजी, मी आता कोणाकडे पाहू? सह्याद्रीचा सिंह आता अगदी भयभीत झाला आहे.'

संभाजीच्या खोल वेदनेला गडकऱ्यांचे शब्द इथे सहज पेलून धरतात. ज्या असीम दुःखांनी त्याला वेढले आहे, त्यांची झळ आपल्यालाही लागत राहते. त्याचे व आपले दुःख एकच होते. ही सहानुभूती व समरसता गडकऱ्यांची जिवंत भाषाच घडवून आणते. उत्कट भावना आणि उत्तुंग कल्पना यांच्या संगमातून हे प्रभावी गद्यकाव्य प्रकट झाले आहे. एक विलक्षण शोकात्म अनुभव देण्याची शक्ती या काव्यमय भाषेत ओतप्रोत भरली आहे. दररोजच्या व्यवहारातली साधी सरळ भाषा संभाजीच्या जळत्या मनाचे दर्शन घडवू शकली असती काय? कोणतीही उत्कट भावना प्रकट होताना काव्याचाच आश्रय करते. त्यातून संभाजीचे दुःख हे एका मूलतःच साहसी भावपेशल दिलदार पण प्रमाथी बनलेल्या राजाचे दुःख आहे. सामान्य माणसाच्या कळाहीन दुःखाशी त्याची तुलनाच होऊ शकत नाही. म्हणूनच गडकऱ्यांची शब्दरचना येथे उत्कटता आणि भव्यता यांच्याकडे झुकलेली आहे. दुःखानुभव आणि काव्यमय भाषा यांचे मुळातच एक अभंग नाते प्रस्थापित झाले आहे. गडकऱ्यांच्या प्रमाणेच काव्यात्म प्रतिभेचे आमचे नाटककार वि. वा. शिरवाडकर शोकात्म नाटकांतून काव्यमय भाषेचाच प्रयोग करतात. 'कौंतेय' मधील कर्ण असो, की 'नटसम्राट' मधील

गणपतराव बेलवलकर असो, आपल्या मनातील दुःखोद्रेक प्रकट करताना काव्याकडेच वळतात. शेक्सपीअरच्या शोकनाट्यातील दुःखवेदनांची चित्रे कवितेच्याच कुंचलीने रेखाटलेली दिसतात. काय असेल ते असो, दुःखाचा स्पर्श रसिकाला काव्याच्या पातळीवर सहज घेऊन जातो यात शंका नाही.

हॅम्लेट, ऑथेल्लो, किंग लियर यांची भाषा या संदर्भात लक्षणीय आहे. व्यवहारात माणसे जशी साचेबंद पद्धतीने बोलतात, तशीच ती शोकनाट्यातही बोलू लागली तर, नाट्य कुठेच दृष्टीला पडणार नाही. वास्तव चित्रणाचा आग्रह आत्यंतिक टोकापर्यंत ताणला की, तो हास्यास्पद झाल्याशिवाय राहणार नाही. वास्तवाच्या गद्य जमिनीवरून सुखदुःखांच्या उंच व उत्कट आकाशात नेण्याचे कार्य काव्यात्म भाषाच करू शकते. दैनंदिन सांकेतिक भाषेपेक्षा साहित्याची भाषा संवेद्यता, अर्थात्मकता, चित्रात्मकता याबाबतीत किती तरी पटींनी अधिक समर्थ असते. नित्याच्या भाषेत कल्पनेला व आंतरिक भावगंधाला फारसे स्थान मिळत नाही. प्रतिभावंत लेखक मात्र आपल्या भावपूर्ण कल्पनेची चैतन्यमयी फुंकर घालून शब्दांचे विझलेले निखारे नव्या तेजाने प्रज्वलित करीत असतो. भाषासौंदर्याचे एक आगळे रूप आपल्यासमोर साक्षात उभे राहते. शेक्सपीअरची शोकनाट्ये अशाच काव्यसमृद्ध शब्दांतून व्यक्तिमनातली अथांग दुःखे समूर्त करतात. या भाषेचा खिन्न उदास विलास वाचकांना रोमांचित करतो. अस्वस्थ करतो. चिंतनाला गती देतो.

पत्नीच्या मरणाची वार्ता ऐकल्यावर ज्याच्या मनाची शकले उडाली आहेत असा मॅकबेथ आपली व्यथा कशी प्रकट करतो हे पाहण्यासारखे आहे. गडकऱ्यांच्या भाषेवर कृत्रिमतेचा, अतिरंजिततेचा आक्षेप घेणाऱ्या समीक्षकांनी शेक्सपीअरच्या शोकनाट्यांतील ' मुक्तकाव्याचा ' विचार केलाच पाहिजे. अनावर दुःख स्वभावतःच काव्याच्या वाटेने वाहू लागते. ' राजहंस माझा निजला ' ही कविता टीकाकारांनी कृत्रिम आणि अतिरेकी ठरवली. सामान्यतः हा आक्षेप त्या कवितेच्या संदर्भात समर्थनीय असेल, पण या कवितेतली माता आपल्या अपत्याच्या मृत्यूने व्यथित होऊन काव्यच बोलू लागते. अशा वेळी, ' our sweetest songs are those that tell us the saddest thought ' हे वचन सयुक्तिक वाटते. मॅकबेथचे दुःख काव्याचा आधार घेऊनच व्यक्त होते. तो म्हणतो,

' She should have died here after;
There would have been a time for such a word,
Tomorrow, and tomorrow, and tomorrow
Creeps in this petty pace from day to day,
To the last syllable of recorded time;
And all our yesterdays have lightep fools

The way to dusty death out, out, brief candle !
Life is but a walking shadow, a poor player,
That struts and freets his hour upon the stage,
And then is heard no more,
It is a tale Told by an idiot,
full of sound and fury, signifying nothing. '

मॅकबेथच्या मनातील विचार आणि भावनांचे वादळ आणि ' एकच प्याला ' व ' राजसंन्यास ' मधील सुधाकर व संभाजीच्या मनात कोंडलेली भावनिक वादळे अशाच प्रकारच्या भाषेतून साकार होतात. शेक्सपीअर आणि गडकरी माणसांच्या जीवनात खोलवर जाऊन रुजलेल्या अनेक व्यथा-वेदनांना याच भाषेने मुखरित करतात. मॅकबेथसारखा महत्त्वाकांक्षी मनुष्य मृत्यूच्या जाणिवेने ' आयुष्य म्हणजे वेड्याने सांगितलेली अर्थशून्य कहाणी ' असे भाष्य करतो. ' एकच प्याला 'त बुडालेला सुधाकरही आपल्या अनुभवातून असेच काहीसे तत्त्वज्ञान बोलू लागतो. सकृद्दर्शनी हे कृत्रिम वाटले तरी, काव्य आणि तत्त्वचिंतन यांच्याद्वारे ' राजसंन्यास ' तील संभाजीची भाषा व्यावहारिक पातळीवरची नसावी. यातच तिचे वेगळेपण व तिची प्रत्ययकारिता सामावलेली आहे. वर उल्लेखिलेली मॅकबेथची भाषा प्रतिमांची आहे, काव्याची आहे. साऱ्याच श्रेष्ठ नाटककारांनी शोकभावनेचे सामर्थ्य काव्याच्या स्पर्शातूनच जाणवून दिले आहे हे लक्षात येते. गडकऱ्यांची नाट्यशैली जितकी लक्षणीय, तितकीच स्तिमित करणारी व भारून टाकणारी आहे. या शब्दप्रभूने आपल्या जवळची शब्दरत्ने तारतम्य न ठेवता मुक्तपणे उधळली असे सांगण्यात येते. तशी काही उदाहरणे देता येतील, पण शब्दांच्या वैशिष्ट्यांशिवाय आपले नाटक रसिकांना आपलेसे करू शकणार नाही याची जाण गडकऱ्यांना होती. ' राजसंन्यास ' हे अपुरे राहिलेले नाटकसुद्धा रंगभूमीवर आपल्या काव्योत्कट, कल्पनाप्रचुर समृद्ध भाषेने आपली वेगळीच मुद्रा उमटवून गेले. या नाटकाची शब्दशैली सर्वसाधारण असती तर या अपूर्ण नाटकाला वाचक-प्रेक्षकांनी इतक्या सन्मानाने डोक्यावर घेतले असते काय ? अपूर्ण राहिलेल्या नाटकाचा साठ-सत्तर वर्षे अपूर्व गौरव होत राहवा ही रंगभूमीच्या इतिहासातली पहिली आणि कदाचित अखेरची घटना ठरावी. गडकऱ्यांच्या नाट्य-प्रतिभेला खरे बळ त्यांच्या अमर्याद शब्दश्रीमंतीने आले हे एक निर्विवाद सत्य आहे. मराठी नाटकांतून लयबद्ध, नादमय व प्रसादयुक्त भाषेचा मुक्त आविष्कार करून वाचक, प्रेक्षकांना शब्दसौंदर्याची चटक लावण्याचे कार्य गडकऱ्यांनीच केवळ केले असे म्हटल्यास अतिशयोक्ती होऊ नये. भाषाप्रभुत्वाचा अर्थ लांबलचक वाक्यांची जुळणी करण्याचे चातुर्य असा कित्येक वेळा चुकीने केला जातो. गडकऱ्यांची वाक्ये कित्येक ठिकाणी दीर्घ असूनही प्रासादिक आहेत. अनुरूपता आणि अन्वर्थकता हे गुण त्यांच्या शब्दांतून जाणवतात. ' राजसंन्यास ' मध्येच एक नाट्यपूर्ण प्रसंग असा आहे की,

संभाजीराजे समुद्रात बुडणाऱ्या तुळशीला वाचवतात. दोघेही परस्परांवर अनुरक्त आहेत. तारुण्यातील अत्यंत उत्कट, अनावर, रोमँटिक प्रीतीने दोघेही थरारून गेलेले असतात. त्यांच्या हृदयात नाचणारे काव्य त्यांच्या ओठांतून शब्दरूपाने वाहू लागतें. या प्रेमिकांची बेहोशी व त्यांच्या गात्रागात्रांतून फुललेले प्रणयाचे उन्मादक चांदणे केवळ काव्यमय भाषेतूनच साकार होऊ शकते. गडकऱ्यांनी चांदण्याची मुलायम भाषा योजून धुंद प्रेमचित्र साकार केले आहे. तुळशी म्हणते,

' मानसीच्या राजहंसा, माझ्या मनी उडी घेऊ नका. जे कधी काळी घडायचे नाही. त्यासाठी रडायचे कशाला? आजवर कोणत्याही पुरुषाच्या डोळ्याला डोळा भिडविताना तुळशीची नजर चळली नाही, पापणी ढळली नाही. नवल्या नजरेचा नेम चुकविण्यासाठी कधी पदर सावरला नाही. कधी जीव बावरला नाही. आज तुळशीचा अभिमान उतरला. रायगडच्या राजाला पाहण्यासाठी डोळ्यांत जीवाची प्रभा दाटली. ताजिमीसाठी देहावर काटेरी सभा थाटली. नजरेच्या एकाच फिरतीने डोळ्यांत रूपरेखेची साठवण झाली. तुळशीला पदराची आठवण झाली. पुन्हा आपल्याकडे पाहताना नजरेची ज्योत पापणीने मालवली. उरीची लाज पदराने पालवली. आज जवानमर्दीच्या बादशहाने माझ्या जोवनवेलीला काटेरी भूषणे बहाल केली. आपल्या देहाच्या स्पर्शाने माझा देह नटला. पण जीव हटला. महाराज, तुळशीच्या हटलेल्या जीवासाठी या दांडग्या दरियाशी झगडून देह कष्टवू नका ! '

वास्तवातली तुळशी इतकी खटकेबाज, प्रासमय, रसपूर्ण भाषा कधीच बोलणार नाही. पण कवीची नवनिर्माणशील प्रतिभा तुळशीच्या हृदयाची सतार प्रेमस्पर्शाने कोणत्या स्वरातून झंकारत झाली असती याचा वेध घेऊ शकते. ही तुळशी गडकऱ्यांची मानसकन्या आहे, तिच्या भाषेची समृद्धी हा आश्चर्याचा विषय ठरू नये. नाट्य आणि काव्य यांच्या समन्वयातून आकाराला आलेली ही राजस भाषा केवळ गडकऱ्यांनीच लिहावी. भाषाप्रभुत्वाचे हे दर्शन आपल्याला स्तिमित करते.

' प्रेमसंन्यास ते एकच प्याला ' या प्रवासाला गडकऱ्यांच्या भाषेच्या संदर्भात निश्चितच अर्थ आहे. ' प्रेमसंन्यासातली ' भाषाशैली अनेक स्थळी अतिरंजनात्मक, कृत्रिम बनली आहे. गडकऱ्यांनी सुरुवातीला नाटकी भाषा आणि नाट्यमय भाषा यात काहीशी गल्लत केलेली दिसते. शब्दांचा भडक रंग त्यांना एका कालखंडात मोहवून गेला. प्रत्येक शब्दावर कोटी करण्याचे व्यसन त्यांच्या बुद्धीला लागले. कोल्हटकरांच्या कोटीबाज भाषेच्या अनुकरणाने असो, किंवा अतिरेकी काव्यमय भाषेचा त्यांचा अंगभूत सोस असो; ' प्रेमसंन्यास ' आणि ' पुण्यप्रभाव 'मधील अनेक संभाषणे कृत्रिम व जाचक वाटतात. नाटक म्हणजे आपल्या भाषाचमत्कृतीच्या प्रदर्शनाचे हक्काचे ठिकाण अशी कदाचित त्यावेळी गडकऱ्यांची समजूत झाली असावी. असंभवनीय प्रसंगांचे चित्रण करताना क्लिष्ट व अतिअलंकारिक भाषेची कृत्रिम रोषणाई त्यांनी सुरुवातीला कशी केली याचे एखादे उदाहरण पाहण्यास

हरकत नाही. गडकऱ्यांसारखा शब्दसौंदर्याचा पूजक कवी आणि नाटककार केव्हा केव्हा कृत्रिमतेच्या आहारी जाऊन भाषेमुळेच रसभंग कसा करीत असे हे दिसते. पुण्यप्रभाव नाटकात भूपाल आणि वसुंधरा चांदण्या रात्री प्रेमसंभाषण करीत असताना दोघेही किती अवजड आणि समासप्रचूर भाषा योजून हास्यास्पद कृत्रिमतेच्या टोकापर्यंत जातात हे जाणवते. भूपाल म्हणतो,

' वंध्यातृप्तीच्या निराश सुखासाठी, निःश्रेयसासाठी आमच्या अगाध ज्ञानसागराची, जीवात्म्याच्या जाणिवेवाचून परमस्वरूपात विलय करून टाकण्याची कल्पना साध्य नसली किंवा सत्यही नसली तरी कल्पना शक्य मात्र वाटते. '

असल्या किचकट वाक्यांचा अर्थ लावण्यासाठी वाचक प्रेक्षकांना किती कष्ट पडले असतील कुणास ठाऊक ? पांडित्याने आणि तत्त्वज्ञानाने जडावलेली ही भाषा एखाद्या विद्वत्ताप्रचुर प्रबंधालासुद्धा पेलणे कठीण आहे. पण गडकऱ्यांचा हा ' भाषिक अवतार ' लवकरच संपला. भावानुकूल, काव्यमय, कोटीबाज संभाषणातून त्यांची पात्रे पुढे बोलू लागली. नाटकीपणाच्या पाशातून ' भावबंधन ', ' राजसंन्यास ' आणि ' एकच प्याला ' लिहिताना गडकरी मुक्त झाले आहेत. त्यांच्या स्वाभाविक भाषेची संपन्नता या नाट्यकृतींतून प्रकट होते.

' एकच प्याला ' लिहिताना गडकऱ्यांची शैली आपल्या वैभवाचे प्रदर्शन मांडत नाही. ती जणू सिंधूसारखीच विनयशील झालेली दिसते. स्वाभाविकतेतले सौंदर्य गडकऱ्यांसारख्या कल्पनारम्यवादी कवीला समजणे शक्य नाही; या टीकेला जणू त्यांनी ' एकच प्याला ' तून उत्तर दिले आहे. ' मी दारू सोडली ' हे सांगताना सुधाकराच्या शब्दातली तळमळ, सिंधूच्या मनातला विलक्षण आनंद आणि आपल्या अपत्यांविषयी त्यांच्या हृदयात उफाळलेली वात्सल्याची लाट गडकऱ्यांच्या पक्व शैलीने समूर्त केली आहे. याच प्रवेशातला सुधाकराचा पश्चात्ताप अक्षराअक्षरातून कसा डोकावतो हे पाहिल्याशिवाय गडकरी शैलीची प्रतीती येणार नाही. सुधाकराच्या पायांवर सिंधू मस्तक ठेवते आणि लज्जित झालेला सुधाकर एखादी वेगवान लाट यावी त्याप्रमाणे बोलू लागतो. त्याच्या प्रत्येक वाक्यात जणू त्याचा हृदयातून उठणारा एकेक जबरदस्त हुंदका सामावला आहे.

' सिंधू, सिंधू काय करतेस तू हे ? माझ्या पायावर मस्तक ठेवतेस ? या सुधाकराच्या ? या दारूबाज सुधाकराच्या ! ज्यानं आपल्या विद्येला, ज्ञानाला, नावलौकिकाला दारूच्या पेल्यात बुडवलं त्या सुधाकराच्या ? सिंधू, मी दारूच्या व्यसनानं काय करायचं ठेवलं आहे ? वडिलांच्या पुण्याईला, ब्रह्मकुलीच्या पवित्रतेला दारूनं तिलांजली दिली ! तुझ्यासारख्या देवीची अशी विटंबना केली ! ज्या तुझ्या बापाच्या घरी रोज सदावर्त चालवीत त्या तुला घासभर अन्नाला अशी महाग केली, की गीतेसारख्या मुलीनं तुझ्यावर दया करावी आणि तुला सहस्रभोजनाचा रस्ता दाखवावा !... तुझ्या बापाच्या घरी खेळता खेळता ओंजळीच्या वैरणीनं तू जात्यात मोती भरडले

असतेस तरी कुणाला त्याचं काही वाटलं नसतं; त्या तुझी मी अशी दशा करून टाकली, पोटासाठी आसवांची मोती वेरून तुला मोलाचं दळण करणं भाग पडावं!.... पंचपतिव्रतांनी पुण्यसंपादनासाठी प्रत्यही तुझी पूजा करावी अशी तुझी पवित्र योग्यता! माझ्या पायावर तू मस्तक ठेवतेस त्यापेक्षा लाथेसरशी मला दूर नरकात का लोटून देत नाहीस? भलत्या भावभक्तीनं माझ्यासारख्या दगडाची देवपूजा तू कशाला करीत बसलीस?'

सुधाकराचा अनुताप साध्या पण वक्तृत्वपूर्ण शब्दांतून फारच परिणामकारक पद्धतीने व्यक्त झाला आहे. ही शैली साधी वाटली तरी ती साधी सोपी नाही. तिच्यात अंगभूत संपन्नता आणि सौंदर्य आहे. प्रामाणिक पश्चात्तापाची वेदना सुधाकराच्या वाक्यांनी सहज तोलली आहे.

नवशब्द, नवीन कल्पना, अर्थचमत्कृती, वाक्यांतला शब्दातला तोल आणि लयकारी, अनुप्रासांचा कुशल वापर, कोट्यांचा सुकाळ इत्यादी वैशिष्ट्यांनी गडकऱ्यांची भाषा डौलदार, नखरेल पण अभिजात माधुरीने नटलेली वाटते. भाषेच्या विलक्षण वैभवाने गडकऱ्यांची नाटके रंगभूमीवर एका युगाची प्रतिष्ठापना करून गेली. केवळ चार-पाच नाटके लिहिणाऱ्या गडकऱ्यांना युगंधर नाटककार ही संज्ञा मिळावी हा एक चमत्कार वाटतो.

गडकऱ्यांच्या धुंद भाषेशी परिचय झालेला कोणताही रसिक त्यांच्या युगप्रवर्तकतेबद्दल शंका घेणार नाही. कोणी काही म्हटले तरी, शब्द हे नाटकाचे मूलद्रव्य आहे. जड शब्दांच्या हृदयात आपल्या प्रतिभेचे अद्भुत रसायन ओतून ते शब्द सर्वांगांनी जिवंत करण्याची किमया गडकऱ्यांना साधली.

एक अमोघ, अपराजित शस्त्र या मूलतःच रोमँटिक असलेल्या कवीच्या हातात पडले. आणि त्याने पाहता पाहता मराठी रंगभूमी अवघ्या आठ-दहा वर्षांत जिंकून घेतली. गडकऱ्यांची रसवंती 'अभिनववाग्विलासिनी' आहे. तिची संगत मिळाल्यानंतर तिच्या सहवासाची अपूर्व बेहोषी जाणवू लागते. मराठी भाषा किती श्रुतीमधुर आहे, नानाप्रकारच्या विभ्रमांनी ती रसिकांना कशी वेड लावते याचा अनुभव त्यांची नाटके वाचताना येत राहतो. आपले भाषावैभव मुक्तमनाने आणि मुक्तहाताने उधळण्याचा छंद लागलेला दुसरा शब्दप्रभू, भावप्रभू, नाटककार केव्हा उदयाला येईल? गडकरी व त्यांची भाषा हे मराठी रंगभूमीला व साहित्याला पडलेले एक मधुर स्वप्न आहे, इतकेच म्हणता येईल.

□

# रामदासांची ‘ समर्थ ’ जीवनदृष्टी

संतांच्या आदर्श जीवनातून आणि विचारांतून समाजजीवनाला पोषणाची आवश्यक द्रव्ये मिळत असतात यात संशय नाही. सामान्य माणसांच्या जीवनविषयक कल्पना तात्पुरत्या आणि क्षुद्र असतात. त्या कल्पनांची छाननी करून त्यांतील ग्राह्य कोणते आणि त्याज्य कोणते याचा विवेक करणे त्याला शक्य नसते. त्याची त्याला आवश्यकताही वाटत नाही. दैनंदिन आयुष्याचा प्रवाह वाहून नेईल तिकडे वाहत किंवा वाहवत जायचे इतकेच त्याला माहीत असते. वाळलेला पालापाचोळा ज्याप्रमाणे वावटळीत सापडतो आणि अर्थशून्य गिरक्या घेत राहतो तशीच अवस्था साधारण माणसांची झालेली असत नाही काय ? सुखदुःखांचे जे चार क्षण आपल्या वाट्याला येतील ते पदरात निमूटपणाने घ्यावेत आणि मरणाची वाट चालत राहवे. हीच जीवनाची गती त्यांना कळते. आपल्या आयुष्याला, आशा-आकांक्षांना, कल्पना-कामनांना आपण स्वतःच एक चैतन्यपूर्ण अर्थ देऊ शकतो व आपले जीवन आणि व्यक्तित्व संपन्न बनवू शकतो याची जाणीव केवळ चाकोरीतून फिरणाऱ्या सामान्य माणसांना कशी होणार ? अशा केवळ प्रारब्धशरण, निष्क्रिय, अगतिक माणसांच्या समूहाला ‘ समाज ’ ही संज्ञा देण्यात अर्थ तरी कसला ? जेव्हा काही पुरुषार्थी व्यक्ती पोटार्थी लोकांना ‘ धीर्धरा धीर्धरा तकवा । हडबडू गडबडू नका ’ असे आत्मप्रत्ययाने सांगून उत्कट, भव्य अशा जीवनाचे स्फुरणदायी स्वप्न त्यांच्या विझत चाललेल्या डोळ्यांत पेटवतात, तेव्हा या समूहाला एक प्रकारची नवी गती मिळते, नवी जाणीव रसरसते. मरगळलेल्या मनातून नवे मंत्र निर्माण होऊ लागतात. साऱ्या समाजात उत्साहाची निर्मितीशीलतेची एक लाट उचंबळते. माणसे आपल्या व्यक्तिगत क्षुद्र स्वार्थांची कवाडे उघडून बाहेरच्या व्यापक जगाकडे शोधक नजरेने पाहू लागतात. या नव्या जाणिवांतूनच समाज आपली जुनी कात टाकतो. जेथे दुष्काळ होता तेथे आता ‘ उदंड जाहले पाणी ’ असा त्याला अनुभव येतो. आपल्या आजूबाजूचे चित्र संपूर्णपणे बदलून गेले आहे. ‘ आनंदवन भुवना ’च्या प्रांगणात आता आपण प्रवेश

केला आहे असा त्याला साक्षात्कार होतो.

पण हे परिवर्तन घडविण्याची प्रज्ञा आणि प्रतिभा समाजात निर्माण झाली पाहिजे. काही वेळा शतके उलटली तरी समाजाला चेतना देणारा संत, समाजसुधारक नव्या दृष्टीचा नेता निर्माण होत नाही. आपल्या उद्धाराची वाट पाहत अहिल्या ज्याप्रमाणे शेकडो वर्षे पडून राहिली होती, त्याप्रमाणे एखाद्या ' रामा 'ची वाट पाहत काही समाज जडावस्थेतच पिचत पडतात. केव्हा तरी तो दिव्य क्षण येतो आणि समाजाला जीवनकलेचा स्पर्श होतो. पण हा क्षण मनुष्य आणतो की, दैव त्या क्षणाला जन्म देते असा एक सनातन वाद आहे. या वादाचा निर्णय महाभारतकारांनी पूर्वीच दिला आहे.

कालो वा कारणं राज्ञः राजा वा कालकारणम् ।
इति ते संशयोमाभूत राजा कालस्य कारणम् ॥

काळ आणि परिस्थिती यांनाही आकार देण्याची व त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता असते असा आशावादी, वास्तववादी निष्कर्ष महाभारतकारांनी काढला आहे. सामान्य समजल्या जाणाऱ्या माणसांतही सुप्तावस्थेत कर्तृत्वाची बीजे असतात. नेतृत्वाचा झरा गुप्तपणाने झुळझुळत असतो. श्रीरामदासांच्याच शब्दांत सांगायचे झाल्यास, ' वन्हि तो चेतवावा रे । चेतवीताचि चेततो । यत्न तो देव जाणावा. ' प्रत्येकाच्या अंतर्मनात एक दिव्य ठिणगी असू शकते. तिची त्याला जाणीवही असत नाही. पण एखादा प्रज्ञावंत त्या ठिणगीला फुलवण्याचा प्रयत्न करीत राहतो. ती ठिणगी हीच त्याच्या भविष्यकालीन कार्याची प्रस्तावना असते. एक दिवस तिच्यातले अग्नितत्त्व उफाळणार आणि पाहता पाहता ठिणगीची ज्वाला होणार ही त्याची दृढ धारणा असते. तो सारखी फुंकर घालीत असतो. वन्ही चेतवण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रतिभा सामर्थ्याची तो उपासना करीत असतो. ठिणगीच्या उष्णतेने आता त्याचे अतरंगही ज्वलंत बनते आणि मगच तो दिव्यदाइक क्षण जन्माला येतो. तो जन्माला घालण्यासाठी पुरुषार्थाची आवश्यकता असते. समाजधारणा करणाऱ्या नेतृत्वात दूरदृष्टी, मर्दपणा आणि ध्येयवादित्व असावे लागते. केवळ संतत्व, केवळ सहिष्णुता, केवळ ईश्वरभक्ती, केवळ ज्ञान यांतून समर्थ समाजाची उभारणी झाल्याची नोंद इतिहासात तरी नाही. समाजघडणीसाठी, स्थैर्यासाठी व प्रगतीसाठी अनेक गुणांची, प्रवृत्तींची जरूर असते. समाजाला विचारांचा व आदर्शांचा एक बळकट पाया लागतो. परस्परांना तोलून धरणारे व परस्परांची शक्ती वाढविणारे भिन्न भिन्न घटक एकसंधपणे एकत्र आले म्हणजे समाज सुदृढ होतो. त्याला त्याचे असे एक स्वतंत्र व्यक्तित्व प्राप्त होते. हे कार्य महाराष्ट्रात काही महनीय व्यक्तींनी केले आहे. ' संत 'ही सर्वसामान्य संज्ञा आपण त्यांना देतो. पण त्यांचे संतत्व अनेक गुणांच्या मिश्रणातून तयार झालेले असते.

संत हा समाजाचा एक अलंकार आहे असे मानणे मला सयुक्तिक वाटत नाही.

अलंकाराइतके संत निरुपद्रवी नसतात. बाह्यतः ते आत्मचिंतनात मग्न आहेत असे वाटले तरी, त्यांच्या चिंतनात समाज हाच प्रमुख विषय असतो. समाजाच्या सुखदुःखाकडे पाठ फिरवून बसलेल्या माणसाला – मग तो कितीही ज्ञानवंत असला तरी त्याला संत कसे म्हणता येईल ? ' तुका म्हणे तोचि संत, सोशी जगाचे आघात ' हे खरे आहे. ' आई. चिंता करितो विश्वाची ', हे उद्गार संतांचेच असू शकतात. निष्क्रिय आणि निरुपयोगी ज्ञानाचे व पदव्यांचे ओझे मस्तकावर मिरविणाऱ्या लोकविन्मुख पंडितांना संतांची पदवी देण्यात कसला अर्थ आहे ? ज्या ज्ञानाला समाज जाणिवेचा गंध येत नाही, त्याचा उपहास खऱ्या संतांनी अनेक वेळा केला आहे. देवाच्या भजन-कीर्तनात रंगलेल्या संत महतांचा ईश्वर एखाद्या देवळात वा एखाद्या मूर्तीतच आहे असा कधीच आग्रह नव्हता. रामदास म्हणतात,

मृत्तिका धातु पाषाणादिक । ऐसि या प्रतिमा अनेक ।
बहुतेक लोकांचा दंडक । प्रतिमा देवी ॥
नाना देवांचे अवतार । चरित्रे ऐकती येक नर ।
जप ध्यान निरंतर । करिती पूजा ॥
एक सकळांचा अंतरात्मा । विश्वी वर्ते जो विश्वात्मा ।
द्रष्टा साक्षी ज्ञानात्मा । मानिती एक ॥ ११–२–२९ ते ३१

रामदासांचे समकालीन संत तुकाराम यांचीही ईश्वरविषयक जाणीव अशीच व्यापक, उदार होती. ज्ञानेश्वरांनीही रामदासांप्रमाणे ' विश्वात्मक ' देवाचाच विचार सर्वत्र मांडला आहे. तुकारामांनी म्हटले आहे,

तिर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी ॥
मिळालिया संत संग । समर्पिता भले अंग ॥ तु. गा. ११४.

रंजल्या–गांजल्यांच्या सेवेतच परमेश्वर असतो असे मानणारे संत समाजजीवनापासून अलिप्त राहणे शक्य नव्हते. काही अभ्यासकांनी संत हे समाजाविषयी उदासीन होते अशा आशयाची टीका केली आहे. ही टीका अपुऱ्या अभ्यासावर आधारलेली आहे यात शंका नाही. संत आणि समाज यांचा एक अतूट संबंध प्रस्थापित झालेला असतो. ' नारायण असे विश्वी । त्याची पूजा करीत जावी । ' असे म्हणणाऱ्या व त्याप्रमाणे वर्तन करणाऱ्या व्यक्ती समाजालाच आपल्या कार्याचा केंद्र-बिन्दू मानून कार्य करीत असतात.

संत रामदासांच्या जीवनदृष्टीचा शोध घेताना त्यांच्या काळाचा, परिस्थितीचा व तत्कालीन समाजाच्या मनःस्थितीचाही संदर्भ लक्षात ठेवावा लागेल. कोणत्याही समाजसुधारकाला स्वकालाचे आणि लोकांचे भान असावेच लागते. काळ व परिस्थिती यांच्या काही अंगभूत मर्यादा असतात. कार्यकर्त्यांच्याही शक्तीला व बुद्धीला अशाच मर्यादा पडतात. जी साधने हाताशी असतात त्यांचा उपयोग त्याला युक्तिप्रयुक्तीने करून घ्यावा लागतो. तो ज्ञानवंत, कुशल संघटक, प्रतिभाशाली असला तरी, त्याच्या

दृष्टीसमोर अमर्याद क्षितिज उभे राहू शकत नाही. विशिष्ट कालात त्याने प्रकट केलेल्या 'दर्शना'चा अपुरेपणा पुढील काळात जाणवणे शक्य असते. कारण कोणताही समर्थ प्रज्ञावंत आपल्या काळाच्या फार पलीकडे झेप घेऊ शकत नाही. पण आपल्या काळाला एक नवा अर्थ मात्र तो देत असतो, जड झालेल्या जीवनपद्धतीला एक नवा जिवंत आकार देण्याचा प्रयत्न तो करतो. याच पार्श्वभूमीवर रामदासांच्या विचार-प्रणालीचा संक्षिप्त विचार येथे करायचा आहे.

आपण नवीन काही सांगत नाही. जे कालाच्या उदरात विस्मृत झाले, ते जे हितकर असेल ते आपण सांगतो असे संत अनेक वेळा विनयाने म्हणतात. ते सर्वस्वी नवीन नसते हे खरे. पण सारेच जुने किंवा पारंपरिक असते असे मानणे मात्र सयुक्तिक नाही. जुन्याच शब्दांत कवी ज्याप्रमाणे नवा, अधिक सुंदर, समुचित अर्थ भरतो त्याप्रमाणेच तत्त्व जुने असूनही त्याकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन समाजपंडित देऊ शकतो. रामदासांच्या जिवित विषयक दृष्टीला असा नावीन्याचा स्पर्श अनेक ठिकाणी झालेला आढळतो नावीन्य आणि सामर्थ्य यांच्या संयोगातून महाराष्ट्रात 'आनंदवन भुवन' निर्माण करू पाहणारा रामदास हा केवळ कवी किंवा केवळ योगी नसून तो एक समाज घडविणारा समाजचिंतक व कार्यक्षम कार्यकर्ता होता अशीच इतिहासाची साक्ष आहे.

बुडाले सर्वही पापी । हिंदुस्तान बळावले ।  
अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवन भुवनी  
...बुडाला औरंग्या पापी । म्लेंछसंहार जाहला ।  
मोडली मांडली छेत्रे । आनंदवन भुवनी  
...सामर्थ्ये येश कीर्तीची । प्रतापे सांडली सीमा ।  
सारसर्वस्व देवाचे । आनंदवनभुवनी

या काव्यपंक्ती केवळ स्वप्नेच पाहत बसणाऱ्या स्वप्नवादी कवीच्या नव्हेत. या स्वप्नाच्या मागे एक समर्थ, पीळदार मन दंड थोपटून उभे असून नवरचना करण्यासाठी आपले बळ एकवटून आवाहन करीत आहे हे स्पष्टपणे जाणवते. नवनिर्मितीची प्रेरणा हे प्रतिभेच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. ही प्रतिभा म्हणजे शब्दशक्ती नव्हे. एक नवा, जयिष्णू, आक्रमक विचार लोकमानसात पेरण्याचा हा एक बलिष्ठ प्रयत्न आहे. समाज जेव्हा स्वार्थापुढे आंधळा होतो, कर्महीन व करंटा बनतो आणि प्रारब्धाच्या जोखडाखाली कर्तव्य विसरून पराभवात व लाचारीत धन्यता मानू लागतो. तेव्हा अशा भेकडांच्या मळखाऊ मनोवृत्तीला कुणीतरी आपल्या समर्थ हातांनी व शब्दांनी जाग आणावी लागते. ही नवनिर्मितीच असते. धगधगीत विचारांचे जळते शब्द निखाऱ्यांप्रमाणे समाजमनाला जेव्हा होरपळून काढतात, तेव्हा मग लोक-दृष्टीला खरा प्रकाश दिसू लागतो. हे कार्य केवळ संतपुरुषाच्या हातून होत नाही. आम्ही नवीन काही देत नाही किंवा नव्याने काहीच सांगत नाही हे शब्द वाच्यार्थाने

घ्यायचे नसतात.

म्हणोनि मार्गाधारे वर्तावे । विश्व हे मोहरे लावावे
अलौकिका नोहावे । लोकांप्रती ॥

हा ज्ञानेश्वरीतला संदेश सर्वस्वी नवा नाही. तो गीतेच्या तत्त्वज्ञानाचाच एक मुख्य भाग आहे. पण ज्या काळात आणि परिस्थितीत ज्ञानेश्वरांनी त्याचा प्रचार सातत्याने केला, तो लक्षात घेतला तर त्यातला नवीनपणा सहज जाणवतो. रामदासांच्या संदर्भातही हेच निभ्रांतपणे म्हणता येते. त्यांच्या जीवनदृष्टीतला सामर्थ्याचा व नावीन्याचा आणि समाजविषयक खोल सहानुभूतीचा महत्त्वपूर्ण भाग दुर्लक्षित करून चालणार नाही. ' कवी ' आणि ' संत ' या दोन्ही संज्ञा रामदासांच्या कार्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करताना अपुऱ्या पडतात. कवीची प्रतिभा संतांची साधुता आणि करुणा, विवेकवंतांची प्रज्ञा व समाजधुरीणांची समयज्ञता, कार्यकुशलता यांचे एक रसायन रामदासांच्या व्यक्तिमत्त्वात जाणवते. ज्ञानेश्वरांपासून रामदासांपर्यंत जे जे संत झाले त्यांच्या तत्त्वज्ञानाची, वाङ्मयाची दिशा स्थूल मानाने एक आहे असे म्हटले जाते. कित्येक चिकित्सकांच्या मते सारे संत समानच असतात. त्यांच्या कार्याचे सूत्र एकच असते. पण यात पूर्ण तथ्य नाही. प्रत्येक संताचे व्यक्तित्व, वाङ्मय, कार्य यांना ज्या परिस्थितीची पार्श्वभूमी लाभलेली असते ती व त्या संतांचे स्वतंत्र व्यक्तित्व यामुळे त्यांच्या जीवनदृष्टीत आणि कार्यातही निश्चित फरक पडलेला आहे. साऱ्याच संतमहंतांना एकाच चौकटीत बसविण्याचा उद्योग अगदी ढोबळ स्वरूपाचा आहे.

रामदासांच्या जीवनविषयक जाणिवा, समाजविषयक कल्पना धारदार होत्या. त्यांचे निरीक्षण खोल, अनेकांगी व चोखंदळ आहे. माणसांचे व जीवनाचे हजारो बारीक सारीक तपशील ते आपल्या साहित्यातून सपासप देतात. इतकी प्रचंड माहिती घरातून निघून गेलेल्या, कुटुंबी आयुष्याशी फारशी ओळख नसलेल्या या बालब्रह्मचाऱ्याने कोठून मिळविली याचे आश्चर्य वाटते. केवळ अध्यात्माची ओढ लागलेल्या भक्ताला ही माहिती करून घेण्यात कसले स्वारस्य आहे ? ही माहिती ते शोधीत आणि नोंदवीत मुद्दाम निघाले होते असेही नाही. प्रतिभा लाभलेल्या व्यक्तीला प्रपंचातील सुखदुःखे आणि तपशील, माणसाचे मनोव्यापार परोक्ष अनुभवानेही जाणता येतात. पण रामदासांच्या अनुभवाला अवलोकनाचा आधार आहे. तीर्थयात्रेच्या निमित्ताने साऱ्या भारतात त्यांनी भ्रमण केले. त्यांनी माणसातला देव पाहिला तसाच दानवही पाहिला. विकारांनी बेभान झालेली माणसे कोणत्या नीचतम पातळीवर उतरू शकतात याची अनेक दृश्ये त्यांना हलवून गेली. पोटाची भूक भागविण्यासाठी माणूस लाखमोलाचे आपले शील कवडीमोलाने सहज विकतो. हेही त्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिले. जीवनाचा अत्यंत उग्र व भीषण कलह समाजाच्या सर्व स्तरांत चाललेला पाहून रामदासांच्या अंतर्मनाला अनेक जखमा झाल्या असल्या पाहिजेत. ते मूलतःच चिंतनशील असल्यामुळे मानवी जीवनातली विविधता विचित्रता आणि विकृतता यांची चिकित्सा

करण्यात ते गढून गेले.

सृष्टीमध्ये बहुत लोक । परिभ्रमणे कळे कौतुक
नानाप्रकारीचे विवेक । आढळो लागती ( दासबोध १९-८ )

बारा वर्षांची तीर्थयात्रा करताना रामदासांनी जी लोकस्थिती पाहिली त्यामुळे त्यांच्या जीवनदृष्टीला नवनवीन धुमारे फुटले. ते अस्वस्थ झाले; अंतर्मुख झाले. त्यांच्या विचारसृष्टीत 'न भूतो' अशी खळबळ उडाली. वैयक्तिक मोक्षासाठी तपःसाधना करण्यापेक्षा, सामाजिक जीवनाच्या ज्या चिंधडया उडालेल्या त्यांना दिसल्या त्या पुन्हा एकत्र करून समाजाचे नवे वस्त्र विणता येईल काय याचा ते विचार करू लागले. माणसांनीच निर्माण केलेल्या अगणित समस्या सोडविण्याचा प्रयत्न करता येणे शक्य आहे काय याचा ते शोध घेऊ लागले. केवळ आत्मिक विचारांच्या वर्तुळात रममाण होणाऱ्या मनोवृत्तीशी रामदासांचे सख्य जुळणे कठीण होते. तुकारामांनीही 'बुडता हे जन न देखवे डोळा, म्हणुनी येतो कळवळा फार' असेच म्हटले आहे. रामदासांनी तुकारामांच्या तुलनेने जग अधिक पाहिले. जीविताचे चमत्कारिक खेळ भारतात सर्वत्र हिंडताना त्यांच्या डोळयांसमोर घडत होते. जिवंत मनाच्या विचारवंताला आपल्या डोळयांवर कातडे ओढून स्वस्थ बसता येत नाही. जी भीषण दृश्ये त्यांनी पाहिली, त्यांचे वर्णन ते करतात.

पदार्थ मात्र तितुका गेला । नुस्ता देशचि उरला ।
येण करिता ब्रहुताला । कष्ट जाले ॥
लोके स्थानभ्रष्ट जाली । कितेक तेथेचि मेली ।
उरली ते मराया आली । गावावरी ॥
माणसा खावया धान्य नाही । अंथरूण पांघरूण तेहि नाही ।
घर कराया सामग्री नाही । काये करिती ॥
काहीच पाहता धड नाही । विचार सुचेना काही ।
अखंड चिंतेच्या प्रवाही । पडिले लोक ॥
प्राणिमात्र जाले दुःखी । पाहता कोणी नाही सुखी ।
कठिण काळे वोळखी । धरीनात कोणी ॥ ( परचक्र निरूपण )

रामदासांनी या भयानक दुर्दशेचे विस्ताराने वर्णन केले आहे. समाजाला कोणी शास्ता वा नेता उरला नाही. अनेकविध मतांचा गदारोळ माजला आहे. कोणाचा पायपोस कोणाच्या पायी नाही. ही अवस्था सर्वच दृष्टींनी विपरीत होती.

ऐसे अवघे नासले । सत्यासत्य हारपले
अवघे अनायक जाले । चहुकडे
मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला
जो जे मती सापडला । तयास तेचि थोर ( १२.२ )

देशाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक अवनतीचे हे केविलवाणे दर्शन त्यांना

घडले. देवधर्माच्या क्षेत्रात तर अराजकच दिसले. जीवनातल्या उदात्त मूल्यांची विटंबना होत असताना लोक दीन होऊन स्वस्थ बसले आहेत. देव आणि धर्म यांच्यावर उघड उघड हल्ले होत असून देवमूर्ती, मंदिरे फुटत आहेत, कोसळत आहेत, विटंबिली जात आहेत याचा पडताळा तर साऱ्या देशात येत होता. धर्म-रक्षणाची आच कुणालाच दिसत नव्हती. स्त्रियांवरचे अत्याचार निमूटपणे सोसले जात होते, कसायाच्या सुरीखाली स्वस्थपणाने कोकराने मान द्यावी तशी बहुसंख्य जनता सत्ताधीशांच्या, परधर्मीयांच्या अन्यायापुढे वाकत होती, शरण जात होती. रामदासांना यापेक्षाही भयंकर अवस्था दिसली ती अशी की, अन्यायाला तोंड देऊन 'मारिता मारिता मरावे' ही क्षात्रप्रवृत्तीच समाजात कोठे उरलेली नाही. अत्या-चाराला शरण जाणारी लाचार, लोटांगणवादी, भेकड, नामर्द प्रवृत्ती समाजात मूळ धरून बसली आहे याची वेदना रामदासांच्या मनाला अधिक झालेली दिसते. ते पराकोटीचे विषण्ण झाले. सत्ताधारी अनेक वेळा उन्मत्त होतात, न्यायनीतीचा गळा दाबून टाकण्याइतके ते जुलूम-जबरदस्ती करतात. पण त्यांच्या या आसुरी प्रवृत्तीला कडकडून विरोध करणारी धर्मशक्ती जेव्हा फणा काढते तेव्हा अधर्म, अन्याय यांना मान वाकवावीच लागते. ही धर्मशक्ती, ही प्रतिकाराची उर्मी, मदांध सत्ता-धीशांना व देवधर्म संस्कृतीच्या शत्रूंना जरब बसवील अशी रगेल सत्त्वशक्ती कुठेच दिसत नव्हती. ती निर्माण करण्याची रामदासांना आवश्यकता वाटली. अन्यायाला केवळ शाब्दिक विरोध करून तो शमत नाही. त्याची नांगी कठोरपणे, धूर्तपणे ठेचली पाहिजे. त्याच्या नरडीचा घोटच घेतला पाहिजे. त्याशिवाय जीवनाचा प्रवाह शुद्ध होणार नाही. जीवन निरामय, धर्ममय, नीतिमय असे बनवायचे असेल तर, धर्म आणि नीतीला आव्हान देणारी सत्ता आपल्या भूमीतून उपटून फेकून दिली पाहिजे. ही रसरशीत, वीरत्वाचा परिपोष करणारी, कर्मवादी, आशापूर्ण विचारधारा आपल्या वाङ्मयातून अखंडपणे खेळविणाऱ्या रामदासांनी गलितगात्र झालेल्या महा-राष्ट्राला नवी जीवनदृष्टी दिली. महाराष्ट्रातला समाज आपली अस्मिता केव्हाच हरवून बसला होता. तो केवळ जगत होता. केवळ जगत राहणे, सत्ताधाऱ्यांच्या पायांशी लोळण घेत जगत राहणे यातच जीविताचे सार्थक आहे असे मानणारी, शेपूट हलवणारी 'श्व-वृत्ती' झपाट्याने देशात पसरत चालली आहे हे पाहिल्यावर रामदासांची स्वत्वभावना उफाळून आली. गीतेच्या तत्त्वज्ञानाचे स्तन्य प्यालेला हा वीर 'मळमळीत अवघेचि टाकावे, निःस्पृहपणे विख्यात व्हावे भूमंडळी' हा आदेश बाहू उभारून देण्यासाठी आणि लोकांत झगडण्याची शक्ती निर्माण करण्यासाठी धडपड करू लागला.

श्री रामदासांच्या जीवितविषयक तत्त्वज्ञानाची ही एक विशेषता मानावी लागेल. 'भूतां परस्परे पडो मैत्र जीवांचे', 'जे जे भूत ते ते जाणिजे भगवंत' ही मैत्रीची, सहानुभूतीची, भूतदयेची शिकवण ज्ञानेश्वर, तुकारामादी संतांनी उत्कटपणे दिली.

ती अत्यंत मौलिक आहे यात कसलाच संदेह नाही. रामदासांनीही आपल्या अनेक वचनांतून या विचारांचा पाठपुरावा केलेला आहे. पण अन्यायाशी सामना केलाच पाहिजे, नाहीतर तो फोफावत जातो व साऱ्या समाजातील सुंदर मूल्यांची मोडतोड करीत प्रतिष्ठित होतो म्हणून तो सहन करीत बसणे नामर्दपणाचे आहे. इतकेच नव्हे तर, अन्यायासमोर मान वाकवणे हे त्याला उत्तेजन देण्यासारखे आहे हे रामदासांनी झडझडून सांगितले. तेजस्वी, बलवती जीवनदृष्टीचा हा एक विशेष. व्यक्तीच्या, समाजाच्या, व राष्ट्राच्या जीवनात असा एखादा कालखंड काही वेळा यतो की, प्रतिकाराची ईर्ष्या मावळून जाते. लोचटपणाचे, लाजिरवाण्या लांगूल चालनाचे पर्व सुरू होते. गुलामगिरीच्या बेड्यांना अलंकार मानण्याचा शेळपट मूर्खपणा रुजू लागतो. अर्जुनसुद्धा नेभळ्याप्रमाणे न समजणारी तत्त्वे पांघरून रणांतून माघारी वळू लागतो. अशावेळी वीरश्रीचे रोमांच फुलवणारी खणखणीत विचारधारा लोकांपुढे ठेवण्याची जरूर असते.

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ।।
हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जीत्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ।।

गीतेचे जीवनविषयक तत्त्वज्ञान रामदासांच्या मनबुद्धीत खोलवर रुजलेले होते. स्वतःची ओळख विसरून गेलेल्या आणि धन्याने टाकलेल्या चतकोर तुकड्यावर गुजराण करीत राहिलेल्या या समाजाला जागृत करणे हेच रामदासाचे मुख्य जीवितकार्य होते. मृतकल्प मनात स्वाभिमानाची धग उत्पन्न केली तरच हा हिंदुसमाज तरेल, अन्यथा तो मरणाच्या पंथाला लागलाच आहे हे पाहिल्यावर त्याला भूतदयेची व सहिष्णुतेची शिकवण देणे केवळ चुकीचेच नव्हे, तर आत्मघातकीपणाचे आहे याची प्रखर जाणीव रामदासांना जशी झाली तशी अन्य संतांना तितक्या तीव्रतेने झाली नसावी. ज्या ब्राह्मणवर्गाकडे समाजाचे वैचारिक, धार्मिक व सांस्कृतिक नेतृत्व होते तो वर्गसुद्धा लाचारीतच जगण्यात कृतार्थता मानीत होता. त्याच्या जगण्याला कोणत्या मूल्यांचे अधिष्ठान होते ? मूल्यहीन जीवनाची त्याला खंत कोठे वाटत होती ? सर्वसामान्य लोक आपले अनुकरण करतात म्हणूनच सांस्कृतिक मूल्यांचा आपल्या जीवनात आदर करण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे हे भानही त्याला राहू नये याची चीड रामदासांना येते. तुकारामांच्या अभंगांतूनही तत्कालीन ब्राह्मणांच्या अधोगतीचे, दुराचाराचे चित्र स्पष्ट उमटले आहे. ' अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड, काय रांड प्रसवली ' अशा अत्यंत तीव्र शब्दांनी अधःपतित ब्राह्मणांची तुकारामांनी पूजा केली आहे. हा वर्ग धर्मसंस्कृतीचा, नीतिनियमांचा पालक समजला जात असे. वर्णव्यवस्थेत त्याला श्रेष्ठ स्थान दिलेले होते. पण संस्कृतीच्या या ठेकेदारांनी आपली संस्कृती बिनदिक्कत पायाखाली तुडवावी आणि भयावह असा

परधर्म कवटाळावा यापेक्षा समाजाच्या दुर्दैवी पतनाचे आणखी कोणते दुसरे चित्र असणार ? रामदासांच्या धर्मप्रेमी हृदयाला सहस्त्रावधी इंगळ्या डसल्या. त्यांच्या मनाची लाही लाही झाली पण या संन्याशाला रणांगणातून पळून जायचे नव्हते. त्याला समाजाचा संसार उभा करायचा होता.

साहेबास लोटांगणी जावे । नीचा सारिखे व्हावे
आणि देवास न मानावे । हे कोण ज्ञान
देव हरपला घरी । येक देव नेला चोरी
येक देव दुराचारी । फोडिला बळे
येक देव जापाणीला । येक देव उदकी टाकिला
येक देव नेऊन घातला । पायातळी
....ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले
गुरुत्त्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे
कित्येक दावकमलकास जाती । कित्येक पीरास भजती
कित्येक तुरुक होती । आपलें इच्छेने
तीर्थक्षेत्रे ती मोडिली । ब्राह्मणे स्थानभ्रष्ट जाली
सकळ पृथ्वी आंदोळला । धर्म गेला.

आत्मसन्मान, स्वधर्म, देव आणि संस्कृती यांच्या संरक्षणासाठी रामदासांनी मांडलेले विचार शाश्वत महत्त्वाचे आहेत. कोणत्याही काळात व परिस्थितीत या विचारांची आवश्यकता ओसरणार नाही. इतर संत महंतांच्या वाङ्मयात ही शक्तिवादी, प्रतिकारात्मक विचारसरणी नाहीं असे नाही. 'ज्ञानेश्वरी' तर गीतेवर भाष्य करण्यासाठीच लिहिली गेली. अर्जुनाला युद्धप्रवृत्त करणाऱ्या ओव्या ज्ञानेश्वरांनी समरसून लिहिल्या आहेत. एकनाथांच्या भावार्थ रामायणातही वीरवृत्तीचा गौरव आहे. 'दया तिचे नाव । भूतांचे पालन । आणिक निर्दालण । कंटकांचे ॥' या तुकोबांच्या अभंगात प्रतिकाराचा ओजस्वी संदेश आहेच. भागवत संप्रदायी संतांनी देश दुबळा केला. यांची विचारसरणी दुबळी होती अशा अभिप्रायाची जी टीका केली जाते ती समर्थनीय नाही. पण प्रचलित समाजस्थितीकडे, समाजातील अनेकविध उत्पातांकडे रामदास ज्या चौफेर दृष्टींनी पाहत होते व त्याची अनेकांगी मीमांसा एखाद्या राजकारणी विचारवंताप्रमाणे करीत होते. तशी चिकित्सा इतर संतांनी केली नाही हे त्यांच्या वाङ्मयावरून जाणवते. सृष्टीत ईश्वरभक्ती वाढवावी, नामस्मरणाचा महिमा विवरून सांगावा, मानवधर्माचे स्पष्टीकरण करावे हीच त्यांची भूमिका होती. देव, धर्म आणि संस्कृती यांच्यावरील हल्ल्यांचा संबंध राजकारणाशी आहे हे रामदासांनी जाणले होते. राजकारणाच्या माध्यमातूनच त्याला उत्तर दिले पाहिजे याची त्यांना जाणीव होती. राजधर्म व क्षात्रधर्म निरूपणावर त्यांनी अधिक भर दिला आहे.

मारिता मारिता मरावे । तेणे गतीस पावावे
फिरोन येता भोगावे । महद्भाग्य
....ऐसे अवघेच उठता । पायदळाची कोण चिंता
हरणे लोळवी चित्ता । देखत जैसा
मर्दे तकवा सोडू नये । म्हणजे प्राप्त होतो जय
कार्य प्रसंग समय । ओळखावा
देव मात्र उच्छेदिला । जित्या परीस मृत्यू भला
आपुला स्वधर्म बुडविला । ऐसे समजावे
मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा
ये विषयी न करिता तकवा । पूर्वज हासती
....देव द्रोही तितुके कुत्ते । मारुनि घालावे परते
देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाही

हा विचार रामदासांनी पुन्हा पुन्हा आपल्या ओजस्वी शैलीतून विवरून सांगितला आहे. क्षत्रिय वृत्तीमुळेच समाज स्थिर व संरक्षित होतो. क्षात्रधर्माची उपासना वाढल्यावर सध्याची निर्नायकी अवस्था दूर होईल, व क्षात्रगुणसंपन्न, धर्मरक्षक, ब्राह्मण्याची प्रतिष्ठा वाढवणारा राजा निर्माण होईल असे त्यांना वाटत होते. आक्रमणशीलता, संघटना, लोकसंग्रह या गोष्टींवर त्यांनी सतत भर दिला. रामदासांचे राजकारण हे धर्मरक्षणार्थ आहे. आज राजकारण या शब्दाचा ज्या अर्थाने आपण उपयोग करतो तसे राजकारण रामदासांनी केले काय या प्रश्नाबद्दल मतभेद आहेत. पण राज्ये शक्तीने रक्षिता येतात, युक्तीने वाढविता येतात आणि राज्यसत्ता ही संस्कृती व धर्म यांच्या संवर्धनासाठी असते, ती त्याच हेतूने राबविली जाते व जावी ही स्वच्छ, स्पष्ट भूमिका त्यांनी ' दासबोधा 'तून आणि अन्य ' प्रकरणांतून ' घेतली आहे. ते व्यवहारचतुर, ध्येयवादी, दूरदर्शी असल्यामुळे लोक कसे एकत्र करावेत व त्यांच्या मनाची भूमी कोणत्या विचारांनी शिंपावी याचे तपशीलवार विश्लेषण ते करतात. रामदासांच्या या प्रचार-विचारांतून तत्कालीन समाजात काही अंशी ध्येयाची जोपासना होऊ शकली. राजा व सरदार यांच्या व्यक्तित्वावर काही प्रमाणात परिणाम होऊ शकला असावा असे विधान करता येते. रामदासांच्या प्रतिभेला एक धर्मरक्षक राजा दिसला आणि त्याच्या महनीय गुणांचा त्यांनी आपल्या शब्दांतून यथोचित गौरव केला.

मराठी संतांच्या विचारांतून व वाङ्मयातून शिवाजी महाराजांच्या ध्येयवादीत्वाला, कार्याला आकार आला अशा आशयाचे विवेचन न्या. रानडे यांनी ' Rise of the Maratha Power ' या ग्रंथातून केले आहे. या मताला काही अभ्यासकांनी विरोध केला असला तरी शिवाजीसारखा न्यायी, ' निश्चयाचा महामेरू, बहुत जणांसी आधारू, अखंड स्थितीचा निर्धारू, श्रीमंत योगी । ' राजा एकाएकी उदय पावणे शक्य

नसते. त्याच्या उदयाला अनुकूल अशा वातावरणाची निर्मिती मराठी संतांनी केली या विधानात परिस्थितीचे तर्कशुद्ध विश्लेषण आहे. ज्ञानेश्वर ते रामदास या तीन साडेतीन शतकांच्या कालखंडात बहुधा साऱ्याच संतांनी धर्म आणि संस्कृती यांच्या जपणुकीचा वाढीचा विचार सतत मांडला आहे, या साऱ्या समाजाच्या मनावर या शिकवणीचा परिणाम काहीतरी होणार हे निश्चितच होते. रामदासांनी तर आपल्या वाणीचे व लेखणीचे सामर्थ्य केवळ याच विचारासाठी खर्च केले. हिंदुसमाज, त्याचा देवधर्म यासाठी त्यांनी अक्षरशः टाहो फोडला. त्यांचे समग्र साहित्य हा त्यांच्या समर्थ जीवन दृष्टीचा एक निखळ पुरावा आहे यात संदेह नाही.

समर्थ रामदासांनी कोणत्या प्रकारचे राजकारण केले या वादग्रस्त प्रश्नाचा येथे विचार करावयाचा नाही, पण ' सकल लोक-एक करावे ' ' गलीम निवडून काढावे ' ' अमर्याद फितवेखोर यांचा करावा संहार ' असे सांगणारा संत तत्कालीन राजकारणाकडे पाठ फिरवून बसला होता असे मानता येईल काय ? छत्रपती संभाजीराजांना रामदासांनी लिहिलेले पत्रच त्यांच्या मनःप्रकृतीवर अणि जीवनदृष्टीवर उत्तम प्रकाश टाकते. शेकडो शिष्यांचा त्यांनी समुदाय केला. अनेक मठांची स्थापना केली. महाराष्ट्र धर्माचा ध्वज फडकवून संघटना उभी केली. क्रांतिप्रवण विचार आपल्या रोकड्या स्पष्ट, सडेतोड शब्दांतून ठसठशीतपणे सांगितले. त्यांची विचारधारा प्रवृत्तीवादी आहे हे उघड आहे. पण असे दिसते की निवृत्तीला पोषक असाही भाग त्यांच्या वाङ्मयात कमी नाही. रामदासांची विचारसरणी प्रवृत्तीकडे अधिकांशाने पुढे पुढे झुकत गेली. जगाचे जसजसे व्यापक दर्शन त्यांना झाले तसतशी ही भूमिका तयार झाली, पण 'दासबोधात आणि विशेषतः ज्याचा उल्लेख 'जुना दासबोध' असा केला जातो त्यातील जीवनदृष्टी वैराग्यप्रधान व निराशावादी अशी आहे. प्रारब्धप्रधान अशीच आहे असे म्हणावे लागते. कोणत्याही विचारवंताच्या विचारात काही प्रमाणात परिवर्तन होणे अटळ असते. अनुभवांच्या कक्षा विस्तारत गेल्या, ज्ञानदर्शनात वाढ झाली, समाजमनात खोल डोकावून पाहण्याची संधी मिळाली की विद्वानांच्या जिवितविषयक दृष्टीत काही नवनवीन रंग येणे स्वाभाविकच असते. तुकारामांच्या व्यक्तित्वाचा विकास क्रमाक्रमानेच होत गेला. आरंभी ' अणुरणिया थोकडा ' असलेला तुका ' आकाशाएवढा ' झाला. रामदासांच्या मनाची, प्रतिभेची अशीच वाढ होत गेलेली त्यांच्या वाङ्मयात दिसते.

युक्ति नाही बुद्धि नाही । विद्या नाही विवेकिता
नेणता भक्त मी तुझा । बुद्धी दे रघुनायका
मन हे आवरेना की । वासना वावडे सदा
कल्पना धावते सैरा । बुद्धि दे रघुनायका ( समग्र ग्रंथ पृ. ४९७ )

' अनुदिनी अनुतापे तापलो रामराया ' असे म्हणून आपल्यापाशी विवेक नाही युक्ती नाही, बुद्धी नाही असे रामदास म्हणतात. हे शब्द वाच्यार्थाने घ्यायचे नाहीत. पण साधकाच्या अवस्थेत रामदासांची ' अचपळ मन माझे नावरे आवरिता ' अशी

काहीशी अवस्था झाली असावी. या काळात त्यांची जीवनदृष्टी सांकेतिक असावी असे मानायला प्रत्यवाय नाही. पण रामदास हे जसे समाजमनस्क वृत्तीचे होत गेले तसे त्यांचे व्यक्तिमत्त्वही गतिशील, विकसनशील बनले. जुना दासबोध वाचताना निवृत्तिवादी व केवळ परमार्थप्रवण अशा एका संताचे दर्शन घडते. मग असा प्रश्न पडतो की रामदास हे पराक्रमाला चालना देणाऱ्या प्रतिकारक्षम विचारधारेचे प्रवर्तक आहेत असे पूर्णांशाने म्हणता येईल काय ? दासबोधाच्या संदर्भात स्वतः त्यांनीच म्हटले आहे,

माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंतःकरणी
परी मी आहे जगज्जीवनी । निरंतर
आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतः सिद्ध
असता न करावा हो खेद । भक्तजनी

आत्माराम आणि दासबोध ही दोन निराळी काव्ये आहेत. पण यात व जुना आणि नवा दासबोध या ग्रंथात रामदासांच्या जीवनदृष्टीची काही अंशी परस्परविरोधी रूपे पाहायला मिळतात. कोणते रूप खरे ? या प्रश्नाचे गणिती पद्धतीने उत्तर देता येणार नाही. दोन्ही वेगळया वाटणाऱ्या विचारधारा एक होऊन वाहू शकतात. त्यात असलेला विरोध काहीवेळा आभासात्मक असतो; दुसरे असे की रामदासांनी आपल्या समग्र जीवनात व वाङ्मयात कोणत्या तत्त्वप्रणालीवर विशेष स्वरूपाचा भर दिला आहे व तो कितपत प्रभावी, उत्कट आहे याचाही विचार करणे आवश्यक आहे. समर्थांच्या या ' दासबोधा ' त मानवी देहाची परोपरींनी निंदा केलेली आढळते. जुन्या दासबोधात प्रपंचनिंदा आहे.

देहासी थोरपण आणिता । शीणची उरे तत्वता
देह विठाळाचे मूळ । देह अशुद्धाचा गाळ
देह नाना अनर्गळ । दुर्गंधीचा ओतिला ( जुना दासबोध ७'४४ )
देही असे नाना विकार । देह अत्यंत असारी असार
ऐसा तो हि क्षणभंगुर । अवचिता नासे
ऐशा मेघळयाचा अभिमान । माथा वाहती मूढ जन
वस्त्रभूषणे शृंगारून । मी थोर म्हणती

समर्थांनी क्षणभंगुर देहाची केलेली ही निंदा तत्त्वतः खरी आहे. देहाभिमानाच्या आहारी गेलेल्या अज्ञानी लोकांसाठी येथे त्यांनी शरीर कसे दुर्गंधयुक्त, रोगमय असते हे सांगितले आहे. शरीराचा शृंगार खोटा, अंतरात्म्याचा विचार आणि विकास हाच महत्त्वाचा हे निष्कर्ष काढताना समर्थांनी केलेली ही शरीर-निंदा आहे. नव्या दासबोधातली नरदेहविषयक विचारसरणी नेमकी उलट आहे. पण यात विसंगती आहे असे मात्र म्हणता येणार नाही. एक विवेकनिष्ठ संत मानवी जीविताचा, शरीराचा विचार भिन्न भिन्न पातळयांवर जाऊन तेथे करीत आहे, शरीर हेच अंतिम

सत्य आहे किंवा इहलोकी प्राप्त होणारी सत्ता व संपत्ती यापलीकडे दुसरे महत्त्वाचे तथ्य नाही असे मानणाऱ्या देहनिष्ठ विचारसरणीवर रामदासांनी टीका केली आहे. नव्या दासबोधातही माणसाला होणाऱ्या निरनिराळ्या रोगांचे इतके आळवून, घोळवून, विस्ताराने व बारकाव्याने वर्णन केले आहे की ते वाचताना वीट आल्याशिवाय राहत नाही, पण हाच हेतू तेथे विवेचकाच्या मनात आहे. शरीराचा, त्याच्या नाशवंतपणाचा, त्यात होणाऱ्या नानाविध विकृतींचा तिटकारा निर्माण करणे ही भूमिका केवळ निराशावादाची आहे असे म्हणता येणार नाही. हे शरीर कोणत्याही क्षणी रोगाच्या व मृत्यूच्या विळख्यात जाऊ शकते म्हणूनच त्याच्या साहाय्याने इहजीवनातील आपली श्रेष्ठतर स्वरूपाची कर्मे केली पाहिजेत असेच रामदासांना सुचवायचे आहे. त्यांचा मुख्य भर कर्तव्यबुद्धी जागृत करणे हा आहे. माणसांनी शरीराचा उबग येऊन त्याचा त्याग करावा, त्याच्याविषयी पूर्ण उदासीन राहवे असा हेतू निश्चितच नाही. नव्या दासबोधातील पुढील ओळी पाहाव्यात,

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो ।
जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीते ।।
या नरदेहाचिने आधारे । नाना साधनांचेनि द्वारे ।
मुख्य सारासार विचारे । बहुत सुटले
देह परलोकीचा तारू । नाना गुणांचा गुणागरू
नाना रत्नांचा विचारू । देहाचेनी ।।
जे जे देह धरूनि आले । ते ते काही करून गेले ।
हरिभजने पावन जाले । किती येके ।।
आत्म्याकरितां देह जाला । देहाकरिता आत्मा तगला ।
उभय योगे उदंड चालिला । कार्यभाग ।। १८.४–१२.

देह हे परलोकीचे तारू आहे. त्याचे अस्तित्व आत्म्यासाठी आहे ही दृष्टी लक्षात घेतल्यावर दोन्ही भूमिका परस्परविरोधी वाटत नाहीत.

प्रपंच आणि परमार्थ यांच्या संदर्भातले रामदासांचे विचार मात्र काही शंका निर्माण करतात. जुन्या 'दासबोधात' ते म्हणतात,

अरे जयासी परमार्थ व्हावा । तेणे प्रपंच त्यजावा
प्रपंची परमार्थ करावा । तो ठाकेना सर्वथा

पण 'नवा दासबोध' लिहिताना मात्र रामदासांच्या संसारविषयक दृष्टीत निश्चित अंतर पडलेले दिसते. प्रपंच आणि परमार्थ यांच्यात आत्यंतिक विरोध असून दोहोंचा समन्वय साधू पाहणारा दोन्ही बाजूंनी वंचित होतो असे त्यांचे मत होते. पण काही वर्षांनंतर लिहिलेल्या नवीन दासबोधात हा जुना विचार मागे पडला. ते म्हणतात,

प्रपंच नेटकेपणाने करण्याचा आणि त्या प्रपंचातच परमार्थ विचार मिसळण्याचा एक नवा युक्तिवाद समर्थ करतात. संसारी सावध असेल त्यालाच परमार्थ प्राप्त करता

येईल असा ठाम विचार नव्या ' दासबोधात ', आला आहे. खरे तर हे प्रपंच विज्ञान हेच दासबोधाचे मर्म आहे. प्रपंचाचे आणि प्रवृत्तीचे एक दृढ तर्कशुद्ध समर्थन त्यांनी केल्यामुळे रामदासांच्या परमार्थविचाराला कर्तव्याचे, प्रवृत्तिधर्माचे चिरेबंदी अधिष्ठान लाभले आहे. सांसारिक दुःखे आणि जीवनवृत्तीचा रडवा सूर संतांच्या वाङ्मयात अनेक ठिकाणी फार उंच स्वरात आळवलेला आहे. परमार्थाचे तुणतुणे तिन्ही त्रिकाळी माणसाच्या कानीकपाळी वाजवताना काही संत मंडळींनी कसलाही कंटाळा केला नाही. माणसे जगत होती. जगण्यासाठी काही व्यवहार उद्योग करीत होती. पण त्यांच्या जीवनप्रेमाचा पाया मात्र असल्या एकांगी आणि आत्यंतिक निवृत्तिवादी विचारांनी डळमळीत झाला होता. रामदासांनी हा पाया बराचसा मजबूत केला. त्यांचे हे कार्य अर्थातच समाजबांधणीला सत्ता मिळवण्याच्या प्रक्रियेला, शत्रूच्या निर्दालनाला पूरक, पोषक ठरले. प्रपंचविज्ञान मांडणारा संत व विवेकवंत हीच रामदासांची प्रमुख बिरुदे आहेत.

रामदासांच्या साधकावस्थेतील दृष्टिकोनात आणि ' नवा दासबोध ' लिहिण्याच्या काळातील वैचारिक भूमिकेत प्रगतीच्या व परिवर्तनाच्या खुणा स्पष्ट दिसतात. ' नित्य नवा दीस जागृतीचा ' अनुभवणाऱ्या संतांच्या जाणिवा अधिकाधिक व्यापक होत जाव्यात यात कसले आश्चर्य ? आरंभी रामदासांचे वैराग्य काहीसे एकदेशी होते. पण लोकस्थितीची विविध स्वरूपी दर्शने घडून जगाचा बरावाईट अनुभव चित्तात ठसल्यावर प्रपंच आणि परमार्थ, भोग व त्याग, व्यक्ती व समाज, मनुष्य आणि ईश्वर यांच्याकडे पाहण्याची दृष्टी पूर्वीइतकी मर्यादित राहणे शक्यच नव्हते. संसाराचा त्याग करावा आणि दिगंतराला निघून जावे हे मत आता उरले नाही. धर्म, संस्कृती देव, देश यांचे रक्षण हा व्यापक ध्येयवाद लोकांसमोर ठेवताना रामदासांनी आपली प्रारंभ काळातली भूमिका बदलली. ती बदलली म्हणूनच ते ' समर्थ ' ठरले. म्हणूनच त्यांना महाराष्ट्र धर्माची संस्थापना करता आली. मानवता, भूतदया ही तत्त्वे श्रेष्ठ खरी, पण ' गलीम निपटून ' काढताना व समाजाची गुढी पुन्हा उभारताना क्षात्रधर्माचा प्रचार करण्याची आवश्यकता होती. प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचा समतोल प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने रामदासी तत्त्वज्ञानाला फार महत्त्व आहे. रामदासांच्या आरंभ काळातील वाङ्मयातून संसारविषयक निंदेचे काही उतारे काढून अन्य संताहून त्यांची प्रपंचाची भूमिका निराळी नाही असे सांगण्यात येते. पण प्रवृत्ती, पराक्रम आणि पौरुष या मूल्यांवर त्यांनी दिलेली भर हीच मुख्यतः लक्षात घ्यावी लागते. खरे रामदास त्यातच सामावलेले आहेत. त्यांच्या जीवनदृष्टीचे वैशिष्टय व तेज त्यांनी आग्रहाने उत्कटपणे मांडलेल्या प्रवृत्तीच्या व समाजधर्माच्या विचारातच आहे. ऐहिक जीवनातील पुरुषार्थाचा डिंडिम रामदासांनीच प्रथम समर्थपणाने वाजवला व ऐहिकाभोवती परमार्थाचे संरक्षक वलय उभे करून महाराष्ट्राच्या सामाजिक धर्माला आकार देण्याचा प्रयत्न केला असे म्हणता येईल.

उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनांस शिकवावे
उदंड समुदाय करावे । परी गुप्तरूपे
महंते महंत करावे । युक्तिबुद्धीने भरावे
जाणते करुनि विखरावे । नाना देसी

संघटनेच्या माध्यमातून धर्मप्रचार समाजबांधणीचा प्रयत्न अलीकडच्या काळात रामदासांनीच केला, ' सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे । परंतु येथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे. ' आत्मिक व नैतिक बळाचे अधिष्ठान ठेवून या चळवळी जोमाने उभारण्याचा त्यांनी संदेश दिला. चळवळ बांधली. हे कार्य एका संन्याशाने आपल्या अंगावर घ्यावे याचे आश्चर्य वाटते. ' महाराष्ट्रधर्म ', ' मराठा ' हे शब्द रामदासांनी आकुंचित अर्थांनी योजलेले नाहीत. समाजजीवनाचा ओघ सतत राहावा, तो रुद्ध होऊ नये म्हणूनच त्यांनी प्रवृत्तीची दृष्टी दिली.

जनाचा प्रवाह चालिला । म्हणजे कार्यभाग आटोपला
जन ठायी ठायी तुंबला । म्हणजे खोटे

संत रामदासांच्या पुरुषार्थी, समर्थ जीवनदृष्टीची काही वैशिष्ट्ये विशद केल्यानंतर त्यांच्या जीवितविचाराला, तत्त्वप्रणालीला काही अंगभूत मर्यादा होत्या काय याचा विचार केल्याशिवाय ही चर्चा अपुरी ठरेल. या लेखाच्या प्रारंभीच अशा अभिप्रायाचे विधान केले आहे की, कोणाही समर्थ विचारवंताच्या, प्रतिभावंताच्या, क्रांतिकारकाच्या दृष्टीला अमर्याद काळ व जग दिसत नाही. आपल्या काळातील परिस्थितीच्या संदर्भात त्याच्या जीवनदृष्टीची घडण होत असते. काही मर्यादा समाजाच्या, परिस्थितीच्या आणि विचारवंतांच्याही असतात. कित्येक शतकांपूर्वी होऊन गेलेल्या ज्ञानवंतांनी जे विचार मांडले ते आजच्या संदर्भात जसेच्या तसे ताजे टवटवीत व उपयुक्त राहतील हे अर्थातच संभवत नाही. प्रत्येक कालखंडात मनुष्याच्या ज्ञानात नवनवीन भर पडतच जाते. जुने कालबाह्य ठरावे आणि जे अद्ययावत आहे, कालानुरूप आहे तेच स्वीकारले जावे हे अगदी स्वाभाविकच आहे. प्रत्येक श्रेष्ठ विचारवंत काही प्रमाणात शाश्वत महत्त्वाचे देऊ शकतो. पण त्याने दिलेले सारेच चिरंतन मोलाचे असते व ते जतन करून ठेवले पाहिजे अशी भाबडी समजूत करून घेण्यात अर्थ नाही. जनाचा प्रवाह वाहाता राहवा हे जितके सयुक्तिक आहे तितकेच ज्ञानाचा, विचारांचा प्रवाहही आपण सदैव वाहता ठेवला पाहिजे हेही तर्कशुद्ध आहे. रामदासांच्या विचारदृष्टीला दिसणारे क्षितिज विस्तृत होते. धर्म आणि संस्कृती यांच्या रक्षणासाठी व अभिवृद्धीसाठी त्यांनी अपूर्व स्वरूपाचे कार्य केले. ' देव मस्तकी धरावा । हलकल्लोळ करावा ' या उक्तीप्रमाणे त्यांनी अक्षरशः हलकल्लोळ केला. पण त्यांच्या समाजविषयक धारणांच्या संदर्भात काही वाद उत्पन्न होतात. रामदासांना अभिप्रेत असलेल्या समाजाची उभारणी परंपरागत भेदांवरच व्हावी असे त्यांना वाटत होते. वैदिक धर्माचा गाभा असलेली सनातन वर्णव्यवस्था त्यांना मान्य होती. तिचाच त्यांनी

अभिनिवेशाने आपल्या वाङ्मयात अनेक स्थळी पुरस्कार केला आहे. वर्णाश्रम धर्माला अवकळा आली, ब्राह्मणांचे सर्वस्व ओसरत चालले, क्षात्रवृत्तीला, ब्राह्मवृत्तीला ओहोटी लागली याबद्दल त्यांनी दुःख व्यक्त करून हा आश्रमधर्म पुन्हा सुप्रतिष्ठित व्हावा म्हणून सतत प्रयत्न केले. ब्राह्मण हा वर्णगुरू आहे. त्याचे स्थान व त्याचे महत्त्व त्याला समाजात पुन्हा लाभावे म्हणजे त्याच्या गुरुत्वाखाली हा समाज नीटस आकार घेईल, अशी दृढ धारणा आहे. त्यांचा 'दासबोध' साऱ्या समाजासाठी आहे. पण तो अधिकांशाने पुढारलेल्या प्रतिष्ठित वर्गाला अनुलक्षून आहे. समाज-नेतृत्वाची सूत्रे याच वर्गाच्या हाती मुख्यतः असल्यामुळे हा वर्ग कर्तव्यपरायण, धर्मनिष्ठ व्हावा अशी त्यांना आच होती. ब्राह्मण, क्षत्रियांना जागृत करून त्यांना दृष्टी देण्याची रामदासांनी धडपड केली. अर्थात या कार्याची त्या काळात गरज होतीच. पण त्यांचे साहित्य व कार्य उच्चवर्णीयांसाठी होते व ते त्या वर्गाची सीमा ओलांडून पुढे समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत गेले नाही. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम इत्यादी भागवतधर्मीय संतांची कविता सामान्य माणसापर्यंत-अगदी झोपडीतही जाऊन पोहोचली. याच्या कारणांचा शोध घेताना असे जाणवते की वारकरी संतांचे मुख्य उद्दिष्ट स्त्री शूद्रांचा – सामान्यांचा उद्धार हेच होते. दीन-अनाथांविषयी, पतितांविषयी करुणा ही संत-साहित्याची प्रधान प्रेरणा आहे. 'अवघियांपुरते ओसंडले पात्र' ही त्यांची प्रवृत्ती आहे. भक्तीच्या क्षेत्रात वारकरी पंथीयांनी ममतेचा पुरस्कार करून पांडुरंग हे सर्वांचे दैवत बनवले. तुकोबांच्या अभंगवाणीने शूद्रातिशूद्रांची दुःखे मुखरित केली. त्यांच्या आशा आकांक्षांना शब्द दिले. रामदासांच्या 'दासबोधात' व्यवहारनिरूपण, राजकारण, उत्तम पुरुष लक्षण, क्षात्रधर्म वगैरे अनेक विषय उत्तम रीतीने वर्णिले आहेत. पण जातीय आणि वर्णीय विषमतेमुळे माणुसकी व न्याय यांना वंचित झालेल्यांच्या वेदना त्यांत दिसत नाहीत. या विषयाचा विचारच तेथे अपेक्षित नाही. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचे प्रतिनिधीपण रामदासांनी फार सामर्थ्याने केले आहे.

समर्थ रामदासांच्या मनात शूद्रातिशूद्रांबद्दल अनुकंपा नव्हती असा अर्थ करणे मात्र पूर्ण चुकीचे ठरेल. ते म्हणतात,

भेटो कोणी येक नर धेड महार चांभार
त्याचे राखावे अंतर या नाव भजन ( करुणाष्टके–२१५ )

रामदासांचे मन हे संतांचे होते. सर्वांविषयीच त्यांच्या ठायी सद्भावना, आपुलकी असावी यात नवल नाही. ब्रह्माच्या ठायी कसला भेदभाव नाही याचेही त्यांनी प्रतिपादन केले आहे.

समर्थांची विचारसरणी सामाजिक दृष्टया प्रतिगामी आहे असा एक आक्षेप काही चिकित्सकांनी घेतला आहे. समर्थ रामदासांच्या प्रतिपादनात वर्णव्यवस्था, ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व इत्यादी उल्लेख अनेक स्थळी सुस्पष्टपणे आले आहेत. जन्मसिद्ध उच्च-नीचतेचे खंडन त्यांनी केले नाही. मनुष्य जन्माने उच्च असतो हा सनातन

दृष्टिकोन त्यांनी स्वीकारला व पुरस्कारिला.

गुरू तो सकळांशी ब्राह्मण । जऱ्ही तो जाला क्रियाहीन
तरी तयासीच शरण । अनन्य भावे असावे ॥ ५-१-६
जरी ब्राह्मण मूढमती । तरी तो जगद्वंद्य ॥

ब्राह्मणांविषयीचा हा विचार अत्यंत वादग्रस्त असून तो कोणाही विचारशील मनुष्याला पटणे कठीण आहे. ब्राह्मण हाच सर्वांचा गुरू करा ? तो अज्ञानी असला, क्रियाहीन असला तरीही त्याला अनन्यभावाने शरण जावे हा संदेश खरोखरच विलक्षण वाटतो. याचा अर्थ मनुष्य जन्मतःच श्रेष्ठ असतो. तो कर्महीन असला, मूढमती असला तरीही त्याचे जन्मजात श्रेष्ठत्व अबाधितच राहते. हा निष्कर्ष सयुक्तिक नाही. वारकरी पंथातील समतावादी विचार या तुलनेने पुष्कळच अधिक उदार व प्रगत आहे यात वाद नाही. संत तुकाराम 'यातिशूद्र' असला तरी आध्यात्मिक क्षेत्रात त्याचे शिष्यत्व रामेश्वरभटासारख्या ज्ञानी ब्राह्मणाने स्वीकारले. याचे महत्त्वपूर्ण कारण तपस्या आणि आत्मज्ञान यामुळे तुकाराम उच्च पदवीला पाहोचले होते. गुरूची जात कोणती हा विचार निरर्थक वाटतो. पण या संदर्भात रामदासांची मते आग्रही असून त्यांनी अभिनिवेशाने सांगितले आहे,

नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथे आचारचि बुडाला ।
वेदशास्त्रब्राह्मणाला । कोण पुसे ? ॥ १४-७-२९

ब्राह्मणांचे महत्त्व कमी होत आहे, त्यांचे गुरुत्व आता निःशंकपणे मानले जात नाही याची खंत त्यांच्या चित्तात होती असे स्पष्ट दिसते. तसे पाहिले तर वर्ण-व्यवस्थेचे समर्थन भागवत पंथीय संतांनीही केले आहे. या बाबतीत रामदासांनी वेगळे करून त्यांच्यावर टीका-टिप्पणी करण्यात स्वारस्य नाही. चातुर्वर्ण्यातील आचारपद्धती, ज्ञानेश्वर, एकनाथ इत्यादी संतांनी कधी अव्हेरली नाही. पण तरीही भक्तिमार्गात - अध्यात्माच्या दालनात जन्मसिद्ध विषमतेचा त्यांनी स्वीकार केला नाही. उलट त्या विषमतेविरुद्ध आवाज उठवून स्त्री-शूद्रांना आपल्या पंथात त्यांनी सन्मानाचे स्थान दिले. गुरूची पारख जातीय दृष्टिकोनातून नव्हे तर आत्मानु-भूतीच्या अधिकारातून केली जाऊ लागली. रामदासांना ही व्यवस्था संमत नव्हती असे दिसते. वस्तुतः समर्थ रामदासांच्या प्रतिपादनात व्यक्तिगत स्वार्थाचा लेशही नाही. एका उंच पातळीवरून ते समाजरचनेचा विचार मांडतात. पण ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्या परंपरागत जन्मजात उच्चत्वाला डंख लागू नये याची दक्षता त्यांनी घेतली. वर्णव्यवस्थेवरील त्यांचा विश्वास पराकोटीचा प्रामाणिक आहे. पण वर्णीय व जातीय विषमतेचे सामाजिक परिणाम किती गुंतागुंतीचे आणि अनिष्ट होतील व त्यातून समाज कधीच एकात्म, एकरस होऊ शकणार नाही याची कल्पना त्यांना आली नाही. आदर्श विचार केवळ त्यांच्या साहित्यात राहिले. सामाजिक विषमता बळावत गेली. वारकरी संतांच्या वाङ्मयात वर्णव्यवस्था तत्त्वतः मान्य करण्यात आली

असली तरी ही व्यवस्था विषमतेवर आधारलेली आहे अशी एक दुःखाची, उद्विग्नतेची लहर त्यांच्या मनातून व्यक्त झालेली दिसते. जातिव्यवस्थेची चौकट मोडून काढण्याचा विचार ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंत कोणाच्याही मनात येणे शक्य नव्हते. ज्ञानेश्वरांनीही अस्पृश्यतेचे समर्थन करून 'वर्णांमाजी छत्रचामर' असा ब्राह्मणांचा श्रेष्ठत्ववाचक उल्लेख केला आहे. नामदेव, चोखामेळा, तुकाराम इत्यादी कनिष्ठ वर्णीयांच्या साहित्यात विषमतेविरुद्ध आवेश आहे, आक्रंदन आहे, बंडखोरीची उर्मी आहे, आपल्या पदरात वेदशास्त्रांनी अन्याय टाकला याचे दुःख आहे. याचा परिणाम हे वाङ्मय सर्व सामाजिक पातळ्यांवरून माणसाच्या हृदयापर्यंत जाऊन भिडले. रामदासांच्या वाङ्मयाला खालच्या थरांतील माणसाच्या वेदनेचे अधिष्ठान लाभले नाही. हे एक ऐतिहासिक सत्य आहे. त्यांच्या जीवनदृष्टीची ही अंगभूत मर्यादा आहे.

समर्थ रामदासांचे महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सामाजिक इतिहासातील स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. एका वादळी कालखंडात हतप्रभ झालेल्या, स्वत्व आणि स्वाभिमान विसरत चाललेल्या, परधर्माच्या विळख्यात इच्छेने व अनिच्छेने अडकत चाललेल्या, गुलामी वृत्तीच्या मरगळलेल्या समाजाच्या जीवनात सांस्कृतिक अहंकाराची, धार्मिक अभिमानाची व राजकीय महत्त्वाकांक्षेची आणि स्वातंत्र्यप्रेमाची, ज्ञान व शक्ती यांच्या भक्तीची ज्योत पेटवण्याचे, असामान्य कार्य रामदासांच्या समर्थ वाणीने, लेखणीने आणि समर्थ जीवनदृष्टीने केले हे एक उज्ज्वल सत्य आहे.

□

# सामाजिक समता आणि संत

मराठी संतांचे साहित्य म्हणजे मराठी भाषेचे चिरंतन वैभव आहे यात काय संशय ? महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनावर संतांच्या साहित्याची व त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची प्रभावी मुद्रा उमटली आहे. ज्ञानदेवाची सुगंधित ओवी, नामया-तुकयाचा भक्तीनें उचंबळणारा गोड अभंग, एकनाथांची रसाळ गीते व गौळणी यांचे आजही मराठी मनाला जबरदस्त आकर्षण आहे हे निर्विवाद. काय असेल ते असो, पण ' ग्यानबा तुकाराम ' या नावात रोमांचित करण्याची एक शक्ती आहे टाळ-मृदुंगाचा नाद घेऊन जेव्हा संतांचा अभंग कानांवर येतो तेव्हा तो मनात उतरतो, सर्वांगात रुजतो. अंतःकरणाची जणू शुद्धी करतो. नास्तिकालासुद्धा भक्तीचा आनंद भरभरून देऊ शकतो. मराठी मातीशी साऱ्याच मराठी संतांचे एक अतूट नाते असे प्रस्थापित झाले आहे की, कित्येक शतके या नात्यातली गोडी कमी होणार नाही. भोळ्याभाबड्या समजल्या जाणाऱ्या संतकवींनी लिहिलेली कविता आजच्या ' आधुनिक ' मनुष्यालाही सहजपणे ओढून घेऊ शकते. आणि त्याच्या पाठीवरून आपला वत्सल हात फिरवीत विवंचनेने पोखरलेल्या त्याच्या चित्तवृत्तीला नवी चेतना देते हा चमत्कार नव्हे काय ? मराठी साहित्याला व जीवनदृष्टीला जीवनरस पुरवणाऱ्या संत वाणीचा व संत कार्याचा भिन्न भिन्न दृष्टीतून विचार होत राहिला आहे यातच या वाङ्मयाच्या महतीचे रहस्य आहे.

संत वाङ्मयाची आजपर्यंत पुष्कळ चर्चा झाली. स्तुतिस्तोत्रे गायिली गेली. टीकाग्रंथ लिहिण्यात आले. वादविवादांचे फड या विषयामुळे कितीतरी गाजले. या वाङ्मयाविषयी इतकी उलटसुलट मते मांडण्यात आली व अजूनही मांडली जातात की ती पाहून मनाचा गोंधळ उडतो. संतवाणी संबंधी चिंतन आणि चर्चा करणे हा खरोखरच एक न संपणारा विषय आहे. कुणाला हे वाङ्मय भाबड्या भाविकांच्या पलायनवादी वृत्तीचे द्योतक वाटले आहे. तर कुणाच्या दृष्टीने या वाङ्मयातूनच

शिवाजीची पराक्रमी समशेर आकाराला आली. कोणी धर्मशास्त्राच्या, कोणी समाजशास्त्राच्या तर कोणी साहित्यशास्त्राच्या चश्म्यांतून या वाङ्मयाकडे पाहतो आणि आपली विशिष्ट मते आग्रहाने मांडतो. पण गमतीची गोष्ट अशी की या वाङ्मयात अनेक रंग विखुरले आहेत. भक्ती, वैराग्य, ज्ञान, कर्माकर्म मीमांसा, भक्ताच्या मनातली तळमळ, आशानिराशा, उपदेश, महत्त्वाकांक्षा वगैरे नाना छटा त्यात पसरल्या आहेत. बाह्यतः हे वाङ्मय एकसुरी वाटले तरी त्यात अनेक सूर मुखरित झाले आहेत. भावनेने ओथंबलेल्या या काव्यात धर्म, नीती व समाज यांचेही स्पष्ट प्रतिबिंब पडले आहे. त्यामुळेच संत वाङ्मयाचे मूल्यमापन केवळ वाङ्मयीन कसोट्यांनी करणे चुकीचे ठरेल. तसे केले तर हे संतकवी म्हणतील, ' सद्‌गृहस्थहो, आम्ही साहित्यशास्त्राचे नियम आणि संकेत कधीच पाळले नाहीत. परमेश्वराविषयीच्या आर्त तळमळीनं आम्ही त्याला साद घातली आणि जे सुचले ते लिहिले. आम्ही वेडे वाकुडे गायिलो, टाळ-मृदंग एकीकडे आणि आमचे गाणे दुसरीकडे अशीच खरी स्थिती आहे. पण जे जे गायलो त्यात आम्ही आमचा आत्मा ओतला. आमच्या आत्म्याचा रंग-गंध या शब्दांत कुठे सापडला तर तो पाहा. या शब्दांत साहित्य आहे की नाही याची चिंता आम्हाला नाही.'

तयार फूटपट्ट्या घेऊन संत वाङ्मयाची उंची मोजता येणार नाही. कारण या साहित्यामागील प्रेरणा व्यापक व विशाल आहेत. वाङ्मयाच्या माध्यमातून देवभक्तीचा आणि माणुसकीचा उद्‌घोष संतांनी केला. रंजल्या गांजल्या जीवांना पोटाशी धरणारी श्रेष्ठ करुणा यात आढळते. मानवावर प्रेम करणाऱ्या वत्सल व्यक्तिमत्त्वाच्या स्पर्शाने हे साहित्य अनेक ठिकाणी उजळून निघाले आहे. म्हणून सांकेतिक समीक्षणाच्या दृष्टीने जो या साहित्याचा विचार करील त्याला त्याचा गाभा मुळीच सापडणार नाही. संतांच्या वाणीत केवळ भक्तीचीच भावना आहे असे म्हणता येणार नाही. कीर्तनाच्या रंगात नाचताना, विठ्ठल नामाचा उत्कटतेने घोष करताना समाजाची जाणीव संत कधी विसरलेले दिसत नाहीत. ते एकांतात असले तरी त्यांचे नाते लोकांताशीच आहे. त्यामुळे ते खऱ्या अर्थाने लोककवीच आहेत. त्यांचे प्रेम साहित्यापेक्षा माणसावरच आहे, माणूस आणि त्याला भोगावी लागणारी दुःखे हाच त्यांच्या काव्याचा केंद्रबिंदू आहे. त्यांचे कार्यही माणसाला माणुसकीचा प्रत्यय देऊन ममतेवर आणि समतेवर आधारलेली एक ईश्वरनिष्ठांची मांदियाळी निर्माण करण्याचे आहे. या व्यापक प्रेरणा लक्षात घेतल्याशिवाय त्यांच्या कार्याचे मूल्यमापन कसे करता येईल ?

संतांची दृष्टी मुख्यतः सामाजिक होती यात कसलीच शंका नाही. पण प्रश्न असा आहे की, त्यांना अभिप्रेत असलेली समाजरचना नेमकी कशी होती ? ते सर्वांभूती परमेश्वर पाहू शकत होते. समतावादाचा पुरस्कार त्यांनी आपल्या आचारविचारांतून सतत केला. ' जे जे भेटे भूत, ते ते जाणिजे भगवंत ' ही अत्यंत उदार-

दृष्टी आहे. ‘ भूतां परस्परे पडो, मैत्र जीवांचे ’ हा संदेश पराकोटीचा सात्त्विक, सुंदर आहे यातही शंका नाही. पण ‘ समता ’ या संज्ञेचा अर्थ कोणता व किती सीमेपर्यंतचा आहे याचा विचार केला पाहिजे. संतांच्या कार्याला अपरिहार्यपणे त्यांच्या काळाच्या व परिस्थितीच्याही मर्यादा पडलेल्या आहेत. काळाची आणि काळाशी बांधलेली समाजव्यवस्थेची कुंपणे कोणत्याही समाजपुरुषाला सर्वस्वी ओलांडता येत नाहीत. काही मर्यादा त्याच्या स्वतःच्याही असतात. हा सारा विचार केल्यावर संतांनी ज्या समतावादी, मानवतावादी समाजाचे स्वप्न रंगवले त्याचे स्वरूप काय होते हे पाहिले पाहिजे. एक गोष्ट मात्र निश्चित की, संतांनी काही प्रमाणात जुन्या रचनेला व संकेतांना बेधडक आव्हाने दिली आहेत. त्यांच्या कार्यावर आक्षेप घेणारे काही टीकाकार असे म्हणतात की, ‘ संत म्हणजे मध्ययुगीन मूल्यांचे केवळ पुरस्कर्ते होते. त्यांच्यापाशी नवी दृष्टी मुळीच नव्हती. जे जे जुने पुराणे आहे त्याचीच स्तुतिस्तोत्रे त्यांनी गायिली. नवी सामाजिक दृष्टी देण्यासाठी त्यांच्यापाशी स्वतंत्र प्रतिभा कुठे होती ? देवभक्तीचे तुणतुणे वाजवीत बसलेल्या निष्क्रिय भोळ्या-भाबड्यांना नवरचनेचे स्वप्न तरी कसे पडणार ? संत आता जुने झाले आणि त्यांचे विचारही तसेच जुनाट बनले. ’ अशी टीका करणाऱ्या लोकांना संतकार्याचे नीटसे आकलनच झालेले नाही. ‘ क्रांतिकारक ’ या संज्ञेचा आज जो अर्थ आपण करतो त्या अर्थाने संतांना कदाचित ‘ क्रांतिकारक ’ म्हणता येणार नाही. कारण जुन्याची पूर्णांशाने मोडतोड करून नव्याची उभारणी करण्याचा त्यांचा प्रयत्न नव्हता. पण माणसांच्या दुःखांची-पारतंत्र्याची आणि नैराश्याची काही मुळे आपल्या समाजव्यवस्थेत कशी खोलवर रुजलेली आहेत याची तीव्र जाणीव त्यांना केवळ निरीक्षणातून झाली होती असे नव्हे तर त्या अनुभवाच्या आगीत ते स्वतः होरपळले होते. अन्याय निमूटपणाने सोसायचा नसतो त्याविरुद्ध पुरुषार्थाने दंड थोपटले पाहिजेत हे भान त्यांना जरूर होते. ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयात ही जाणीव आहे. नामदेवातही आहे पण चोखामेळा आणि तुकाराम यांच्या काव्यात ती अधिक तीव्र, धारदार बनली आहे. ज्या भागवत संप्रदायाचे हे उपासक आहेत त्या संप्रदायानेच समतेला आपल्या तत्त्वज्ञानात महत्त्वाचे स्थान दिले आहे.

भागवत संप्रदाय हा वैदिक धर्मांतर्गत असा पंथ असला तरी हा एक बंडखोर वृत्तीचा व मानवी समतेवर निष्ठा ठेवणारा उदार दृष्टीचा संप्रदाय आहे. भगवान बुद्धानंतर निदान महाराष्ट्रात तरी मराठी संतांनी समतेची चळवळ सुरू केली याबद्दल वाद होऊ नये. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर समतावादी होते. पण या पंथाला भागवत संप्रदायाच्या तुलनेत फारसे यश लाभले नाही ही एक ऐतिहासिक घटना आहे. वारकरी संतांनी भक्तीच्या आवेगात भजन कीर्तने करून टाळ कुटीत नामघोष जरूर केला असेल पण ते क्रियाशून्य भक्त होते आणि सामाजिक घडणीशी त्यांचा काही संबंध नव्हता असे मानणे निखालसपणे अज्ञानाचे ठरणार आहे. वैदिक संस्कृतीचे

समाजशास्त्र विषमतेवर आधारलेले आहे याची दुःखद जाणीव त्यांना जन्मभर टोचत होती. विषमता आणि अहंकार यावर उभारलेली समाजरचना माणसामाणसांत भद करीत होती याचा अनुभव स्वतः संतांनाही येतच होता. वैदिक परंपरेच्या छत्राखाली माणसाचो एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे वाढ होत नाही. कारण चातुर्वर्ण्यांत त्याचे स्थान जन्मानेच ठरलेले असते. समतेचा आचारविचार वर्णाधिष्ठित व्यवस्थेत मुळातच नसल्यामुळे जन्माच्या अपघाताने मनुष्य एखाद्या वर्णाशी आणि जातीशी कायमचा जखडला जात असे. ही परंपरा कमालीची कर्मठ, जडव चिरेबंदी असल्यामुळे समतेची शीतल झुळूक का तटबंदीच्या पलीकडे पोहोचू शकत नव्हती. बहुसंख्य लोकांच्या पायात या व्यवस्थेने जणू साखळदंड अडकवले होते. लक्षावधी स्त्री-शूद्रांना जवळ करण्याची आणि त्यांच्या पराधीन क्षुद्र आयुष्यात चैतन्य निर्माण करण्याची काहीच आवश्यकता या संस्कृतीला वाटली नाही. ही माणसे कशीतरी खुरडत होती. कशीतरी जगत होती आणि अखेर मरून जात होती. त्यांची कदर करण्याइतकी सवड वैदिक ऋषीमुनींना नव्हती. ते वर्णव्यवस्थेचे गोडवे आपल्या उच्च स्वरांत गात होते. माणसाच्या जन्मजात श्रेष्ठ-कनिष्ठपणाचा हिशेब आपल्या पद्धतीने करीत होते. देव, धर्म, संस्कृती आणि साहित्य ही सारी क्षेत्रे वर्णीय उच्चतेच्या बळावर काही थोड्या लोकांनी शतकानुशतके आपल्या ताब्यात ठेवली होती. सर्वांचा पालनकर्ता परमेश्वर सुद्धा आपण ठरवून दिलेल्या चौकटीतच त्यांनी कोंडून ठेवला होता. पण भागवत संप्रदाय उदयाला आला आणि परिस्थितीत बदल होऊ लागला. भक्ती ही विषमतेला विरोध करून समतेचा पुरस्कार करणारी एक प्रगतिशील, बंडखोर शक्ती आहे हे सिद्ध होऊ लागले. माणसाच्या ठायी असलेल्या नानाविध सामर्थ्यांना ही शक्ती चालना देऊ लागली. ज्या भक्तीचा डिंडिम मराठी संतांनी उत्कटतेने वाजवला ती भक्ती म्हणजे पळवाट नव्हे. भक्तीचा संबंध मनुष्याच्या आंतरिक प्रेमाशी आणि वात्सल्याशी असतो. भक्तीचा एक किरण सामान्य मनुष्याच्या हृदयात पडला की, त्याच्या साऱ्या व्यक्तित्वाला आणि जीवनदृष्टीला उजळून काढण्याची किमया तो करू शकतो. हेच भागवत संप्रदायाने सिद्ध केले. ज्ञानेश्वरांसारख्या एखादा विदग्ध पंडित आणि चोखामेळासारखा एखादा वर्णव्यवस्थेत सर्वात खालच्या पायरीवर उभा असलेला अज्ञानी महार भक्तीच्या लाटेने एकत्र येऊ शकतात हा चमत्कार मराठी संतांनी सातशे वर्षांपूर्वी दाखवला नाही काय ? संतांची भागवतपरंपरा वैदिकांच्या विषमतावादी प्रवृत्तीला तीव्रतेने विरोध करीत राहिली म्हणूनच आज हिंदू धर्माला सर्वसंग्राहक आणि सर्वसमावेशक असे म्हणवून घेण्याचा काही प्रमाणात तरी अधिकार मिळाला. संतांचे समाजशास्त्र हे वैदिकांच्या समाजशास्त्रापेक्षा निःसंशय किती तरी पुरोगामी आहे. भक्तीच्या बळावर मुक्तीची सनद झोपडीतल्या शूद्रांच्या, अतिशूद्रांच्या हाती सहज देणाऱ्या संतांच्या भागवत धर्माने हिंदू समाजाच्या रक्षणाचे कार्य फार खंबीरपणे केले आहे

याचे भान आपण ठेवले नाही तर संत कार्याचा नीट उलगडाच होणार नाही. कित्येक शतके ज्याला आपण 'हिंदू समाज' म्हणतो तो समाज काय होता? समाजाचे समाजपणच मुळात काही उरले होते काय? खरे सांगायचे तर येथे अनेक प्रकारचे लहान लहान आणि परस्परांहून आपण फार वेगळे आहोत असे मानणारे व वेगळेपणा अहंकाराने जपून ठेवणारे गट होते. प्रत्येकाच्या निष्ठा आकुंचित होत्या. वर्णांनी आणि जाती-पोटजातींनी तुकडे तुकडे झालेला हा दुबळा हिंदूसमाज आपल्या हिंदुत्वाचे आणि समाजपणाचे कसे काय रक्षण करू शकत होता कोण जाणे? समाजात एकात्मता, संवादित्व काहीच उरलेले नव्हते. विषमतेला पोसणाऱ्या वैदिक समाजशास्त्राला बाजूला सारून संतांनी सामान्य माणसाला पोटाशी धरून त्याला प्रतिष्ठा देण्याचा जो प्रयत्न केला तो ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचा नव्हे काय? वर्णव्यवस्थेत तुमचे स्थान खालचे की वरचे हा प्रश्नच गैरलागू आहे असे स्पष्ट प्रतिपादन भागवत संप्रदायी संतांनी समाजाच्या सर्व स्तरांत जाऊन केले तेव्हा सामान्यांच्या समाजात जणू स्वातंत्र्याची, आत्मप्रतिष्ठेची नवी पहाट फुलून आली. आपला आध्यात्मिक गुरूसुद्धा कोणत्याही जातीचा असला तरी चालतो. कारण जातीपातींचे अडसर महत्त्वाचे नाहीत ही संतांची भूमिका त्या काळात बंडखोरीची होती यात काय संशय? त्यांच्या गुरुपूजेत आध्यात्मिक अधिकारात पारंपरिक जातिकल्पनेला थाराच नाही. ब्राह्मण्य आणि शुद्रत्व ही दोन्हीही येथे निरर्थकच मानली गेली. या संदर्भात तुकोबांनी म्हटले आहे.

अभक्त ब्राह्मण जळो त्याचे तोंड
काय त्यासी रांड प्रसविली।
वैष्णव, चांभार धन्य त्याची माता
शुद्ध उभयतां कुळ याती॥
ऐसा हा निवाडा झालासे पुराणी
नव्हे माझी वाणी पदरीची।
तुका म्हणे आगी लागी थोरपणा
दृष्टी त्या दुर्जना न पडो माझी

कुळ, जाती आणि वर्ण यांचा बडेजाव कमी करून आंतरिक भक्तीच्या अधिकारावर ईश्वरप्राप्ती होऊ शकते हे तत्त्वज्ञान साऱ्या समाजात पेरण्याचे श्रेय सर्वार्थांनी संतांचे आहे. जन्माधिष्ठित उच्चनीचपणाच्या कल्पनेला त्यांनी सुरुंग लावला आणि माणसाचे श्रेष्ठपण त्याच्या अंतःकरणातल्या भक्तीवरच अवलंबून आहे असे पुन्हा पुन्हा प्रतिपादन करून ब्राह्मण्यांचा अहंकार मोडून काढला. हे कार्य सामान्यस्वरूपाचे आहे काय?

सातशे वर्षांपूर्वी चंद्रभागेच्या वाळवंटावर ज्ञानेश्वर नावाचा ब्राह्मण ( संतांना जात असते काय? होय असते. त्यांनासुद्धा जातीच्या पाशात गुरफटून टाकणारी मनोवृत्ती

आजही आढळते ) आणि चोखामेळा नावाचा महार नामसंकीर्तनाच्या आनंदात दंग होऊन एकमेकांना उराउरी भेटत होते. नामदेवाच्या कीर्तनात सर्व जाती, पंथांचे लोक सामील होत होते. त्यांत कोणी उच्च नव्हता, कोणी नीच नव्हता, ' अवधियांपुरते ओसंडले पात्र ' अशी अवस्था होती. भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन नाचणाऱ्यांत माळी, कुंभार, न्हावी, सुतार, सोनार, चांभार महार, ब्राह्मण आणि मराठे सारेच होते. आपल्या जाती आणि आपली समाजरचनेतली स्थाने विसरून विठ्ठलाचा नामघोष करीत बेभानपणे नाचत होते. चंद्रभागा वाहात होती. आणि तिच्या तीरावर जमा झालेली लोकगंगा भेद विसरून वाहात होती. भक्तीच्या क्षेत्रांत साऱ्यांच्याच जाती आणि पाती तात्पुरत्या का होईना पण गळून पडल्या होत्या. ते केवळ भक्त होते. साऱ्यांनाच भक्तीचा ताम्रपट मिळाला होता. सामाजिक विषमतेच्या अखंड टोचणीने गांजून गेलेली त्यांची मने भक्तीच्या प्रदेशात स्वातंत्र्याचे आणि समतेचे सुख चाखत होती. ' म्हणौनि कुळजातिवर्ण । हे आघवेचि गा अकारण । येथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ' ।। ज्ञानेश्वरांनी आणि सर्वच संतांनी ही स्पष्ट भूमिका घेऊन माणसाच्या माणूसपणावर शिक्कामोर्तब करून टाकले. प्रा. श्री. म. माटे यांच्या मते, ' ही महाराष्ट्रातली पहिली यशस्वी क्रांती आहे. ' येथूनच लोकशाहीच्या तत्त्वाला आरंभ झाला असे त्यांना वाटते. काही प्रमाणात माटे यांचे हे विश्लेषण मान्य करण्यासारखे आहे. ' क्रांती ' हा व्यापक शब्द कदाचित या घटनेला उद्देशून योजता येणार नाही. पण अठरापगड जातीजमातींचे लोक एका झेंड्याखाली प्रचंड उत्साहाने एकत्र येतात. आणि एकाच सुरात परमेश्वराचा घोष करीत आनंदाने नाचतात व गातात हे दृश्य अत्यंत विलक्षण नव्हे काय ? महारमांगाची सावलीसुद्धा अंगावर पडू नये म्हणून दक्षता घेणारे स्पृश्य लोक आपापले अहंकार विसरतात आणि चोखामेळ्याच्या सुरांत आपला सूर मिसळून देतात. या घटनेचे वर्णन कोणत्या शब्दांनी करावे ? भक्तीच्या या बाजारपेठेने कर्मकांड,, तीर्थयात्रा, यज्ञयाग यांचे प्रस्थ कमी झाले. वारकऱ्यांचा हा भागवतपंथ साऱ्या अकुलीनांना, उपेक्षितांना आपल्यात सामावून घेऊ शकला. जातिव्यवस्थेत खालच्या पायऱ्यांवर उभ्या असलेल्या अपमानितांच्या मनातला न्यूनगंड नाहीसा करून हिंदू समाजाशी त्यांना अधिक दृढतेने जोडण्याचे कार्य यामुळे संत करू शकले. बहुसंख्य लोकांच्या जड, अगतिक झालेल्या जीवनाला व मनाला एक नवी चालना मिळाली. आश्चर्याची गोष्ट अशी की साऱ्याच जातीतल्या या सामान्य लोकांनी भक्तीच्या अभिनिवेशात साहित्याची निर्मिती करून मराठी साहित्याला एक नवा जिवंत प्रवाह मिळवून दिला. आपणही लिहू शकतो, आपणदेखील गाऊ शकतो. आपल्याही अंतःकरणातली भावफुले सुगंधाचा सडा शिंपू शकतात, आपल्याही व्यक्तित्वाला सामर्थ्याचा स्वर मिळू शकतो, आपल्याही एकतारीवर नवी कविता मुखरित होऊ शकते, आपली भक्तीसुद्धा ईश्वराला आमंत्रण देऊ शकते, आपल्याही आयुष्याच्या अणूरेणूत परमात्मा सामावला जातो. हा एक विलक्षण आत्मप्रत्यय

आल्यामुळे चोखामेळा आणि जनादासीसुद्धा नवनिर्मिती करू लागले. उच्चवर्णीयांनी वाङ्मय लिहायचे आणि त्यांनीच ते वाचायचे हा संकेत बाजूला सारून सामान्य माणसेही स्वतंत्रपणे लिहू लागली. कथाकीर्तन करू लागली. त्यांचा न्यूनगंड निरसून गेला. ' मज विश्वंभर बोलवीतो ' हा विश्वास मनीमानसी उद्गंबळून आल्यावर वाणीला नव्या तेजाची धार आल्याशिवाय राहात नाही. भक्तीच्या भावनेने भारलेल्या या साहित्यात सामान्य माणसांच्या व्यक्तित्वाची, आशाआकांक्षांची अनेक रूपे दृष्टीला पडतात. अभ्यासिकेत बसून, ' घटपटाची ' चर्चा करीत या साहित्याची निर्मिती झाली नाही. समाजात वावरताना, काबाडकष्ट करताना जीवनातल्या दुःखांना सामोरे जाताना आणि परमेश्वराचे अनन्यभावाने स्मरण करताना जे हृदयात दाटून आले ते बोल त्यांनी लिहिले. सामान्य माणूस जेव्हा साहित्याचा निर्माता होतो तेव्हा ते साहित्य झोपडीपर्यंत सहज पोहोचते. ' वेडेवाकुडे गाईन, परि तुझाच म्हणवीन ' या विश्वासातून उमटलेले संतांचे बोल ' आर्ष ' साहित्यात समाविष्ट झाले हा एक चमत्कारच नव्हे काय ? साधारण आणि उपेक्षित दलितसमाजात ही परिवर्तनाची लाट उसळून आली. ' फोडू कळिकाळाचे शिर ' हा प्रत्यय आला. भक्तीच्या दालनात सर्वांनी एकत्र यावे व आपल्या अंतःकरणप्रवृत्तीला अनुसरून लिहावे ही घटना सामाजिक दृष्टया क्रांतिकारक वाटावी अशीच नाही काय ? सात शतकांपूर्वीचा समाज केवळ परंपरापूजक होता इतकेच नव्हे तर संकेताचा किंचितही भंग त्याच्या दुराग्रही प्रवृत्तीला मानवण्यासारखा नव्हता. पण तरीही भिन्न भिन्न जातीतील लोक भक्तीच्या क्षेत्रात एकरस होतात हे एक महत्त्वपूर्ण परिवर्तन मानावे लागते. या अवस्थेला आध्यात्मिक लोकशाही अशी संज्ञा देणे काही जणांना अतिशयोक्तीचे वाटते. कारण लोकशाही हा शब्द पुष्कळच व्यापक अर्थानं आपण योजीत असतो. तथापि जातीपातींच्या आकुंचित निष्ठा बाजूला ठेवून भक्ती नावाच्या मूल्यासाठी माणसे परस्परांत मिसळून जातात व भक्तीच्या माध्यमातून मानवी एकतेचा विचार उद्घोषितात. यात एकप्रकारचे बंड आहे हेच खरे. संतांचे हे सामाजिक कर्तृत्व काळाच्या संदर्भात लक्षणीय स्वरूपाचे वाटते. त्यांची दुसरी सामाजिक महत्त्वाची कामगिरीसुद्धा अभिमानास्पद आहे. संतांनी जनसामान्यांच्या मायबोलीला साहित्याची श्रीमंती आणि अस्मिता प्राप्त करून दिली. भाषेतूनच साहित्य आणि संस्कृती फुलत जाते. प्रादेशिक एकात्मतेच्या मुळाशी भाषाच महत्त्वाची असते. ज्या भाषेत आपण आपले प्रेम, राग, लोभ, आपल्या कामना-कल्पना सहजपणे व्यक्त करतो तीच भाषा जेव्हा साहित्यनिर्मितीची भाषा बनते तेव्हा सांस्कृतिक सूत्र मळकट बनत जाते. आपल्या मायबोलीतून अध्यात्म आणि तत्त्वज्ञान यांचे निरूपण करणारे संत सामान्य माणसांची बोलभाषा सुप्रतिष्ठित करू शकले. एका सूत्रात सारा समाज गोवण्याची ही किमया संतांनी केली नसती तर त्यांचा समाजजीवनाशी फारसा संबंध उरला नसता.

संतांनी क्रांती केली असे मानले तर तिचे स्वरूप हे असे आहे. पण येथेच एक प्रश्न उपस्थित करता येतो. त्यांना मूलभूत सामाजिक क्रांती अभिप्रेत आहे काय ? भक्तीच्या दालनात नवी, निर्मितिशील बंडखोर पाऊले उमटवणाऱ्या संतांना सामाजिक जीवनात खरोखरच बदल व्हावा आणि जातिव्यवस्थेची ही जुनाट कुंपणे पार उध्वस्त करावीत असे वाटत होते काय ? आध्यात्मिक लोकशाहीच्या या निर्मात्यांना एक नवा, समतेवर आधारलेला समाज खरोखरच पाहिजे होता काय ? या प्रश्नांचा विचार करताना मात्र संतांच्या अपुऱ्या कार्याबद्दल व दृष्टिकोनाबद्दल विषण्णता वाटल्याशिवाय राहात नाही. खरे तर या संतांनी मुळातल्या जखमेची निःपक्षपाती दृष्टीने नीट चिकित्सा केलीच नाही. जखम शतकानुशतके वाहातच आहे. तिच्याकडे सहानुभूतीच्या डबडबलेल्या डोळ्यांनी त्यांनी पाहिले. पण ही सहानुभूती हळवी आणि दुबळी होती. डोळ्यांतले अश्रू माणसाच्या हृदयाची व करुणाबुद्धीची साक्ष देतात. कोणताही सामाजिक बदल केवळ करुणेतून होऊ शकत नाही. सांकेतिकतेच्या विरुद्ध संहारक शक्ती उभी राहिल्याशिवाय क्रांतीला आकार येत नाही. संतांनी तर देवाघरीचा न्याय आपण मानलाच पाहिजे अशी अगतिका बोलून दाखवली. म्हणूनच त्यांच्या प्रगतिवादित्वाला मुळातच काही ठळक मर्यादा पडलेल्या आहेत. त्यांचे पुरोगामित्व केवळ अध्यात्माच्या दालनातच विशेषपणे दिसले. प्रत्येक प्राणिमात्रात परमेश्वर भरून उरला आहे असे मनःपूर्वक मानणाऱ्या संत मंडळींनी सामाजिक जीवनातल्या जीवघेण्या विषमतेला मनःपूर्वक आशीर्वाद दिला याचे आश्चर्य वाटते हा काय प्रकार आहे ? याचा अर्थ इतकाच करावा लागेल की शेकडो वर्षांच्या चरत गेलेल्या जखमेवर संतांनी आपल्या करुणाबुद्धीच्या, भूतदयेच्या मलमपट्ट्या मात्र लावल्या, सामाजिक क्रांतीची दृष्टीच मुळात संतांना नव्हती काय ? हा प्रश्न मात्र काहीसा कोड्यात टाकणारा आहे. आमूलाग्र समाजक्रांती संतांना नकोच होती. त्यांना काही बाह्य बदल मात्र हवे होते. जाती आणि वर्ण यांची सनातन व्यवस्था ढासळून टाकावी व एक नवी उभारणी करावी ही भूमिकाच त्यांची नव्हती. उलट अशी भूमिका घेणाऱ्या तत्त्वज्ञानाला त्यांचा प्रामाणिक विरोध आहे.

पंढरीच्या वाळवंटात ज्ञानेश्वर, नामदेव आणि चोखामेळा हातात हात धरून कीर्तनप्रवचनात रंगले असतील यात शंका नाही. पण कीर्तन संपवून विठ्ठलाच्या मंदिरात प्रवेश करताना मात्र चोखामेळ्याचे महारपण त्याच्या आड आले. विठ्ठल-दर्शनाचा ध्यास घेऊन टाहो फोडणाऱ्या या संताला अखेरपर्यंत मंदिरात प्रवेश मिळाला नाही. हा ‘ अस्पृश्य ’ संतकवी जिवाच्या आकांताने साऱ्यांना सांगत होता,

ऊस डोंगा परि रस नव्हे डोंगा ।
काय भुललासी वरलिया सोंगा ॥
चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा ।
काय भुललासी वरलिया सोंगा ॥

पण 'वरलिया सोंगा' लाच महत्त्व देणारी आमची प्राचीन परंपरा विषमतेला घट्ट कवटाळून बसली होती. तिला आव्हान द्यावे आणि सामाजिक व्यवहारात माणसाच्या कुळजातीवर्णाला झुगारून द्यावे असे कोणत्याच संताला वाटलेले नाही. अनेक 'अकुलीन' 'अस्पृश्य' समजल्या जाणाऱ्या श्रेष्ठ संतकवींनी मराठी वाङ्मयात आपल्या अनुभवांची भर घालून ते समृद्ध केले आहे. या कवींच्या मनाला जे सामाजिक दुखणे जडले होते त्याची तीव्र वेदना त्यांच्या काव्यातून उमटली आहे. चोखामेळा म्हणतो,

एकासी कदान्न एकासी मिष्टान्न । एका न मिळे कोरान्न मागतांचि ॥
एकासी वैभव राज्याची पदवी । एक गावोगावी भीक मागे ॥
हाचि न्याय तुमचे दिसतो का घरी । चोखा म्हणे हरि कर्म माझे ॥
विठोबा का न कळे तुम्हां । सर्व जगाचा तू आत्मा ॥
पुराणपुरुष परमात्मा । आत्मा दीना उपेक्षसी ॥
पहा न्याय नाही तुमचे घरी । एका दुःख एक राज्य करी ॥
ऐसी नीत नव्हे बरी । साजे थोरी थोरपणे ॥

माणुसकीला कालिमा फासणारी जातीय विषमता त्यांच्या अंतःकरणाला जन्मभर जाळीत राहिली. प्रसंगविशेषी तिच्याविरुद्ध त्यांनी आवाजही उठविला. पण आवेश ओसरला की, 'ही वर्णव्यवस्था आणि समाजरचना हे ईश्वरी देणे आहे ते आपण तक्रार न करता निमूटपणाने स्वीकारलेच पाहिजे कारण हा आपला सनातन धर्म आहे ही आपली ऋषिप्रणीत परंपरा आहे, ती मानण्यातच आपले हित आहे. मागील जन्मीचे पाप म्हणून आपण खालच्या जातीत जन्माला आलो. आता जात पुसणे शक्यच नाही' असा दुबळा नकारात्मक विचार या भागवतधर्मी संतांनी करावा ही घटना महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाला भूषणास्पद नाही. जे धाडसी पाऊल त्यांनी आध्यात्मिक क्षेत्रात जिद्दीने उचलले ते तसेच सामाजिक क्षेत्रात कणखरपणे पडले असते तर आमच्या समाजाचा इतिहास आज वेगळाच झाला असता. पण जे घडलेच नाही त्याचा विचार करण्यात काय अर्थ आहे? आपल्या जातिव्यवस्थेला हजार हत्तींचे बळ लाभले आहे. तिला कडकडून विरोध करण्यापेक्षा तिच्याशी जमवून घेणे हेच संतांना अधिक सयुक्तिक वाटावे यात त्यांच्या परंपराप्रेमाची आणि वैचारिक दौर्बल्याची साक्ष पटते असेच विधान खिन्नतेने करावे लागते. मानव्याचा अवमान करणारी ही विषमतामूलक जातिव्यवस्था उखडून फेकून देण्यासाठी कित्येक समर्थ हाथ पुढे आले होते असा इतिहास आहे. महावीर आणि बुद्ध, बसवेश्वर आणि चक्रधर यांनी आपले सामर्थ्य या अन्यायाच्या विरुद्ध उभे केले होते. ज्ञानेश्वरांसारखा प्रतिभावंत आणि नामदेव, एकनाथ यांच्यासारखे थोर कार्यकर्ते बुद्ध महावीरांच्या भूमिकेशी समरस झाले असते तर आज स्वातंत्र्योत्तर काळात जातीपातींचे बंध कदाचित आहेत इतके कठोर वाटले नसते. म्हणूनच असे स्पष्टपणाने विधान करणे भाग पडते की

सामाजिक समता हे संतांचे प्रमुख उद्दिष्टच नव्हते. त्यामुळेच एका बाजूने ' हे विश्वचि माझे घर ' असे भावपूर्ण उद्गार काढणारी ज्ञानेश्वरांची वत्सल वाणी असेही म्हणते की,

देखे अनुक्रमाधारे । स्वधर्म जो आचरे ।
तो मोक्ष तेणे व्यापारे । निश्चित पावे ॥ (अ. ३-८०)
सांधे शूद्रघरी आघवी । पक्वान्न आहाति बरणी ।
तो द्विजे केवी सेवावी । दुर्बळ जरी जाहला ॥ ( अ. ३-२२१ )

शूद्राच्या घरातली पक्वान्ने झाली तरी ब्राह्मणाने ती कशी खायची ? समर्थ रामदास हे तर चातुर्वर्ण्याचे कडवे पुरस्कर्ते ते म्हणतात—

अंत्येज शब्दज्ञता बरवा । परि तो नेऊन काये करावा ॥
ब्राह्मणासान्निध पूजावा । हे तो न घडे की ॥ ( दासबोध ५-१.२६ )

या वचनांच्या पार्श्वभूमीवर चोखामेळा, कर्ममेळा, जनाबाई, तुकाराम यांची वचने लक्षात घेतली तर असे जाणवते की जन्मसिद्ध उच्च, नीचत्वाची कल्पना मुळातच यांना मान्य नाही. ते साहजिकच आहे. भक्ती आणि कवित्वशक्ती यांचे वरदान लाभलेल्या या थोर संतांना सारा जन्म उपेक्षित अवस्थेत काढावा लागला. त्यांच्या व्यथा, वेदना त्यांनीसुद्धा संकोचानेच आपल्या काव्यातून व्यक्त केल्या. हे कवी जुन्या काळातील होते म्हणून त्यांची अभिव्यक्ती काहीशी सौम्यच होती. चोखामेळा आणि तुकाराम आज असते तर त्यांच्या साहित्यातून विद्रोहाचे रसरशीत अंगार फुलून आले असते. पण काळ आणि परिस्थिती यांचा संदर्भ त्यांना लक्षात घेणे भाग होते. ते परंपरेच्या विरुद्ध बंडाची भाषा बोलत असले तरी शास्त्र प्रामाण्याला आणि जातिव्यवस्थेला धक्का लावण्याचे त्यांना धैर्य नाही. ब्राह्मण संत आणि ब्राह्मणेतर संत असा भेदभाव करणे मला प्रशस्त वाटत नसले तरी त्यांच्या मनाची, संस्काराची, व्यक्तित्वाची ठेवण निःसंशय काही प्रमाणात वेगळी आहे. जातीय विषमतेचा जाच जेवढा तुकारामाला झाला तेवढा एकनाथाला होणे शक्यच नव्हते.

सामाजिक समतेच्या संदर्भात संतांचे कार्य अगदीच शून्यवत आणि पराभूत मनोवृत्तीचे आहे असे मानायचे काय ? संत केवळ प्रवाहपतित मनोवृत्तीचे आणि परंपरेचे दासानुदास होते काय ? मला तसे वाटत नाही. काळाचा आणि परिस्थितीचा संदर्भ लक्षात न घेता असे विधान करणे अविचाराचे ठरेल. प्रा. गं. बा सरदार या विचारवंताचे मत याबाबतीत चिंतनीय आहे. ते म्हणतात, ' भौतिक दुरावस्था व मानसिक गुलामगिरी यामुळे सामान्य जनता जडमूढ व अगतिक बनलेली होती. या केविलवाण्या स्थितीतून तिला मुक्त करण्यासाठी संतचळवळ जन्मास आली. या चळवळीचे कार्यक्षेत्र बऱ्याच अंशी धार्मिक व सांस्कृतिक होते. सामाजिक जीवनातील मूलभूत प्रश्नांना तिने हात घातला नाही. युरोपप्रमाणे आर्थिक झगड्याची तिला साथही

मिळाली नाही. शास्त्रप्रामाण्याला व जातिव्यवस्थेला धक्का न लावता वारकरी पंथाने स्त्रीशूद्रादीकांना आत्मविकासाचा मार्ग खुला करून दिला.' प्रा. सरदार यांनी पुढे असेही म्हटले आहे की, 'संतचळवळ ही सामाजिक लढ्यापासून लोकांना परावृत्त करणारी प्रतिगामी शक्ती नसून धार्मिक जीवनाच्या कक्षेत त्यांच्या हक्कांसाठी सनदशीरपणे झगडणारी सुधारणावादी प्रवृत्तीच होती.'

देवाधर्माच्या नावाखाली समाजाच्या अनेक तुकड्यांना एकत्र जोडून त्यांच्यात स्वत्त्व आणि ऐक्य निर्माण करण्याचे साहसी कार्य संतांनी केले. सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने या कार्याला विशेष मोल आहे. शतकानुशतके लोकमनात खदखदत राहिलेल्या उच्चनीच भावाला हळुवार हातांनी निदान भक्तीच्या क्षेत्रात तरी दूर करण्याच्या बाबतीत संतांनी असामान्य यश मिळविले. या क्षेत्रात माणसाच्या कपाळावरची सनातन लेबले त्यांनी काढून टाकली याचा काही अंशी तरी सामाजिक व्यवहारात परिणाम होण्यास मदत झाली. संतांनी वर्णव्यवस्थेचा समाजव्यवहारात पुरस्कार केला असला तरी हा पुरस्कार ते फार आग्रहाने आणि उत्कटपणे करीत राहिले होते असे दिसत नाही. प्रा. सरदार म्हणतात त्याप्रमाणे संतांची शक्ती सुधारणावादी स्वरूपाचीच होती. ते लोकांत राहणारे; लोकांत मिसळलेले, लोकाभिमुख मनोवृत्तीचे लोकनेते होते. त्यांच्या दृष्टीत काही भव्य स्वप्ने तरळत होती. पण ज्या व्यवहाराच्या जमिनीवरून त्यांना चालायचे होते. तिच्यातल्या खाचखळग्यांची जाणीव ठेवूनच पाऊले टाकणे त्यांना भाग पडत होते. नामदेव, तुकाराम आणि इतर कित्येक खालच्या थरातले संत विषम समाजरचनेचे मनःपूर्वक समर्थक होते असे त्यांच्या चरित्रावरून आणि साहित्यावरून वाटत नाही.

एकोणिसाव्या शतकात जातिव्यवस्थेला जबरदस्त हादरे देणाऱ्या समाज सुधारकांचा उदय झाला. त्यांच्या मनावरही संतांच्या मानवतावादी वाणीचे संस्कार झालेले आहेत. संतांच्या वाङ्मयातून त्यांनीही काही प्रमाणात प्रेरणा घेतल्या होत्या. पण जाती आणि वर्ण यांचे वर्चस्व सर्वस्वी नष्ट करण्यात या सुधारकांनाही फारसे यश आले नाही. 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ फसलेली दिसते. भारतीय समाजाच्या हाडीमासी जी स्थितिप्रियता रुजली आहे ती किती चिवट आहे हेच यावरून जाणवते. पण संतांनी बाराव्या तेराव्या शतकापासून जातीय एकतेचे आणि माणसाच्या माणूसपणाला प्रतिष्ठा देण्याचे जे प्रयत्न केले ते सारेच निरर्थक होते व ते सारेच विफल झाले असे निष्कर्ष काढणे इतिहासाच्या दृष्टीने चुकीचे आहे. संतांची सामाजिक जाणीव तीव्र होती आणि ती अस्सल होती यात कसलाही संदेह नाही. त्यांच्या सामाजिक कार्याला अंगभूत स्वरूपाच्या मर्यादा होत्या हे मान्य करून सुद्धा ज्या काळात प्रचाराची साधने अत्यल्प होती आणि ज्या कालखंडात मनुष्याच्या मनावर व बुद्धीवर ज्ञानविज्ञानाचे फारसे संस्कार झालेले नव्हते त्या मध्ययुगीन वातावरणात आपली आत्मशक्ती पणाला लावून समाज जागवण्याचा व तो मानण्याच्या दृष्टिकोनातून

बांधण्याचा संतांनी जो विलक्षण प्रयत्न केला त्याची आठवणसुद्धा आजच्या ज्ञानी मनुष्याला नवी प्रेरणा द्यायला समर्थ आहे. संतांनी सारेच बुडविले आणि अंधश्रद्धेचे एक भाबडे युग निर्माण केले अशी विपर्यस्त टीका करणाऱ्या लोकांना संतांच्या ठायी असलेली प्रबोधनशक्ती किती तेजस्वी आणि प्रभावी होती याची कल्पना करणे शक्य नाही हे त्या लोकांचे दुर्दैव आहे. यापेक्षा अधिक काय म्हणायचे !

□

# साहित्यिक स्वतंत्र आहेत ?

एकदा एका कवीची अस्मिता उफाळून आली. आपल्याला उपदेश करणाऱ्या टीकाकाराला परखडपणाने त्याने विचारले,

'कविता अशी असावी आणि तशी असू नये असे मला सांगण्याचा तुम्हाला काय अधिकार ? तुम्ही कोण ? प्रेम कसे करावे हे प्रेमिकाला सांगण्यात अर्थ असत नाही. तो आपल्या अंतःकरणप्रवृत्तीला अनुसरून प्रेम करील. मी देखील माझ्या प्रकृतीप्रमाणे कविता लिहीन. ती तुम्हाला पसंत पडेल की काय याची चिंता करण्याचे मला कारण नाही. माझी कविता ही माझीच असली पाहिजे.'

कवीचे हे बाणेदार उत्तर समर्थनीयच म्हणावे लागेल. कोणतीही कलाकृती कलावंताच्या स्वतंत्र दृष्टीतून, प्रतिभेतून आणि प्रकृतीतून जेव्हा आकार घेते तेव्हा ती खऱ्या अर्थाने समर्थ बनते यात संशय नाही. कोणाच्या तरी आदेशावरून आपली लेखणी चालविणारा लेखक उत्तम साहित्यकृती निर्माण करू शकेल हे संभवत नाही. लेखकाची लेखणी सर्वस्वी स्वतंत्र आणि मुक्त असावी हा तर्कशुद्ध विचार आहे यात संशय नाही. जेव्हा लेखणीवर आणि वाणीवर वेगवेगळी बंधने पडतात तेव्हा त्यांचा आविष्कार कृत्रिम, दुबळा व प्रभावशून्य झाल्याशिवाय राहात नाही आपल्याला मनापासून वाटते ते प्रामाणिकपणे, निर्भीडपणे लिहिण्याचा अधिकार लेखकांना नसेल तर त्यांचे लेखन 'मोले घातले रडाया नाही आसू नाही माया' या कोटीतले झाल्याशिवाय राहात नाही. ज्या साहित्यकृती माणसाने आपल्या मनात वर्षानुवर्षे जिवाभावाने जपल्या आहेत, त्यांची निर्मिती करणारी प्रतिभा स्वतंत्र होती. ती कुणाची बटीक बनलेली नव्हती. तिने आपल्या सामर्थ्याची मुक्तपणे अभिव्यक्ती केली हे उघड आहे. साहित्याच्या स्वायत्ततेबद्दल आज वाद करण्याचे कारण नाही. स्वातंत्र्याच्या निर्भय वातावरणातच कोणतीही कला आपल्या अंगोपांगांनी रसरसून फुलू शकते याची उदाहरणे मुद्दाम दिली पाहिजेत असे नाही. स्वातंत्र्य हा प्रत्येक साहित्यिकाचा-खरे

तर प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध अधिकार आहे. स्वतंत्र्याचा वारा प्यालेली लेखणी नवनवीन सुंदर स्वप्ने जगाला देऊ शकते. ती ' दुरितांचे तिमिर ' निरसून स्वधर्मसूर्याचा प्रकाश साऱ्या विश्वात पाडण्याची जिद्द धरू शकते. ती ' भला भेटला तर कासेची लंगोटी द्यावी पण नाठाळ भेटला तर त्याच्या माथ्यावर काठी हाणण्याची ' बंडखोर प्रतिकारी भाषा बोलू शकते. मुक्त प्रतिभा नव्या जगाला आकार देऊ शकते. देशोदेशीच्या सरस्वती पुत्रांनी जे उत्तम वाङ्मय निर्माण केले त्याला कारण त्यांनी आपली प्रतिभा, बुद्धी कोणाला विकलेली नव्हती. ' आम्ही काय कुणाचे खातो रे, तो राम आम्हाला देतो रे ' असे ठणठणीतपणे राज्यकर्त्यांनासुद्धा बजावण्याची हिंमत त्यांच्यात होती. आणि म्हणूनच शिवाजी महाराजांनी दिलेली धनदौलत निश्चितपणे परत पाठवण्याची स्वाभिमानी वृत्ती एका गरीब देहूच्या वाण्यात–तुकारामात होती. त्याच्या धारदार, मानी, तेजस्वी, सात्त्विक, न्यायप्रिय पण स्वतंत्र व्यक्तित्वाचे स्पष्ट प्रतिबिंब त्याच्या अभंगवाणीतून पडले आहे. स्वातंत्र्यावर प्रेम करणारे, स्वातंत्र्य हे श्रेष्ठ मूल्य आहे असे मानणारे लेखक, कवी, कलावंत ज्या राष्ट्रात असतात ते राष्ट्र स्वातंत्र्य आणि स्वाभिमान यांनी फुलून येते. साहित्यिकाचे स्वातंत्र्य या दृष्टिकोनातून पाहिले तर अत्यंत महत्त्वाचे आहे यात काय संशय ?

आजची परिस्थिती वेगळी आहे. साहित्य ही शक्ती आहे आणि ती एखाद्या राजकारणासाठी, एखाद्या विचारप्रणालीसाठी आपल्याला राबवून घेता येईल असा धूर्त विचार अलीकडच्या काळात सर्वच देशात झपाट्याने वाढला. आपली लेखन-शक्ती एखाद्या सत्तेच्या किंवा राजकीय स्वार्थाच्या दावणीला बांधणारी लेखक मंडळी या काळात बरीच उदयाला आली. राज्यशासनाभोवती फेर धरून नाचणारे आणि शासनाने दिलेल्या पारितोषिकामुळे, अनुदानामुळे मिंधे झालेले लेखक, कवी आज संख्येने कमी नाहीत. या स्वाभिमानशून्य लेखकांनीच साहित्यिकाची प्रतिभा ही विकत घेण्यासारखी बाजारी वस्तू आहे असे सिद्ध केले नाही काय ? लाचार माणसे सर्वत्रच असतात. पण आज मराठी साहित्याच्या क्षेत्रात या मंडळींची जी भाऊगर्दी झालेली दिसते ती पाहिल्यावर आश्चर्याचा धक्का बसतो. साहित्याच्या स्वायत्ततेबद्दल व्यासपीठावरून व्याख्यान देणारे काही साहित्यिक मंत्रीमहाशयाच्या एका स्मित-भेटीची अपेक्षा करीत तासनतास मंत्र्याच्या दारात घोटाळत असलेली दिसतात. एखाद्या समितीवर आपली वर्णी लागावी, एखाद्या शासकीय मंडळात आपल्याला जागा मिळावी यासाठी अनंत लटपटी करीत राहिलेल्या या लेखकांना स्वातंत्र्याबद्दल बोलण्याचा काय अधिकार आहे ? लेखकांच्या स्वातंत्र्यावर व साहित्याच्या स्वायत्ततेवर या लेखकांनीच प्रहार करण्याची प्रेरणा शासनाला दिली असा आरोप केला तर चुकीचा ठरेल काय ? मुंबईच्या साहित्यसंमेलनात शासनविरोधी भूमिका घेतलेल्या काही साहित्यिकांनी पूर्वी अनेकवेळा शासनाच्या कृपाकटाक्षाची याचना केली आहे. जेव्हा त्यांच्या पदरात काही पडत होते, तेव्हा शासनाच्या औदार्याचे गोडवे गाण्यात,

समर्थन करण्यात लोचट धन्यता मानणारे हे काही लोक आज मात्र 'साहित्याची स्वायत्तता धोक्यात आली.' 'मंत्र्यांनी आपली तोंडे संमेलनात दाखवू नयेत' अशी गर्जना करीत आहेत. साहित्याच्या स्वातंत्र्याबद्दलचे हे प्रेम नाटकी असू नये, ते प्रामाणिक असावे व कोणत्याही काळात आणि परिस्थितीत साहित्याच्या संचारावर कोणत्याही शासनाने बंधन लादू नये अशी स्वच्छ, निरपवाद, तात्त्विक, आग्रही भूमिका घेतली पाहिजे. शासकीय पारितोषिकांवर बहिष्कार टाकावा असे सांगणाऱ्या एका लेखकाने दोनतीन वर्षांपूर्वी आपल्या पुस्तकाला पारितोषिक मिळावे म्हणून मंत्री आणि परीक्षक यांच्यापुढे आपल्या इमानी लांगूलचालनाचे गोंडस प्रदर्शन केले होते. हा दुहेरी अथवा दुटप्पी प्रकार लेखकांनी बंद केला पाहिजे. कारण साहित्याचे स्वातंत्र्य मर्यादित करणारी एक हुकुमशाही शक्ती यातून निर्माण होण्यास मदत होत असते.

एखाद्या पक्षीय विचारसरणीला किंवा सांप्रदायिक विचाराला बांधून घेतलेले काही लेखक असतात. त्यांच्या त्या निष्ठा जर प्रामाणिक असतील तर मला काहीच म्हणायचे नाही. तसे करण्याचा त्यांना अधिकार आहे. पण त्यांची ही 'बांधिलकी' उत्स्फूर्त असावी. कोणत्यातरी स्वार्थाने ती त्यांनी स्वीकारली की त्यांच्या लेखनातले स्वयंभू तेज मावळून जाते ही माझी मुख्य तक्रार आहे. कौरवांची बाजू न्यायाची नाही हे माहीत असूनसुद्धा त्यांचेच समर्थन करीत राहिलेल्या काही आचार्यांची केविलवाणी अवस्था मला येथे आठवते. 'अर्थस्य पुरुषो दासः' अशी कबुली देणाऱ्या भीष्म, द्रोणांनी विचारवंतांच्या मानसिक आणि बौद्धिक दास्यावर विदारक प्रकाश टाकला आहे. माणसे अशीच असायची. स्वाभिमानी आणि स्वतंत्र माणसे आकाशातून खाली पडत नाहीत हे मान्य करूनसुद्धा लेखक कवींना त्यांचा स्वतःचा असा वैचारिक कणा असावा. तो त्यांनी स्वतःच जोपासावा म्हणजे साहित्यनिर्मिती करणाऱ्या प्रतिभावंताच्या वाटेला जाण्याची हिंमत शासनालाही होणार नाही. लेखकांच्या स्वयंप्रभ व्यक्तित्वाची उभारणी होण्यासाठी त्याच्या मनात स्वाभिमानाची, स्वातंत्र्यप्रेमाची बीजधारणा व्हावी लागते, असा साहित्यिक कुणाचाच गुलाम असत नाही. गुलामगिरीचे साखळदंड तोडण्याची जबरदस्त प्रेरणा तो साहित्यातून देऊ शकतो. त्याच्या कलाशक्तीवर कोणतीही बाह्य संघटित स्वरूपाची शक्ती, मग ती राजकीय, शासकीय वा धार्मिक असो ती निर्बंध घालू शकणार नाही. रोमरोमांतून स्वतंत्र वृत्ती उचंबळणाऱ्या काही लेखक कवींचे आजही दर्शन होते तेव्हा ते नव्या प्रेरणा किती निष्ठेने देऊ शकतात हे प्रत्ययाला येते. त्याने काहीतरी नवीन प्रेरणा दिल्याच पाहिजेत असा आग्रह धरण्याचेही कारण नाही. स्वातंत्र्याच्या वातावरणात त्याचा आत्मविकास होत राहातो. आपल्या स्वातंत्र्याची मनःपूर्वक जपणूक करण्याचा प्रयत्न स्वतः लेखक कवींनीच फारसा केला नाही हे शल्य माझ्या मनात आहे.

साहित्याच्या स्वायत्ततेवर आघात करणाऱ्या बाह्य शक्ती रोखून धरल्या म्हणजे

साहित्य हे संपूर्णपणे स्वतंत्र राहिल असे म्हणतात येईल काय ? आम्हाला जे इष्ट वाटते ते आम्ही लिहिणार हा आग्रह सयुक्तिक आहे. पण खरोखरच लेखक, कलावंत तत्त्वचिंतक 'स्वतंत्र' वातावरणात 'स्वतंत्र' मनाने निर्मिती करीत असतो काय ? स्वातंत्र्य ही बाहेरून मिळणारी घटना नसून ती कलावंतांच्या आंतरिक विचारातून स्फुरलेली, निर्माण झालेली आहे. लेखकाची निर्मिती, त्याचे भाव-विश्व, त्याचे जीवन-विषयक तत्त्वज्ञान सर्वस्वी स्वतंत्र केवळ त्याचे स्वतःचे असते असे मात्र मुळीच म्हणता येणार नाही. त्याचे व्यक्तित्व ही देखील पूर्णपणे स्वतंत्र अशी घटना असत नाही. लेखक हा समाजाचा एक अपरिहार्य घटक असतो. विशिष्ट सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीतून, संस्कारातून त्यांच्या व्यक्तित्वाची जडणघडण होत राहते. समाजनिरपेक्ष असे मन किंवा व्यक्तित्व असूच शकत नाही. भोवतालच्या समाज-जीवनाचे असंख्य संस्कार घेऊन प्रतिभावंत हा आकाराला येत असतो. त्यामुळेच आपण सर्वस्वी स्वतंत्र निर्मिती करीत आहोत हा त्यांचा दावा कसा मान्य करता येईल ? व्यक्ती स्वतंत्र असली तरी ती एकाकी असत नाही. ती समाजाचा मूलभूत घटक असते. बीज एकटे, स्वतंत्र असले तरी जेव्हा ते मातीत रुजते तेव्हा मातीच्या बऱ्यावाईट गुणधर्मांचा संस्कार घेऊन ते अंकुरत वाढत राहते. लेखकाची साहित्य कृती ही त्याच्या स्वतंत्र मनाची अभिव्यक्ती आहे असे विधान करताना हे स्वतंत्र मन आजू-बाजूच्या सामाजिक व राजकीय आणि अन्य अनेक प्रकारच्या अवस्थांतून मळलेले आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्याने जी भाषा उचलली आहे ती भाषा देखील त्याच्या स्वतःच्या मालकीची असत नाही. सामाजिक संकेतातून तयार झालेली एक भाषा तो स्वीकारतो. व सुखदुःखात्मक जीवनाला रेखाटण्याचा प्रयत्न करतो. जीवनाचाच आधार त्याला असतो या अर्थानेही त्यानी निर्मितीशीलता ही केवळ एका व्यक्ति-मनाची घटना नसते. कित्येक लेखकांचा असा भ्रम आहे की आपण जे लिहितो ते पूर्णपणे स्वतंत्र आहे. पण त्याच्या स्वातंत्र्याला कित्येक मूलभूत मर्यादा पडलेल्या असतात. त्या त्याला जाणवू नयेत ही एक आश्चर्याचीच गोष्ट वाटते. अनेक लेखक प्रवाहपतित असतात. कोणत्यातरी प्रवाहाबरोबर ते वहात किंवा वाहावत जातात. पण आपल्याला स्वतःची मती आहे अशी भ्रामक समजूत करून घेतात. घाण्याभोवती डोळ्यांवर ढापणे बांधून फिरत राहणाऱ्या बैलाला कदाचित पुष्कळ प्रवास केल्याचा आनंद वाटत असेल. पण तेथे गती असली तरी प्रगती मात्र नाही. नव्या जुन्या संकेतांच्या व रूढीच्या भोवती प्रदक्षिणा घालीत बसलेल्या कवी लेखकांना 'स्वतंत्र' हे विशेषण कोणत्या अर्थाने देता येईल ? कितीतरी साहित्यिकांच्या जाणिवांना, अनुभवांना बुद्धीला अनेक प्रकारची कुंपणे पडलेली दिसतात. पण ही कुंपणे त्यांना स्वतःला जाणवतच नाहीत. त्यामुळे त्याच त्या जुन्या, मळलेल्या आणि रुळलेल्या वाटेने चालत राहण्यात धन्यता मानणाऱ्या या वाङ्मयकारांनी स्वतःच आपल्या स्वातंत्र्यावर नकळत कितीतरी बंधने लावलेली आहेत. सरकारी बंधने दिसू शकतात

कारण ती ढोबळ आहेत, पण लेखक आपणच निर्माण केलेल्या किंवा आपल्याभोवती उभ्या राहिलेल्या चार भिंतीतच आत्मसंतुष्टपणाने दिवस काढतो तेव्हा तो लेखकाच्या मूलभूत स्वातंत्र्याचाच एक अर्थाने घात करीत असतो असेच म्हणावे लागेल. काही चांगल्या प्रतिभावंतांनी तर लोकाभिरुचीचे लोकानुनयाचे दास्य पत्करलेले असते. जे लोकांना आवडते ते चांगल्याचुंगल्या भाषेच्या आणि तंत्राच्या लेबलातून त्यांना पुरवीत राहण्याचे घाऊक कंत्राट त्यांनी घेतलेले असते. त्यांची प्रतिभा हळूहळू या लोक-रंजनाच्या पिंजऱ्यातच अडकून पडते. नवनवीन वाटा शोधण्याचे, नवनवीन अनुभवांचा वेध घेण्याचे आणि अनेक अंगांनी माणूस समजावून घेण्याचे जे स्वातंत्र्य—जे जन्मजात स्वातंत्र्य कलावंताला असते त्याचाच घात मनोरंजनाचा गंडा हातात बांधून बसलेले हे कंत्राटदार व्यापारी करीत नाहीत काय? बाहेरून लादलेली बंधने जेवढी साहित्याला विनाशक असतात त्यापेक्षाही लेखकाने स्वतःच स्वतःवर लादून घेतलेली बंधने अधिक विध्वंसक असतात. शासनाने कसलाही हस्तक्षेप केला नाही तरीही त्या लेखकांना साहित्याच्या स्वातंत्र्याचा व्यापक अर्थ कधीच समजला नाही. असे लेखक कोणत्या प्रकारची साहित्यनिर्मिती करणार हा खरा प्रश्न आहे. बाह्य बंधनाच्या विरुद्ध आवाज उठविणे सोपे आहे तो जरूर उठवला पाहिजे. पण जी बंधने साहित्यिक स्वतःच कळत न कळत स्वीकारतो आणि त्यामुळे स्वतःचे स्वातंत्र्य गमावून बसतो—त्याची खंत लेखकांना वाटली पाहिजे. स्वातंत्र्य आणि स्वायत्तता या शब्दांचा उद्घोष करणाऱ्या लेखकांनी या संदर्भात आत्मपरीक्षण केले व स्वतःभोवती बांधलेल्या कृत्रिम तटबंदीतून मुक्त होण्याची त्यांनी धडपड केली तर त्यांना खऱ्या स्वातंत्र्याचा वेध घेता यईल.

कोणत्याही कलावंताने आपल्या आंतरिक प्रकृतीवर, प्रज्ञेवर, नितांत प्रेम करीत एक प्रकारच्या धुंदीत किंवा अधिक स्पष्ट बोलायचे तर मस्तीत वावरायला शिकले पाहिजे. मात्र त्याला आजूबाजूच्या परिस्थितीचे, समाजाचे जिवंत भान असलेच पाहिजे. आपल्या प्रतिभेवर पूर्ण विश्वास असलेल्या बाणेदार साहित्यिकाच्या स्वाभिमानाशी सौदा करण्याचा मोह कुठल्याही शासनाला किंवा मंत्र्याला होणार नाही. मंत्र्यापुढे मान हालवीत बसलेल्या लोचट साहित्यिकाचे स्वातंत्र्य खरे तर त्याने स्वतःच गमावलेले असते. किंवा अधिक खरे सांगायचे तर ते मुळातच त्याच्यापाशी नसते. त्यामुळे गमविण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

स्वातंत्र्य या संकल्पनेचा साहित्याच्या संदर्भात अगदीच स्थूल असा विचार लेखकांनी करू नये. पक्ष, राजकारण, शासन एखादा विशिष्ट संप्रदाय यातून साहित्याच्या स्वातंत्र्यावर अनेक वेळा आक्रमणे होतात हे नाकारण्यात अर्थ नाही. हुकुमशाही राष्ट्रात तर लेखकाच्या लेखणीची व त्यांच्या वाणीची धास्ती घेतलेल्या राज्यकर्त्यांनी तिच्यावर सतत कडक पहारा ठेवलेला दिसतो. पण जुलमी राज्यसत्ता उलथून पाडण्याची ताकद मनाने सदैव स्वतंत्र असलेल्या लेखकांत आणि पत्रकारांत

असते याचे प्रत्यंतर आपल्याला अनेक वेळा आले आहे. श्रेष्ठ साहित्यिक हा स्वातंत्र्याचा एक रमणीय अविष्कार असतो. म्हणूनच आपले साहित्य आपल्या स्वतंत्र मनःसृष्टीत फुलवण्याचा प्रयत्न साहित्यिकांनी केला पाहिजे. एखाद्या राजकीय व्यवस्थेला किंवा शासनाला विरोध करण्यातच स्वातंत्र्याची उपासना आहे असा मर्यादित अर्थ आम्ही करू नये. लेखकाच्या स्वातंत्र्याला विरोधी असणाऱ्या सर्व प्रकारच्या स्थूल आम्ही सूक्ष्म, बाह्य आणि अंतर्गत शक्तींना जागरूक विरोध करण्याची आवश्यकता आहे. हा विरोध तत्त्वनिष्ठेतून उत्पन्न व्हावा, खाजगी आकुंचित स्वार्थातून नव्हे. साहित्यिकांचे स्वातंत्र्य म्हणजे आजूबाजूचा समाज दुःख आणि अन्याय यांच्या वरवंट्याखाली चिरडला जात असताना केवळ व्यक्तिगत सुखाची आणि उन्मादाची गोड गोड चित्रे रंगवीत बसणे नव्हे. असले स्वातंत्र्य लेखकांचा आणि पर्यायाने समाजाचा घात करील.

□

# काही रंग : काही रेषा

अेका रसिक समीक्षकाच्या मुक्त चिंतनाचा हा आविष्कार.

डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी साहित्यातील विविध प्रवृत्तींचे व प्रवाहांचे घडवलेले हे रुचिर दर्शन.

कोणताही पूर्वग्रह घेऊन ते साहित्याकडे जात नाहीत. संवेद्य मनाने ते प्रतिसाद देतात. साहित्यातील निरनिराळे रंग व रेषा यांचा मागोवा घेतात.

अेका ललित सुंदर शैलीचा सुखद प्रत्यय या लेखांतून येत राहातो. पण साहित्यातल्या अपप्रवृत्तीवर जेव्हा ते तुटून पडतात तेव्हा या हळुवार, काव्यात्म शैलीला अेक आक्रमक रुप येते.

या समीक्षा लेखांचें स्वरुप म्हणूनच अभ्यास जड, रुक्ष नाही. लेखकाच्या चिंतनशील वृत्तीत भावनेचा ओलावा आहे म्हणून हा ललित लेखसंग्रह वाचकांना आवडेल.